उत्सवाचे रूप । आनंद सोहळा । सच्चिदानंद झाला । सृष्टि स्वरूप ।।१।।
नरदेह असा । आनंदाचा डोह । धर्म कर्म साधा । ओळखून ।।२।।
उत्सवाच्या ठायी । दु:ख भोग झाडा । आनंदे निवाडा । नरदेही ।।३।।
स्वरूप ओळखा । मनोस्वरूपाने । उत्सव साधणे । अनिल म्हणे ।।४।।

# उत्सव

प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे

मोरया प्रकाशन
सुविचार आणि सुसंस्कार यांचा प्रसार हाच आमचा विचार

**उत्सव (तत्त्वज्ञानात्मक चिंतन (तत्त्वज्ञान/वैचारिक)**
**(UTSAV) (Philosophical Thinking)**

**लेखक : प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.in

© **सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**

**प्रकाशक / मुद्रक**
दिलीप महाजन / गौरी देव / योगिनी आठल्ये
मोरया प्रकाशन
'अनुश्री', ४०/१०, एरंडवणा, पुणे ४११०३८
मो. ९२२३५०१७९७, ८६००१६६२९७
६, 'दिव्यकुंज'. सुदर्शननगर, R10 एम.आय.डी.सी.,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०३
email : info@moryaprakashan.com
web. www.moryaprakashan.com

**प्रस्तावना** : श्री. अभय टिळक

**प्रथमावृत्ती : २०२३**

ISBN - 978-93-92269-60-8

**अक्षरजुळणी** : श्रीपाद कुलकर्णी

**मुखपृष्ठ** : चैतन्य खरे

**मूल्य** : रु. २००/-

आईस –

# उत्सव अंतरंग अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना – अभय टिळक | ०५ |
| १. | संवाद | १७ |
| २. | सच्चिदानंद परब्रह्म | २२ |
| ३. | उत्सव | २९ |
| ४. | दैवतकथा आणि वन्य, कृषी व दर्यावर्दी जीवन यांतील उत्सव : अनुबंध | ४८ |
| ५. | वंश आणि कुटुंब यांतील उत्सव मालिका | ८१ |
| ६. | सामाजिक व सांस्कृतिक उत्सव | १०० |
| ७. | राजकीय तथा राष्ट्रीय उत्सव परंपरा | ११८ |
| ८. | भाग्ये नरदेह लाभला – उत्सव साधा | १३७ |

# ‘उत्सव’ –

## संत विचारविषयक अवघ्या शब्दरूपाचे आगळेपण...

**– अभय टिळक**

विश्वाच्या निर्मितीबाबतची विविध स्पष्टीकरणे, सिद्धान्तने आजवर सादर केली गेलेली आहेत. मात्र, जगाची उत्पत्ती कोणी का व कशी केली याचा धांडोळा घेण्यात संशोधकांच्या आजवर कैक पिढ्या झगडत आलेल्या आहेत. आजही ना तो शोध थांबला ना ती जिज्ञासा शांतवली. या शोधात केवळ भौतिकशास्त्री होते असेच काही नाही. आधिभौतिकशास्त्र्यांनीही या प्रश्नाच्या मुळाशी तळाशी घेण्याचा निकराचा प्रयत्न सतत चालविलेला आहे. ज्या भौतिक जगात आपण प्रत्यही जगत असतो त्या जगाची उत्पत्ती कशी झाली यांबाबत आजपर्यंत त्या मानाने चौफेर संशोधन व लेखन झालेले आपण पाहतो. हे सारे शोधन बव्हंशी जगाची जडणघडण, त्याची रचना, त्या रचनेत अनुस्युत असणारे नियम, विश्वरचनेतील बदलांच्या मुळाशी असणारे घटक, त्यांचे गुणदोष व स्वभावधर्म यांसारख्या बाबींसंदर्भातीलच दिसते. परंतु, या जगाचे स्वरूप नेमके आहे तरी कसे आणि त्याचबरोबर या दृश्य विश्वाचा स्वभाव कसा आहे, या, त्यांमानाने सूक्ष्म पैलूंसंदर्भात मात्र, भौतिकाच्या प्रांतात फार काही शोधन–बोधन झालेले सहजासहजी हाताला लागत नाही. या प्रांतात मुख्यतः मुशाफिरी केलेली आढळते ती अध्यात्मशास्त्रींनी. शोधाचा हा प्रांत कमालीचा सूक्ष्म आणि म्हणूनच जटिल ठरतो. विश्वाचा जो कोणी निर्माता असेल त्याचे अंतरंग नेमकेपणाने जाणून घ्यायचे तर, ज्ञानदेव म्हणतात त्या प्रमाणे, शोधाच्या त्या प्रदेशात प्रवेश मिळतो तो ‘अंतरंगचि अधिकारिये’ या कोटीतील जिज्ञासूंना. सृष्टीचा जो कोणी निर्मिक

असेल त्याचे स्वरूप आकळले तर त्याच्या स्वभावाचा काहीसा अंदाज येऊ न विश्वपसाऱ्याच्या निर्मितीसाठी तो अथवा ती का प्रवर्तली असावी, यांसंदर्भातील काही प्रमेये सिद्ध करता येतील. या प्रांतातील संशोधकांना आम्ही म्हणतो 'संत'. ज्याने कोणी हे जग ज्या हेतूने निर्माण केलेले आहे ते जग अधिक सुभग, निरामय, आनंदी बनण्यासाठी जे आपले आयुष्य खर्ची घालतात तो संत, अशी 'संत' या कोटीची सोपी, सम्यक् आणि अर्थवाही व्याख्या तुकोबांनी करून ठेवलेली आहे. साहजिकच, या विश्वाचा आणि त्यातील लोकव्यवहाराचा पोत कल्याणप्रद बनावा यासाठी त्यात आवश्यक ते परिवर्तन घडवून आणण्यासाठी झगडणारे संतप्रवृत्तीचे समाजसुधारकही जगाच्या निर्मात्याबद्दल जिज्ञासा बाळगून असावेत, हे स्वाभाविकच ठरते. महात्मा जोतीराव फुले हे या संदर्भातील आद्य उदाहरण. किंबहुना, जगाच्या जन्मदात्यासाठी 'निर्मिक' ही आगळी संज्ञा प्रस्थापित करणारेही तेच.

जगाचे स्वरूप आणि स्वभाव जाणून घेणे हे जिकिरीचे का शाबीत होते, याचा उलगडा होण्यासाठी आपल्याला त्या संदर्भातील कार्यकारणभावाच्या मुळाशी जावे लागते. कारणाशिवाय कार्याची उत्पत्ती अशक्य आणि कारणाचे सारे गुणदोष कार्यात उतरतात, या दोन प्रमेयांवर अवघा कार्यकारणभाव तोललेला आहे, म्हणजेच जगाचे स्वरूप आणि स्वभाव जर जाणून घ्यायचा असेल तर या जगाचा जो कोणी निर्मिक आहे त्याचे स्वरूप आणि स्वभाव जाणून घेणे, कार्यकारणभावानुसार, क्रमप्राप्त ठरते. भौतिकशास्त्राच्या जिज्ञासू संशोधकांचे बोट धरणे शोधाच्या या प्रांतात अप्रस्तुत ठरते. साहजिकच, त्यासाठी आम्हांला मग हात धरावा लागतो अध्यात्मशास्त्राच्या प्रांतातील अंतरंगअधिकारी संतविभूतींचा जग जगाचे आदिकारण, जगातील चराचर वस्तुमात्र, या वस्तुमात्रांचे परस्परांशी असणारे नाते आणि या सगळ्या दृश्य विश्वपसाऱ्याचा त्याच्या निर्मिकाशी असलेला अनुबंध यांबाबत स्वानुभूतीसंपन्न कथन मांडणाऱ्या विभूतिमत्त्वांच्या शब्दनिधीला आम्ही म्हणतो 'संतसाहित्य' जीव जगत-जगदीश्वर या त्रिपुटीच्या परस्परनात्याचे आणि त्या नातेसंबंधाद्वारे फुलणाऱ्या अवघ्या व्यवहाराचे संतप्रणित आकलन आम्हांला घडते संतसाहित्यामध्ये. संतबोध आम्हांला घडवतो जगाच्या निर्मिकाचे आणि पर्यायाने विश्वपसाऱ्याचे स्वरूप आणि स्वभावदर्शन. संतांच्या अनुभवसिद्ध शब्दकळेचा मागोवा घेत दृश्य विश्व आणि त्याचे आदिकारण

असणाऱ्या विश्वनिर्मात्याचे स्वरूप आणि स्वभाव समजावून घेण्याचा निरलस प्रयत्न करणे, या प्रबळ व प्रधान हेतूने संतविचाराचा अवकाश न्याहाळण्यास प्रवृत्त होणाऱ्या अतिशय मोजक्या श्रद्धावान चिकित्सक अभ्यासकांमध्ये डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचा अंतर्भाव होतो. या शोधयात्रेदरम्यान आपल्या हाताला लागलेले आकलनाचे कवडसे, 'सेवितो हा रस वाटितो आणिका' या निखळ ऊर्मीने प्रेरित होऊन शब्दबद्ध करण्याच्या बांधिलकीमधून डॉ. सहस्रबुद्धे यांचे संतविचारविषयक असे आजवरचे लेखन अंकुरलेले आहे. 'उत्सव' हा प्रस्तुत दस्तऐवज म्हणजे त्याच प्रेरणेचा एक ताजा व तेजाळ कवडसा.

शब्द हे कोणत्याही साहित्यव्यवहाराचे स्वाभाविक मूलद्रव्य असल्याने शब्द हेच साहित्याभ्यासाचे आदिसाधन ठरते. संतसाहित्यालाही हाच न्याय साहजिकच लागू होतो. परंतु, संतसाहित्याचे आलोडन म्हणजे संतबोधाचा केवळ शाब्दिक अभ्यास नव्हे, ही जाण संतसाहित्याच्या अभ्यासकांमध्ये अभावानेच आढळते. संतांचे शब्द ज्या अनुबोधाचे दर्शन घडवतात त्या अनुभवाची जातकुळी जाणून घेत त्या अनुभवाचे सौंदर्य न्याहाळण्याचा प्रयत्न करणे इथे अभिप्रेत आहे अथवा असते, याची जाणीव असणारे अभ्यासक अतिशय दुर्मिळच. डॉ. सहस्रबुद्धे यांचा समावेश दुर्मिळांच्या त्याच गटात होतो. डॉ. सहस्रबुद्धे यांनी आजवर प्रसवलेल्या संतविचारविषयक अवघ्या शब्दरूपाचे आगळेपण नेमके इथेच सामावलेले आहे. ते हाडाने आणि वृत्तीने संशोधक आहेत, यात वादच नाही. मात्र, कोरड्या व तटस्थ चिकित्सेने त्यांच्यातील सश्रद्ध अभ्यासकावर निर्दय अतिक्रमण केलेले नाही.

संतांच्या वचनांइतकीच त्यांच्या अंतःकरणात आस्था नांदते ती संतवचनांना जी 'मात' समाजपुरुषाला सांगायची अथवा ऐकवायची आहे तिच्याप्रत. संतांच्या शब्दकळेद्वारे प्रगटणाऱ्या त्यांच्या कारुण्यभरित हृदयातील प्रेरणांचे आवाहन आपल्या मनःपटलावर बिंबवण्याच्या विशुद्ध हेतूने संतवचनांच्या जिज्ञासू अभ्यासकांनी संतबोलांचा मागोवा घ्यावा, ही डॉ. सहस्रबुद्धे यांच्या अंतःकरणाची आस आहे. 'संतवचनांची मात' या श्रीगंधर्ववेद प्रकाशनाने २०२१ साली प्रकाशित केलेल्या त्यांच्या ग्रंथातील प्रत्येक प्रकरणात डॉ. सहस्रबुद्धे यांची ती पोटतिडिक प्रकर्षाने शब्दांकित झालेली दिसते. संतसाहित्याच्या विद्यापीठीय अभ्यासकांबरोबरच संतवचनांचे उपयोजन आपापल्या कार्यक्षेत्रातील चळवळींसाठी आवर्जून

करणाऱ्या समाजकारणातील नेत्यांना आणि त्यांच्या अनुयायांना नेमक्या त्याच वस्तुस्थितीचा विसर पडतो आहे, या वास्तवाबाबत डॉ. सहस्रबुद्धे यांच्या मनोमन दाटलेली खंत त्यांच्या श्रीगंधर्ववेद प्रकाशनानेच २०१८ साली प्रकाशित केलेल्या 'संतवाङ् मयाच्या आशयनिष्ठ अभ्यासाची दिशा' या पुस्तकाच्या शब्दाशब्दातून डोकवते.

तर्क आणि श्रद्धा यांचे नाते अहिनकुलवतच असावयास हवे, ही आपली एक अतिशय लाडकी आणि तितकीच भ्रममूलक धारणा आहे. भौतिकाइतकेच आधिभौतिकाच्या प्रांतातील संशोधनदेखील प्रांजळ जिज्ञासा तर्कनिष्ठ विचार आणि सूक्ष्म निरीक्षण – विश्लेषणादी साधनसामग्रीची मागणी करते, ही बाब सहजासहजी फारशा कोणाच्या ध्यानी येत नाही. लौकिक व्यवहाराशी संलग्न बाबींसंदर्भातील संशोधनाचे निष्कर्ष वस्तुनिष्ठ असतात तर आधिभौतिकाच्या प्रदेशातील शोधनाद्वारे गवसणारे सत्य व्यक्तिनिष्ठ असते. आंतरविश्वातील गुह्यांचे आकलन व दर्शन व्यक्तिनिष्ठच असल्यामुळे त्याचे साधारणीकरण शक्य नसते, हेही मान्य, परंतु, केवळ त्या आणि तेवढ्याच कारणासाठी आधिभौतिकातील संशोधनाची महत्ता आणि प्रामाण्य नाकारणे अथवा दुय्यम लेखणे, ही संशोधन आणि संशोधकीय व्रत वृत्ती या दोहोंशीही प्रतारणा ठरते. डॉ. सहस्रबुद्धे यांची संशोधकीय प्रेरणा आणि प्रतिभा या प्रतारणेने कलंकित झालेली नाही. भौतिक जगाचे आकलन करून घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अध्ययन संशोधनाची सामग्री स्थूल आणि वस्तुरूप असते. तर, अंतर्जगाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी अनिवार्य गणले जाणारे साधनही त्या जगाइतकेच सूक्ष्म, व्यामिश्र आणि तरल असते. 'मन' हे त्या साधनाचे नाव संतांचे शब्द ज्या शब्दातीत वस्तूचा निर्देश करतात त्या वस्तूचे रूप–स्वरूप हस्तगत करायचे तर त्या प्रक्रियेचे एकमेव साधन असणारे मनदेखील तितकेच परिष्कृत असणे (आणि ते तसे नसेल तर प्रयासपूर्वक ते परिष्कृत बनवणे) अनिवार्य असते ही निष्ठा डॉ. सहस्रबुद्धे यांनी संतविचाराच्या त्यांच्या अवघ्या अभ्यासादरम्यान डोळसपणे जपली–जोपासलेली आहे. संतांचे अनुभवविश्व आणि त्या विश्वाचे अधिष्ठान असणारे, विश्वरूपाने नटलेले प्रगटलेले विश्वात्मक आदितत्य मन–बुद्धीच्या पातळीवर अवगाहन करून घ्यायचे झाले तरी त्यासाठी मनावर काही संस्करण अत्यावश्यक ठरते. किंबहुना जगाचे आणि त्याच्या माध्यमातून प्रतीत होणाऱ्या त्याच्या निर्मिकाच्या स्वरूपाचे

पायाशुद्ध शब्दज्ञान करून घेण्यासाठीच संतबोधाची कास धरावयाची असते, ही डॉ. सहस्रबुद्धे यांची धारणा, 'संतप्रबोधित मनोस्वरूप विचार' या त्यांच्या २०२१ साली, मोरया प्रकाशनाच्या माध्यमातून अवतरलेल्या अक्षरसंचिताद्वारे प्रगटलेली दिसते.

आपल्या देशातील वैचारिक परंपरेमध्ये जगाविषयीची जिज्ञासा प्रथम शब्दबद्ध झालेली आढळते ती जगातील सर्वांत प्राचीन वाङ्मय गणल्या जाणाऱ्या ऋग्वेदातील नासदीय सूक्तामध्ये निरामय, निश्चल, निराकार असणारे एक निरुपाधिक असे तत्त्व या विश्वाचे आदिकारण होय, हा होय नासदीय सूक्तामधील सृष्टिनिर्मितीविषयक कथनाचा गाभा. विश्वाच्या या आदिकारणातच प्रथम मनोरूप बीजाची उत्पत्ती होते आणि त्या बीजाच्या ठायी काम (म्हणजे इच्छा) उत्पन्न होऊन क्रमाने सृष्टीची रचना साकारते, असा क्रम नासदीय सूक्त आपल्या पुढ्यात मांडते. महत्–तत्त्वाचे आणि त्या तत्त्वाच्या महत्–मनाचे हे जे नाते नासदीय सूक्त मांडते तेच व तसेच नाते सृष्टीतील प्राणिमात्रांचे अधिष्ठान असणारे आत्मतत्त्व आणि त्या प्राणिमात्रांचे मन यांच्यादरम्यान नांदते, हे सूत्र डॉ. सहस्रबुद्धे मांडतात. २०२१ सालीच मोरया प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या त्यांच्या 'मनोस्वरूप विचार' या दस्तऐवजाद्वारे आत्मतत्त्वाचे आद्य प्रगटीकरण मनामध्ये घडून येते, हा डॉ. सहस्रबुद्धे यांचा 'मनोस्वरूप विचार' या ग्रंथातील प्रतिपाद्य सारभूत गाभा विश्वाचे अधिष्ठान असणारे परमतत्त्व आणि त्याच विश्वाचा अंश असणाऱ्या जीवमात्रांचे आदिस्वरूप असणारे आत्मतत्त्व यांचा अभिजात असा जैविक संबंध डॉ. सहस्रबुद्धे यांनी त्यांच्या 'मनोस्वरूप विचार' आणि 'संतप्रबोधित मनोस्वरूप विचार' या जोडग्रंथांद्वारे विशद केलेला आहे. आत्मतत्त्व आणि परमात्मतत्त्व यांचे स्वरूपसिद्ध असणारे अन्योन्य नाते प्रतीत होण्यात अडथळा ठरणारे मानवी मनाचे मालिन्य निवारण्यासाठीच संतबोधाची साधना अगत्याची ठरते, हा प्राचार्य सहस्रबुद्धे यांच्या संतसाहित्यविषयक विचारविमर्शाचा केंद्रवर्ती सांगावा होय. 'उत्सव' या त्यांच्या प्रस्तुत ग्रंथाच्या निर्मितीमागे संतबोधविषयक चिंतनाचे केवढे संचित सज्ज आहे, याची कल्पना यावी म्हणून हा विस्तृत आढावा प्रस्तुत व आवश्यक ठरतो.

संतपरंपरा आणि त्या परंपरेने रुजवलेली जीवनमूल्ये या संदर्भात डॉ. सहस्रबुद्धे आजवर जे चिंतन करत आलेले आहेत त्यांत एक अंतर्गत सूत्र आहे.

केवळ इतकेच नाही तर, त्यांचे संतबोधविषयक मनन सतत उत्क्रांत होत आलेले दिसते. 'उत्सव' ही साहित्यकृती म्हणजे त्याच उत्क्रांतीचा पुढील टप्पा ठरतो. ज्या जगाचे आपण घटक आहोत ते जग आणि त्याचा निर्माता यांच्याशी आपले नाते नेमके कशा प्रकारचे आहे, याचा शोध घेणाऱ्या पंथाला आम्ही 'अध्यात्म' असे म्हणतो. हा शोध ज्याचा त्याने घ्यायचा असतो. त्यासाठी अंतर्मुख बनून खूप सावधगिरीने आणि कसोशीने प्रथम आपलाच शोध लावण्यासाठी कंबर कसावी लागते. आपण आणि भवतालचे विश्व यांचा आतड्याचा संबंध आहे, आपण आणि जग ही दोन भिन्न अस्तित्वे नाहीत, याची खूणगाठ पटणे, ही त्या शोधाची अंतिम परिणती गणली जाते. आत्मानुभूतीपूर्ण विभूतींनी त्यांच्या या प्रवासाचा शब्दांच्या माध्यमातून चितारलेला आलेख म्हणजे संतसाहित्य. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर आपल्या आणि भवतालातील दृश्य विश्वाच्या आदिस्वरूपाचा प्रत्ययकारी शब्दांतून मांडलेला शोध, हे संतसाहित्याचे हृदगत होय. या नात्याचे स्वरूप सम्यकपणे जाणून त्यानुसार आपला जीवनक्रम राबवणे म्हणजेच संतबोधाचे आचरण. त्यामुळे आपले आणि पर्यायाने समाजपुरुषाचे जगणेही निर्मळ निरामय बनणे अपेक्षित आहे व असते. आपले आणि जगाचे स्वरूप प्रथम आपण जाणून घ्यायचे आणि त्या जाणिवेच्या अधिष्ठानावर लोकव्यवहारात सक्रिय बनून लोकजीवनाचा पोत उन्नत बनविण्यासाठी झटत राहायचे, हा होय महाराष्ट्राच्या समाजमनाची जडणघडण करणाऱ्या भागवतधर्मी संतविचाराचा गामा. 'तुम्ही तरूनी विश्व तारा' हे ज्ञानदेवांच्या निमित्ताने मुक्ताईनी 'ताटीच्या अभंगांद्वारे उभ्या संतमंडळाला केलेले दिशादर्शन संतविचारातील लोकसंग्रहाचे मूल्य उजळून अधोरेखित करते. हाच सारा विचारव्यूह डॉ. सहस्रबुद्धे यांनी २०१६ साली सिद्ध केलेल्या त्यांच्या पद्मगंधा प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या पुस्तकात शब्दबद्ध केलेला आहे. जग, जगाचे अधिष्ठान असणारे आदितत्व आणि विश्वातील चराचर जीव यांच्या स्वरूपाच्या आणि त्यांच्या दरम्यान नांदणाऱ्या नात्याच्या डॉ. सहस्रबुद्धेकृत संशोधक चिकित्सेचे पहिले आवर्तन या बिंदूपाशी परिपूर्तीस जाते. जगत आणि जीवमात्र यांच्या स्वरूपाचे शोधन- विश्लेषण करणारे संतहृदय डॉ. सहस्रबुद्धे या साऱ्या अक्षरश्रमांद्वारे आपल्या पुढ्यात उलगडून मांडतात. 'उत्सव' या त्यांच्या प्रस्तुत ग्रंथापासून प्रारंभ होतो तो दुसऱ्या आवर्तनाला जगाच्या आणि पर्यायाने

त्याच्या निर्मिकाच्या स्वभावाचे आकलन करून घेणे आणि त्याचे दर्शन शब्दांच्या माध्यमातून तुम्हाआम्हांला घडवणे, हे होय. 'उत्सव'च्या निर्मितीमागील प्रयोजन, जीव आणि जगत यांचे स्वरूपदर्शन संतबोलांच्या माध्यमातून घडवल्यानंतर आता या उभयतांच्या स्वभावदर्शनास प्रवृत्त होण्याद्वारे डॉ. सहस्रबुद्धे यांच्या संशोधक दृष्टी वृत्तीची समधातता आपल्या पुढ्यात उभरून येते.

'उत्सव' चे बीजांकुरण डॉ. सहस्रबुद्धे यांच्या मनोभूमीत २०२१ सालीच झाले होते. याची साक्ष 'संतवचनांची मात' ही त्यांची साहित्यकृती पुरवते. भक्तीने आत्मारामाचे अर्थात शिवात्म्याचे जीवात्म्याला सतत स्मरण होते आणि जीवात्मरूपासह जिवाची जगतात घडणारी क्रीडा ही परमात्म्याची क्रीडा आहे, या चिद्विलासाची जाणीव होते आणि कर्म ही क्रीडा वाटू लागते. जीवनातील असे ज्ञानोत्तर कर्म म्हणजे परब्रह्माच्या लीलेतील खेळगडी होणे होय. क्रीडेचा आनंद हा अलिप्त, तटस्थ, निरपेक्ष राहून यशापयशाला समत्वबुद्धीने पाहून घ्यावा लागतो. यालाच खेळाडूपणा असे म्हणतात.....वैराग्य येणे म्हणजे कर्म नाकारणे किंवा कर्मापासून पलायन नव्हे, तर खेळाडूपणे कर्म करणे होय या डॉ. सहस्रबुद्धे यांच्या विश्लेषणामध्ये 'उत्सव' चे बीजांकुरण प्रतीत होते. दृश्यमान होणारे विश्व म्हणजे परतत्त्वाची अनादी काळापासून अव्याहत चालणारी क्रीडा होय आणि यच्चयावत चराचर वस्तुमात्र त्या क्रीडेतील खेळगडी होत, हा ज्ञानदेवांच्या शांभवाद्वयाचा सारभूत गाभा डॉ. सहस्रबुद्धे यांनी 'उत्सव' च्या माध्यमातून फुलवलेला आहे, जग, जगदीश्वर आणि जगातील जीवमात्र यांच्या परस्परनात्याकडे बघण्याचा हा एक अगदी निराळा आयाम होय. खेळातून मिळत राहतो आनंद. किंबहुना म्हणूनच आपण 'क्रीडोत्सव' अशी शब्दसंहती व्यवहारात योजत असतो. कारण, मूळ 'उत्सवः' या संस्कृत शब्दाचा अर्थ 'आनंद' अथवा 'उल्हास' हाच आहे. संपूर्ण विश्व आणि त्यात साकारणारा व्यवहार ही परतत्त्वाची क्रीडा होय आणि या क्रीडेच्या माध्यमातून ते परतत्त्व आनंदाची प्राप्ती करून घेत असते, हा या सगळ्या विचारव्यूहाचा गाभा होय. सत्यत्व, ज्ञातृत्व आणि अनंतत्व ही विश्वाचे अधिष्ठान असणाऱ्या आदितत्त्वाची स्वरूप त्रिपुटी होय, तर, उल्हास अथवा आनंद हा त्याचा स्वभाव होय, असे त्या आदितत्त्वाचे सम्यक् दर्शन ज्ञानदेवांचे शांभवाद्वय आपल्याला घडवते. भागवतधर्मी संतविचाराचे अधिष्ठान याच अद्वयदर्शनाद्वारे सिद्ध झालेले आहे. त्या दर्शनाच्या स्वरूपांगाचे आकलन

पूर्वप्रकाशित लेखनसंभाराद्वारे विशद केल्यानंतर, डॉ. सहस्रबुद्धे आता त्याच अद्वयानंद सिद्धान्तनाच्या स्वभावांगाचे विश्लेषण प्रस्तुत ग्रंथाच्या माध्यमातून करत आहेत. आपण आणि परतत्त्वाच्या स्वरूपसाधर्म्याची अनुभूती आल्यानंतर आपसूकच आपल्या आणि परतत्त्वाच्या स्वभावसाधर्म्याचाही अनुभव अंतःकरणात स्थिरावला की उभा विश्वव्यवहार हा क्रीडोत्सव ठरतो आणि या जगातील आपले जगणे ही आनंदपर्वणी शाबीत होते, या बिंदूवर डॉ. सहस्रबुद्धे आपल्याला ग्रंथगत विवेचनाद्वारे आणून पोहोचवतात.

विश्वाकडे आणि विश्वव्यवहाराकडे बघण्याची ही जीवनदृष्टी आणि तिच्या मुळाशी असणारे जीवनविषयक तत्त्वज्ञान हे वेदान्तापेक्षा स्वरूपतःच निराळे आहे. निगमबोधानुसार दृश्य विश्व हे मायेचे अपत्य ठरते. तर, ज्ञानदेवप्रणित अद्वयबोधानुसार भौतिक विश्व म्हणजे परमशिवाचे प्रगट रूप अद्वैतवेदान्त आणि अद्वयदर्शन ही दोन्ही दर्शने विश्वोत्पत्ती व विश्वाचे स्वरूप- स्वभाव यांचेच विवेचन करतात. परंतु विश्वव्यापाराच्या संदर्भातील कथनामध्ये मात्र या दोन दर्शनांमध्ये महदंतर आहे. विश्व साकार होण्यास पुरुष तत्त्व आणि स्त्री तत्त्व अशा दोघांचा संयोग आवश्यक आहे यांबाबत दोन्ही दर्शनांमध्ये एकवाक्यता आहे. परंतु, विश्वोत्पत्तीस कारणभूत होणाऱ्या या युगुलांमधील उभय घटकांच्या स्वरूपाबाबत तसेच स्वभावाबाबत मात्र वेदान्तदर्शन आणि अद्वयदर्शन यांत अतिशय मूलभूत असा गुणात्मक फरक आहे. ब्रह्म आणि माया या उभय तत्त्वांच्या साहचर्याद्वारे जगाचा पसारा साकारतो असे वेदान्ताचे कथन तर दृश्यमान जगाचे आदिकारण असणारे शक्तिमय शिव हे तत्त्वच विश्वरूपाने प्रगटलेले आहे. हे अद्वयदर्शनाचे विश्लेषण, अद्वैतदर्शनानुसार, ब्रह्म तत्त्वाच्या साहचर्याद्वारे जग प्रसवणारी माया 'आवरण' आणि 'विक्षेप' अशा उभय शक्तींनी युक्त असते. ब्रह्माचे शुद्ध स्वरूप माया तिच्या आवरण शक्तीने आच्छादून टाकते तर तिच्या ठायी वसणाऱ्या विक्षेप शक्तीने ती ब्रह्म तत्त्वाच्या ठिकाणी भौतिक जग उत्पन्न करते. वेदान्तानुसार ब्रह्म हे तत्त्व विशुद्ध ज्ञानवान तर माया हे तत्त्व आहे अविद्यामय. साहजिकच, कार्यकारणभावानुसार अविद्यामय मायेची निर्मिती असणारे भौतिक जग तिच्यासारखेच अविद्यामय आणि म्हणून दुःख-क्लेशदायक प्रतीत होते. अशा जगात मग रमणार कोण आणि रमण्यासाठी तिथे आनंदाची प्राप्ती तरी व्हावी कोठून व कशी? दुःखमय अशा या संसारातून लौकरात लौकर मुक्त होणे हेच

मग आपाततः निश्चित होते या विश्वातील प्रत्येक मानवमात्राचे अंतिम व सर्वोच्च ध्येय.

परंतु, अद्वयबोधाचे या संदर्भातील कथन मात्र संपूर्णतः आगळेच आहे. भौतिक विश्वाचे अधिष्ठान असणाऱ्या 'शिव' या तत्त्वाचे अर्धांग म्हणजे 'शक्ती' हे तत्त्व मुदलात ही दोन तत्त्वे म्हणजे एकाच तत्त्वाच्या दोन अवस्थांची नावे होत. तत्त्व एकच मात्र त्याचे दोन अवस्थांमधील आविष्करण भिन्न असे हे मोठे नवल. हे तत्त्व ज्या वेळी निरुपाधिक अवस्थेमध्ये निश्चल, स्थितिज, केवळ स्पंदरूपाने पहुडलेले असते तेव्हा त्याच्या त्या स्थितीला म्हणतात 'शिव' तर, हेच तत्त्व ज्या वेळी गतिज बनून विश्वाकार प्रगटते तेव्हा त्याच्या त्या विश्वात्मक रूपाला म्हणतात 'शक्ती' या युगुलाच्या अशा त्या अलौकिक ऐक्याचे आणि सामरस्याचे विलक्षण बहारदार विवेचन ज्ञानदेवांनी मांडलेले आहे त्यांच्या 'अमृतानुभवा'च्या पहिल्याच प्रकरणात शिवाशिवाय शक्ती आणि शक्तिहीन शिव या संकल्पना मुदलातच अप्रस्तुत ठरतात शांभवाद्वयानुसार शिवाबरोबर अनादी काळापासून अभिन्नत्वाने नांदणारी ही शक्ती पंचरूपात्मक आहे. दृश्य विश्वाचे बीजरूप असणारा असा तो शक्तियुक्त शिव त्यांमुळेच, पंचरूपात्मक शक्तींनी युक्त असा आहे. ज्ञान, क्रिया, इच्छा, आनंद आणि चित् या होत त्या पंचशक्ती. साहजिकच, अशा पंचरूपात्मक शक्तीने संपन्न असणारा शिव निर्मिती (सर्जन), विलास (स्थिती), संहार (विलय), पिधान (आच्छादन) आणि कृपा ही पाच कृत्ये अंगीकारत असतो, हा होय अद्वयबोधाचा सांगावा, हे शिव तत्त्व जसे ज्ञानवान तसेच क्रियावानही आहे. वेदान्तदर्शनामधील 'ब्रह्म' तत्व आणि अद्वयसिद्धान्तामधील 'शिव' तत्त्व यांच्यातील गुणात्मक फरक इथे असा स्पष्ट होतो. ब्रह्म तत्त्व ज्ञानवान असले तरी क्रियाशील नसल्यामुळे विश्व साकारण्यासाठी त्याला क्रियावान परंतु अविद्यामय माया तत्त्वाचे साहचर्य अनिवार्य ठरते. मात्र, अद्वयदर्शनातील शिव ज्ञानवान आणि क्रियावानही असल्यामुळे त्याला विश्वनिर्मितीसाठी अन्य कोणत्याही बाह्य तत्त्वाची गरज भासत नाही. आपल्या शक्तीस्वरूपाच्या चलनाद्वारे तो त्याला वाटेल तेव्हा जगदाकार प्रगटतो आणि त्याला त्याच्या त्या विश्वात्मक रूपाचा कंटाळा आला की आपले दृश्यमान प्रगट रूप आवरून घेत तो निश्चल अशा विश्वोत्तीर्ण अवस्थेस प्राप्त होतो, केवळ स्पंदरूपाने निरुपाधिक स्थितीमध्ये पडून राहतो. अद्वयसिद्धान्तातील शिव हा असा स्वायत्त आहे. विश्वात्मक स्वरूपात

प्रगट व्हायचे की विश्वोत्तीर्ण स्थितीत पहुडायचे हा त्याच्या मर्जीचा खेळ होय.

आता, 'जग' नावाचे एक वस्तुमात्र आपण निर्माण करावे, हे स्फुरण तरी त्या शिवाला का होते, असा मार्मिक प्रश्न कोणाही जिज्ञासूच्या मनात या टप्प्यावर अंकुरावा, हे अतिशय स्वाभाविकच ठरते. या प्रश्नाचे उत्तर म्हणजे डॉ. सहस्रबुद्धे यांचा 'उत्सव' हा ग्रंथ ! आनंदरूप शक्तीने युक्त असणाऱ्या आनंदस्वरूप शिवाच्या ठायी असणारी स्वप्रत्ययाची असोशी हे जगाच्या निर्मितीमागील आदिप्रेरणा होय. विश्वरूपाने नटून आपल्याच नामरूपमय वैचित्र्यपूर्ण अस्तित्वाचा आनंद भोगण्याची शिवाच्या ठायी उमलणारी ऊर्मीच जग प्रसवते. विशुद्ध निरुपाधिक, अनाम अरूप अशा स्पंदमय विश्वोत्तीर्ण एकाकी स्थितीचा कंटाळा आला की तिथवर एकविध असणारे शिव तत्त्व जग नावाच्या पसाऱ्याद्वारे बहुविध स्वरूपात प्रगटते आणि विश्वव्यापाराच्या रूपाने बहरणाऱ्या क्रीडेच्या माध्यमातून आनंदोत्सवाचा अनुभव घेत राहते. शिव स्वतःच आनंदयुक्त, आनंदस्वरूप असल्याने त्याच्याच प्रगटीकरणाद्वारे साकारलेले दृश्य विश्वही शिवाइतकेच आनंदमय, उत्सवपूर्ण असते. त्यांमुळे, उत्सव हाच जगाचा आणि स्वाभाविकपणे जगातील प्रत्येक अस्तित्वाचा स्थायी भाव होय, स्व-भाव होय, हेच डॉ. सहस्रबुद्धे इथे परोपरीने सांगत आहेत.

भारतीय समाज आणि समाजमन उत्सवप्रिय का आहे, याचा विलक्षण वेधक, रोचक आणि तपशीलवार आलेख म्हणजे डॉ. सहस्रबुद्धे यांचा हा ग्रंथ. खरे म्हणजे, 'केवळ भारतीय समाजच काय तो उत्सवप्रिय आहे', असे म्हणणेदेखील आता अनुचित ठरेल. संपूर्ण विश्वातील प्रत्येक वस्तुमात्र स्वभावतःच उत्सवप्रिय आहे. त्याचे कारणही सरळ, सोपे व साधे आहे. अद्वयबोधात अनुस्युत असणाऱ्या कार्यकारणभावानुसार, जगाचे आदिकारण असणाऱ्या शिवाचा 'स्व-भाव'च उत्सवस्वरूप म्हणजे आनंदमय असल्यामुळे विश्वातील प्रत्येक जीवमात्र जात्याच उत्सवप्रिय ठरतो. बहुविधतेने नटलेले शिव तत्त्व ज्या प्रमाणे विश्वातील प्रत्येक रूपाकाराच्या माध्यमातून स्वतःचीच प्रतीती स्वतःच्या ठायी घेण्याद्वारे आनंदोत्सव भोगते, त्याचप्रमाणे, जगातील हरएक जीवमात्र सण-समारंभ यात्रा-जत्रा - कुळाचार - कुलविधी - गोत्रकर्मे यांच्या माध्यमातून आनंदोत्सवाची पर्वणी साधत राहते. ते साहजिकच ठरते कारण विश्वोत्तीर्ण स्पंदरूपात्मक शिव काय अथवा विश्वात्मकतेने प्रगटलेले त्याचे शक्तीरूप काय उत्सव, आनंद हा

त्या तत्त्वाचा 'स्व-भाव' होय. विश्वव्यापार ही शिवाची क्रीडा आणि तिच्याद्वारे आनंदोत्सव उपभोगणे ही शिवाची अदम्य ऊर्मी, असा हा सगळा आनंदसोहळा आहे. सृष्टीतील सर्व जीवमात्र वस्तुमात्र त्याच परब्रह्माचे अंशस्वरूप आहेत. ते प्रत्येक जीवन उत्सवपूर्णच आहे! सोन्याचा प्रत्येक कण सोने असावा, पाण्याचा प्रत्येक बिंदू पाणी असावा तसा आनंदाचा प्रत्येक क्षण आनंदच असणार हे जाणून घेऊन, अर्थात जीवन हाच उत्सव आहे हे जाणून जगावे, हे डॉ. सहस्रबुद्धे यांचे या ग्रंथाच्या अगदी प्रारंभीच आपल्या पुढ्यात अवतरणारे विश्लेषक विवेचन म्हणजे जगदीश्वर आणि जीवमात्र या दोहोंच्या स्वभावसामरस्याचे निरपवाद द्योतनच होय. हाच होय ज्ञानदेवांच्या अद्वयानंदवैभवाचा सत्त्वांश. डॉ. सहस्रबुद्धे यांच्या निरंतर चिंतनाचा विषय असणाऱ्या श्रीगोंदेनिवासी शेख महंमदबाबांच्या 'योगसंग्राम' नामक प्रबंधाचा सारांशही हाच. ज्ञानदेव आणि शेख महंमदबाबा अनुभूतीच्या संदर्भात पुरेपूर समानधर्मा होत ते असे.

उत्सव हाच सृष्टी, सृष्टीकर्ते आदितत्व आणि या सृष्टीतील प्रत्येक जीवमात्र यांचा स्वभाव असल्यामुळे तो अस्तित्वाच्या विविध पातळ्यांवर उपभोगणे ही प्रत्येकाची सहजोर्मी ठरते. आमचे सगळे सण-समारंभ, सांस्कृतिक-सामाजिक-आध्यात्मिक उत्सव हे प्रत्येकाचा जन्मजात अभिजात स्व-भाव असणाऱ्या आनंदाची प्रतीती समूहरूपाने चाखण्याची माध्यमे होत, हे आहे डॉ. सहस्रबुद्धे यांचे या ग्रंथातील केंद्रवर्ती प्रमेय, सच्चिदानंद स्वरूपातील आनंदमग्नता स्वसंवेद्यतेने भोगण्यासाठी माणसाने लोकजीवनात सामवेदात्मक आणि अथर्ववेदात्मक पद्धतीने म्हणता येईल, अशा उत्सव मांडणीचा किंवा उत्सव करण्याचा पर्याय निवडलेला दिसतो. माणसाचे अवघे जीवनच उत्सवमय आहे असे पाहण्यात येते, हेही स्वाभाविक आहे. परब्रह्माचे स्वसंवेद्यतेने सृष्टीस्वरूप उत्सवस्वरूप अनुभवणे जसे स्वभावतः आहे तेवढेच परब्रह्मस्वरूप मानवाने उत्सवस्वरूपात आनंदप्राप्ती करून घेणे स्वाभाविक आहे, हे डॉ. सहस्रबुद्धे यांचे प्रतिपादन जीव- शिवाच्या स्वभावसामरस्याचे इंगीत सहजतेने उलगडून मांडते. परंतु, डॉ. सहस्रबुद्धे यांच्या या शब्दव्यापाराचे आगळेपण केवळ इतक्यावरच आटत नाही. आनंदोत्सव व्यष्टी आणि समष्टीचा स्वभाव असताना आपले रोजचे जगणे मात्र पदोपदी नीरस, खंतावलेले, पीडित दिसते - जाणवते, या विरोधाभासाचाही उलगडा ते करतात. आपल्या आदिस्वरूपाचे मानवमात्रांना प्रसंगवशात होणारे पूर्ण विस्मरण

हे जगदाकार आनंदोत्सवाला पारखे होण्याचे आधकारण होय, हे वास्तव डॉ. सहस्रबुद्धे निखालसपणे अधोरेखित करतात. आपले मूळ स्वरूप काय आहे. याचाच विसर पडल्याने आपल्या स्थायीभावालाही मनुष्यप्राणी मुकतो, इतके साधे समीकरण मांडत तुम्हीआम्ही स्वस्वरूपाला विन्मुख का व कसे बनतो, याचाही मनोज्ञ खुलासा डॉ. सहस्रबुद्धे करतात. अवघा मानवमात्र शिवशक्तीच्या खेळातील खेळगडी म्हणून वावरण्याऐवजी स्वतःच शिवशक्ती असल्याच्या देहाहंकाराने भूमिका मिरवतो. क्रीडेतील निरपेक्ष आनंदाला पारखा होतो, हे त्यांचे प्रतिपादन या संदर्भात असाधारण मोलाचे शाबीत होते. आपल्या मूळ स्वरूपामध्ये स्थिर राहून विश्वाकार आनंदोत्सवाची लज्जत अविरत चाखण्याचा स्वभाव पूर्ववत हस्तगत होण्यासाठीच मानवमात्रांनी अनुभूतीसंपन्न संतविभूतींचे बोट धरायचे असते, या दृढ धारणेने उमरभर केलेल्या संतसाहित्याभ्यासाचा डॉ. सहस्रबुद्धे यांना गवसलेला सारभूत गाभा आपल्या पुढ्यात साकारतो तो असा.

संतबोलांच्या सश्रद्ध व डोळस परिशीलनाचे नेमके प्रयोजन काय आणि संतप्रणित मूल्यांचे उपयोजन आपल्या जीवनात घडवून आणण्यासाठी संतांच्या विचारविश्वाच्या अंतरंगात आपण कोणत्या भावनेने डोकवणे गरजेचे आहे, याची विलक्षण पायाशुद्ध आणि निखळ जाणीव असल्याखेरीज अशा पोताचे आशयसंपन्न विश्लेषण शब्दरूप धारण करत नसते. डॉ. सहस्रबुद्धे यांच्या संतविचारविषयक वाचन-चिंतन-मनन-लेखनाचे आगळे वैशिष्ट्य मनाला भावते ते त्याचमुळे. संतसाहित्याच्या निव्वळ शब्दाभ्यासालाच सारसर्वस्व मानणाऱ्या साहित्यिकांच्या तुलनेत डॉ. सहस्रबुद्धे वेगळे प्रतीत होतात त्याचे कारणही हेच ... आणि हेच त्यांचे बेलाग बलस्थान होय!

**अभय टिळक**

# (१)

# संवाद

# जीवनोत्सव जाणून जगावे!

भोग भोगायचे! कुणाला चुकलेत? काही खरं नाही! दुःखाचे डोंगर संपता संपत नाहीत. कशात राम नाही हो. ''भवदुःखाच्या अनंत डोही परि बुडतो पाही!'' ''मृत आशांच्या चिंध्या वरूनी पिशाच्य माझे भटकत राही, शांती नसेची तया!'' किती काही करा यश नाहीच! आत्महत्येला पर्यायच नाही! तुकोबारायच म्हणून गेलेत. ''सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वता येवढे!'' अहो, भगवान बुद्धांना तर अवघे विश्व दुःखाने भरलेलेच दिसले! भगवान शंकराचार्य सांगून गेलेत माया पाश तुटता तुटत नाहीत! अवघा मायेचा खेळ! सगळेच निरर्थक! वाट्याला आलं नाईलाज आहे. मरेपर्यंत संपणार नाही! अशा असंख्य प्रकाराने अनेकांच्या मुखाने जीवनाची रडगाणी, आपण अनादिपणे ऐकतोच आहोत. हा दुःखाचा अनुभव एवढा तीव्र का होतो? याचे कारण सरळ आहे. सर्वांना सुख, आनंद हवा असतो, तो मिळत नाहीच का? मिळतो. पण दुसऱ्या क्षणी तो आनंद विरून जातो नि यातायात, दुःखे, रिणकोच्या दारात धनकोचे वसुले निर्दयपणे उभे राहावेत, तसे उभे राहतात. पुन्हा रडण्याला पर्याय नाही!

जीवनानुभूती अशी दुःखानं भरलेलीच असेल तर; आनंदम् ब्रह्म । सच्चिदानंदस्वरूप परब्रह्म । अशी वाक्ये अनुभूतीतून कशी प्रकटली असती? जगद्गुरु संत तुकोबाराय म्हणतात–

**''आनंदाचे डोहीं आनंदतरंग । आनंदचि अंग आनंदाचें ।।१।।**
**काय सांगों झालें कांहींचियाबाई । पुढें चाली नाहीं आवडीनें ।।२।।**
**गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ।।३।।**

**तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा आला ।।४।।''**

(र. रा. गोसावी, तु.अ.गा.स.सं.गा. २५८२)

किंवा

**''आनंदे कीर्तन कथा करी घोष । आवडीचा रस प्रेमसुख ।।१।।''**

(तत्रैव २९९९)

किंवा

**''आनंद अद्वय नित्य निरामय । जे कां निजध्येय योगियांचे ।।१।।''**

(तत्रैव २४२२)

किंवा

**''आनंदाचा थारा । सुखें मोहरला झरा ।।१।।**
**ऐशी प्रभुची ज्या कळा । त्याच्या कोण पाहे बळा ।।२।।**
**अंकिता ऐसिया । होईल पावविलें ठाया ।।३।।**
**तुका म्हणे ऐसें । दिलें आभंड प्रकाशें ।।४।।''**

(तत्रैव २६६७)

किंवा

**''आनंदाच्या कोटी । साठविल्या आम्हां पोटीं ।।१।।**
**प्रेमा चालिलो प्रवाहो । नामघोष लवलाहो ।।२।।**
**अखंड खंडेना जीवन । रामकृष्ण नारायण ।।३।।**
**घडी ऐहिक्य परत्र । तुका म्हणे सम तीर ।।४।।''**

(तत्रैव १९१६)

किंवा

**''आनंदे एकांती प्रेमें ओसंडत । घेऊ अगणित प्रेमसुख ।।१।।**
**गौप्य धन न ये वारा लागोयास । पाहो नेदूं वास दुर्जनासी ।।२।।**
**झणी दृष्टि लागे आवडीच्या रसा । सेवूं जिरे तैसा आपणासी ।।३।।**
**तुका म्हणे हें बहु सुकुमार । न सहावे भार वचनाचा ।।४।।''**

(तत्रैव १७३४)

जीवन आणि परलोक दोन्ही आनंदाचे डोह आहेत. याचा अनुभव ईह जीवनातच घेता येतो. हे जीवन प्रेममय करून जगू लागले की ही आनंदानुभूती ईह जीवनातच घेता येते. 'मातेचा डोहळा' हा भोग नाही. तो परमात्म्याची आनंद क्रीडा अर्थात

उत्सव आहे; हे जाणून जगले की दुःखच शिल्लक राहात नाही. अवघे जीवन आनंदाने भरून गेल्याचाच अनुभव येतो. आनंद अनुभवण्याची सच्चिदानंदात्मक दृष्टी हवी. ती दृष्टी जीवनावर प्रेम करण्याने, अर्थात प्राप्तकर्मावर प्रेम करण्याने प्रकटते. मग जीवन ही यातायात, भ्रम राहात नाही; ती युद्धक्रीडा होते!

**''रात्री दिवस आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतरबाह्य जग आणि मन ।।१।।**
**जीवाही आगोज पडती आघात । येऊनियां नित्य नित्य वारू ।।२।।**
**तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळें । अवघीयांचे काळें केले तोंड ।।३।।''**

(तत्रैव ३१६६)

मीच श्रीविठ्ठल आहे असे नामस्मरणाने अद्वैत ज्ञान झाले की युद्धात विजय आपलाच! अर्थात सारी दुरिते काळे तोंड करून पळून जातात.

बालकवींना तर सर्वत्र आनंद, अर्थात सच्चिदानंदरूप परब्रह्मच भरलेले दिसते. ते म्हणतात–

**''आनंदी आनंद गडे । इकडे तिकडे चोहिकडे**
**नभात भरला । दिशांत फिरला**
**मोद विहरतो चोहिकडे ।**
**आनंदी आनंद गडे ।''**

अवघ्या सृष्टीतच आनंद भरून राहिला आहे. तर मग आपले जीवन आनंदाला अर्थात सुखाला अर्थात उत्सवाला पारखे कसे असेल? माणसाचे जीवनही आनंदमयच आहे. त्यासाठी जीवनाचा खेळगडी मात्र झाले पाहिजे. मग अवघी यातायात, अवघी दुःखे त्या आनंदमग्नतेत, अर्थात जीवन खेळात विरून जातात आणि उरते फक्त आनंदमयता. प्राप्त कर्म हा भोग नव्हे तर आनंदानुभूतीसाठीची इतिकर्तव्यता आहे हे जाणले पाहिजे. मग आपसुकच दुःख जवापाडे होईल!

भगवान श्रीकृष्णांनी आपल्या सृष्टीलीलेच्या उत्सवाचे मर्म श्रीमद्‌भगवद्‌गीतेत, 'कर्मयोग' हा जीवनयोग, असा सिद्धांत मांडून स्पष्ट केले आहे –

**''नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः । शरीरयात्रापि च ते न प्रसिद्‌ध्येद कर्मणा ।।''** (भ.गी. ३–८)

नियतीनुसार नेमलेल्या कर्माचे तू पालन कर, कारण कर्म करणे निष्क्रियतेपेक्षा श्रेष्ठ आहे. कर्म केले नाही तर माणूस आपल्या देहाचे पोषणसुद्धा चांगल्या प्रकारे

करू शकणार नाही.

**''कर्म ब्रह्मोद्‌भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्‌भवं । तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्य यज्ञे प्रतिष्ठितम ।।३.१५।।''**

कर्म वेदांतून उद्‌भवले. अविनाशी वेद अर्थात ज्ञान कर्मस्वरूप यज्ञात स्थिर झाले आहे. ज्ञान म्हणजेच सच्चिदानंदस्वरूप होय हे जाणून कर्म करावे.

**''मयी सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा । निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ।।३.३०।।''**

कर्म भगवंतापासून प्रेरित आहेत. त्याच्या इच्छेने ते घडते, असा स्थिर विचार करून; फलाशारहित व अभिमानरहित होऊन, आळस टाकून युद्ध अर्थात कर्म कर.

म्हणूनच–

**''कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संङ्गोऽस्त्वकर्मणि ।।२.४७।।''**

कर्मावर स्वतःचा अधिकार सांगून फळाची किंवा हेतुसिद्धतेची अपेक्षा न धरता क्रीडा म्हणून व प्राप्तनियम म्हणून प्राप्तकर्म कर्तव्यतत्परतेने करावे. कारण कर्म हा परब्रह्माचा क्रीडाविष्कार आहे. जीवन हा असा कर्ममय उत्सव आहे.

सर्व प्रकारच्या जीवांचे सर्व गुण एकत्र करून; सर्वांपरी विकसित असा नरदेह अर्थात मानवी देह लाभला आहे. या देहाचे ठिकाणी प्रत्यक्ष परब्रह्मच नांदते आहे. तेच कर्मरूपाने प्रकटणार आहे. हे जाणून तात्कालिक हेतूपूर्ती, वासनापूर्ती या पलिकडे, परब्रह्मस्वरूप मानवी जीवाने कर्माचे स्वरूप लक्षात घेऊन; जीवन जगावे अर्थात जीवनाचा उत्सव करावा!

सामान्यतः माणूस आधिभौतिक अर्थात बाह्यविश्वातील वस्तूंचा मानवेंद्रियांशी संयोग होऊन; सृष्टीतील दैवतांच्या अर्थात शक्तींच्या कोपाने वाट्यास येणारा आधिदैविक आणि आध्यात्मिक अर्थात बाह्यवस्तुसंयोगाशिवाय वाट्यास येणाऱ्या, अशा तापत्रयाने वेढलेला असतो. त्यामुळे त्याला जीवनात दुःखांची अनुभूती येते.

या त्रितापावर मात करण्यासाठी आणि सच्चिदानंद स्वरूप अर्थात निरामय आनंद अनुभवण्यासाठी जीवनातील आजन्मकरीताची उद्दिष्टानुवर्ती, अशी उत्सवांची मांडणी मानवाने समूहमनाने केली आहे. यालाच आपण जीवनसारणी

असे म्हणतो. माणूस, जन्मप्रथा, विवाहप्रथा आणि मर्तिकप्रथा या तीनही टप्प्यांवर संस्कारांची अर्थात उत्सवांची मांडणी करून; जगण्याला अर्थ देतो. एकप्रकारे जीवनाच्या खेळाला दिलेले हे आध्यात्मिक स्वरूप असते. व्यक्ती आणि समष्टीच्या पातळीवर संघमनाने मानव हा संस्कारांचा, उत्सवांचा प्रवास करतो. हे करतांना सामान्यतः, हा उत्सवांचा प्रवास आहे; याचाच माणसाला विसर पडतो. अवघे जीवन यातायातींचे, कटकटींचे जीणे वाटू लागते. सारणीतील उत्सवांची मालिका परब्रह्मात्मक किंवा सच्चिदानंदस्वरूपात्मक कर्माविष्कार आहे; हे लक्षात घेतले, खेळगडी म्हणून जीवनाच्या खेळात खेळू लागला तर जीवनाचाच परिपूर्ण उत्सव होईल. कविवर्य मंगेश पाडगांवकर पुणे विद्यापीठाच्या विद्यापीठ गीतात म्हणतात, ''ज्ञान बनो कर्मशील । कर्म ज्ञान वान ।।'' ते याच जीवनोत्सवाचा आस्वाद घेण्यासाठी होय.

संस्कृतीचे सनातनातून पारंपरिक झालेले संचित, जीवनातील अवघ्या क्षेत्रात उत्सवांची मालिका मांडून; सारणीस्वरूप प्रकट होत आहे. जीवनातील अगदी लहान-लहान उद्दिष्टांचे संपादन करतांनाही, उत्सवाची मांडणी करावी लागते. यात अगदी नाळविच्छेदनापासून मरणोत्तर पिंडदानापर्यंत शिक्षण, व्यापार, घरेदारे, राजव्यवहार, समाजव्यवहार, संरक्षणव्यवहारापर्यंत एवढेच नव्हे तर शास्त्रे, कला यांच्या मांडणीपर्यंत; वर्तने, साधने आणि शाब्दपरंपरा या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी समाविष्ट असतात. उद्दिष्ट हे आनंदलक्ष्यी असते. उद्दिष्टातील संपादनापर्यंतचे कष्ट, यातायात, संघर्ष हेदेखील उद्दिष्टपूर्तीचा आनंद लुटण्यासाठी असते. तो आनंद अनुभवतांना अवघे कष्ट, यातायात, विवंचना विरून जातात. किंबहुना त्या संघर्षाचे पुरुषार्थसाधनेत रूपांतर झालेले असते. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरुषार्थांचे अंतिम ध्येय सच्चिदानंदस्वरूप होणे असे असते. श्रीकृष्ण परब्रह्म अर्थात सच्चिदानंदस्वरूप हेच जर सृष्टीनिर्मितीचे स्वभावतः कारण, कार्य आणि रूपही आहे; तर सर्व दुःखे भ्रामक, तात्कालिक, क्षणभंगूर ठरतात. सृष्टीतील सर्व जीवमात्र, वस्तुमात्र त्याच परब्रह्माचे अंशस्वरूप आहेत. ते प्रत्येक जीवन उत्सवपूर्णच आहे! सोन्याचा प्रत्येक कण सोने असावा, पाण्याचा प्रत्येक बिंदू पाणीच असावा तसा आनंदाचा प्रत्येक कण आनंदच असणार; हे जाणून घेऊन, अर्थात जीवन हाच उत्सव आहे हे जाणून जगावे. हेच जीवनाचे श्रेय!

## (२)

# सच्चिदानंद परब्रह्म

सत्-चिद्-आनन्द, अर्थात सत्य-चैतन्य-आनन्द अर्थात सत्य म्हणजेच चैतन्य आणि चैतन्य म्हणजेच आनन्द, असे ते अस्तित्व आहे. त्या अस्तित्वाला भारतीय परंपरेत आरंभापासूनच परब्रह्म या नावाने अर्थात देवाधिदेव म्हणून भारतीय लोक मानतात.

या परब्रह्माचे वर्णन-

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।**

अशी प्रक्रिया सांगून करतात. हे परब्रह्म ॐ या एकाक्षर चिन्हात प्रकटले आहे अशी भारतीय सनातन कल्पना आहे. भारतीयांना ॐ या एकाच अक्षरात सत् चिद् आनंद स्वरूप परब्रह्म प्रकटल्याचे साक्षात्कारित झाले आहे.

ॐ = सच्चिदानंद असे, अदः अर्थात 'ते' परब्रह्म; पूर्णम् = परिपूर्ण आहे. (तसेच) इदम् अर्थात 'हे' = जगत सुद्धा परिपूर्ण आहे. कारण पूर्णात् = त्या पूर्णातून अर्थात परब्रह्मातून 'हे' = पूर्ण जगत; उदच्चते = उत्पन्न झाले आहे. मात्र परब्रह्माठायीची स्वाभाविक प्रक्रिया अशी आहे की; पूर्णस्य = परब्रह्माचे, पूर्णम् = पूर्णत्व, आदाय = काढून घेतल्यावर सुद्धा; पूर्णम् = पूर्ण; एव = पूर्णच, अवशिष्यते = शिल्लक राहाते. याचाच स्पष्ट अर्थ ते परिपूर्ण परब्रह्म जगतच्या स्वरूपात दृष्यमान होते. मात्र ते दृष्यमान होणे म्हणजे ते परिपूर्ण ठायी संपणे नव्हे; तर ते तसेच निर्विकार असणे होय. म्हणजेच जे दृष्यमान होते ती केवळ त्या परिपूर्णाची लीला आहे. अर्थात त्या परब्रह्माचे अर्थात परब्रह्म तत्त्वाचे लीलात्मक, अर्थात क्रीडात्मक दर्शन आहे. हे लक्षात घेऊन आपण त्या लीलेतील, क्रीडेतील क्रीडापटू अर्थात खेळगडी आहोत; हे ओळखावे म्हणजे

ठायीचे अर्थात देहरूपात असलेले विकार नाहीसे होतील. परब्रह्म स्वरूपाचे ज्ञान अर्थात संवेदन ठायीच प्रकट होईल. विवेकपूर्ण ताटस्थ अर्थात शांती प्राप्त होईल आणि आनंदानुभूती प्राप्त होईल. म्हणूनच हा मंत्र शांती मंत्र, पूर्ण ज्ञानप्रकाशित करणारा मंत्र म्हणून ओळखला जातो. याकरिता मंत्राच्या अखेरीस – ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः म्हणण्याची प्रथा आहे.

पूर्णपरब्रह्मातून, जगत्स्वरूपात पूर्णत्व काढून घेतले अर्थात प्रकटले ते कशामुळे? हे कार्य कोणी केले? पूर्ण परब्रह्म हेच जगत् प्रकटण्याचे कारण आहे का? की हा कार्यकारण भाव काही वेगळा आहे. ॐकार चिंतनातून हा कार्यकारण भाव कोणत्या प्रकारे ज्ञात होतो? की कार्यकारण भावच मानता येणार नाही? कारणाशिवाय कार्य नाही ह्या मानवी शास्त्रीय सूत्रनियम निरीक्षणाची, येथे संगती कशी लावायची?

या सर्व प्रश्नांचे उत्तर, संत श्री माउली ज्ञानेश्वरांनी त्यांच्या 'भावार्थ दीपिका' अर्थात 'ज्ञानेश्वरी'त आणि अमृतानुभवात अर्थात अनुभवामृतात दिले आहे. ''ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या आत्मरूपा ।।१।।'' या 'ज्ञानेश्वरी'मधील पहिल्या अध्यायातील पहिल्या ओवीत आत्मरूपाचा स्वभाव, अस्तित्व आणि अक्षररूप अनुभूती यांचा यथार्थ उल्लेख केला आहे. आत्मरूप म्हणजेच परब्रह्म, हे आद्य, अर्थात मूळ, अविनाशी, निर्गुण, निराकार, निर्विकार, निज, केवल, महाशून्य सच्चिदानंदरूप असे अस्तित्व, ॐ या एकाक्षरातून जाणवते. ते अस्तित्व स्वसंवेद्य अर्थात, स्वतःच स्वतःला जाणवणारे अर्थात स्वतःच ठायीच, सतत चैतन्यशीलपणाने प्रकट जाणविणारे आहे. तसे असूनही ते आद्य आहे. अर्थात मूळ स्वरूप आहे. हेच अस्तित्व निधान 'ॐ पूर्णमदा...' या शांतिमंत्रात वर्णिले आहे. म्हणजेच परमात्मा आणि जगत् ही अस्तित्व दोन नाहीत एकच आहेत. तेच परिपूर्ण म्हणून जाणवते. 'अमृतानुभव' ग्रंथात हीच स्वसंवेद्य प्रक्रियात्मकता सगुण स्वरूपाच्या रूपकात्मकतेने संत श्री माउली ज्ञानेश्वरांनी वर्णन करून सांगितली आहे. 'शिवशक्ति समावेशन' या पहिल्या अध्यायात माउली म्हणतात–

**''ऐसी इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ।**
**तिथें वंदिलीं मियां मूळिकें । देवोदेवी ।।१।।**
**जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरीं ।**

**चारूस्थळीं येकाहारी । एकांगाची ।।२।।''**

'अमृतानुभवा'च्या सुरुवातीला मंगलाचरणाचे पाच श्लोक आहेत. त्याचा शेवट करतांना 'नमः पूर्णाय शंभवे' असे म्हटले आहे. अर्थात पूर्णरूप शंभूला माझे वंदन असो असे म्हटले आहे. म्हणजे शिव हेच परब्रह्म अशा अर्थाने संबोधित केले आहे.

१२ व्या शतकातील जयदेवाच्या 'गीतगोविंदा' या काव्यातील शृंगारावर, गीतगोविंदाचा भावानुवाद मराठीत करणारे डॉ. म. ना. बोपर्डीकर यांनी मोठे सूचक भाष्य केले आहे. ते लिहितात, 'गीतगोविंदातील शृंगार लौकिक, भौतिक, व्यावहारिक पातळीवर नाही. तो आध्यात्मिक पातळीवरील आहे. सीताराम, राधाकृष्ण, उमाशंकर, मायाब्रह्म, जीवशिव यांची रतिभावना आत्मार्पणाची आहे म्हणून मंगल आहे. 'गीतगोविंदा'त याच मंगल रतिभावनेचा कलाविलास वर्णिला आहे.' नगर येथील स्वरानंद प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या या ग्रंथात जी युगुले उल्लेखित आहेत ती एक प्रकारे 'पूर्ण' आणि पूर्णातून प्रकटलेले पूर्ण प्रदर्शित करतात. त्यांचे आत्मार्पण हा रतिभाव त्यातील अद्वैत सिद्ध करतो.

नेमके असेच 'अमृतानुभव' सांगताना 'देवोवेदी' या उल्लेखातून श्री ज्ञानेश्वर सांगतात. उपाधीविरहीत अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार अशा, विश्वाच्या जनकाला अर्थात निर्मात्याला वंदन करून माउली 'तोच' अद्वैताने आहे असे प्रतिपादन करतात. म्हणूनच 'मुळिके । देवोदेवी' असा उल्लेख करतात. परब्रह्माचे द्वैतस्वरूप, समावेशनात्मकतेने 'अद्वैत' कसे संवेदित होते हे 'शिव-शिवा' युगुलाच्या 'समावेशन' वर्णनातून स्पष्ट केले आहे. पूर्णातून पूर्ण प्रकटूनही पुन्हा पूर्णच अनुभूत होते. अर्थात पूर्णातून प्रकटलेले पूर्णदृष्ट होणारे रूप हे अंततोगत्वा मूळ निरुपाधिक 'पूर्ण' स्वरूपच प्रतीत होते. हाच अमृतानुभव अर्थात सच्चिदानंद स्वरूपाचा अनुभव होय.

माउली म्हणतात- शिव हा प्रियु अर्थात प्रियकर स्वतःच प्राणेश्वरी अर्थात चैतन्यशक्ती झाला आहे. अर्थात प्रेमाच्या विलक्षण आवेगाने अर्थात आवडीने म्हणजेच प्रेमाने, सरोभरी अर्थात उत्कट ओढीने अर्थात आवेगाने, 'चारुस्थळी एकाहारी एकांग' अनुभवास येतो आहे. म्हणजे वक्षस्थळी अर्थात चारुस्थळी अर्थात मिठीत एकच होऊन जणू एकच शरीर म्हणून अनुभवास येतो आहे. 'द्वैताद्वैत' असा हा विलक्षण आनंदमय अनुभव! हा अनुभव शिव-शिवा भिन्नतेचा

नाही किंवा अर्धनारीनटेश्वराचाही नाही तर हा अनुभव महत्‌तत्त्वाठायीच्या महाशक्तीच्या अद्वैताचा अनुभव आहे. हा अनुभव म्हणजेच संपूर्ण जगताचा आनंदपूर्ण असा अनुभव; ठायीच आत्मरूपाला येणे होय. या अनुभवाचे उत्सव स्वरूपातील वर्णन माउलींनी पुढील ओवीत केले आहे. ते म्हणतात–

**''आवडीचेनि वेगें । येकयेकातें गिळिती अंगें ।**
**की द्वैताचेनि पांगे । उगळिते आहाती ।।३।।''**

शिव आणि शिवा अर्थात ठायीची शक्ती, यांची प्रेमभराने आपापली अंगे आपापसात गिळून एकांग झाली आहेत; असा अनुभव येतो. याचवेळी द्वैताच्या अनुभूतीसाठी अर्थात प्रियकर आणि प्राणेश्वरी असा द्वैत आनंदानुभव घेण्यासाठी पुन्हा एकमेकांची अंगे उगळित आहेत असे भासमान होते. जगताचे ठिकाणी हे जगत्‌ त्या परब्रह्माने व्यापले आहे असे वाटतांनाच हे जगत्‌ आणि परब्रह्म कार्यकारणपणेही जाणवतात. वस्तुतः पूर्णाचा पूर्णाविष्कार हा पूर्णच आहे, हेच दोन्ही प्रकारे जाणवते. द्वैतारंग एवढा एकरूप होतो की एकरंग वाटावा तोच ते दोन रंगही जाणवावेत, अशी प्रक्रिया अनुभवास येते; हेच मानवी जन्माचे सार्थक होय.

निजरूपाच्या ठायीच्या पूर्णत्वाचा आणि स्वसंवेद्यतेचा अनुभव, परब्रह्म विलासातून येतो. त्या कैवल्याला आपणच आपले स्वरूप अनुभवण्याची अर्थात स्वसंवेद्यतेचा अनुभव ठायीच घेण्याची उत्कट इच्छा झाली. निर्गुण, निराकार, निर्विकार, केवल, महाशून्य, अविनाशी अशा आत्मरूपाचा स्वरूपाविष्कार चक्रनेमीक्रमात्मक, अर्थात उत्पत्ती, स्थिती, लय, पुन्हा उत्पत्ती, अशा प्रकारे सृष्ट झाला. परब्रह्म ह्या महत्‌तत्त्वाला ठायीची महत्‌शक्ति संवेदित होऊ लागली. या महत्‌तत्त्वाचा त्रिविध आविष्कार, उत्पत्ती, स्थिती आणि लय – पुन्हा उत्पत्ती या चक्रनेमीक्रम प्रक्रियात्मक, अविनाशित्वाने संवेदित झाले तेही ठायीच! त्या आविष्कारांना शिव–शक्ति अर्थात शिवा, विष्णू–लक्ष्मी अर्थात वैष्णवी आणि ब्रह्म–माया अर्थात ब्रह्मा अशी नामाभिदाने देऊन; विश्वपसाऱ्याच्या संगती लावण्याचे कार्यही ठायीच झाले. ही तीन युगुले वास्तविक युगुले नाहीतच. महत्‌तत्त्व परब्रह्माच्या आविष्कार सृष्टीस्वरूपाच्या स्वसंवेद्यतेची ती भावनिक अस्तित्वे ठायीच प्रकटली आहेत. मानवाने अर्थात त्या परब्रह्माठायीच्या स्वसंवेद्यतेतील तत्त्वस्वरूप स्वसंवेद्यता, अनुभवणाऱ्या अस्तित्वाने ह्या परब्रह्म

आणि पराशक्तीची द्वैताद्वैत अनुभवसिद्धी ठायी अनुभवण्यासाठी लावलेली ॐकार शब्दब्रह्मविलासात्मक अशी ही वैज्ञानिक संगती होय. श्रुती, स्मृती, पुराणे, शास्त्रे यांचा खटाटोप यासाठीच आहे.

सच्चिदानंद परब्रह्माचे स्वसंवेद्य प्रकट आत्मरूप म्हणजे सृष्टीस्वरूप होय. अनेकविधतेने नटलेल्या सृष्टीचे स्वरूपही सच्चिदानंद परब्रह्म स्वसंवेद्य स्वरूपच होय. परिपूर्ण स्वरूप असे सच्चिदानंद परब्रह्म स्वसंवेद्यपणे आनंदमग्न आहे. हे सर्वच ज्ञानीजनांनी मान्य केलेले स्वरूप आहे. त्या परब्रह्माठायी स्वसंवेद्यतेने प्रकटलेले सृष्टीस्वरूप आनंदमग्न असणार, हे उघड आहे. अर्थात शिवशिवा समावेशन प्रक्रियेतून, संत श्री माउली ज्ञानेश्वरांनी हाच आनंदमग्नतेचा उभयपक्षी अमृतानुभव स्वसंवेद्यतेने घेतला आहे. सृष्टीतील सर्व चरअचर मात्रांत ते आत्मरूपच भरून असल्याने चराचरमात्र स्वसंवेद्य सच्चिदानंद स्वरूप आहेत हे उघड आहे. त्या कारणाने सर्व चराचर मात्र आनंदमग्न असण्यासाठी, अर्थात शिवशिवा स्वरूप, समावेशनासाठी अति उत्सुक असणार हेही उघड आहे. ही सच्चिदानंद स्वरूपता हेच अंतिम लक्ष्य अर्थात अद्वैत हेच अंतिम लक्ष्य असते हे उघड आहे. चराचरमात्र, स्वरूपतः आनंदमग्नतेसाठी उत्सुक आहेत. तसे त्यातील एक रूप मानव हेदेखील यासाठीच धडपडत असणार हे उघड आहे. या आनंदमग्न अवस्थेची स्वसंवेद्यता, सृष्टीस्वरूपात दृष्ट आहे, हे विचारात घेतले; तर सृष्टी हा त्या आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाच्या ठायीचा उत्सव आहे, असेच प्रतीत होते. उत्सव म्हणजेच आनंद, अर्थात उत्सव ह्या कार्याच्या ठायी आनंद असतोच! म्हणजेच परब्रह्म स्वरूपाची जगत्स्वरूपता हा उत्सव आहे. म्हणूनच प्रत्येक अस्तित्व उत्सवात मग्न होण्यासाठी धडपडते.

डॉ. श्री. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी संपादित, श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर (भीष्म) प्रकाशित, 'भारतीय इतिहास व संस्कृति यांचा यथार्थ अभ्यास' या खंडात्मक ग्रंथमालिकेतील 'ब्रह्मन्' या १२व्या खंडाच्या प्रस्तावनेत श्री. अ. ग. जावडेकर, या आनंदमग्न अवस्थेच्या आतुरतेसंबंधात लिहितात, 'जीव मूलतः आनंदस्वरूप आहे' या मथळ्याखाली माणसाला सतत सुखाची इच्छा का उत्पन्न होते? या प्रश्नाला उत्तर देतांना म्हणतात, 'आनंदमग्नता हा मुळी जिवाचा स्वभावधर्म आहे. तो त्याचा गाभाच असल्याने त्याची स्वाभाविक कार्यप्रवृत्ती, मूळची अनुभूती कायम टिकविण्याची असते. त्याचा जो मूळ गुणधर्म

तोच त्याच्या कार्यप्रणालीत दिसून येतो. जीव हा आनंदस्वरूपी असल्यामुळे त्याची धारणा म्हणजेच त्यात उमटणारे तरंग साहजिकपणे आनंदाकडे (अर्थात सत्य आणि चिद् यांकडे) धाव घेत राहतात. जीव मूलतः आनंदस्वरूपी असूनही त्याला सातत्याने आनंदाची अनुभूती येत नाही, ही जी मोठी तात्त्विक समस्या निर्माण होते, तिलाच वेदान्तात माया, अज्ञान, अविद्या अशी नावे दिलेली आहेत.'

ते पुढे लिहितात, 'आपला स्वाभाविक व अमूल्य ठेवा हरवला आहे एवढे मात्र खरे. एखादी वस्तू का व कशी हरवते याचे समर्पक वा समाधानकारक उत्तर देणे कठीण आहे. मग ती पुन्हा गवसेपर्यंत शोध घेत राहणे एवढाच पर्याय शिल्लक राहतो. तेव्हा हरवेलला आनंद पुन्हा प्राप्त करून घेण्यासाठी तर्कशुद्ध व शास्त्रपूत प्रयास हाच त्या शोधाचा एकमेव खात्रीचा मार्ग होय.' हे श्री. अ. ग. जावडेकरांचे विवेचन जेवढे खरे; तेवढेच लोकजीवनात अनादिकालापासून तर्कात बसू शकत नाही अशा सच्चिदानंद स्वरूपाची संगती नकारात्मकतेने लावण्यापेक्षा त्या सच्चिदानंद स्वरूपातील आनंदमग्नता, स्वसंवेद्यतेने भोगण्यासाठी माणसाने लोकजीवनात सामवेदात्मक आणि अथर्ववेदात्मक पद्धतीने म्हणता येईल, अशा उत्सव मांडणीचा किंवा उत्सव करण्याचा पर्याय निवडलेला दिसतो. माणसाचे अवघे जीवनच उत्सवमय आहे असे पाहता येते, हेही स्वाभाविक आहे. परब्रह्माचे स्वसंवेद्यतेने सृष्टीस्वरूप उत्सवस्वरूप अनुभवणे जसे स्वभावतः आहे; तेवढेच परब्रह्मस्वरूप मानवाने, उत्सवस्वरूपात आनंदप्राप्ती करून घेणे स्वाभाविक आहे.

श्रुतिवाङ्मय, स्मृतिवाङ्मय शास्त्रे आणि पुराणांनी मानवाच्या जीवनावस्थेची, कार्यप्रवृत्तीची आणि एकूण परब्रह्म आणि जगत्सृष्टीची संगती परोपरीने लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचीच परिणती तत्त्वज्ञानात आणि धर्मशास्त्रात तथा अन्य शास्त्रांमध्ये झाली आहे. चराचरसृष्टी हीच स्वरूपतः आणि स्वभावतः स्वसंवेद्यपणे सच्चिदानंद स्वरूप आहे. मग असे असताही इतिहासात मानवेतरांकडून, मानवाप्रमाणे या अमृतानुभवाचा शोध घेऊन; मांडणी करण्याची प्रक्रिया मात्र घडलेली दिसत नाही. अपवादही अभावानेच शोधावे लागतात. मात्र माणसाने हा खटाटोप करून, अविद्या, माया किंवा अज्ञान यांची पटले दूर करून संघर्षपूर्वक, व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर या सच्चिदानंद स्वरूपाचा अर्थात निर्गुण,

निराकार, निर्विकार, निज, महाशून्य, केवल, परब्रह्म, परमात्मा, आद्यस्वसंवेद्य आत्मरूप अशा सच्चिदानंदरूपाचा आणि स्वसंवेद्यतेने आविष्कारित अशा स्वरूपतः असलेल्या सृष्टीस्वरूपातील सच्चिदानंद स्वरूपाचा शोध, स्वसंवेद्यतेने घेण्याचा सनातन खटाटोप केलेला आहे. हे मानवाच्या संदर्भानेच का घडले? ह्याचा विचारही ऋषी, मुनी, तपस्वी, सिद्ध, योगी, संत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, कवी, लेखक, कलावंत यांनी केला आहे. मानवी देहाचे वेगळेपण परोपरीने अनुभवत, शास्त्रांची आणि तत्त्वज्ञानाची मांडणी केली आहे. त्याद्वारा 'शिव-शिवा समावेशन' आणि 'ॐ पूर्णमद...' या सिद्धांताचा साक्षात्कार अनुभवण्याचा सतत प्रयत्न केला आहे.

# (३)

# उत्सव

जन्म आणि मृत्यूमधील सगुण साकार देहाच्या जगण्याला आपण जीवन असे म्हणतो. जन्म आणि मृत्यू या दोन्ही गोष्टी स्वाधीनच्या नाहीत हे प्रत्येक माणसाला ज्ञात असतेच. मानवी जिवंतपण हे अलौकिकच म्हणावे लागते. अन्य प्राणीमात्र अर्थात जीवमात्र आहार, निद्रा, भय आणि मैथून या चार अपरिहार्य विकारांसह पृथक वा समूहशीलतेने जीवन कंठीत असतो. भोग भोगणे हेच त्याचे जीवन असते. मनुष्य या जीवमात्रांप्रमाणे या चारही विकारांसह जगत असतोच. अन्य जीव प्राप्त नैसर्गिक अवस्था आणि उपलब्धी यांत फार जुजबी प्रमाणात भोगसापेक्ष बदल घडवून भोग भोगण्यात दंग असतो. अन्नशोधनासाठी स्थलांतर करणे, संभोग, प्रजनन आणि निद्रा यांसाठी सुरक्षित जागा शोधणे, प्रजननासाठी प्रसंगी घरटी बांधणे इ. पुरताच बदल घडविण्याची क्षमता या जीवमात्रांत असते. माणूस मात्र आपल्या ठायीच्या मनोस्वरूपच्या शक्तींनी, निसर्गाने उपलब्ध करून दिलेल्या गोष्टी स्वप्रतिभेने बदलून, नियमित करून वा कृत्रिमपणे निर्माण करून; जीवन साधने बनवून जगतो. हाच माणूस प्राणी आणि अन्य जीवमात्र यात भेद आहे.

माणसाला निसर्गाने जे दिलं ते त्याच्या प्रतिभेने सुंदर करून साधनस्वरूप वापरलं. समूहजीवनाला कुटुंब, जात, समाज, गाव, राज्य, राष्ट्र असे आत्मनिष्ठ आकार दिले. स्वतःचे जीवनविषयक नियमन, सारणी त्याने स्वतः निर्माण केली. धर्मकर्म, व्यापारउदीम, कृषीकर्म, आरोग्य, न्यायनीती, संरक्षण इ. अनेक अंगांनी मानवी जीवन समूहसापेक्षतेने बंदिस्त केले. स्व ला सामूहिकतेचे बंधन घालून यातायात केली. पंचभौत्तिकांचा माणसासाठी साधन म्हणून उपयोग करण्यात त्याच्या प्रतिभेने विलक्षण यश मिळविले. तो स्वतःच निर्माता झाला.

निर्मिकाचेही विस्मरण होऊन; स्वतःच निर्माण केलेल्या धर्मकर्ममीमांसेत, आणि स्वनिर्मित साधनांच्या गर्दीत तो स्वतःच हरवला. म्हणजे स्वप्रतिभेने निर्माण केलेल्या सौंदर्यपूर्ण साधनात, त्यांच्या उपयोजनात तो स्वतःच मग्न झाला. ही त्याची मग्नता म्हणजे जीवनाचे उत्सवरूपच होय.

जन्म का घडला? मृत्यू का? मृत्यूनंतर काय? जन्मापूर्वी काय? जगनिर्माता कोण? निर्मिती का? कशी? असे प्रश्न त्याला पडलेच, पण त्याने त्याच्या परीने त्यांची उत्तरे शोधून जीवनकर्म सुरूच ठेवले. माणूस स्वतःच निर्माता, शास्ता, भोक्ता झाला. असे होऊनही जन्म आणि मृत्यू याविषयी त्याला निर्णायक काहीच करता आले नाही. स्वनिर्मित, भौत्तिक आणि मानव्यविषयक सारणीमध्ये तो स्वतःच हरवला. जीवनाचे ध्येय कोणते; यासंबंधी तो भ्रमित झाला. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, भौत्तिक, न्यायनीतीविषयक तथा धार्मिक गोष्टींत त्याने उद्दिष्टानुवर्ती जगणे सुरू ठेवले. उद्दिष्टपूर्तीसाठी बद्धपणाने संघर्षात्मक जीवन सुरूच ठेवले. उद्दिष्टपूर्तीचे समाधान आनंद मिळताच पुढील उद्दिष्टांसाठी संघर्ष या अशा बद्ध उत्सवांच्या शृंखलेत मानव सापडला.

उद्दिष्टपूर्तीपुरता आनंद, उद्दिष्टाप्रमाणे क्षणभंगूर ठरतो हे त्याला कळले; तरी देहभावाने त्याच त्या धर्मकर्ममीमांसात्मक, उद्दिष्टानुवर्ती, यातायातीत माणूस फसला. हे घडत असतांना जीवनार्थ केलेल्या कलहाचे, संघर्षाचे अंतिम फलित शून्य आहे, हेही त्याला जाणवले. म्हणूनच त्याचे जीवन हा अखंडपणे सुखाचा, आनंदाचा शोध होय असे माणसाला वाटू लागले. स्वतःच निर्माता असूनही शाश्वत आनंद मिळविण्यात आपण अपयशी आहोत याची जाणीव माणसाला होतच राहिली. तो आनंद नेमका कोठे आहे? कसा मिळविता येईल? तो मिळाला की आपली स्थिती काय होईल याविषयी त्याचे कुतुहल प्रत्यही शिगेलाच पोहोचले आहे. त्यासाठी माणसाने नवी आनंदलक्ष्यी उद्दिष्ट्ये जीवनाच्या सर्व क्षेत्रात निर्माण केली. उद्दिष्टपूर्तीसाठीची पद्धती, प्रक्रिया, सिद्धी असा उद्दिष्टपूर्तीचा उत्सव मांडला. देहभावाने या उत्सव शृंखलेत अडकला आणि अडकतोच आहे.

ऋषी, मुनी, तपस्वी, कवी, लेखक, कलावंत, शास्त्रज्ञ, चिंतक यांनी, जन्म-मृत्यूमधील देहभावकेंद्रित उत्सवांची भ्रामकता लक्षात आणून देऊन त्या उत्सवांना अंतिम, मूलभूत असे आत्मलक्ष्यी ध्येय दिले. त्यामुळे तात्कालिकतेला पुरुषार्थाचे रूप येऊन, सच्चिदानंदस्वरूप हे अंतिम लक्ष्य मिळाले. जन्म-मृत्यूम

धील जीवनातील उद्दिष्टानुवर्ती सर्व यातायातींना निष्काम कर्मयोगाचे विवेकपूर्ण परिमाण मिळाले. तत्त्वज्ञ, साधूसंत, ऋषीमुनी इ.चे हे कार्य मानवी जीवनाला अशाश्वत अशा उद्दिष्टपूर्तींकडून शाश्वत अशा ध्येयपूर्तीचे परिमाण देणारे ठरले. जीवन हाच उत्सव झाला!

**सच्चिदानंदरूपाय विश्वोत्पत्यादि हेतवे ।**
**तापत्रयविमोक्षाय श्रीकृष्णाय वयं नुमः ।।**

या श्रीमद्भागवतातील मंगलाचरणातील श्लोकामध्ये सच्चिदानंदस्वरूप हेच विश्वोत्पत्तीचे कारण आहे असे म्हणून सच्चिदानंदरूपाचाच विश्व हा आविष्कार आहे असे स्पष्ट करून, विश्व हाच उत्सव आहे असे म्हटले आहे. हे उमगले तर जीवनार्थ कलहात पुरुषार्थ साधनेतील क्रीडात्मक आनंदमयताच उद्भवते. जीवनातील दुःखाचे रुपांतरही आनंदरूप वाटू लागते. तेथे देहभावात्मक दुःखाची जाणीव सरते.

ही आनंदानुभूतीची प्रक्रिया भक्तिभावनेच्या उत्कटतेतून सिद्ध होते. भक्तिसाधना हा उद्दिष्टपूर्तीसाठीचे साधन म्हणून माणूस वापरू लागला; तर समस्त यातायात ज्ञानात्मकतेने विवेकपूर्णतेने घडेल आणि आत्मसुख प्रतीती देणारी ठरेल. यासाठीच भक्तीचा उत्सव मांडला पाहिजे. भक्ती हेच प्रत्येक उद्दिष्टाचे प्रतिरूप असले पाहिजे असा ज्ञानात्मक व्यवहार सुरू झाला तर देहभावाची आसक्ती नाहीशी होईल. वासनांविषयी विरक्ती येईल आणि लौकिकात, समूहजीवनात प्रत्येक यातायात खेळ स्वरूपात समोर येईल.

लोकधुरिणांनी जीवनसारणी मांडतांना हीच 'लोकनिष्ठ अध्यात्म' दृष्टी ठेवली. उत्सव संपन्नतेसाठी कलह, दुःखभोग, यातायातदेखील आनंदमग्न आनंदमग्नतेने घडते. जीवन असे आनंदलक्ष्यी होते. हतबलता, नैराश्य, निरुपायता, दुःख, दैन्य, दारिद्र्य, पराधिनता, क्लेश, त्रिविध ताप सोसण्याचे आत्मबल प्रकटते. भक्ती, ज्ञान, वैराग्य ही त्रिपदी कार्यरत करण्याचे सामर्थ्य मानवी मनात आहे. मनोस्वरूप सिद्ध झाले की, हे घडते, संपूर्ण सारणी ही 'लोकनिष्ठ अध्यात्मवादी' भूमिकेतून असल्याचे जाणवते. विवेक, वैराग्यपूर्ण कर्तव्यतत्परता, समूहनिष्ठेने प्रकटते. अर्थात भूतमात्रांच्या निष्ठेने प्रकटते आणि जीवनात आनंदमग्नता येते.

हे का व कसे घडते? याविषयी प्रश्न, महामाया, महाशक्ती स्वरूपिणी, शिवांनी अर्थात पार्वतींनी महतत्त्वस्वरूप शिवांना विचारला. 'शिवस्वरोदय' या

स्वर शास्त्रात हा प्रसंग मोठ्या नाट्यमयतेने मांडला आहे. वास्तविक पाहाता अमृतानुभवांप्रमाणे ‘प्रियुचिप्राणेश्वरी’ असे शिवशिवांचे स्वरूप आहे. त्यादृष्टीने तत्त्वाला तत्त्वानेच विचारलेला प्रश्न आहे असे या प्रश्नाचे स्वरूप होते. जीवनाच्या दुःखपूर्ण भासणाऱ्या यातायातींना आनंदमग्न उत्सवाचे परिमाण देणारा हा संवाद आहे. हा संवाद असा–

‘सार्थ शिवस्वरोदय’ या गो. ना. शास्त्री दातार संपादित तथा लिखित श्री गजानन बुक डेपो (अर्थात पुरंदरे आणि कंपनी) प्रकाशित ग्रंथात, शिव–शिवा संवाद सुरुवातीलाच आला आहे.

**‘‘देव्युवाच । देवदेव महादेव कृपां कृत्वा ममोपरि ।।**
**सर्वसिद्धिकरं ज्ञानं कथयस्म मम प्रभो ।।१।।**
**कथं ब्रह्मांडमुत्पन्नं कथं वा परिवर्तते ।।**
**कथं विलीयते देव वद ब्रह्मांडनिर्णयम् ।।२।।’’**

पूर्वी एकदा देवी श्री महादेवास म्हणाली, हे स्वामी, हे देवदेवा महेश्वरा, माझ्यावर कृपा करून सर्वसिद्धी प्राप्त करून देणारे ज्ञान मला सांगा ।।१।। हे विश्व कसे उत्पन्न झाले, हे कशाने चालले आहे व याचा अंत कसा होतो इत्यादी ब्रह्मांड संबंधी निर्णय मला सांगा.।।२।।

**‘‘ईश्वर उवाच । तत्वाह(ब्र)ह्मांडमुत्पन्नं तत्त्वेन परिवर्तते ।।**
**तत्त्वे विलीयते देवि तत्त्वह(ब्र)ह्माण्डनिर्णयः ।।३।।’’**

श्री महादेव सांगतात– हे पार्वती, हे ब्रह्मांड तत्त्वापासून उत्पन्न झाले हे तत्त्वानेच चालले आहे व याचा तत्त्वामध्येच लय होतो; याप्रमाणे ब्रह्मांडाचा निर्णय तत्त्वानेच होतो.

**‘‘देव्युवाच ।। तत्त्वमेव परं मूलं निश्चिंत तत्त्ववादिभिः ।।**
**तत्त्वस्वरूपं किं देव तत्त्वमेव प्रकाशय ।।४।।’’**

देवी म्हणाली– तत्त्ववेत्त्यांनी सर्वउत्पत्तीच आदिकारण तत्त्वच होय असं ठरविलं आहे. तर हे देवा, तत्त्वाचे स्वरूप काय आहे हे आपणच मला समजावून द्या. ।।४।।

**‘‘ईश्वर उवाच ।। निरंजनो निराकार एको देवो महेश्वरः ।।**
**तस्मादाकाशमुत्पन्नमाकाशाद्वायुसंभवः ।।५।।**
**वायोस्तेजस्ततश्चापस्ततः पृथ्वीसमुद्भवः ।।**

**एतानि पंचतत्त्वानि विस्तीर्णानिच पंचधा ।।६।।''**

श्री महादेव म्हणाले, मायारहित आकाशरहित, अद्वितीय प्रकाशमान असा जो महेश्वर (आत्मस्वरूप) त्यापासून आकाश उत्पन्न झाले, आकाशापासून वायू ।।५।। वायूपासून तेज, तेजापासून जल व जलापासून पृथ्वी उत्पन्न झाली. हीच पंचतत्त्वे होत. या प्रत्येकाचे विस्तृत असे पाच पाच भेद आहेत.।।६।।

'शिवस्वरोदय' या शास्त्र ग्रंथाचा प्राकृत ओवीबद्ध अनुवाद असे ज्याचे वर्णन करता येईल, अशा 'तत्त्वसार, पवनविजय, काळ ज्ञान' या त्रिखंडात्मक लेखनात तत्त्वसार सांगतांना संत शेखमहंमद सांगतात, ''आतां जो शिवशक्तीचा खेळु । आणिक समाधीचा मेळु । निराकाराचा आकारू । महंमदी सद्गुरु सांगिजेल ।।'' श्री संत शेखमहंमद महाराज कृत 'अमृतवाणी' या डॉ. यु. म. पठाण संपादित आणि श्री संत शेखमहंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठान व ग्रामस्थ, श्रीगोंदा यांनी प्रसिद्ध केलेल्या या ग्रंथात 'शिवशक्तीचा खेळ' असे या निराकारातून आकारित झालेल्या विश्वपसाऱ्याच्या नित्य चलनाला म्हटले आहे. शिवशंकर 'शिवस्वरोदय' शास्त्र पार्वतीदेवींना समजावून सांगत आहेत. म्हणजे आपल्यातून निष्पन्न झालेल्या 'स्वरोदय' स्वरूपातील शक्तीलाच शास्त्र समजावून सांगत आहेत. हे शास्त्र मानव म्हणून जन्माला आलेल्या तत्त्वज्ञानी जाणकारांना, काय व कसे उमगले हे सांगून स्वतःच्या विश्वस्वरूपाचे क्रीडारहस्य समजून सांगत आहेत. ते सांगतात 'हे पार्वती हे ब्रह्मांड तत्त्वापासून उत्पन्न झाले, हे तत्त्वानेच चालले अर्थात तत्त्वाने क्रीडारूप अर्थात उत्सवस्वरूप चालले म्हणजेच सत्य, चिद्, आनंद या एकात्म अवस्थेने, आनंदमग्नतेने चालले आणि त्याचा लय अर्थात अंतिम ध्येय तत्त्व हेच आहे.' या सर्व विवेचनाचा मतितार्थ असा, आनंद या सत्याच्या चैतन्य अवस्थेतून आनंदमय असे विश्व निर्माण झाले. या विश्वाच्या चलनाचे अंतिम ध्येय आनंद हेच आहे. तत्त्व म्हणजेच आनंद. अर्थात, ब्रह्मांडही आनंदमय आहे. स्वाभाविकपणे या ब्रह्मांडातील प्रत्येक आकाराचे, अर्थात सगुण रूपाचे अंतिम लक्ष्य आनंद हेच आहे. त्यामुळे त्या साकारसगुणाचा जन्म, मृत्यू आणि मधील जीवनस्थितीचलन या सर्व स्तरांवर आनंद हेच त्याचे, अर्थात त्या साकारसगुण जीवाचे लक्ष्य आहे.

मानवाच्या जीवनातील प्रत्येक क्षण भोगण्याचे उद्दिष्ट आनंद अर्थात सुख प्राप्ती हेच असणार. समूहशील माणूस त्या प्रत्येक क्षणाचा आनंदलक्ष्यी

भोग घेण्यासाठी भूमिका घेतो. येथेच जीवाची देहभाव आणि आत्मभाव यात पंचतत्त्वीय, रासायनिक नित्य बदलामुळे रासायनिक आणि कायिक स्वरूपात बदल घडविण्यासाठी धडपडू लागतो. जीवनार्थ कलहातील त्या जीवाची ती एक भूमिका असते. जीवनक्रीडेतील त्याची ती भूमिका आनंदलक्ष्यी उद्दिष्टानुवर्ती व्यवहार करते. जन्माला आलेले अर्भक आपल्या अर्भक या भूमिकेतून आनंद मिळविण्यासाठी धडपडू लागले त्यावेळी त्याच्या ठायीच्या भूक या विकाराची पूर्ती म्हणजे आनंद अशी देहभावाची कल्पना असते. भूक भागविणे एवढ्या उद्दिष्टासाठी ते अर्भक आकांत मांडते. परिपूर्ती झाली की ते आत्मभावाने खेळू लागते पुन्हा देहभावातील क्षुधा जागृत होईपर्यंत. अर्थात उद्दिष्टपूर्तीचा आनंद क्षणभंगूर सुख आहे हे त्याला जाणवते तरी त्या आनंदप्राप्तीसाठी मातेला लुचण्यासाठीचा त्याचा उत्सव सुरू होतो. देहभावाने तात्कालिक आनंद होतो. हे जसजसे त्याला कळू लागते तसतसा त्याच्यातील आत्मभाव देहभावाचे ठायीच प्रकट होत असतो. शाश्वत आनंद लाभावा, हीच स्वाभाविकता असते. त्यासाठी जीवनातील विविध भूमिका तो जीवात्मा वठवू लागतो. आपल्या जीवनातील देहभावाच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी आत्मभावाचा उपयोग करू लागतो. येथेच सगुण, निर्गुणाचा शाश्वत आनंदासाठी प्रयत्न सुरू होतो.

सगुण मायावशतेने अर्थात वासनावशतेने, उद्दिष्टानुवर्ती आनंद मिळविण्यात तो मग्न होतो आणि क्षणाक्षणाला क्षणभंगूर आनंदाने दुःखी होऊन शाश्वत आनंदासाठी तो धडपडू लागतो. पंचभौतिक तत्त्वे, महातत्त्वाप्रत पोचण्यात स्वाभाविक अडथळे बनतात. त्यालाच देहाहंकार असे नाव आहे. देहालाच 'मी' समजून ठायीच्या सच्चिदानंदाला तो पारखा होतो. ते पारखेपण त्याला जाणवते, म्हणूनच समूहसारणीरूपात प्रत्येक उद्दिष्टपूर्तीला शाश्वत आनंदलक्ष्यी मांडणी करून तो सारणीतील उत्सवात देहभानासह भूमिका बजावू लागतो. मात्र देहाहंकाराने जोपर्यंत तो उत्सवातील भूमिका बजावतो तोवर भ्रामक क्षणभंगूर आनंदात मग्न होऊन तो शाश्वत आनंदाला पारखा होतो. अपत्यप्राप्तीचा उत्सव करताना पिता आणि माता इ. भूमिका बजावतांना निसर्गाच्या स्वाभाविक रासायनिक प्रक्रियेचा त्याला विसर पडतो. स्वनिर्मितीचा देहाहंकार कुरवाळतो आणि काही क्षणानंतर पुन्हा त्या तात्कालिक आनंदाला पारखा होतो. शिवशक्तीच्या खेळातील खेळगडी म्हणून वावरण्याऐवजी स्वतःच शिवशक्ती असल्याच्या देहाहंकाराने भूमिका

मिरवितो. क्रीडेतील निरपेक्ष आनंदाला पारखा होतो.

मानवाच्या प्राप्त साकार सगुण रूपाची अर्थात देहाची क्षमता मानवी मनोस्वरूपाने जाणली. मानवी देह हा उद्‌भिज, अंडज, स्वेदज, जारज या चारही प्रकारच्या जीवांच्या क्षमतेसह अधिक विकसित असा जीवात्मा आहे हे त्याला जाणवले. स्वरशास्त्र मांडण्याचे प्रातीभ ज्ञान त्याला प्राप्त झाले. या शास्त्राचे ज्ञान विश्वातील सर्व गोष्टी भोगूनही मूळ तत्त्वस्वरूप होण्याची क्षमता स्पष्ट करून; मानवाला ब्रह्मस्वरूप देणारे आहे; हे मानवी मनोस्वरूपाच्या द्रष्टेपणाला उमगले. मानवी देहाच्या जन्म-मृत्यूसह जीवनातील धडपडीला या ज्ञानाने सच्चिदानंदरूप प्राप्त करून देणारे आकार देता येतील; अशी सारणी मानवी समूहमनाला या द्रष्टेपणातून उमगली. मानवी जीवनसारणी हा मानवी मनोस्वरूपाचा विलास आहे. मानवाने, तत्त्वातून विलासात्मकतेने प्रकटलेल्या तत्त्वमयी विलासात्मक शक्तिस्वरूपिणी सृष्टीप्रमाणे, आपल्या समूहमनाने प्रतिसृष्टीस्वरूप सारणी निर्माण केली ही मानवी स्वरूपाची लीलाच होय.

सृष्टीचा विचार मानवी जीवात्म्याने जीवात्मकेंद्रिततेने केला. सृष्टी आणि जीवात्मा यांचा अन्योन्य संबंध हा असा मानवी जीवात्मकेंद्रित झाला. त्या घटनेमुळेच तर मानवी जीवनाचा सांस्कृतिक इतिहास अनुभवता येतो. मनोस्वरूपाची लीला हीदेखील परब्रह्माच्या नित्य परिवर्तनशील अविनाशी सृष्टीलीलेसारखी कलात्मक स्वरूपातच प्रकटते आहे. मानवी मन हे तत्त्वाशी स्वरूपसंबंधाने अनुभवता येते. तत्त्वातून लीलात्मक अर्थात कलात्मक विश्वनिर्मिती हा जर; नियती नावाची जी सर्वतर्कांपलिकडील प्रक्रिया आहे; त्या नियतीनुसार चमत्कार मानला तर; मानवी संघमनाची मनोस्वरूपाच्या स्वसंवेद्यतेतून प्रकटलेली कलात्मक जीवनसारणी हाही चमत्कार असे मानता येईल.

भारतीय दैवतकथाशास्त्राप्रमाणे, सृष्टीनियंते त्रिदेव यांची अर्थात शिव, विष्णू, ब्रह्म आणि शिवा, वैष्णवी आणि ब्रह्मा या शक्तींची सृष्टीसारणी लीला अर्थात सृष्टीकला मानले तर; सोऽहं पद जाणवलेल्या, त्रिदेव देवी अशा आत्मस्वरूपा, मानवी मनोस्वरूपाची जीवनसारणी लीला आहे अर्थात सारणी कला आहे, असं म्हणता येते. 'World is the stage and every man is an actor' ही उक्ती त्यामुळेच प्रचलित झाली असावी. या सारणीसाठी ऋषींनी द्रष्टेपणाने 'अहं ब्रह्मः अस्मि' किंवा 'सोऽहम' किंवा 'एकोऽहं बहुस्याम प्रजाजेय', 'तत्त्वमसि'

अशा आत्मविश्वासात्मक घोषणा केल्या, त्या संघमनोस्वरूप विचारानेच होय; हेही तेवढेच सत्य! सच्चिदानंदस्वरूपता ठायीच आहे. ती भोगण्यासाठी संघमनोस्वरूपाची सारणी म्हणजे कलासाधना होय, असेच मानवी जीवनसारणीचे स्वरूप वर्णन करता येईल.

'मनोस्वरूप विचार' या प्रस्तुत लेखकाने लिहिलेल्या आणि मोरया प्रकाशन, पुणे/डोंबिवलीने प्रकाशित केलेल्या पुस्तकात मनोस्वरूपपणाचे निजरूपत्व, स्वसंवेद्य आणि आद्य ॐकार स्वरूपत्व, सविस्तर स्पष्ट केले आहे. हे मनोज्ञान सद्‌गुरुकडून सत्‌शिष्याला प्राप्त होते, हे खरे असले तरी; समस्त मानवी जीवजातीस हे ज्ञान होऊन; त्यांना सच्चिदानंद स्वरूपता ठायीच, त्यांच्या जीवनसंघर्षात अनुभवता यावी; यासाठी जीवनसारणीत प्रत्येक कर्मघटना उत्सवसदृश्य, उद्दिष्टपूर्तीस्वरूप पारंपरित केलेली दिसते. हा मनोस्वरूप विचार, श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी लिखित, कॉन्टिनेन्टल प्रकाशन प्रकाशित 'आनंद-तरंग' या ग्रंथात, 'भौतिकशास्त्रांचा अभ्यास आत्मज्ञानाशिवाय अपुरा' या मथळ्याखालील 'नारदाची कथा' निवेदित करून; मांडला आहे. ते लिहितात, '(आत्मज्ञान) हे मिळविणे हाच मानवी पुरुषार्थ आहे. कारण, याच ज्ञानाने अमृतत्त्व म्हणजे मोक्ष मिळतो. हे मनावर बिंबविण्याकरता छांदोग्य उपनिषदात नारदाची कथा आली आहे. कथा सारांश असा, नारदांना चराचर सृष्टीचे अर्थात भौतिक ज्ञान झाले आहे, हे सनत्‌कुमारांनी जाणले. मात्र आत्मज्ञान होण्यासाठी नारदांना प्रथम वाणीचे महत्त्व सांगितले व वाणीतून मनाचे ज्ञान करून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. मानवी जीवनात वाणी आणि भौतिकज्ञान यांचा उपयोग मनाच्या शुद्धतेवर अवलंबून असल्याचे सांगून; 'मन हे आत्मा आहे, मन हेच ब्रह्म आहे, अशी मनाची भूमिका होणे आवश्यक असल्याचे सांगितले. मन हे शुद्ध संकल्पवान करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. मानवाचा दानव होणे वा देव होणे हे मनावर अवलंबून आहे. शुद्ध मनाशिवाय वाणी व भौतिकज्ञानाचा स्वतःचे व स्वतःभोवती असणाऱ्या लोकांचे कल्याण करण्याकरिता उपयोग होणे शक्य नाही.' याप्रमाणे मानवी मनाचे महत्त्व सनत्‌कुमारांनी नारदांस पटवून दिले. सर्वसाधारण देहभावाने जगणाऱ्या मानवाला सच्चिदानंद स्वरूपाचा अनुभव जीवनसंघर्षात व्हावा, यांसाठी मोठ्या कलात्मकतेने जीवनसारणीत धर्म, संस्कृती, कुटुंब, समाज, कृषीविज्ञान, न्यायनीती, राजव्यवहार, वैद्यक इ.

सर्व जीवनांगात उद्दिष्टानुवर्ती उत्सवात्मक मांडणी केली आहे. ही उत्सवस्वरूप मांडणी मनोस्वरूपाच्या संघमनोस्वरूपाची कलात्मक मांडणी आहे. संघजीवनात संघर्षपूर्णतेने उद्दिष्टपूर्तीस्वरूपात, उत्सवी वृत्तीने जगण्याचा प्रयत्न, व्यष्टी आणि समष्टी स्वरूपात माणूस करीत आहे. ही उत्सवांची मांडणी म्हणजेच माणसाने माणसांसाठी केलेली 'लोकनिष्ठ अध्यात्मवादी' मांडणी होय. प्रस्तुत लेखकाने लिहिलेल्या, पद्मगंधा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'लोकनिष्ठ अध्यात्मवाद' या ग्रंथात याविषयी विस्तृत चर्चा केली आहे.

निर्गुण, निराकार, निर्विकार, महाशून्य, निज, केवल, संवित्ती, आद्य ॐकारस्वरूप, स्वसंवेद्य सच्चिदानंदस्वरूपातून अर्थात महत्‌तत्त्वातून, महाशक्तीस्वरूप विश्वोत्पत्ती होणे हाच आनंदमय आविष्कार अर्थात उत्सव होय. विश्वाचे परिवर्तनशील, अविनाशी नित्य असे पंचतत्त्वात्मक चलन ही आनंदमय प्रक्रिया म्हणजेही उत्सवच आणि पुन्हा निर्गुण सच्चिदानंदस्वरूप होण्याच्या ध्येयाने घडणारी विश्वचलन ही आनंदघन प्रक्रियादेखील उत्सवच होय.

विश्वचलनातील जन्म, जीवन आणि मृत्यू असे मानवी व्यक्ती आणि समष्टीचे चलन, हेदेखील उत्पत्ती, स्थिती आणि लय प्रक्रियेतील एक, तसेच नित्य परिवर्तनशील आविष्कार अस्तित्व होय. नरदेह अर्थात मानवदेह अर्थात मानवी जीवात्मा हे विश्वचलनातील नित्य प्रक्रिया अवगत होणारे आणि निजरूपाच्या स्वसंवेद्यतेने मानवी जीवनाविष्काराला आकारित करून; मनस्वी चलन घडविण्याचा नित्य प्रयत्न करणारे; जीवसृष्टीतील सर्वाधिक विकसित अस्तित्व होय. या अस्तित्वाने उत्पत्ती, स्थिती आणि लय या प्रक्रियेला स्वसंवेद्यतेने सारणीचे रूप दिले. मानवाच्या सारणी आविष्कृत करण्याच्या या निर्माण क्षमतेमुळे मानवी जीवन स्वनिर्मित सारणीत बद्ध झाले; तरी त्याच्या आविष्काराचे अंतिम लक्ष्य स्वाभाविकपणे सच्चिदानंदस्वरूपच असणार हे उघड आहे. मात्र मानवाच्या अतिविकसित जीवात्म अवस्थेमुळे त्याच्या अस्तित्वाला जीवसृष्टीतील अन्य प्राण्यांपेक्षा वासनादेहभावाला अधिक अहंकारवशता आली. या देहाहंकारामुळे, मानवाने आविष्कृत केलेल्या लोकसारणीत सच्चिदानंदस्वरूपाचे लक्ष्य बाधित झाले. स्वस्वरूपाला पारखेपणा प्राप्त होऊन; जीव अर्थात देह हाच, जगतात कर्ता, शास्ता आणि भोक्ता असल्याची अहंकारी भ्रामकता आली. या भ्रामकतेने जीवनसारणीतील, व्यक्तिगत आणि समूहगत प्रत्येक धर्मकर्म चलनाला जीवाहंकाराने

व्यापले. क्षणभंगुरतेला, मर्त्यतेलाच शाश्वतता समजण्याची अंधविश्वासात्मकता जीवाच्या मूळ स्वभावाला बाधित करू लागली. येथेच जीवनात दुःख, पीडा, त्रास, न्यून, निराशा अशा अज्ञानवश गोष्टी बळावल्या. उत्सवांना तात्कालिक सुखसमाधान, आनंद किंवा उद्दिष्टपूर्तीचे परिमाण मिळाले. मृत्यूसमयीचे स्मशान वैराग्य, अशा जीवात्म्यांना पुन्हा अंतिम लक्ष्य, सच्चिदानंदस्वरूपता, याचे स्मरण करून देऊ लागले. येथेच मानवी जीवाला जागृतीची विवेकाची संधी होती, परंतु त्यातून मृत्यू ही तात्कालिक प्रक्रिया आहे याचे ज्ञान अज्ञानवश होऊन, मृत्यूचे भय बळावले.

संघमनाच्या स्वसंवेद्य मनोस्वरूपाने, सारणीत, तत्त्वापासून आविष्कारित अशा महतत्त्व, महतत्त्वाच्या ठायीची महाशक्ती, महतत्त्व आणि महशक्तीची त्रिविध शक्तिरूपे अर्थात् ब्रह्म-ब्रह्मा, विष्णू-वैष्णवी, शिव-शिवा - त्यांपासून आविष्कृत पंचतत्त्वे आणि या सर्व स्तरांवरील दिव्यत्वाची अनेकविध आविष्कारित शक्तिरूपे, यांच्या दिव्यानुभूतींची दैवत मालिका मनोन्वित केली. ही मालिका माता, पिता, गुरू, विशेष अधिकारी या सर्वांपर्यंत, पारंपरित केली. या सर्व दिव्यत्वाची प्रचिती ठायीच्या आत्मरूपात आणि आत्मरूपाच्या देहाठायीच्या चैतन्य संचारातही घेतली. जीवनसारणीत कर्मधर्मात्मक चलनात या सर्व दिव्यत्वांना ठायी अनुभूत करण्यासाठी, कृतज्ञता, श्रद्धा तथा विश्वास व प्रेमपूर्णतेने उत्सवांचे निर्माण केले. राजयोग, भक्तियोग, कर्मयोग यांचे व्यवस्थापन उत्सवांच्या परिपूर्तीसाठी आणि शक्तिसंपादनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी केले. या योगमार्गाने परिपूर्तीसाठी संघर्ष स्वीकारला.

जन्म, स्त्री-पुरुष संबंध, मृत्यू, भूक, वस्त्र, निवारा, व्यक्ती, कुटुंब, कुटुंबातील नातेसंबंध, सख्खे आणि सोयरे, गोत्रज, गोत्रसंबंधी, जात, समाज, ग्राम, ग्रामदैवते, वेस, वेसदैवत, भूखंड दैवते, बांधावरील दैवते, कृषीकर्म, कृषीकर्मसंबंधी मशागत, पेरणी, निंदणी, खुरपणी, पाणी देणे, लावणी, कापणी, मळणी, कृषी उत्पन्ने व त्यांचा विनिमय, कृषीजीवनविषयक संबंधी गुरेढोरे, पक्षी इ. कृषी संरक्षण, पर्जन्यविषयक विविध संकेत, ग्रामलोक परस्परसंबंध, स्वयंपूर्ण ग्रामातील विनिमय, ग्रामरचना घरेदारे, ग्रामव्यवस्थापन मंदिरे, मंदिरे, पंचक्रोशी, ग्राम तथा पंचक्रोशी व्यवस्थापन, ग्रामधुरीण, ग्रामपंचायत, जातपंचायत, राज्यव्यवस्था, नगरे व ग्राम संबंध, नद्यांचे प्रवाह व त्यांचे व्यवस्थापन,

संरक्षण, महसूल, आरोग्यव्यवस्था, स्थानदैवते, क्षेत्रीय दैवते, कुलदैवते-देवके, राज्यव्यवस्थेतील विविध अधिकारपदे व त्यासाठीची व्यवस्था, व्यापारउदीम, बाजारहाट, अवजारे, यंत्रे, साठवणविषयक साधने, भांडीकुंडी, अंथरुणपांघरुणे, दोरनाडे, बैठक व्यवस्था, कलाकुसर, पुरोहितवर्ग, उपासकवर्ग, धर्मकल्पना, धर्मपरंपरा, पंथपरंपरा, शिक्षणव्यवस्था, राज्योराज्यांचे परस्पसंबंध, राष्ट्रकल्पना, द्वंद्वे, भांडणे, वाद, युद्धे, युद्धांवर आधारित विनिमय, फंड, कार्यालये, दुकाने, वाहने, वाहनव्यवस्था, पेढ्या, जडजवाहर सोनेनाणे यांचा व्यवहार, सावकार, रिणको, धनको या संबंधातील विविध प्रथा, आधुनिक युगातील या सर्व गोष्टींसंबंधात विकसित झालेली व्यवस्था, वने, डोंगर, दऱ्या, खाणी, ऋतुचक्र यांशी समग्र जीवनाचा संबंध, अशा समग्र जीवनातील न्याय, नीती, कलात्मकता, सौंदर्य दृष्टी, श्रद्धा, भावसंबंध, या व अशा असंख्य सूक्ष्मातिसूक्ष्म स्वरूपातील, जीवननिगडित गोष्टींतील मानवी भूमिका, त्यातील हक्क आणि कर्तव्ये व ती निभावण्याची पद्धती, घटना, प्रसंग, संस्कार, विधिविधाने इ. अशा सर्व बाबी ज्या विशिष्ट उद्दिष्टपूर्तीसाठी असतात, त्यांचे ध्येय, उद्दिष्टपूर्तीतील आनंद व अंततोगत्वा जीवनसाफल्याचा शाश्वत आनंद हेच जीवनाचे श्रेय असते, असे ढोबळमानानेही म्हणता येते.

दिलेल्या उदाहरणांच्या आधारे मानवी जीवनाची गुंफण अनेकविध अंगी आहे हे लक्षात येईल. भारतीय परंपरेने, चौदा विद्या चौसष्ट कलांनी आणि आधुनिक काळापर्यंत असंख्य विद्याशाखा आणि असंख्य कला व कौशल्ये यांच्या उपयोजनाने, संघमनाच्या मनस्वीपणाने, आकार देऊन अधिकाधिक आनंद मिळविण्याचे अवसर या जीवनसारणीसाठी निर्माण केले आहेत. याचाच अर्थ सर्वार्थे सर्वांगांना उत्सवाचे विधिविधान देण्याचा प्रयत्न केला आहे. असा प्रयत्न, हीदेखील एक ज्ञानसाधनायुक्त आणि कलासाधनायुक्त जीवनप्रक्रिया आहे. या सारणीला पुरुषार्थांचे व आश्रमांचे परिमाण दिले आहे. त्यासाठी स्मृतीग्रंथ, नीतिशास्त्रे, न्यायशास्त्रे, संशोधनपद्धती, राज्यशास्त्रे, समाजशास्त्रे अशा शास्त्रांचे निर्माण आणि उपयोजन केले.

जीवनसारणीतील प्रत्येक अंगोपांगांच्या संबंधाने सामूहिक जीवनात भूमिका स्वीकारून कर्तव्यरत होतांना, श्रम करतांना माणसाची द्विधा स्थिती पाहावयास मिळते. त्यातील एक म्हणजे देहभावसापेक्ष सकामस्थिती होय. या स्थितीमध्ये

लोभ, मोह, मद, मत्सर, असूया, स्पर्धा, स्वार्थपरता, वासनाधिनता, व्यसनाधिनता, शोषण आणि संग्रह वृत्ती, सत्तालोलुपता अशा अनेक देहवासनासंबंधित गुणांमुळे माणसाच्या निखळ आनंदात अडथळे येतात. यांनाच परंपरेने रिपु तथा शत्रू असे म्हटले आहे. अर्थात या गुणांमुळेच उद्दिष्टपूर्ती आणि स्वार्थपर सत्तालोलुपता संबंधाने अवघे जीवनच संघर्षमय, क्लेशदायक, दुःखकारक वाटू लागते. असे जीवनही आनंदलक्ष्यी पद्धतीने जगताना, प्रत्येक उद्दिष्टपूर्ती उत्सवी पद्धतीने करण्याचा प्रयत्न घडतो. त्यामुळे उद्दिष्टपूर्तीचा आनंद मिळतो. परंतु आशालोलुपता आणि स्वार्थपर स्पर्धा यामुळे आनंद क्षणभंगूर ठरून; पुढील उद्दिष्टपूर्तीसाठी उत्सवी संघर्ष मांडण्याला कारणीभूत होतो. संचयप्रवृत्ती, सत्तालोलुपता यासंबंधाने या संघर्षाची ठायी ठायी उदाहरणे मानवी जीवनात मिळतच राहतात.

दुसरी स्थिती ही आत्मज्ञानपर असते. ती वैराग्य विवेक याने युक्त, ताटस्थ्यपूर्वक कर्तव्यतत्पर निरपेक्ष कर्मयोगी वृत्ती असते. या वृत्तीने जीवनसारणीत जीवन कंठणारा माणूस व्यक्तिगत आणि समूहजीवनातही जीवनमुक्त सानंद जीवन जगतांना अनुभूत होतो.

नरदेहाचे अस्तित्व द्विविध आहे. मानवेतरांचे अस्तित्वदेखील द्विविध असणार हे उघड आहे. सर्वाभूती परब्रह्म हे जाणवले की याची खात्री पटते. एवढेच नव्हे तर पार्थिव, अचर अशा सृष्टीरूपांतही असेच द्विविध अस्तित्व असणार, असे म्हणता येईल. सच्चिदानंदस्वरूप स्वसंवेद्य असे निजरूपच सर्वप्रकारे, अनेक होऊन नटले आहे. हे लक्षात घेतले तर वरील तीनही विधाने मान्यच करावी लागतात. त्या निर्गुणास स्वसंवेद्यतेचा अनुभव वाणी आणि अनेकविध भौतिक रूपाने नटून घेण्यासाठी विकार झाला तर; अंशात्मक निजरूप असलेल्या मानवालादेखील या पंचभौतिकातून विविध रूपे निर्माण करण्याची शक्ती आहे असे प्रत्यक्ष प्रत्ययास येणे नवल नाही. माणसाने मानवी समूह, माणसाचा संबंध येणारी चराचर सृष्टी आणि मानवनिर्मित स्वकेंद्रित साधने; यांसह मानवी सारणी तयार करून; त्यात जन्मापासून मृत्यूपर्यंत आणि जीवनमुक्त होण्याच्या इच्छेपर्यंत, असंख्य लहान आणि महान अशी उद्दिष्टे कल्पिली. त्या उद्दिष्टांची विधिविधानांसह मांडणी केली. या मांडणीत धर्मकर्मसूत्रांनुसार स्वपरीने कर्तव्यकर्म करण्याची सारणी तयार केली. स्वतःच स्वतःच्या जीवात्मस्वरूपाला देहभावी आणि विदेहभावी असे अस्तित्व बहाल केले. उद्दिष्टांच्या विधिविधानांसह कर्मप्रक्रियेला त्याने आनंदलक्ष्यी असे

उत्सवी रूप दिले.

आनंदलक्ष्यी उत्सव सफल करण्यासाठी माणसाने यातायात अर्थात प्रयत्न स्वरूपात संघर्ष मांडला. उत्सव संपन्न करण्यासाठी करावयाच्या संघर्षाला त्याने दुःख, क्लेष, यातना असे संबोधले. या दुःखानंतर उत्सवपूर्तीचे सुख मिळणार या शाश्वतीने संघर्षाला पुरुषार्थाचे परिमाण दिले. या संपूर्ण प्रक्रियेत आत्मांशाचे अंतिम लक्ष्य सच्चिदानंदस्वरूप हेच आहे. हे मानवाच्या द्विविध अस्तित्वातील अतिमहत्त्वाचे सूत्र त्याला उमगले. परंतु पंचतत्त्वांच्या वृत्तीने देहभावाठायी वासनामयता निर्माण होऊन; जी देहभाव बद्धता येते, तेथे जीव, जगतात आत्मभावाला वंचित होऊन; स्वरूप स्वरूपातील मनोस्वरूपाला बाधित आणि बद्ध करतो. बहुधा सर्वसामान्यपणे समस्त मानव जात, जी बद्धतेचा अनुभव घेते, जाणीव असूनही मर्त्यदेहाच्या वासनाधिन अस्तित्वालाच वास्तव जीवन मानते. वास्तविक हे वाटणारे वास्तवच भ्रामक आणि विनाशी असते. हे अस्तित्व भोगणेही ज्या अविनाशी आत्मतत्त्वाने शक्य असते; त्या आत्मस्वरूपालाच वंचित झाल्याची जाणीव; या देहभावी अस्तित्वाला सतत होत राहाते. यातूनच देहभाव आणि आत्मभाव यांचा मनोस्वरूपाचे ठायी संघर्ष जाणवतो.

देहभावाने जगताना, स्वनिर्मित सारणीत, उद्दिष्टांची वासनालक्ष्यी परिपूर्ती करण्याचा खटाटोप अर्थात संघर्ष आणि आत्मभावाच्या शाश्वत संवेदनेमुळे जीवनाचे मूळ आणि सार्थ वास्तव अशी निर्गुण अस्तित्वाची ओढ व तसाठी संघर्ष, असा द्विविध संघर्ष. यामुळेही असफलतेची बद्धमनाला देहाठायी होणारी जाणीव किंवा शल्य, यामुळे अवघे जीवनच दुःखाने भरलेले आहे असे वाटू लागते. याच जाणिवेने मानवी अस्तित्व सर्वार्थे आनंदलक्ष्यी होऊन; उत्सवप्रिय होते. सुखद, दुःखद अशा भासमान होणाऱ्या सर्व बारीकसारीक धर्मकर्मात्मक घटनाप्रसंगांना उत्सवाचे रूप देऊन, भूमिका वठविण्यासाठी माणूस धडपडत राहतो. या उत्सवाची चर्चा, तो मनोमनी सत्यासत्य जाणिवेसह ठायीच द्वंद्वात्मकतेने करीत राहतो. याही अर्थाने त्याचा जीवनार्थ कलह अंतरबाह्य स्वरूपात सुरू राहतो. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग', शरीर आणि मन दोन्ही ठिकाणी असतो. या युद्धातील मुख्य द्विविध जाणीव असते ती भूमिका वठविण्याच्या दांभिकतेची आणि सत्यापर्यंत पोहोचण्याच्या दुर्दम्यतेची.

भारतीय परंपरेने तर, व्यष्टीपासून समष्टीपर्यंत, मानवमात्रांची सर्वथा बांधणी

केली. त्यासाठी 'वसुधैवकुटुंबकम्' अशी घोषणा केली. विश्वात भारतीय सनातन अतिप्राचीन अशी संस्कृती, त्याअंतर्गत आदिम संस्कृती म्हणविणाऱ्या सर्व संस्कृती, तथाकथित सर्व धर्मांच्या सारणी, मानवी जीवात्म्याला समूहसारणीत विशिष्ट भूमिका घेऊन; विशिष्ट कर्तव्यदक्षतेने; सारणीतील विशिष्ट उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी आवाहित करतात. सारणीतील कर्तव्यतत्परतेचे स्वार्थपरतेने, समाजकंटक अथवा समाजशोषक बनून जगणारे, आसुरी वृत्तीचे लोकही संस्कृतीसारणीचे उत्सव साजरे करण्याच्या भूमिका दांभिकपणे बजावतात.

अनाचार, दंभाचार, भ्रष्टाचार करणारे, धर्मांध, सत्तांध, धनदांडगे अशा प्रकारचे लोकही ढोंगीपणाने सारणीत कर्तव्यतत्परतेनेच आपण निर्वाह करीत असल्याचे आवर्जून सांगतात. म्हणजेच मानवमात्रच एकप्रकारे देहभावाने कर्मधर्ममीमांसेत गुंतलेला असतो. मानव देहभावाची नश्वरता माहीत असूनही; देहाहंकाराने वासनालोलुप असे, भ्रामक, संमोहित जीवन जगण्यातच पुरुषार्थ मानतो. याचा परिणाम म्हणजे समाजात षड्रिपूंचे अर्थात अज्ञान, दास्य, लाचारी यांना निमंत्रण देणाऱ्या राग, लोभ, मोह, मद, मत्सर, असुया, स्पर्धा, सत्तालोलुपता, धनलोलुपता, शोषकता यांसह तथाकथित धुरीण स्वार्थांधतेने मानवमात्रांना जागविण्याचा प्रयत्न करतात. सच्चिदानंदकेंद्री बनून जीवात्म्याने कर्तव्यतत्परतेने सारणीत सर्वात्मकतेने जगावे, यासाठी सनातन सारणी मानवी मनोस्वरूपाने, मानवी देहाच्या उपयोजनाने प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारी सारणी संस्कृती, स्वार्थाच्या भ्रामक विळख्यात अडकून, अवघे मानवी जीवन सुंदोपसुंदीच्या सर्वविनाशक संघर्षात झोकून देते. अवघे जीवनच दुःखकारक वाटू लागते.

संस्कृती सारणीचे महत्त्व पटवून देत, सच्चिदानंद स्वरूपाच्या नित्य स्मरणासाठी, सगुणभक्तीची परंपरा निर्माण करून; आत्मभावाने निरहंकाराने, लाभलेल्या नरदेहाने प्राप्तकर्म कर्तव्यतत्परतेने, विवेक आणि वैराग्याने ज्ञानात्मकतेने करावे, यासाठी ऋषी, मुनी, तपस्वी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, सिद्ध, साधक, संत, कवी, लेखक, कलावंत, राष्ट्रधुरीण, विश्वधुरीण, महामानव, नरदेहाची अलौकिकता परोपरीने सांगतात. देहाच्या नश्वरतेचे भान ठेवून; भक्ती, ज्ञान, वैराग्य अशा त्रिपदीने जीवन व्यतित करण्याचे आवाहन करतात. त्यासाठी संस्कृती सारणीच्या मांडणीच्या प्रत्येक उद्दिष्टाचा उत्सव करा असे

प्रबोधन करतात. मध्ययुगीन संतांनी तर 'बुडती हे जन न देखवे डोळा' असे म्हणत स्वार्थांध देहभावी विश्वाविरुद्ध उभे राहून विश्वाच्या कल्याणार्थ अर्थात देहाठायीच सच्चिदानंद अनुभूती अनुभूत करण्यासाठी प्रबोध केला. उपनिषदांचे मंडन त्यासाठीच घडले. श्रीकृष्ण भगवंतांनी सर्व संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भक्ती, ज्ञान, कर्म आदी योगांचे प्रबोधन सर्वांसाठी केले. महर्षी व्यासांनी भागवताचे निर्माण केले. मध्ययुगीन परंपरेमध्ये समर्थ रामदासांनी दासबोध त्यासाठीच समोर मांडला. माउली ज्ञानेश्वरांचे 'पसायदान' आणि संत तुकोबारायांचे 'आनंदाचे डोही' हे प्रबोधक काव्य त्यासाठीच प्रकटले. हे सारे लक्षात घेऊन; मानवमात्राने प्राप्त, अतिविकसित अशा नरदेहाचा अर्थात मानवी देहाचा विनियोग सच्चिदानंद स्वरूपाठायी जीवन लय पावावे म्हणून करावा. हे साधण्यासाठी कोणीही धुरीण विजनवासात जायला सांगत नाही. प्राप्त कर्म ज्या समूहजीवनातील उद्दिष्टपूर्तीसाठी आहे; त्या प्रत्येक उद्दिष्टपूर्तीमध्ये कर्म करतांना प्रेमाने, ज्ञानात्मकतेने आणि वैराग्याने, कर्मकर्तव्य करावे असा कर्मोत्सव करावा, असेच धुरिणांनी सुचविले आहे.

मानवी जीवन हा उत्सव आहे. एवढेच नव्हे तर सच्चिदानंद स्वरूपाचा घडलेला विश्वाविष्कार, त्याचे चलन आणि त्याचा सच्चिदानंद स्वरूपाशी लय हाच मुळात उत्सव आहे. 'आनंदोत्सव' असे या उत्सवाचे नामकरण करता येईल. याकरिता 'उत्सव' हा शब्द आणि त्या शब्दात साठविलेला आणि त्याही शब्दापलिकडे असलेला भावाशय समजून घेतला पाहिजे. परब्रह्म, कैवल्य हे एकल आहे. ते परिपूर्ण आहे असे आपण परंपरेने म्हणतो. त्या परब्रह्माचा हा स्वसंवेद्य विश्वाविष्कारदेखील परिपूर्णच आहे, हे उघड आहे. हा आविष्कार अनेकविध अनेकरूपांनी जाणवत असला तरी; ही अनेकविधता आणि अनेकता, काटेकोरपणे पृथक विचारात घेताच येत नाही, याचा अनुभवही आपण घेत आहोत. म्हणजे विश्वाविष्कार संपूर्णतः व्यामिश्रपणाने अनुभूत होतो आहे. माणसाचा विचारदेखील एक मानवी देह असे रूप म्हणून भौतिकतः क्रूरता आली तरी जीवात्मा म्हणून आणि देहभावाने घडणारे वर्तन म्हणून; समष्टीशी संबंधितच विचार करावा लागतो. म्हणजेच मानवाचे व्यष्टीरूपात आणि समष्टीरूपातील वावरण्याचे लक्ष्य पूर्ण परब्रह्माचा, परिपूर्ण अनुभूती देणारा आविष्कार म्हणूनच विचारात घ्यावे लागते. विश्वातील प्रत्येक अर्थात सूक्ष्मातिसूक्ष्म रूपापासून विश्वव्यापक प्रकाश,

अंधार, अवकाश या रूपापर्यंतच रूप हे सच्चिदानंद रूपच होय. त्यामुळेच प्रत्येक रूपाचा, उत्पत्ती, स्थिती आणि लय असा आविष्कार ही उत्सवाची मालिकाच ठरते किंवा उत्सव ही प्रक्रियाच अवघ्या सृष्टीची जीवनसारणी आहे असे म्हणता येते.

उत्सव हा अकारान्त, पुल्लिंगी शब्द, शब्द–घटनात्मक रूपात पाहाता उद् हा उपसर्ग + स् हा धातू द्वितीयगण आत्मनेपद + अप हा कृदन्त प्रत्यय + सु (ः) विभक्तिप्रत्यय यांतून 'उत्सवः' असा शब्द तयार होतो. असे वामन शिवराम आप्टे यांनी मांडलेल्या, संस्कृत–हिंदी कोश या कोशाधारे म्हणता येते. उत्सव या शब्दाचा अर्थ सूत्ररूपाने सांगतांना, दिलेले सूत्र असे– 'अत्यानंद ः यत्र जायते' = उत्सवः जिथे अत्यानंद निर्माण होतो तेथे उत्सव असतो. आनंदाची वेळ म्हणजे उत्सव, अत्याधिक आनंद घडविणाऱ्या घटनेत अत्याधिक उत्साह निर्माण होतो.

उत्सव या शब्दाला इंग्रजी पर्यायी शब्द Fest असा आहे. त्याचे स्पष्टीकरण– A festival or gathering devoted to a particular activity or interest. Fest हा शब्द मुळात जर्मनमधून आला आहे. The fest is usually accompanied by a parade and other celebratory events. या सर्व भाषिक घटनांचा अर्थ असा की; घटना किंवा उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. या प्रयत्नांच्या अखेरीस उद्दिष्टपूर्ती होणार. उद्दिष्टपूर्ती झाली की आनंद होतो. या सर्व प्रक्रियेला 'उत्सव' म्हणावे. मानवी जीवनसारणी ही अगदी सूक्ष्मातिसूक्ष्म अशा उद्दिष्टांच्या मालिकेने आणि मूळ अवस्थास्वरूप अर्थात सच्चिदानंदस्वरूप या ध्येयाने प्रक्रियात्मकतेने सुरू असते. मानव एक व्यक्ती दिसला तरी त्याचे देहभावात्मक व आत्मभावात्मक जीवन हे परिपूर्ण सृष्टीआविष्कारासारखेच व्यामिश्र आणि प्रक्रियात्मकच असते. मानवाचे जीवन जाणवते ते धडपड, प्रयत्न, कर्म यांतून उद्दिष्टपूर्ती करणारे असे. एक उद्दिष्टपूर्ती झाली की पुढची, मग त्यापुढची अशी अंतिम सच्चिदानंद स्थितीपर्यंत उद्दिष्टांची मालिकाच असते.

माणूस उत्सवप्रिय आहे. कार्यक्रम हा शब्द सर्वसामान्यपणे उत्सवासाठी प्रतिशब्द म्हणून वापरला जातो. भारतीय परंपरेत प्रत्येक कार्यक्रमाला स्वतंत्र नाव दिलेले दिसते. संस्कृतापासून सर्वच भारतीय भाषांमध्ये अशी नावे दिलेली

दिसतात. विवाह, गर्भादान, डोहाळजेवण, जन्मोत्सव–सटवाईपूजन अर्थात पाचवी, बारसे, कानटोचणी, उष्टावण अशी, केवळ संभोगापासून अपत्य संगोपनापर्यंत उत्सवांची साखळी दिसते. जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा या मानवी व्यक्ती व कुटुंबाशी, अर्थात गोत्रांशी निगडित सामाजिक प्रथा, विशिष्ट उद्दिष्टपूर्ती करीत; मानवी जीवनाच्या परिपूर्तीकडे घेऊन जात असतात. जीवन परिपूर्ती म्हणजे मोक्ष अशी संकल्पना भारतीय परंपरेमध्ये दिसते. अशीच सारणी जगभरात बहुधा सर्व मानवी समूहांमध्ये दिसते. अगदी दैनंदिन स्वयंपाकामध्येदेखील उद्दिष्टपूर्तीसाठी जमवाजमव, मांडणी, विशिष्ट विधिक्रिया, खाण्यातील आनंद अशा क्रमाने आपण उत्सवाचा अनुभव घेतो. अशी एकही गोष्ट नाही की, तेथे उद्दिष्टपूर्तीसाठी विधिविधानक्रिया आणि परिपूर्ती, असा क्रम नाही. शाळाप्रवेश ही उद्दिष्टपूर्ती घ्या. आपल्याला विशिष्ट नियमित विधिविधानांची पूर्ती करण्याची यातायात करावीच लागते. मानवी जीवनसारणी अशी उत्सवी आहे.

मानवाने काळानुरूप सारणी परिवर्तनातही ही उत्सवी क्रिया अपरिहार्यपणे अवलंबिली आहे. या उद्दिष्टानुवर्ती जीवनसारणीला मायापाश असे म्हटले जाते. जगाच्या पाठीवर यच्चयावत माणूस, अशा पाशात, देहभावाने अडकला आहे. आत्मस्वरूप मन या मायापाशात, अर्थात वासनागर्तेत हरवते. हेच परिपूर्ण जीवन आहे, असे देहभावाने मानू लागते. यालाच प्रपंचपाश असे म्हणतात. प्रामुख्याने या गोष्टींनाच धर्मकर्म मानून जीव, जगतात देहभावाने जगत असतो. परिपूर्तीचा आनंद घेण्यासाठी प्रत्येक उद्दिष्टाला शक्य तेवढे कलाकौशल्यात्मक क्रीडात्मक रूप देण्याची पराकाष्ठा करतो. ही परकाष्ठा करीत असतांना उद्दिष्टांच्या साखळीत आशाभावाने अडकतो. एका उद्दिष्टाकडून त्यापेक्षा पुढील किंवा मोठ्या उद्दिष्टाच्या पूर्तीकडे प्रयत्नशीलपणाने यातायात करू लागतो. गावचा पंचायत सदस्य, सदस्य म्हणून निवडणुकीचा गुलाल उधळता उधळताच राष्ट्रप्रमुख पदापर्यंतची उद्दिष्ट स्वप्ने पाहू लागतो. सम्राट होण्याच्या आशासाखळीतच आनंदाचा बोध घेत परिश्रमरत होतो. प्रत्येक उद्दिष्टाची विधिविधाने कलाकुसरीने क्रीडात्मकतेने वासनापूर्तीसाठी करीत आनंद घेतो. त्याच क्षणी आशास्वरूप मनातील देहाहंकारी नागीण पुढे झेपावते. चैतन्यशाली आत्मस्वरूप मन ही स्वतःच्या मूळ सच्चिदानंद स्वरूपाला पारखे होऊन; देहाहंकाराच्या वासनाधिनतेने लिप्त आणि बाधित होते. तात्कालिक आनंद ही मग दुःखकारक वाटू लागतो. तरी तो

मिळविण्याचा, त्यासाठी उत्सव करण्याचा मोह संपत नाही. त्यासाठी माणूस जीवन संघर्षासह आकांत मांडतो, हेच पूर्वसंचित आणि भोग आहेत असे मानू लागतो. सच्चिदानंदस्वरूप होण्याची क्षमता देहसाधनामध्ये असतांना, माणूस देहाहंकार मिरविण्यातच गुंग होतो. एकाक्षणी हे सारे नश्वर आहे असे लक्षात येते तेव्हा दुःखी होतो. देह सत्य, अहंकार सत्य, समूहातील देहाहंकाराची प्रतिष्ठा सत्य, असे मानून स्व स्वार्थाचे परिमाण सत्य, प्रेम आणि करुणा या निर्गुणाच्या गुणांना लावून; जीवनसारणीतील प्रत्येक उत्सव अतीव कलाकुसरीने क्रीडात्मकतेने प्रयत्नांची पराकाष्ठा करून करण्याचा प्रयत्न करतो आणि तरी अशांतता विफलता सोडत नाही. तो अज्ञानमूलक देहाहंकाराने उत्सवी असतो.

नरदेह हा एवढा विकसित आहे की, अलौकिक अशा सच्चिदानंदस्वरूपाचा अनुभव तो ठायीच घेऊ शकतो. त्यासाठी धर्मश्रद्धेने भक्ती, ज्ञान, वैराग्य मार्गाने देह व्यतीत करण्याचे भाग्य साधनेने साधता येते. मनोस्वरूप अर्थात मन हेच सच्चिदानंदस्वरूप होय हे जाणून निर्लेपपणे जीवन कंठता येण्याची क्षमता केवळ मानवी जीवात्म्याच्या ठायी आहे. म्हणून जीवन पुरुषार्थपूर्ण करता येते. सच्चिदानंदस्वरूप होणे हे अंतिम उद्दिष्ट अर्थात मानवी जीवनाचे ध्येय. सत्य–चैतन्य–आनंद हे अंतिम असे परब्रह्म तत्त्व होय. मनोस्वरूपाने हे परब्रह्मतत्त्व ठायीच अनुभवता येते. त्यासाठी सच्चिदानंदस्वरूपाचा उत्सव आत्मरूपाने मांडला आहे. तो उत्सव अनुभवण्यासाठी देहभावाचे आत्मभावात रूपांतर करण्याची साधना देहाने करावी. हे सामर्थ्य ओळखावे; हीच तर समस्त महामानवांची सांगी आहे. 'उत्सव म्हणजे पूज्यभावाने केलेला, तत्त्वाचा कलात्मक आविष्कार होय.' हे सतत लक्षात घेऊन; भक्ती, ज्ञान, कर्म आदी योगमार्गांची मांडणी जीवनात देहभावाने आणि आत्मभावाने जगतांना विवेकपूर्णतेने करण्याचा यत्न करावा. त्यामुळेच नश्वर जीवन सच्चिदानंदस्वरूप होईल.

जीवनाच्या सर्व अंगोपांगात देहभावाने उद्दिष्टशृंखला जगत असतांना, आत्मभावाने ज्ञानवान कर्म करणे, मानवी देहाच्या स्वाधीन आहे. मनोस्वरूप अवस्थेने हे साधता येते, यासाठीच मानवाने स्वप्रतिभेने जीवनसारणी, कर्मधर्ममीमांसा यांसह संस्कृतीची मांडणी करून; युगे, परिवर्तनशीलतेसह उपासना मांडली आहे.

जीवनातील उत्सव साजरे करतांना व्यक्तिसापेक्षता ही मानवी समूजजीवन

सापेक्षतेनेच सारणीत अधीन असते. व्यक्तिसापेक्ष आणि समूहसापेक्ष मानवी जीवनाच्या सर्व प्रकारच्या गरजा पंचमहाभूतांकडून भागतात. पंचमहाभूतांचे स्वप्रज्ञेने संघटन, विघटन आणि स्वजीवनासाठी विनियोग करण्याचा मानवी उपक्रम सनातन आहे. पंचमहाभूतात्मक, देहरूपासह, पंचमहाभूतांच्या सर्व शक्तिकलांना स्वसापेक्ष स्वरूपात स्वीकारून; माणसाने त्याची भौतिक, अधिभौतिक आणि अधिदैविक सारणी निर्माण केली. ही सारणी व्यक्ती आणि समष्टीची परस्परावलंबी अशी बनविली आहे.

पंचमहाभूतांतून निर्माण झालेली चर-अचर सृष्टीही, मानवसापेक्षतेने, मानवी सारणीत, साधन म्हणून सामावून घेतली गेली आहे. असे होऊनही यातील प्रत्येक गोष्ट आत्मस्वरूप पूर्णत्वाधीन अशा या पूर्णत्वाचे पूर्ण-पूर्णातून स्वरूपता सृष्टीपूर्ण प्रकटते आणि सृष्टीवलयही पूर्णात होतो. या अनुभूतीने मानवी धुरिणांनी नियती किंवा विधिलिखित नावाची, सर्वअस्तित्वाच्या पलिकडील एक अवस्था मानली आहे. सारणीतील व्यवहार आणि अलौकिक व्यवहार या दोन्ही गोष्टींचे उत्सव मांडणे हेच जीवनसफलतेसाठी, मानवाच्या हाती असलेले, परिपूर्णाचे अनुभवन करण्याचे, अर्थात सच्चिदानंद स्वरूप होण्याचे स्वसंवेद्य साधन आहे. हे लक्षात घेऊन संपूर्ण जीवनसारणीला मानवाने उत्सवाचे परिमाण दिले आहे. जीवनार्थ कलहाला असे लौकिक आणि अलौकिक परिमाण लाभले. या परिमाणाचे उत्सवस्वरूपातील दर्शन करून घेण्याचा प्रयत्न करावयास हवा. हा प्रयत्न जीवनाच्या विविध अंगांसंबंधाने करता येईल. मानवी जीवनसंघर्षाचे लौकिक आणि आध्यात्मिक स्वरूप त्यातून अवगत करून घेता येईल.

## (४)

# दैवतकथा आणि वन्य, कृषी व दर्यावर्दी जीवन यांतील उत्सव : अनुबंध

मानवाने स्थिरवास्तव्य स्वरूपातील जीवन केव्हा सुरू केले हे; विश्वोत्पत्ति, पृथ्वीची अवस्था, जीवसृष्टीचे निर्माण या सर्व घटनांच्या संदर्भाने सांगणे कठीण आहे. पृथ्वीचे शास्त्रीय कसोटीवर आज मान्य असलेले वय अब्जावधी वर्षांचे आहे. शास्त्रीय ज्ञान हे सतत विकसितपणे, अस्तित्वाच्या माहितीविषयी नवे नवे तर्क पुढे आणते. ते स्वाभाविक आहे. माणसाची प्रातीभ शक्ती सतत अशी प्रक्रिया करीत असते.

भारतीय परंपरेतील महर्षी व्यास प्रणित श्रीमद्भागवत पुराणातील कालगणना श्रद्धेने मान्य केली तर सत्य/कृत, त्रेता, द्वापार आणि कली अशा युगांच्या चौकड्यांपैकी सातव्या चौकडीतील कलियुगात आज आपण विचार करीत आहोत. सहा चौकड्या ओलांडून सातव्या चौकडीचाच केवळ विचार केला; तरी अक्षरशः लाखो वर्षांचा काळ विचारात घ्यावा लागतो. सातव्या चौकडीतील सत्ययुगात महाप्रलयानंतरची पुनर्उत्पत्ती झाली असे मानले तरी; उल्लेखित पुराण कथांनुसार, सहाव्या चौकडीतील काही जीवसृष्टी सातव्या चौकडीच्या सत्ययुगात महाप्रलयांतून वाचून प्रकटली, असे म्हणता येते. हे कार्य त्रिदेवांनी केले अशी श्रद्धा आहे. याचा अर्थ प्रथम चौकडीमध्ये विश्वनिर्मितीपासून परब्रह्मतत्त्वाची महत्‌त्त्वातून महाशक्ती प्रकटून; त्यात त्रिविध अशा ब्रह्म-ब्रह्मा, विष्णू-वैष्णवी आणि शिव-शिवा अशा चैतन्यशाली, ईश्वर म्हणून ज्यांचा उल्लेख होतो; अशा अस्तित्वांची निर्मिती व त्यांपासून जीवसृष्टी निर्माण झाली होतीच. एवढेच नव्हे; तर सातव्या चौकडीपर्यंत येताना, काही ऋषी अर्थात मानवी व्यवस्थापक असे,

आज ज्यांना शास्त्रज्ञ म्हणतात असे, मानव वाचले होतेच. प्रचलित वेद-पुराण कथांनुसार मानवी जीवनसारणी पुन्हा मांडण्याची क्षमता या व्यवस्थापकांमध्ये होती.

ब्रह्ममानसपुत्र ही संकल्पना विचारात घेतली तर; महाप्रलयानंतर चक्रनेमीक्रमाने पुन्हा सत्ययुगात, उद्भिज, स्वेदज, अंडज, जारज अशी जीवसृष्टी, पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांचे आवश्यक अस्तित्व आणि या सर्व गोष्टींची पुनर्व्यवस्था लावण्याचे महत्कार्य, या ब्रह्ममानसपुत्रांनी केले. ब्रह्माम ानसपुत्रांकडून हे पुनर्व्यवस्थापन करण्याचा काळ कृतयुग अर्थात सत्ययुगाचाच भाग म्हणून ओळखला जातो.

ऋषींनी कृषीकर्म शिकविले असे जेव्हा म्हटले जाते; तेव्हा स्थिर मानवी जीवनावस्था ऋषींनी प्रस्थापित केली हे स्पष्टच आहे. म्हणूनच या ऋषींना ब्रह्ममानसपुत्र असे म्हटले जाते. हे ऋषी म्हणजे कोणी मानवेतर नव्हते; ते मानवांतील धुरीण होते. महाप्रलयानंतर हाताशी असलेल्या शारीरज्ञानाचा आणि पंचमहाभूतात्मक शक्तींचा, व्यवस्थापूर्ण विनियोग करण्याची क्षमता असलेलेच महाप्रलयातही टिकून राहिले होते, हेही स्पष्टच आहे. ब्रह्मांडातील पृथ्वीसदृश्य सर्वच अस्तित्वांचा असा महाप्रलय झाला असावा हेही ब्रह्मांडाविषयीच्या दैवतकथांतून पुढे येते. हा सर्व तर्क आहे; की याला काही आधार आहे? वेदपुराणांतील दैवतकथा हाच आधार यासाठी स्वीकारावा लागतो. त्या आधाराच्या सत्यतेविषयी असंख्य प्रश्न आजच्या मानवाच्या मनात निर्माण होत असले तरी; भौतिक प्रगतीला मूलगामी कल्पनांचे खाद्य ह्याच दैवतकथा पुरवितात, हे लक्षात घ्यावे लागते.

कलियुग संपून सातव्या चौकडीचा महाप्रलय होतांना भौतिक शास्त्रीय प्रगती, कदाचित वेद उपनिषदे, पुराणे, रामायण, महाभारत यात उल्लेखित दैवतकथांपेक्षाही अधिक झालेली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. प्रत्येक महाप्रलयानंतर अविनाशी पूर्णत्वाचा पुनराविष्कार होताना, मागील संचिताच्या अनुभूतींच्या पुढेच प्रवास सुरू झाला असणार हेही खरे मानावेच लागते. हे सर्व विचारात घेता, कृषीजीवन आणि मानवी समूह व्यवस्थापन परंपरांचा विचार, सृष्टीउत्पत्तीशी जोडूनच करावा लागतो. हे सर्व विवेचन यासाठी आहे की; आज पृथ्वीवरील मानवाच्या हाती मौखिक परंपरांतून संग्रहित व

व्यवस्थापित केलेले सुसूत्र असे प्राचीन ज्ञानदायी वाङ्मय, श्रुतिवाङ्मयाशिवाय दुसरे नाही! परमतत्त्वाचे सृष्टीस्वरूप प्राकट्य आणि सृष्टीस्वरूपाचे परमतत्त्वात पुनर्लयीकरण, या प्रक्रियातामक अविनाशित्वाचा भौतिकतः विचार करतांना या श्रुतिवाङ्मयाचाच आधार घेणे क्रमप्राप्त आहे , हे नक्की! यासाठी वेदवाङ्मयापासूनच कृषीजीवन आणि दैवतकथांचा विचार करावा लागतो. म्हणजे उत्सवांचा प्रारंभ हा कृषीजीवन आणि दैवतशरणम् यापासूनच आहे असा विचार करावा लागतो.

पंचमहाभूताच्या शक्तिमत्तेचा थेट, प्रत्यक्ष, नित्य अनुभव कृषीकर्म करतांना माणसाने सतत घेतला आहे. त्यामुळे कृषीजीवनाचे, भरणपोषण करणाऱ्या वायू, आप, तेज, पृथ्वी आणि आकाश या पंचभौतिक शक्तींविषयी शरण्यभाव माणसाच्या ठिकाणी निर्माण झाला. आकाश, तेज, वायू या पितृदेवता आणि आप आणि पृथ्वी या मातृदेवता वाटल्या. दिव्यशक्तींची प्रचिती आणि भरणपोषण करण्याच्या अनुभूती यामुळे देव, दाता, दान ह्या कल्पना आल्या. पृथ्वीशी निगडित जीवसृष्टीचा, विशेषतः उद्भिज सृष्टीचा असाच मानवकेंद्रित दिव्य अनुभव मानवाने घेतला. त्यातून वनस्पती देवता निर्माण झाल्या. वायू, पर्जन्य तथा आप आणि सूर्य यांचा अनुभव डोंगर, दऱ्या, मैदाने यांच्या सान्निध्याने आला. त्यांनाही देवत्व बहाल झाले.

प्राणीजीवनाचा मानवकेंद्री उपयोग दोन प्रकारे होण्याच्या अनुभवाने त्यांनाही देवत्व बहाल झाले. थोडक्यात मानवाला स्थिर जीवन देण्यासाठी ज्या-ज्या दिव्यशक्तींचा थेट उपयोग होतो हे लक्षात आले त्या सर्व गोष्टी परमेश्वरस्वरूप होत, हे माणसाने जाणले. या सर्व गोष्टी प्रसन्न असल्या तरच, जीवन सफल, सुफल, स्थिर राहील. या विचाराने त्या शक्ती प्रसन्न करण्यासाठी नर्तन, वादन, गायन, रेखन, मंडन या स्वरूपात उत्सव मांडणी झाली. प्रसन्न करण्यासाठी त्या देवतांच्या प्रतिकांची मांडणी सुरू झाली. त्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी देवतांना स्वरूप देऊन; जे-जे मानवी जीवनाला आवश्यक उदा. अन्न, वस्त्र, निवारा, कपडालत्ता, सौंदर्यभावना या सर्व गोष्टी देवतांना प्रदान करून; प्रसन्न करण्याचे प्रयोग आत्मियतेने सुरू झाले. स्त्री-पुरुष संबंध, मातृअपत्य संबंध यातून शक्ती-तत्त्व, माता-संतान स्वरूपात शरण्यभाव प्रकट होऊ लागला. या सर्व कल्पना ऋषींनी अर्थात महाप्रलयातून वाचलेल्या मानवांनी पूर्वसंचितातून, नवसृष्टीकडे, परंपरेने संक्रमिक करण्याच्या प्रयत्नातून ब्रह्मशक्तीचे दान म्हणून

भाषा, नाट्य, वेद यासारख्या गोष्टी ब्रह्मदेवाने दिल्या असा संस्कार, ऋषीरूप ब्रह्ममानसपुत्रांनी केला. या ऋषीरूप धुरिणांनाही देवत्व प्राप्त झाले.

कृषीजीवनाशी निगडित ग्रामरचना ग्रामव्यवस्था, पंचक्रोशी, प्रदेश, नगरे, राज्यव्यवस्था या प्रकारच्या व्यवस्था निर्माण झाल्या. त्यात कृषी, शिक्षण, आरोग्य, स्थापत्य, मानवी वस्त्रेप्रावरणे, अलंकार, कलाकुसर याचबरोबर कुटुंबव्यवस्था, ज्ञातीव्यवस्था, विवाहसंस्था, राज्यसंस्था, वंशपरंपरा आदी मानवकल्पित व्यवस्था आल्या. त्यात भारतीय परंपरेत शाश्वत स्वरूपातील व्यवस्थापन कल्पना पुढे आल्या. त्यांना वर्णाश्रम म्हणू लागले. स्मृतीग्रंथांनी अनुभूतीसंचित आणि परंपरासंचित सर्वांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला. त्यातून व्यवस्थापनवर्ग, पुरोहितवर्ग, न्यायासनवर्ग, कलाजीवनवर्ग, शिक्षणातील गुरु-शिष्य किंवा शिक्षापरंपरा, आश्रम, विद्यालये, विद्यापीठे याचबरोबर युद्धशास्त्र, ज्योतिर्विज्ञान, आरोग्यविज्ञान यांतील गुरु-शिष्य परंपरा आणि ज्ञानशाखा सुरू झाल्या. अन्न, वस्त्र, निवारा, भांडीकुंडी, शस्त्रेअस्त्रे, अवजारे यांविषयी भौतिक आणि रासायनिक शास्त्रे पुढे आली. आज विविध साधनांच्या माध्यमातून याच सर्व परंपरा आधुनिक, नवाधुनिक स्वरूपात पुढे आलेल्या दिसतात. माणसांच्या कृषी आणि दैवतविषयक भूमिका बदललेल्या दिसल्या; तरी मानवी जीवनसारणीतील भावना त्याच आहेत.

परिवर्तनप्रक्रियेत तपशील बदलले तरी; तत्त्वांत बदल होत नाहीत. भौतिकशास्त्रे, मानव्यशास्त्रे आणि अध्यात्मशास्त्रे यांतील मुलभूत तत्त्वे वेगवेगळ्या स्वरूपात माणसाने आकारित केली तरी; त्यांची अपरिहार्यता बदलत नाही. शाश्वत सत्यासाठीचा जीवनसंघर्ष, उद्दिष्टपूर्तीची मालिका चालूच राहते. उत्सवांचे स्वरूप व मांडणी बदलते तरी त्यातील तत्त्व आणि अनुभूतींशी निगडित आनंद तोच राहतो. माणसाच्या प्रतिभेची झेप आणि उद्दिष्टपूर्तीची झेप नेहमी उर्ध्वगामीच असते. ही झेप नेहमी उत्सवांशी जोडलेली असते.

जगभरात पंचभौतिक, नैसर्गिक आणि मानवी दैवतांची संख्या नित्य वाढत जाते. त्यांच्या उत्सवांची संख्या वाढत जाते. कारण तत्त्व-सृष्टी आणि पुन्हा तत्त्व; ही अनादि आणि शाश्वत प्रक्रिया असते. त्यातील माणसाचा वासनात्मक देहभाव आणि तत्त्वात्मक आत्मभाव नित्य असतो. या माणसाच्या वासनात्मक देहभावाला तत्त्वात्मक आत्मभावाची ओढ असते. त्यासाठी तात्कालिकतेच्या

आशाबद्ध शृंखलेतून निसटून; निर्गुण आत्मभावापर्यंत जाण्याचा अंतरबाह्य संघर्षात्मक प्रयत्न अर्थात उत्सव सुरूच असतो.

भारतीय परंपरेत तेहतीस कोटी अर्थात तेहतीस प्रकारची दैवते आहेत, असे मानले गेले आहे. या तेहतीस प्रकारच्या दैवतांची नित्य असंख्य रूपे, त्यांचे अनुभव आणि उत्सव सुरूच आहेत. देव, दानव, राक्षस, यक्ष, किन्नर, विद्याधर, गंधर्व, अप्सरा, भूत, पिशाच्य, समंध, प्रेत, मानव एवढेच नव्हे तर अन्य जीववर्गदेखील या दैवतांचे उत्सव करीतच आहेत. उद्भिजांचाही संबंध दैवतोत्सवांत अनिवार्य दिसतो. तत्त्वज्ञानाचा विचार केला; तर 'तत्त्वाचा पूज्यभावाने केलेला कलात्मक आविष्कार म्हणजे उत्सव होय.' अर्थात निर्गुण आद्य स्वसंवेद्य सच्चिदानंदाचे आविष्कार रूप म्हणजेच सृष्टी. त्यातील अतिविकसित अस्तित्वरूप म्हणजे मानवी जीवात्मा. समूहाने जीवन भोगणाऱ्या या जीवात्म्याने, आपल्या जीवनाला समाज आणि संस्कृतीचा आकार दिला. हा आकार म्हणजे उत्सव. प्रजनन, अन्न, वस्त्र, निवारा यांच्या परिपूर्तीसाठीची साधने पंचतत्त्वांकडून, आपल्या प्रतिभेने स्वीकारताना, दिव्यत्वाला, दिव्यत्वातील शक्तिविषयक अनुभवांना, देवत्व बहाल केले. तत्त्वाचे जीवनधारणेसाठी नम्र, शरण्यभावाने आणि देहभावाने, धर्मसारणीत रूपांतर केले; म्हणजेच उत्सवरूप दिले. हे करतांना स्वाभाविकपणे, कृषीजीवन हाच मानवीजीवनाचा मूलाधार झाला. अवघे जीवन धर्मकर्ममीमांसात्मक कर्तव्यतत्परतेने कृषीजीवनोत्सव स्वरूपात आविष्कृत झाले.

उत्सवप्रियता हे मानवाचे व्यवच्छेदक बनले. व्यष्टीचा व समष्टीचा परस्परसंबंध सारणीरूपात उत्सवात्मक झाला. प्रयत्नांची पराकाष्ठा अर्थात संघर्ष, उद्दिष्टांची परिपूर्ती आणि जीवनाची इतिकर्तव्यता यांना उत्सवाचे परिमाण मिळाले. कृषीजीवन आणि जगभरातील दैवतपरंपरा यांचा विचार केला तर अवघे जीवन उत्सवमालिकांच्या स्वरूपात पुढे येते. यालाच सुखदुःख शृंखला असे म्हटले जाते. दुःखानंतर सुख अर्थात उद्दिष्टपूर्तीसाठी उत्सवसंपन्नता आणि सुखानंतर पुन्हा दुःख म्हणजे पुढील उद्दिष्टपूर्तीसाठी अर्थात उत्सवसांगतेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा; असा आशेचा न संपणारा प्रवास. या न संपणाऱ्या प्रवासाला अंतिम अर्थात मूळ तत्त्वबोधाचे अर्थात सच्चिदानंदरूपाचे परिमाण असते. कृषीजीवन आणि दैवतकथा यांच्यासंबंधाने नरदेहाचे मूल्य अधिक अधोरेखित होते.

जीवनाचा उत्सव सिद्ध आणि सफल करण्यासाठी, मानवाने पंचतत्त्वांना

अनुसरून, संगीत-योग मांडणी केली ती प्रामुख्याने दैवतांना प्रसन्न करून; सुफलीकरण उत्सव संपन्न करण्यासाठी आहे. प्रजनन, अन्न, वस्त्र, निवारा यांविषयी जीवनात समाधान लाभावे म्हणून हा नर्तन वादन गायनात्मक कलाविष्कार त्यांच्या परंपरा जीवनस्थैर्याच्या आरंभबिंदूपासून, पूज्य भावाने, पंचमहाभूतांचे विभ्रम, स्वप्रतिभेने आत्मसात करून; मानवाने अस्तित्वात आणलेल्या दिसतात.

सृष्टीसारणी हे पंचमहाभूतांचे विभ्रम आहेत असे म्हणणे; हे परमेश्वराच्या सृष्टीरचना स्वसंवेद्य विकारवश कौशल्याच्या दृष्टीने सयुक्तिक वाटते. 'आनंद-तरंग' या श्रीपाद कुलकर्णी लिखित, कॉन्टिनेन्टल प्रकाशन प्रकाशित, १९८४ मध्ये प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात 'सृष्टीरचना-कौशल्य'विषयक आलेले चिंतन यादृष्टीने महत्त्वाचे वाटते. ते लिहितात, 'ही सृष्टी निर्माण करण्याचे परमेश्वरास स्फुरण झाल्यावर त्याने ही सृष्टी रचना-कौशल्य दाखवून निर्माण केलेली आहे. ते स्वतः जसा अनादि व अनंत आहे, तशीच त्याची सृष्टीही अनादि व अनंत आहे. फरक एवढाच की, तो स्वतः निर्गुण, निराकार व निर्विकार आहे, तशी ही सृष्टी नाही. ती सगुण, साकार व सविकार आहे. या सृष्टीचे निर्मितीचक्र अव्याहत चालू असते, या अर्थाने ती अनादि आहे. निर्माण झालेला प्रत्येक पदार्थ मात्र अनित्य म्हणजे नाशिवंत आहे.' ते आणखी लिहितात, 'वैविध्याने विनटलेली सृष्टी आपल्यातील वैचित्र्याने नाना रसरंग निर्माण करून सगळीकडे 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे । मनात भरला, नभात शिरला, आनंदी आनंद गडे' असे वातावरण निर्माण करणे, हा सृष्टीउत्पत्तीचा हेतू आहे.' आनंद हे तत्त्वाचे आणि स्वाभाविकपणे तत्त्वस्वरूप सृष्टीचे आणि त्यातील मानव या रूपाचे ही अंतिम लक्ष्य आहे. जीवनाच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी कृषीपरंपरा व परंपरांच्या सुफलीकरणासाठी दैवतपरंपरा आणि या दैवतांच्या प्रसन्नतेसाठी, संगीत परंपरा; असा हा मानवी प्रज्ञेचा मनोज्ञ प्रवास आहे. मानवाच्या सर्व हालचालींना, मानवाने निर्माण केलेल्या सर्व साधनांना, त्याने आनंद अनुभूतीचे अर्थात उत्सव परिपूर्तीचे परिमाण दिले आहे.

मानवी समूहजीवनाचा इतिहास पाहिला तर; लोकविद्या किंवा लोकसाहित्य व लोकसंस्कृती अर्थात लोकोत्सव यांच्या परंपरा निर्माण होतात आणि नंतर त्यांना समूहजीवनाच्या संदर्भाने, शास्त्रीय स्वरूप प्राप्त होते. भौतिकशास्त्रे, मानव्यशास्त्रे, स्थापत्यकलाशास्त्रे, कृषीविज्ञान, आरोग्यविज्ञान, ज्योतिर्विज्ञान, दैवतकथाशास्त्रे,

धर्मनीतीतत्त्वज्ञानशास्त्रे या सर्व शास्त्रांचा प्रवास असाच सुरू असतो. या प्रक्रियेला कोणतेही शास्त्र आणि तत्त्वज्ञान अपवाद नाही. असा विचार करता कृषीजीवन आणि दैवतकथाशास्त्र यांतील उत्सवांची मालिका व त्यांचे स्वरूप याच लोक आणि अभिजात या परंपरेत शोधावे लागते.

कृषीजीवनात जमिनींची मशागत, बीजशोधन, सुफलीकरण आणि विनियोग या सर्व संबंधाने कार्ये व दैवते यांच्या संबंधासह उत्सवमालिका दिसून येते. या संबंधाने 'लोककला-संकल्पना व स्वरूप' या प्रस्तुत लेखकाने लिहिलेल्या आणि पद्मगंधा प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात पहिल्या प्रकरणात 'लोकजीवनाच्या विविध संदर्भात वैश्विक पातळीवर आविष्कार' मथळ्याखाली विस्तृत चर्चा केली आहे.

ऋग्वेदातील वैदिक ऋषींनी मांडलेली सुक्ते ही सूर्य, इंद्र, पर्जन्य, वायू अशा पंचभौतिक महातत्त्वात्मक दैवतांची स्तुती स्तोत्रे असून; ही सर्व सुक्ते ही कृषीजीवनातील सुफलीकरणासाठी आणि कृषीकर्माधारे मानवी जीवन समृद्धीसाठी दैवतोत्सव गीते आहेत, हे लक्षात येईल. पुरुषसुक्तासारखे सुक्त कृषीजीवनावर आधारित, संपूर्ण समाजाच्या स्थैर्याविषयीचे आणि मानवी जीवनाच्या ऐश्वर्यासाठी प्रार्थनास्वरूप आहे. कृषीजीवनातील, विशेषतः मशागतीची सुरुवात ही कऱ्हाकेळीच्या पूजनाने आणि औजारांच्या पूजनाने होते. भारतीय परंपरेमध्ये ऋतुचक्राप्रमाणे अक्षय्यतृतीया या तिथीला असा मशागत मुहूर्त होतो. बैलपोळा, नवरात्र महोत्सव, बलिप्रतिपदा, मकरसंक्रांती, होलिकोत्सव आदी सणोत्सव हे कृषीजीवनाशी निगडित असे उत्सव आहेत. यज्ञसंस्थेतील देवयज्ञ आणि भूतयज्ञ हेही कृषीजीवनाशी जोडलेले आहेत. किंबहुना कृषीजीवनातून नागर जीवनात व धर्मशास्त्रात समाविष्ट झाले आहेत, हे लक्षात येईल.

दैवतांच्या यात्रा आणि जत्रा यांच्या परंपरा ह्या तर कृषीकर्माधीन समाजरचनांच्या जीवनातील सर्वप्रकारच्या ऐहिक आणि पारलौकिक जीवनासंबंधी समस्या सोडविण्यासाठीच्या उत्सवांच्या स्वरूपात येतात. या परंपरांना पुरोहितांचा वर्ग, पारंपरिक परिमाण देऊन; उत्सवांचा पूज्य भाव जपत कर्मधर्माला कलात्मक स्वरूप देतो. महाराष्ट्राचे उदाहरण घेतले तर; डॉ. रा. चिं. ढेरे यांनी ज्या वर्गाला लोकसंस्कृतीचे उपासक असे म्हटले आहे; ते सर्व उपासक पुरोहित किंवा भिक्षुक म्हणून पुढे येतात. वाघे-मुरळी, गोंधळी, वासुदेव, पांगुळ, जोगतिण,

पोतराज अशा अनेक संस्था याप्रकारे उत्सवात सहभागी असतात. देवऋषी अथवा विविध देवतांची भगत किंवा मंत्रवारी घेऊन; प्रत्यक्ष देवतांच्या स्वरूपात समस्या सोडविण्यासाठी सरसावलेले दिसतात. भाकिते सांगणाऱ्या संस्था, विविध लोकसमूहांच्या संदर्भाने परंपरेने या उत्सवात सहभागी असतात. महाराष्ट्रातील ललिते सादर करणाऱ्या संस्था, कलगीतुऱ्यांच्या परंपरा, सहदेवभाडळी, भारूडे सादर करणाऱ्या संस्था, गाऱ्हाणे घालणाऱ्या संस्था, दशावतारी खेळे, खम सादर करणाऱ्या संस्था, दंडार सादर करणाऱ्या संस्था, भवाडा किंवा बोहाडे किंवा आखाडे तथा आखाडी सादर करणाऱ्या संस्था इ. संस्था उत्सवांना कलारूप आणि श्रद्धा जागविण्याचे परिमाण देत असतात. कीर्तनकारांचा वर्ग, भजनी मंडळ्या, लोकनाट्ये अशा संस्था उत्सवांना रंजन, प्रबोधन यांचे परिमाण देतात.

या सर्व संस्थांना जातींचे आणि व्यावसायिकांचे स्वरूप प्राप्त झालेले दिसले तरी; समूहजीवनात धर्मकर्मात्मक उत्सवांच्या संदर्भाने पूज्यभावही दिसतो.

विविध दैवतांच्या संदर्भाने तत्त्वज्ञानाच्या संदर्भात, आध्यात्मिक साधनेच्या संदर्भाने, साधना आणि भक्तिमार्ग प्रबोधित करणाऱ्या साधू, संत, संन्यासी, दिव्यधुरीण, गुरू, सद्गुरु, कर्मकांडात्मक परंपरा सांभाळणारे पुरोहित, या व अशा संस्था मानवी समूहजीवनाच्या भरणपोषणा संदर्भात कृषीजीवन आणि दैवतकथा यांच्या समन्वयासह, परिवर्तन प्रक्रियेत सहभागी होत, समूहजीवनाला, प्रपंच आणि परमार्थ यांतील उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने करावयाच्या प्रयत्नांना अर्थात उत्सव संपन्नतेला मार्गदर्शन करतात. निसर्गावलंबी कृषीजीवन, लोकजीवनातून प्रकटलेले अभिजात जीवन, विविध भौतिक शास्त्रे या संदर्भाने, समवाय साधन व प्रबोधन करण्याचे कार्यही, या पूज्यता सांभाळणाऱ्या संस्था करीत असतात.

कृषीजीवन आणि दैवतकथा परंपरांशी निगडित खेळकरी लोकांचा वर्ग उदयाला आलेला दिसतो. महाराष्ट्रात डोंबारी, कोल्हाटी, नंदीबैलवाले, अस्वलवाले, वाघवाले, मदारी आणि गारुडी यांच्या संस्थांबरोबरच संगीतासह कला सादर करणाऱ्या नायिका, कलावंतिणी यांचाही वर्ग समाजजीवनात पाहावयास मिळतो.

स्थलकाल परिस्थिती आणि लोकसमूह किंवा ज्ञाती यांचा कृषीजीवनाशी, त्यावर अवलंबित ग्राम आणि नागरव्यवस्थेशी असलेल्या संबंधाच्या अनुषंगाने जत्रा, यात्रा, संकेत, धर्मकर्म, भाकिते, आरोग्यविषयक ठोकताळे यांच्या भिन्न

भिन्न परंपरा पाहावयास मिळतात. या परंपरांना प्राचीनतम लोकबंधांपासून परिवर्तनशीलतेने आधुनिकतेपर्यंत लोकबंधांचे स्वरूप प्राप्त झालेले असते.

कृषीजीवन आणि दैवतकथा यांचा संबंध, बाजारहाट, व्यापारउदीम, आरोग्य, शिक्षण, विविध भौतिक साधनांच्या संदर्भाने असणारे व्यवसाय यांशीही जोडलेला असतो. या सर्व संबंधाने उद्दिष्टपूर्ती करतांना वेळ, काळ, संकेत, दैवतप्रसन्नता, शुभाशुभ विधिनिषेधात्मक परंपरा, उत्सवांना व्यावहारिकता आणि अध्यात्मजीवन यांचे परिमाण देतात.

स्थापत्य मूर्तीकला, चित्रकला, विणकाम, भरतकाम यांनाही कृषीजीवन आणि दैवतकथांचे परिमाण, उत्सव परिपूर्तीसाठी प्राप्त झालेले असते. या कलांच्या परंपराही स्थलकाल परिस्थिती यांशी व दैवतकथांशी अनुबंधित असतात.

कृषीजीवन आणि दैवतकथा यांनी मानवी लोकजीवनाचे एकही अंग रिक्त सोडलेले नसते. पशुपालन आणि पक्षीपालन यांच्यासह सर्वव्यापी असे स्वरूप या परंपरांना प्राप्त झालेले असते.

कृषीजीवनातच दर्यावर्दी मत्स्यपालन आणि मत्स्यव्यवसाय यांचा विचार अंतर्भूत करावा लागतो. दर्यावर्दी जीवन आणि दैवतकथा यांचे स्वरूपदेखील उत्सवसंपन्नतेच्या दृष्टीने समानच असते. कृषीजीवन ‘भू’ तत्त्वाशी संबंधित आहे, तर मत्स्यजीवन ‘जल’ तत्त्वाशी संबंधित आहे. ही भिन्नता दिसत असली तरी; ‘तेज’, ‘वायू’ आणि ‘आकाशतत्त्व’ या अन्य तत्त्वांचा सारखाच संबंध दोन्हीकडे असतो. उद्दिष्टपरिपूर्ती करतांना उत्सवसंपन्नतेला सारखेच परिमाण त्यामुळे प्राप्त झालेले असते.

कृषीजीवन, मत्स्यजीवन आणि दैवतकथाशास्त्र तथा धर्मतत्त्वज्ञान या संदर्भाने लौकिक आणि पारलौकिक जीवनात, आनंदप्राप्तीसाठी, उद्दिष्टपरिपूर्तीच्या निमित्ताने मांडल्या गेलेल्या उत्सवांना पूज्यभावाने कलात्मकरूपे देणाऱ्या मानवी प्रतिभेने जीवनात संगीत, चित्र, शिल्प आणि नाट्यकलांचा विकास केला. दैवतांविषयीचा पूज्यभाव आणि विधिनाट्यात्मकता वगळली तर निखळ कलासौंदर्यप्रतिती घेता येते. कलेचे शास्त्र मांडतांना कलेतील नाविन्य, कुसर आणि कौशल्य याकडे लक्ष दिले जाते. यांतून कलांच्या परंपरा निर्माण झाल्या. अभिजातता प्राप्त झाली असे म्हटले जाते. दैवतकथाशास्त्र हे निरामय आनंद प्राप्तीसाठीच माणसाने आकारले. सच्चिदानंदस्वरूप हे त्याचे अंतिम लक्ष्य. हेच लक्ष्य निखळ आनंद अर्थात सौंदर्य

प्रतितीच्या संदर्भाने कलांचे असते. आज अभिजात संगीत, नृत्य, नाट्य, शिल्प, चित्र, मूर्ती या कला या थेट कृषीजीवन, मत्स्यजीवन आणि दैवतकथाशास्त्र यांतूनच उदित झाल्या यांचा प्रत्यय येतो.

लोकसंगीत ही सर्व कलांची जननी आहे असे म्हणता येते. लोकसंगीतातील स्वर, ताल आणि लय या गोष्टी संपूर्ण मानवी जीवन कलात्मकतेने प्रकट करतात. संगीत कलेने स्थापत्य, शिल्प, चित्र या कलांना लयतत्त्वाचे परिमाण देऊन जिवंत केले. जीवनात ओतप्रोत असलेले लयतत्त्व हे प्रामुख्याने पंचभौतिक विभ्रमांचा मानवी जीवनाशी असलेल्या संबंधाने आविष्कृत होते. कृषीजीवन आणि दैवतकथा यांच्या अनुबंधाने हे लयतत्त्व कलारूप धारण करते. कलासाधना ही दैवतांचे भक्तिभावाने पूजन करून कृषीजीवन सुफलीत करण्यासाठी केली जाते. त्यायोगे जीवन सर्वांगाने फुलते अशी धारणा असते.

अखिल विश्वाच्या उत्पत्तीचा मूल स्त्रोत स्वसंवेद्य आत्मरूप होय. अर्थात जाणीवयुक्त चेतनाशक्ती आहे. या चेतनाशक्तीमधून अवकाश आणि अवकाशासाररूप म्हणजे वायू किंवा शिवतत्त्व निर्माण झाले. वायूचे साररूप म्हणजे गती होय. गती म्हणजे चलनवलन. पंचतत्त्वाच्या ठायी हे चलनवलन स्वाभाविक आहे. या चलनवलनातून स्वर अर्थात शब्द आणि गती जाणवते हीच तर ब्रह्मनची पहिली अभिव्यक्ती आहे. याच अभिव्यक्तीने पंचमहाभूतात्मक, संघटन विघटन स्वरूपात जीवसृष्टी निमाण झाली. याच अभिव्यक्तीने सगुणता प्राप्त झाली.

स्वर आणि गती यातूनच सबंध सृष्टीला सूर आणि लय प्राप्त झाले. लोकसंगीताचा आविष्कार या स्वाभाविकतेतून मानवाठायीच्या प्रतिभेने केला. शिव ही कलाविश्वाची मुख्य देवता म्हणून प्रसिद्ध झाली. त्याचेही हेच कारण आहे. भारतीय परंपरेतील लोकवाङ्मयात दैवतकथांचा अभ्यास करू लागले तर; संपूर्ण जीवनाचे निरीक्षण, पालन व समस्या निवारण इ. साठी सतत शिव-शिवा अर्थात शिव-पार्वतींचा प्रवास सुरू असतो किंवा शिव-शिवा सारीपाटाचा डाव मांडून खेळत असतात. सबंध सृष्टीचे स्वर-लय या स्वरूपातील चैतन्यमयी सारणीचे दर्शन, शिव-शिवा यांच्या संवादातून घडते. शिव-शिवांचीच आणखी द्विविध रूपे म्हणजे विष्णू-वैष्णवी आणि ब्रह्म-ब्रह्मा किंवा माया. सूर आणि लय यांतूनच शब्द आणि हालचाली प्रसिद्ध करणारी चित्रशैली निर्माण झाली.

सृष्टीच्या चैतन्यशाली हालचालींना लयींना संगीतकलेचे अर्थात नर्तन, वादन आणि गायन यांचे रूप प्राप्त झाले. याचे मुख्य कारण म्हणजे जीवसृष्टीतील मानवाचा सर्व सृष्टीशी असलेला संबंध. संबंधांविषयी मानवाने व्यवस्थापन आणि संवाद साधण्याचा जो प्रयत्न केला त्यांचे रूप हे कलारूप होय. नृत्य, नाट्य आणि वाणी - त्यांचे सूर-शब्द स्वरूपातील वादन यांनी हे कलाविश्व त्याच चैतन्यतत्त्वाला शरण जाण्यासाठी, प्रसन्न करण्यासाठी आणि त्यायोगे जीवनानंद मिळविण्यासाठी सिद्ध झाले. 'भारतीय इतिहास व संस्कृती यांचा यथार्थ अभ्यास' या खंडात्मक इतिहासात, 'भीष्म' प्रकल्पांतर्गत, 'श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर' यांनी प्रसिद्ध केलेल्या 'नादाची उपपत्ति' या प्रकरणात, भर्तृहरी या वैय्याकरणाने मांडलेल्या मताच्या आधारे चर्चा केली आहे. त्याच्या 'वाक्यपदीय' मधील

**''वागेवार्थं पश्यति वाग् भवति, वागेवार्थं निहितं संतनोति ।**
**वाचैव विश्वं बहुरुपं निबद्ध तदेतदेकं प्रविभज्योपभुंक्ते ।।''**

(१-११९)

**''न सो अस्ति प्रत्ययो लोके यः शब्दानुमादृते ।**
**अनुविद्धमिव ज्ञानं सर्वं शब्देन भासते ।।''**

(१-१२४)

अर्थात- केवळ वाणीच शब्दांचे अर्थ पाहू किंवा जाणू शकते. तिच्यामुळे हे प्रचंड व वैविध्यपूर्ण विश्व एकत्र बांधून ठेवले जाते आणि त्यातील सुसंवाद चालू राहतो. शब्दांच्या उपयोगाविना माहिती आणि ज्ञान प्राप्त होणे शक्य नाही. तसेच एकमेकांशी चर्चा करणे हे शब्दांमुळेच शक्य होते.

(१) परा- ऐकू न येणारा सामान्य मानवी बुद्धीच्या पलीकडील पण योगसाधनेने स्थिर झालेल्या बुद्धीच्या आवाक्यात येणारा.
(२) पश्यन्ति- बुद्धीच्या जोरावर स्थिर झालेल्या मनाला आकलन होणारा तरीही अव्यक्त.
(३) मध्यमा- मनाला ऐकू येणारा, पण बाह्यतः अव्यक्त.
(४) वैखरी- गळ्यात उगम पावलेल्या कंपनांद्वारे व्यक्त होणारा व ऐकू येणारा

असा वाणी विन्यास निर्माण झाला तो माणसाच्या ठायीच्या प्रतिभेने. कृषीकर्मात्मक हालचाली करतांनाच्या आणि स्त्री-पुरुष संबंध व माणसाचे

सृष्टीशी संबंध यांविषयीच्या हालचालीतून, दैवी शक्तीसंदर्भात, ज्ञानात्मक संवेदनेने, कृषीजीवन आणि दैवतकृतज्ञता या संबंधाने, स्वर आणि लय यांना आकार मिळाले. एकूणच चैतन्यतत्त्वाच्या आविष्कार आणि अभिव्यक्तीतून कलांचा दैवी स्वरूपात उगम झाला. या कलांचा उत्सव संपन्नतेसाठी उपयोग हे मानवी जीवनाचे व्यवच्छेदक ठरले.

यासंदर्भात उपरोक्त ग्रंथात एक मोठी सूचककथा दिली आहे– '(शतपथ ब्राह्मण VII २.४.१.७) यानुसार – गंधर्वांना संगीत व सुंदर ललना यांची आवड असते. विश्वावसू नामक एका गंधर्वाने गायत्री नावाच्या वैदिक छंदापासून सोमाची चोरी केली. गायत्री म्हणजे सूर्य. जेव्हा देवांना या चोरीची माहिती मिळाली तेव्हा त्यांच्याकडून सोम परत आणण्यासाठी त्यांनी वाक् नावाच्या एका सुंदर कुमारिकेला विश्वावसूकडे धाडले. त्या अत्यंत देखण्या तरुण देवीला पाहताच वाग्देवी सरस्वतीच्या बदल्यात गंधर्वांनी सोम परत केला. आता ती साऱ्या कलांची व वाङ्मयाची अधिष्ठात्री देवता बनली आहे.'

दैवतकथा परंपरेत शिवतत्त्वापासून विष्णूस्वरूप गणेशांची उत्पत्ती तर ब्रह्म–ब्रह्मा अर्थात मायेपासून कला आणि प्रतिभास्वरूप सरस्वती निर्माण झाली. गणेश आणि शारदा सरस्वती या शिव–शक्ती, विष्णूलक्ष्मी आणि ब्रह्ममाया या त्रिविधतेने आविष्कृत देवतांचे सार भूत युगुल म्हणजे गणेश–शारदा. मानवी जीवनाच्या आरंभाकरिता आणि जीवनचलनाकरिता या देवतांना सर्वारंभे पूजनाचा मान दिला. कृषीजीवनातही कऱ्हाकेळीची पूजा हे शुभारंभाचे कलात्मक प्रतीकपूजन केले जाते. मानवी जीवनातील सर्व प्रकारच्या विधिविधानात आरंभाला मनोस्वरूपाच्या या आरंभिक दैवतप्रतिकांचे पूजन भक्तिभावाने केले जाते. हे युगुल मानवाच्या मनोस्वरूप अशा प्रातीभ आणि कलाविष्काराचे उगमस्थान आहे.

भारतीय परंपरेत विविध प्रदेशांमध्ये सनातन परंपरेने, स्थलकाल परिस्थितीनुसार, उत्सवांचे कलारूप नृत्य शैलीतून प्रकटले आहे. त्या सर्व नृत्य सादरीकरणाचे स्वरूप उत्सवातील विधिनाट्यात्मक कर्म संपन्न करणे हे असते. या सर्व कला सादरीकरणाचा हेतू प्रामुख्याने कृषीजीवनाचे सुफलीकरण, मानवी जीवन चलनातील, पुरुषार्थ सफलीकरण, यासाठी देवदेवतांची कृपा संपादन करणे हे असते. या कलासाधनेला शास्त्रीय स्वरूप देण्याचे कार्य परंपरेतील

अनुभवातून कलासादरीकरणातील प्रतिभावंत धुरिणांनी अर्थात ऋषींनी केले. अशा प्रकारे अभिजात कलांचा जन्मा हाही मानवाच्या प्रारंभिक कृषीजीवन मूलकतेतून झाला. त्यांचा हेतू दैवतशरणम् असाच होता. मानवाच्या प्रतिभेला जीवनाविष्काराची तत्त्वमूलकता अहर्निश जाणवत राहिली आहे. ऐहिक जीवन जगतांना वासनादेहाच्या देहभावाला या कलारूपातून त्याने आनंदकेंद्री स्वरूप देऊन; जीवनातील जन्मप्रथा, जननप्रथा आणि मर्तिकप्रथांनाही कलारूप दिले.

आनंदानुभव आणि दुःखविरेचन या दोन्ही गोष्टींसाठी माणसाने आपल्या जीवनात या कलारूपांना कुळधर्म कुळाचाराचे स्थान दिले. खंडोबाचे जागरण, शक्तिस्वरूपांचा गोंधळ, भवाडे किंवा बोहाडे, आखाड्या, खम, दंडार, कलगीतुरे, दशावतारी खेळे, गाऱ्हाण्या घालण्याच्या प्रथा आणि तमाशा-खेळ किंवा खडीगंमत हे सर्व प्रकार संगीतबद्ध, नृत्याविष्कारासह विधिनाट्ये म्हणून महाराष्ट्रात सादर केले जातात. त्यांना कुळधर्माचे स्थान आहे. हे सर्व कुळधर्म कृषीजीवन आणि जनजीवनातील सुफलीकरणासाठी असतात. महाराष्ट्रातील या सर्व विधिनाट्यांचे परंपरागत असे अभिजात शास्त्रही सर्वमान्य झाले आहे. कर्नाटकातील यक्षगानासारखे प्रकार याच स्वरूपाचे आहेत.

भारतात विविध प्रदेशात अशाच प्रकारे विधिनाट्यांमधून उदित झालेले व आता अभिजात नृत्य तथा संगीतशैली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकारांची ओळख करून घेतली तर; कृषीजीवन आणि दैवतकथाशास्त्र यांवर अवलंबित समग्रजीवनाला उत्सवसंपन्नतेचे परिमाण या संगीत नृत्यशैलींनी दिले आहे हे लक्षात येईल. 'भारतीय इतिहास व संस्कृती यांचा यथार्थ अभ्यास' या प्रकल्पांतर्गत 'संगीत, नृत्य व नाट्य' या पंधराव्या खंडात 'नृत्यकला' या प्रकरणात भारतातील विविध नृत्यशैलींचा परिचय करून दिला आहे. त्यांतील उल्लेखांनुसार **(१) भरतनाट्यम** अथवा भारतनाट्यम. हा प्रकार मुळात दाक्षिणात्य असून; लोकपरंपरेतून भरतमुनींनी शास्त्रीय स्वरूपे दिलेल्या, विख्यात शास्त्रग्रंथ म्हणून प्रसिद्ध असलेल्या, भरताच्या नाट्यशास्त्रावर आधारित आहे. या शैलीमध्ये नृत्याचा भाग मुख्य असतो. या शैलीत कलावंतांमध्ये बहुसंख्य स्त्रियाच असतात. प्राचीन पारंपरिक तांडव नृत्याच्या अनेक शैलींपैकी ही एक शैली आहे.

भगवान शिव हा तांडवशैलीचा पहिला आचार्य मानला जातो. यासंदर्भात भरतमुनींनी सांगितलेली दैवतकथा सूचक आहे. 'भगवान ब्रह्मदेवाने अमृतमंथन

व त्रिपुरसुंदर ही दोन नाटके भगवान शिवांसमोर सादर केली. यांच्या प्रयोगांमुळे शिव अतिशय प्रभावित झाला. तथापि तो म्हणाला (शिव म्हणाले) प्रयोगांचा आस्वाद घेण्यासाठी त्यांच्यामध्ये नृत्य अंतर्भूत करण्याची सुधारणा करणे आवश्यक आहे. त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविल्यावर शिवाने तो नृत्यप्रकार तंडू नावाच्या शिष्याला शिकविला आणि तंडू शैलीचा प्रमुख प्रदर्शक बनला. त्याच्या नावावरून त्या नृत्य प्रकाराला 'तांडव' ही संज्ञा प्राप्त झाली.' या कथेचा अर्थ असा की, अमृतमंथन प्रसंग आणि त्रिपुरासूर संहार या प्रसंगांच्या उदाहरणांवरून अशा अन्य प्रसंगी यशस्वितेसाठी, विधिनाट्य म्हणून नृत्यपूर्ण नाट्य सादर करण्याची प्रथा शिवांनी सुरू केली. ब्रह्मदेव स्वतः अशा उत्सवसंपन्नतेचा पहिला प्रयोगकर्ता शिवतत्त्वाच्या साक्षीने झाला. उत्सवसंपन्नतेसाठी पूजनमार्ग म्हणून विधिनाट्ये सादर करण्याची परंपरा अशी निर्माण झाली आहे. म्हणूनच शिवांना नटराज असे म्हणू लागले. डमरूच्या रूपाने स्वर, ताल, लय तीनही गोष्टींची उत्सवसंपन्नतेतील आवश्यकता पारंपरिक झाली.

दक्षिणेतील मंदिरे उभारतांना कौशल्य व कला या दोहींचा विलास पाहावयास मिळतो, तो या परंपरेचा परिपाक होय. 'संगीत, नृत्य व नाट्य या विषयांवरील 'भारतार्णव' या प्रबंधाचा कर्ता नंदिकेश्वर हा भगवान शिवाचा पहिला शिष्य तंडू याच्या वंशात जन्माला आला. तंडू हा प्रख्यात नाट्यशास्त्राचा लेखक भरतमुनी याचाही गुरू होता.' याचा अर्थ 'भरतनाट्यम' ही नृत्यनाट्यशैली शिवविषयक लोकपरंपरेतून पुढे अभिजात रूपात प्रकट झाली. 'नाट्य हा शब्द नाचणे या अर्थाच्या प्राकृत नट व संस्कृत नृत् या धातूंपासून बनला आहे. नृत व नृत्य अगदी थोडा फरक आहे. खेळकरी कसरतवाले नृत करतात तर विधिनाट्याप्रसंगी, नाट्यात आणि रंजनात्मक प्रयोगात नृत्य केले जाते. उत्सवसंपन्नतेसाठी दोन्ही प्रकार केले जातात.

भरतनाट्यम शैलीत **(१) समपद–** रंगमंचावर देवतेला फुले अर्पण करताना सुरुवातीला दोन्ही पाय जुळवून सरळ ताठ उभे राहणे. **(२) उद्धातिक–** एक पाय सरळ स्थिर ठेवून दुसऱ्याच्या टाचेने जमिनीवर आघात करणे. अशा पायांच्या हालचाली तर हस्तमुद्रांमध्ये बोटांचा उपयोग नजरेत भरण्यासारखा असतो. या मुद्रांच्या ३२ शैली ह्या एका हाताने करावयाच्या तर; २४ शैली दोन्ही हातांनी करावयाच्या आहेत, असे तज्ज्ञ सांगतात.

भरतनाट्यम शैलीचे- १) आनंद तांडव २) संध्या तांडव ३) शृंगार तांडव या तीन प्रकारांना मुख्यतः भरतनाट्यम म्हणतात. ४) त्रिपुर तांडव ५) उर्ध्व तांडव ६) मुनित तांडव ७) संहार तांडव ८) उग्गिर तांडव ९) भूत तांडव १०) प्रलय तांडव ११) भुजंग तांडव आणि १२) सुधा तांडव - असे १२ प्रकार आहेत. याचा अर्थ सुख, दुःख, विनाश, प्रलय, युद्ध इ. सर्वसंबंधातील गोष्टीसंबंधातील प्रसंग, घटना यशस्वी होण्यासाठी मांडावयाच्या उत्सवात हे प्रकार सादर केले जात असावेत. भरतनाट्यम हीच शैली आज अभिजात शैलीस्वरूपात शिकविली जाते. अभिनय दर्शनाच्या नृत्यतंत्रद्वारा शब्द आणि वाद्यसंगीताच्या साथीसह ही शैली; अलारिपु, जातिस्वरम्, शब्दम्, वर्णम्, चरणम् आणि तिल्लाना या टप्प्यांनी शिकविली व सादर केली जाते. या शैलीसादरीकरणासाठी मृदंग, टाळ व तंबोरा ही पारंपरिक वाद्ये तर हार्मोनियम, वीणा, बासरी व सतार ही आधुनिक वाद्ये समाविष्ट केली जातात. नर्तक नर्तिकांना वेषभूषेत जरीच्या कलापूर्ण किनारी धोतरे व साड्या यांचा वापर केला जातो. नर्तक-नर्तिकांनी रसभावाविष्कार स्थलकालपरिस्थितीनुरुप करण्याची अपेक्षा असते. गुरू व देवता वंदनाला महत्त्व असते.

**(२) कथाकली-** नृत्याद्वारे मंचावर एक कथा सांगितली जाते. केरळ प्रांतात या शैलीचा उगम सांगितला जातो. नंबुद्री ब्राह्मण समाजाने ही शैली निर्माण केली असे म्हटले जाते. कुचिपुडी व कथाकलीमध्ये साधर्म्य आहे. ही शैली पुरुषांनी सादर करावयाची असते. स्त्रियांची भूमिकाही पुरुष करतात. ४ नर्तक, ४ गायक, ४ वादक असा १२ जणांचा चमू असतो. सादरीकरण रात्रभरही चालते. शुद्ध नृत्याबरोबर वीर व रौद्ररस समाविष्ट असलेली नृत्येही दाखविली जातात. तांडव नृत्यातील १२ पैकी एका शैलीशी एका शैलीच्या जवळची ही शैली आहे. जलद हालचाली, चेहऱ्यावरील भावमुद्रा व हस्तमुद्रा यांचे उत्कृष्ट दर्शन यात असते. या नृत्याचा प्रयोग देवतांना पूजा अर्पण करणे व भक्तियुक्त प्रार्थना करणे अशा स्वरूपाचा असतो. जयदेवाचे 'गीतगोविंद' या अष्टपदीचे गायन यातच नृत्यासह केले जाते. मृदुंग, बासरी आदी वाद्यांचा उपयोग केला जातो.

**(३) कुचिपुडी-** कथाकली शैलीचा एक विख्यात आचार्य आंध्रप्रदेशातील कुचिपुडी येथे राहात असे. त्याच्या वंशाचे नाव या नृत्यशैलीला मिळाले. त्याने कथाकली या केरळीय नृत्यशैलीचा विकास केला. चेंदा, मृदुंग, बासरी अशा

वाद्यांचा वापर केला जातो. रावणाचे पात्र रंगमंचावर आणायचे असेल तर दहा तोंडे घेऊनच अवतरते. शब्दविरहितपणे रामायण-महाभारतातील कथा यांत सादर केल्या जातात. या शैलीत दक्षिण भारतीय ४ उपपद्धती अंतर्भूत आहेत. (१) तमीळपुराणातून त्रिपुरासूर विजय अशा कुट्टकथेपर आधारित नृत्याविष्कार केरळमधील कलावंताने आणला. तो चेंगत्तुवन नावाच्या केरळच्या चेरावंशाच्या राजापुढे सादर केला. त्यावरून चकयारकुट्ट असे नाव आहे. यालाच 'कुडियत्तम' म्हणतात. (२) चामुंडादेवीच्या पूजेप्रित्यर्थ मुडियेत्त सादर केले जाते. शुंभ-निशुंभ मर्दन प्रसंग यात सादर केला जातो. (३) कृष्ण-नट्टम याद्वारे कृष्णकथा सादर होते. (४) रामनट्टम याद्वारा रामकथा सादर होते.

रामायण-महाभारत पुराणे यावर आधारित कथा कथाकलीत व कुचिपुडीमध्ये सादर होतात. रंगभूषेसाठी, पच्चा-हिरवा, चट्टी-पांढरीपट्टी, कट्टी-हिरवा, थडी-सफेद, काळा, लाल एकत्रित, कारी-काळा, मिनिक्कु-सौम्य गोरे अशा रंगांनी भाव प्रकट करतात.

घुमटाकार झगे, लाल डगले आणि शिरस्त्राणे, मुखवटे वापरतात. मोठ्या समयांच्या प्रकाशात नृत्य सादर होते.

**(४) कथ्थक–** कथ्थक म्हणजे कथानिवेदक होय. देवालयात व इतरत्र कथाकथन करणारा. कथ्थकचा उगम उत्तरप्रदेशात झाला असावा. कथ्थक नृत्यशैली भरतनाट्यम् एवढीच प्राचीन आहे. निर्मात्याच्या अर्थात देवाच्या चरणी समर्पित होऊन कथानिवेदन स्वरूपात उपासना करण्यासाठी कथ्थकचा उपयोग केला जातो. कथाकलीमध्ये नृत्य व नाट्य अशी दोन्ही लक्षणे दर्शविली जातात. ईश्वराबद्दलची कथा नृत्याच्या भोवती गुंफली जाते. नृत्य आणि अभिनयाच्या माध्यमातून कथा सादर केली जाते. कथक हे नृत नसून नृत्यनाट्य असते. भागवत पंथामध्ये कथ्थक अधिक लोकप्रिय आहे. छांदग्योपनिषद आणि तैत्तरीय अरण्यकात विष्णू रूपांचा उल्लेख येतो. चैतन्य महाप्रभूंनी वासुदेवकृष्ण पंथाचा प्रसार केला. कीर्तनप्रकार हा कथ्थकाचाच प्रकार म्हणता येईल. या नृत्यासाठी मृदंग, तबला, सारंगी व बासरी अशी वाद्ये वापरली जातात. सुरुवातीला वादक त्रिताल, झपताल किंवा एकताल सुरुवातीच्या या तालाला लेहरा असे म्हणतात. प्रारंभी मंद्र व स्थिर लय नंतर ती पाव, निम्मे, दुप्पट, चौपट, आठपट अशी वाढविली जाते.

अन्य नृत्यशैलींप्रमाणे गणेशवंदनेने सुरुवात होते. नर्तक, नर्तिका दोहोंचा समावेश असतो. नंतर गुरुवंदना होते. थाळा-नावाचा नृत्य पदन्यास करून, नर्तिका लक्ष वेधून घेते. नंतर आमदा-आगमन केले जाते. नंतर तत्कार अर्थात कथ्थक नृत्याचा आत्मा म्हणता येईल, असे नृत्य सुरू होते. परमेलु-स्वरूपात वाद्यमिश्रणात्मक तालाने रंगत आणली जाते. परन- अर्थात वेगवेगळी गती व लय दिली आहे. क्रम व लय - या दृष्टीने पदन्यास होतो. कवित्व- अर्थात कवितेचा आधार घेतला जातो. तोडा, तुकडा, तुक्रा असे तबल्याचे बोल कथ्थक रंगवितात. विविध प्रांतात वेगवेगळ्या प्रकारे कथ्थकच्या आविष्कार परंपरा आहेत. प्रदीर्घ ठुमरी ही गायली जाते. नर्तक स्वतःच गायन करू शकतो.

**(५) मणिपुरी किंवा रासनृत्य-** ही नृत्यशैली उत्तर-पूर्व भारतात अर्थात पूर्वांचलात विशेष प्रचलित आहे. भक्तिपूर्ण रासक्रीडा, या स्वरूपाच्या या शैलीच्या माध्यमातून श्रीरामांची आराधना करण्यात येते. यात स्त्री-पुरुषाचा सहभाग असतो. नृत्य करीत गीतांचे प्रस्तृतीकरण करत अभिनयाच्या सहाय्याने कथात्मकता सादर केली जाते. यातील मुख्य प्रकाराला 'लैहरीब' असे नाव असून टाळ्या वाजवून सादरीकरण केले जाते. दुसरा 'ईशरिचोलन' प्रकार वाद्यांच्या साथीने नृत्य करीत सादर केला जातो. 'ऐग्रिहेगल' नावाच्या तिसऱ्या प्रकाराचा उपयोग जत्रांच्या वेळी युवक-युवती यांच्या नृत्यासाठी केला जातो. हा प्रकार भगवान श्रीकृष्णांच्या चरित्रावरील 'रासलीला' स्वरूपाचा असतो.

या नृत्यशैलीविषयीची लोककथा अशी; भगवान शंकरांनी रासलीला पाहण्याची इच्छा श्रीकृष्णांकडे व्यक्त केली. श्रीकृष्णांनी त्यांना रासलीला केवळ ऐकण्याची परवानगी दिली. रासनृत्य सुरू झाल्यावर भगवान शंकर, नृत्य ऐकण्याचा प्रयास करू लागले. तथापि नृत्याची लय, गती, माधुर्य व पदन्यासाचा आवाज ऐकून शंकरांचे भान हरपले. अट विसरून ते नृत्य पाहू लागले. त्याक्षणी नृत्य बंद झाले. तरी शंकरांना नृत्यप्रकाराचा तपशील चांगला माहीत होता. त्यांनी पार्वती व तिच्या सख्यांना हा प्रकार शिकवून नृत्य सादर करायचे ठरविले. कैलासात डोंगराळ भागावर हे नृत्य करणे शक्य नव्हते. भरपूर सपाट जमीन असलेल्या दरीची निवड करून तेथे नृत्य करायचे ठरविले. परंतु दरी पाण्याने भरलेली होती. भगवान शंकरांनी त्रिशुलाच्या सहाय्याने पाणी निचरून जाण्याची व्यवस्था केली. त्या दरीत सपाट जमिनीवर शंकरांनी पार्वतींच्या सहाय्याने रासलीला नृत्याचा

कार्यक्रम पार पाडला. नागराजांनी आपल्या मण्याच्या सहाय्याने प्रकाशाची योजना केली. त्यामुळे या प्रदेशाला मणिपूर नाव मिळाले व शैलीला मणीपुरी असे नाव मिळाले. मणिपूरमध्ये प्रत्येक गावात कृष्णमंदिर असते त्याला नृत्यमंच जोडलेला असतो. त्या मंचावर भक्तिभावाने श्रीकृष्णांबरोबर 'लैहरीब' म्हणजे आनंद किंवा मौज नृत्य केले जाते. या शैलीचे १) भांगी २) वृंदावनी ३) कुसुमपराग असे तीन लास्य अर्थात हळुवार व डौलात करावयाचे नृत्य आणि ४) गोष्ट भांगी व ५) वृंदावनी हे तांडव प्रकारातील दोन नृत्याविष्कार केले जातात. रासनृत्याचे १) वैशाखात करावयाचे वसंतरास, २) आश्विनात करावयाचे कुंजरास, ३) कार्तिक मासात महारास, ४) अखंड प्रणय नृत्य असे नित्यरास असे चार प्रकार आहेत. मणिपुरी नृत्यप्रयोग साधारणपणे ६ तास चालतो. यात बहुतांशी नर्तिकाच भाग घेतात. लालरंगाचा घागरा आणि वरती ओढणी व लाल चोळी असा पोशाख असतो. कृष्ण रेशमी पितांबर परिधान करतो. नामसंकीर्तनाने रासलीलेचा प्रारंभ होतो. गीत गोविंद-अष्टपदी गायली जाते. सूत्रधार रासलीलेची घोषणा करतो. वृंदा व अन्य गौळणींसह राधा प्रवेश करते. राधाकृष्ण यांचे लटके भांडण वृंदा सोडविते आणि रास हा नृत्यप्रकार सुरू होता.

भरतनाट्यम, कथाकली व कुचीपुडी, कथ्थक आणि मणिपुरी या भारतातील नृत्यशैलीतूनच गुजरात, मध्यभारत, महाराष्ट्र, कर्नाटक या प्रदेशांमध्ये, गर्भानृत्य, बोहाडा नृत्य, भोंडला नृत्य, टिपरी किंवा दांडिया, लेझीम, टाळ किंवा दिंडी नृत्य अशा शैली निर्माण झालेल्या दिसतात. महाराष्ट्रातील गवळण व लावणी नृत्य यांसह सादर होणारी गंमत, खेळ किंवा तमाशा याचा विचार यात करावा लागतो. हे सर्व नृत्य प्रकार प्रामुख्याने शिव-शिवा, विष्णू-वैष्णवी या दैवतांशी अर्थात उत्पत्ती, स्थिती आणि लय यांशी अर्थात कृषीजीवनाशी जोडलेले दिसतात. उत्पत्ती, स्थिती आणि लय यांचे चक्र मानवी जीवनाचे भरणपोषण करणारे आहे. त्यामुळे या कलांचे किंवा या प्रयोगांचे सादरीकरण निर्माता ब्रह्म-ब्रह्मा अर्थात माया यांनी केले आहे, असे मानले जाते.

प्रतिभा आणि कला यांच्या माध्यमातून सर्व संकटांवर, समस्यांवर मात करून; मंगलमय जीवन करणाऱ्या या प्रयोगसिद्ध कला श्री गणेश यांच्या अधिपत्याखालीच सादर होतात.

शिवांची आणि शक्तींची असंख्य अशी स्थलकालपरिस्थितीनुसारची रूपे

दैवते म्हणून पुढे आलेली असतात तशीच विष्णूलक्ष्मींची दशावतारांसह अनेक रूपे प्रचलित झालेली दिसतात. यामध्ये प्रामुख्याने श्रीराम आणि श्रीकृष्ण ही अनुक्रमे त्रेता आणि द्वापार युगातील अवतार रूपे विशेष प्रचलित दिसतात.

कृषीजीवनाशी निगडित, मानवी जीवनात स्थैर्य, मांगल्य, सुफलता यावी यांसाठी दैवतांची परंपरा निमाण झालेली दिसते. स्थिर जीवनाबरोबरच विविध प्रकारची दैवते प्रसंगा–प्रसंगाने जीवनात स्थैर्य, मांगल्य, सुफलता यांसाठी मनोनीत होऊन; त्यांच्या परंपरा झाल्या. कृषीजीवन सारणी संपन्न करण्यासाठी, दैवतांच्या कृपेसाठी भक्तिभावाने उत्सवांची मांडणी झाली. त्यात नृत्य, नृत्त, नाट्य, गायन, कीर्तन, खेळे, बोहाडे, लळिते, भारूडे, खेळ आदी अनेक गोष्टी, उत्सव साजरा करण्यासाठी मानवाने, आपल्या प्रतिभेने जीवनानुभूतींचे आकार देऊन आविष्कृत केल्या. यातूनच नित्य पूजन व भक्तीसाठी अनेकविध भक्तिप्रकार जोडले गेले. 'नारदीय भक्तिसूत्रे' ही सर्वश्रुत अशी भक्तिसाधना परंपरेने चालत आलेली दिसते. अनेक संप्रदायांनुसार भक्तिसाधना प्रकार संख्येने कमीजास्त होतात. पंचविध, नवविध, अनेकविध अशा या प्रकारातील सामान्य असे, श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन हे प्रकार सर्व प्रकारच्या जीवनपद्धतींमध्ये पाहावयास मिळतात.

कृषीजीवनाने देवकल्पनेची अपरिहार्यता लक्षात आली. देवकेंद्री जीवनधर्म, अर्थात मानवी जीवनाचे धारणातत्त्व नैसर्गिकपणे जोडलेले दिसते. जीवनधारणा हे मानवी जीवनाचे व्यवच्छेदक आहे. समूहाने जगताना, मुलभूत विकारांच्या अर्थात आहार (भूक), निद्रा (विश्रांती किंवा सुषुप्ती), मैथून (निसर्गतः जननप्रक्रियेसाठीची कामवासना) आणि भय (अर्थात भय निवारण) या संदर्भाने, निश्चितता, विश्वास आणि औपभोगितता यांच्या न्याय अपेक्षेने, अर्थात मानवी समूहातील आबालवृद्ध, स्त्री–पुरुष, सबल–दुर्बल अशा सर्व घटकांना, सुयोग्य आणि समान संधी प्राप्त व्हावी, यासाठी समाजात देवाधिष्ठित धारणासूत्रे निर्माण करण्यात प्रतिभावंतांनी पुढाकार घेतला. धर्मश्रद्धेवर आधारित जीवनधर्मश्रद्धा असे स्वरूप मानवी सारणीला मिळाले.

जीवनधारणेसाठी स्थिरसाधन म्हणजे कृषीकर्म होय. स्वाभाविकपणे उपलब्ध जल आणि जमीन यांची व्यवस्था यांविषयी स्वामित्व व स्थैर्य विचार यांवर आधारित, कुटुंब, ग्राम, नगर यांची मांडणी मानवाने केली. अन्न, वस्त्र आणि

निवारा, दळणवळण यांसाठी सुलभ साधनांचा पुरवठा करणाऱ्या मानवी ज्ञानधारा निर्माण झाल्या. यातूनच कौशल्य कला आणि विद्या उदित झाल्या. निर्मितीचे ज्ञान व त्यातून गुरुपरंपरा, त्यांशी निगडित असे आहार, निद्रा, भय आणि मैथून केंद्री, स्थैर्य सापेक्ष जीवन; या मानवी समूहांच्या अपेक्षेनुसार ज्ञानी व त्यानुसार साधने निर्माण झाली. साधनांच्या उपलब्धीचे परस्परावलंबित्व यामुळे मानवी समूहसारणी बांधली गेली. कृषीजीवनाला आणि दैवतव्यवस्थापनेला विशेष महत्त्व या सारणीत आपसुकच प्राप्त झाले. जीवनधारणा म्हणजे समूहसापेक्ष असे वाट्यास आलेले अथवा स्वीकारलेले कर्म आणि त्यांशी आधार देणारे दिव्यत्वाचे संवेदन म्हणजे देव होत. यातून देवधर्म यांच्या परंपरा निर्माण झाल्या. मानवी वासनादेह आणि त्याचे चलन घडविणारे त्या ठायी संवेदित होणारे चैतन्य, असे जिवात्म्याचे वैयक्तिक स्वरूप, समाजपुरुष आणि सामाजिक सामूहिक सुख अर्थात आनंद यांसाठी देवधर्म आणि कर्ममीमांसा यांच्या मांडणीतून संपूर्ण मानवी जीवनधारणा, माणसाने स्वप्रतिभेने बद्ध केली.

या समूहसापेक्ष बद्धतेमुळे मानवी जीवनात उद्दिष्टपूर्तींच्या मालिकेत कर्म, प्रयत्न यांना संघर्षाचे, स्पर्धेचे स्वरूप प्राप्त झाले. उद्दिष्टपूर्तीसाठी संघर्ष निभावण्यासाठी संपूर्ण मानसिक आधार देणारे तत्त्व म्हणजे देव होय. देव अर्थात आत्मस्वरूप अर्थात मनोस्वरूप होय. जे मनाला समाधान देते, ते तत्त्व म्हणे देव. या विचारातून मानवी जीवनाला धर्म आणि तत्त्वज्ञानाने व्यापले.

**मानवी देह,** हे नैसर्गिक असे चैतन्यशाली साधन होय हे त्याच चैतन्यतत्त्वाच्या सहाय्याने माणसाला उमगले. त्या देहाने मानवी जीवनकेंद्रिततेने पंचभौतिकाचे उपयोजन करता येते. एवढेच नव्हे तर त्या देहातील मनोस्वरूपाने भोवतीच्या आणि ठायीच्या पंचभौतिकात्मकतेचा उपयोग मानवाला घेता येतो. त्या पंचभौतिक आविष्काराला हवा तसा आकार देता येतो. त्या पंचभौतिक आविष्काराचाही उपभोग घेता येतो हे सूत्र अथवा सामर्थ्यतत्त्व माणसाला गवसले.

मुक्तपणाने उपभोग घेता येतो हे मानवाला समजले. मानव अनादिपणे उपभोग घेत आहे. हे उपभोग घेणे म्हणजे मानवी जीवनातील व्यक्तिगत आणि समूहगत आनंदप्रतिती होय, हे त्याने जाणले. या सर्व जाणिवांचा उगम मानवाच्या मनोस्वरूपाचा पंचतत्त्वांशी आलेला संपर्क, संबंध यात आहे. उगम क्षेत्र म्हणजे कृषीकर्म आणि मत्स्यव्यवसाय व प्राणी शिकार कर्म होय. 'अन्नम् ब्रह्म' हे

जीवनसूत्र ठरते. नित्य भूक. त्यासाठी आहार. त्यातून पोषण असा क्रम अवगत झाला. त्याशिवाय लय हे जीवनसूत्र मानवाला उमगले. ह्याचा पुरवठा करणाऱ्या सर्व शक्ती, साधने यांना देवत्व बहाल झाले. एवढेच काय स्तन्यपरंपरेमुळे भूमी हीदेखील नित्य अन्न देणारी माता आहे, असा पूज्यभाव निर्माण झाला. तसेच जलप्रवाह आणि जलाशय हेही नित्य अन्न आणि पाणी देणारे आहेत हे लक्षात आले. या दोन्ही गोष्टींना मातृदेवतेचे स्थान माणसाने दिले. जलाशय डोंगर, वृक्ष यांना याच कारणास्तव पितृदेवतेचे स्थान मिळाले. एवढेच नव्हे तर प्राणीरूप अन्न कसे उपलब्ध होते हे लक्षात घेऊन 'जीवो जीवस्य जीवनम्' हे सूत्र यांतून उमगले. उद्भिज, अंडज, स्वेदज, जारज, जलचर, भूचर, उभयचर, खेचर अशा प्रकारांतील प्राण्यांना आणि वनस्पतींनाही देवत्व बहाल झाले.

माणसाने पंचतत्त्वात्मक देवतांबरोबर जीवनाला सहाय्यभूत सर्व सृष्टीला देवत्व दिले. माणसाच्या चैतन्यशाली स्वसंवेद्य मनोस्वरूपाने, आद्य स्वसंवेद्य आत्मरूपाप्रमाणेच ठायीच्या मनोस्वरूपाने एकप्रकारे प्रतिसृष्टी निर्माण केली. ही सृष्टी निसर्ग आणि मानवी जीवात्मा यांच्या नित्य संबंधाने जीवात्म्याठायीच्या मनोस्वरूपाने निर्माण केली. नरदेहाच्या जीवात्मा स्वरूपाचे हेच तर लौकिक आणि अलौकिक असे स्वरूप आहे. आपल्या जीवनसंघर्षाला भोगाला निखळ आनंदाचे परिमाण स्वाभाविक परमात्मतत्त्वाप्रमाणे लाभावे; यासाठी त्याने अनुभूतींच्या आधारे सर्व शक्तींना साधनांचे रूप देतांना, साधना आणि पूजा बांधली. यातूनच मानवी कर्मसारणी आणि देवधर्मसारणी माणसाने निर्माण केली.

कृषीजीवनातील नित्य यज्ञाच्या नैसर्गिक प्रक्रियात्म अनुभूतीने यज्ञसंस्था उभी केली. उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळा या स्वरूपात यज्ञसंस्थेला आकार दिला.

''**अन्नादभवंति भूतानी । पर्जन्याद अन्नसंभवः ।**
**यज्ञात भवती पर्जन्यो । यज्ञकर्म समुद्भवम ।।**''

हे जीवनाचे नित्यसूत्र त्यास गवसले. याचा अनुभव त्याने कृषीजीवनात आणि ठायीच्या देहधर्मातही घेतला. त्याची जीवनशैली यज्ञसंस्था आणि दैवतपूजा यांशी निगडित बनली. देवधर्माशिवाय मानवी जीवन आनंदमग्न होणार नाही हे सत्य माणसाला आध्यात्मिक जीवन जगण्यास प्रवृत्त करणारे ठरले.

मत्स्यव्यवसाय आणि कृषीजीवन यांशी संबंधित अनेक देवतांची निर्मिती झाली. त्यांच्या उत्सवपरंपरांनी जीवन व्यापून टाकल्याचा अनुभव येतो. नैसर्गिक वनांच्या आश्रयाने असणारे कृषीजीवन हेही वन्य देवतांनी व त्यांच्या उत्सवांनी व्यापलेले दिसते. आज ज्यांचा उल्लेख वन्य जमाती किंवा आदिवासी जमाती म्हणून होतो त्या जमातींच्या देवता आणि त्यांच्या उत्सवांचे स्वरूप पाहिले तर दैवतकथांच्या सनातन श्रद्धा व परंपरांचा सहज परिचय होतो.

वन्य देवतांमध्ये शिव-शिवा स्वरूप देवतांचा अर्थात पितृदेवता आणि मातृदेवतांचे आदीम बंध सापडतात.

पर्वत, गड, डोंगर यांना देवत्व दिलेले दिसते. लोकजीवन धारणेमधील त्यांचे दातृत्व आणि दिव्यत्व लोकगीते, लोककथा, भाविकबंध अर्थात वाक्यांश, म्हणी, वाक्‌प्रचार यांतून दिसून येते. शिव-शिवास्वरूप मातृपितृ देवतांची स्थाने अशा पर्वत, गड, डोंगर शिखरावर आढळतात. आकाश, वायू, सूर्य, तारे, नक्षत्रे या सर्वांना पेलणारी शिखरे आणि त्यांतून उत्पन्न होणारे स्त्रोत हे सर्व आभाळाचं देणं आहे, सृष्टीचं देणं आहे याची स्वसंवेद्यता माणसाच्या ठायी येते. चित्‌शक्ती आणि चैतन्याचे स्थान आकाश आणि पृथ्वीचा थेट संबंध दर्शविणाऱ्या पर्वतशिखरांवर देवतांचे अस्तित्व भासमान होणे स्वाभाविकच आहे. पर्वतशिखरे आणि पर्वतांचे आकाश पेलत महाकाय असणे हे जीवनाला स्थैर्य आणि आश्रय देणारे आहे; याचा अनुभव मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासूनच घेतला.

सूर्य, वायू, आकाश, शिखर, कडे कपारी, दऱ्या यांना स्वतःबरोबर, स्वतःला सांभाळणाऱ्या दैवतांचे स्थान माणसाने दिले. त्यांच्याकडे करुणा भाकण्याची परंपरा निर्माण झाली. आपण या सृष्टीचे अपत्य आहोत. आपल्यासाठी ही अवघी सृष्टी या आभाळाने आणि पृथ्वीने निर्माण केली; ही भावना सहजच निर्माण झाली. त्यामुळेच मोठ्या कृतज्ञभावाने सृष्टीतील सर्व चर आणि अचरांना त्याच शिव-शिवांची रूपे मानून त्यांचे आनंदमग्नतेने श्रद्धेने, स्वजीवनाच्या सुफलनासाठी उत्सव मांडले गेले. त्या अस्तित्वांची लय अवघ्या जीवनाला मिळाली. वन्यजीवन जगणाऱ्या अथवा निसर्गाश्रयी जीवनात डोंगर, झरे, नद्या, वृक्ष, वेली, औषधी वाटणाऱ्या लहान-मोठ्या वनस्पती, पर्जन्य, सूर्य, तारे, नक्षत्र, पशुपक्षी या सर्वांना मानवी जीवनात पर्यायाने देवत्व बहाल झाले. यात अन्नस्वरूपालाही अर्थात धान्य, फळे, फुले, पाने, पशुपक्षी यांनाही देवत्व प्राप्त झाले. ह्या गोष्टी पोषण करणाऱ्या असल्याचा

अनुभव घेतला. जत्रायात्रातील बळीप्रथा, नित्य पाकक्रियेतील अग्नीला घास देणे (वैश्वदेव), अन्न समोर ठेवून श्रद्धेने कृतज्ञतेने वंदन करून भक्षण करणे; या सर्व गोष्टी पाहिल्या की मानवाला स्वस्वरूपाचे भान सनातनपणे आहे, हे लक्षात येते. वन्यजीवनातून महानगरीय जीवनापर्यंत श्रद्धापूर्ण आनंदमग्नतेसाठी उत्सवांची, दैवतपूजनाची श्रद्धाभक्तीची परंपरा हा जीवनधारणेचा, देवाधर्माचा मुख्य स्त्रोत या वन्यजीवनापासून निर्माण झाला असावा, असे म्हणता येते.

या सर्व देवतांची अनगड प्रतिके ही त्याच डोंगर, दऱ्या, वृक्षराजी यातून त्यांच्या अंशभागातून दगडगोटे, खांब, मुंडे स्वरूपातील काष्ठ प्रतिके पाहिली की लक्षात येते. जलचर, उभयचर, भूचर, खेचर अशा प्राण्यांनाही देवत्व मिळालेले दिसते. त्यांच्या दिव्यकथा, त्यांच्या भक्तिपरंपरा आणि जीवनाच्या आनंदमग्नतेसाठी त्यांच्या उत्सवांची परंपरा सर्वदूर वन्यजीवनात दिसते. त्यांचे कलात्मक, कौशल्यात्मक आकार श्रद्धापूर्णतेने घरेदारे, अंगण, ओटे, राऊळे, देऊळे यांवर संगीतबद्धपणे शिल्पित झालेले दिसतात. वन्याश्रयी कृषीजीवनातून मानवाच्या धारणा स्त्रोतांना जन्म देणारी आणि सनातनपणे सांभाळणारी ही सर्व सृष्टीसाधने अपरिहार्यपणे जीवनाचा भाग बनली. या सर्व साधनरूपांप्रमाणेच आपणही याच सृष्टीचलनाचा एक पंचभौतिक भाग आहोत. सृष्टीशक्ती आणि सृष्टीजनिता याचेच आपण अंश आहोत, ह्या भावना मानवाठायी ओतप्रोत झाल्या. यातून मानवी मातृपितृ देवतांचा जन्म झाला. त्यांच्या ठायी पूज्यभाव निर्माण झाला. मानवाला दिव्य अविनाशी तत्त्वाचा स्पर्श होऊन; देह आणि आत्मरूप यांचे भान आले. या दोन्ही गोष्टी मानवी तत्त्वज्ञान परंपरेत दिव्यत्वाचे चिंतन करून; अविनाशी आनंदमग्नतेची कामना करतात. तत्त्वज्ञानाने धर्मधारणेला अर्थात जीवनसारणीला शाश्वत रूप दिले. याच भावनेने मानवी जीवनातील धुरिणांनाही देवत्व प्राप्त झाले. आई, पिता, राजा या स्वरूपातील पूर्वज देवतांना कृषीजीवनात आणि सामुद्रिक जीवनात, बांधाबांधावर किनाऱ्याकिनाऱ्यावर स्थान मिळाले. त्यांच्याही पूजन भक्तीच्या परंपरा निर्माण झाल्या.

मत्स्यव्यवसायामध्ये अर्थात दर्यावर्दी जीवनात, मत्स्य हा पृथ्वीची धारणा आणि पालनपोषण करणारा परब्रह्माचा अवतार आहे; तर विष्णूशक्ती कलशरूपाने लक्ष्मी तथा जीवनाचे साधन वितरित करते. सागर हे मत्स्यदेवतेचे देवालय म्हणून त्यासही देवत्व आहे. सागरच मत्स्यव्यवसाय करण्यास संरक्षण आणि बल

प्रदान करील आणि मत्स्य आपल्या अगणित अंशात्मक अवतारांचे अन्नस्वरूप ब्रह्म प्रदान करील; ही कृतज्ञतेची मानवी भावना मानवाच्या जीवात्मस्वरूपाचे वेगळेपण सिद्ध करणारी आहे. जीवात्मा आणि परमात्मा यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करणारी आहे. सूर्य आणि चंद्र या प्रकाशतत्त्व तथा तेज तत्त्व रूपाने, मत्स्यव्यवसायिकांना उर्जा प्रदान करणाऱ्या देवता आहेत; तर वायू हेच वाहन तथा संरक्षक कवच देणारे दैवत आहे. या दैवतांवर अवलंबित रुक्ष देवाच्या सहाय्याने मत्स्याचेच अनुकरण करीत सागरात, जलाशयात, नद्यांमध्ये प्रवास करीत अन्नशोधन करावयाचे; अशी मत्स्योपजीवी मानवसमूहाची धारणा आहे. सागरलाटा, वीजवादळे, होड्यांचे डोलणे, तरंगणे, हेलकावणे, त्यांवर मात करीत मत्स्यपंखांच्या अनुकरणाने वल्हवणे या सर्व विभ्रमांना एकत्रित करून; स्वर, ताल, लय यावर आधारित दर्यावर्दींचे आनंदमग्न होऊन जगण्याचा कृतज्ञतापूर्वक प्रयत्न, त्यांच्या नर्तन, वादन, गायन यांतून दिसतो. नित्य निसर्गाला थेट कवटाळून मृत्यूला आव्हान देऊन; आत्मरूपाचा ऐहिक आविष्कार करतांनाही सच्चिदानंदस्वरूपात मग्न होऊन; नरदेहाचा व्यवहार करायचा, ही केवढी दुर्दम्य क्रीडा, सृष्टीकडून ज्ञानात्मकतेने संज्ञापित करून घेऊन मानवाने सिद्ध केली.

सागरपूजन, होडीपूजन, अवघ्या निसर्गाला व त्यातील मूळ वायूतत्त्वाला आवाहनपूर्वक भावभक्तीने कृतज्ञता व्यक्त करीत, जीवनाचाच उत्सव मांडण्याची कला दर्यावर्दींकडून घेता येते. जीवात्म्याची दुर्दम्य जीजीविशा आणि आत्मरूपाचे चैतन्यशाली वावरणे या दोन्हीसह, जीवनधारणेचा उत्सव मांडून दैवतांना आवाहनपूजन करून; ठायीच्या आत्मरूपाचे, सच्चिदानंदस्वरूप असे महत्तत्त्व आणि महाशक्ती यांच्या संवेदनेने आविष्कृत होऊन जगणे, हे जीवन संघर्ष आणि सच्चिदानंदस्वरूपाच्या सृष्टीस्वरूप क्रीडेचे साक्षात दर्शन घडविणारे आहे. दर्यावर्दींचे हे ज्ञानवान जगणे नित्यप्रलय, नित्य जीवन दर्शविणारे आहे. नारळी पौर्णिमेचा उत्सव आणि दर्यावर्दी जलदेवतांचा पूजनोत्सव, पुनवेच्या प्रकाशातील जीवनानंदोत्सव, या उत्सवांनी जीवनाशी, जीवनाच्या सहाय्याने जीवनझुंज देऊन; चाललेला दर्यावर्दींचा जीवनोत्सव म्हणजे विज्ञान आणि ज्ञान यांचे अद्वैत प्रदर्शित करणारा शिवशक्तीचा नित्य सारीपाठ खेळ आहे.

कृषीकर्मावर आधारित जीवनातही; हाती सापडलेले बीज पुन्हा मातीत टाकून द्यायचे आणि सृष्टीच्या चक्रनेमीक्रमावर विसंबून अन्नपदार्थ मिळतील

या अपार श्रद्धेने तीतिक्षा करायची. म्हणजे ''मातीच आपणा जन्मही देते । मातीवरती जीवन जगते । पुढे सर्व ते मातीत मिळते । मग कशास करिता गर्व फुका ।।'' हेच सूत्र अवलंबून भूमीला, मानवाच्या स्थिर आणि सुखद जीवनासाठी शरण जायचे. मातीचे व्यवस्थापन आपल्या परीने करायचे. मातीतून मिळालेले बीज वापरायचे. त्याच्या सुफलनासाठी जमिनीची पिकणाऱ्या पिकाची निगा राखण्यासाठी मशागत करायची, एवढेच आपल्या हाती. म्हणजे कृषीकर्मातील भूमीसंबंधी, पेरणी, खुरपणी, निंदणी, पाणी देणे, तोडणी, कापणी, मळणी या सर्व गोष्टींसाठी, मातृस्वरूप मातीला एकप्रकारे ढुशा देऊन पान्हवायचे, तिची माया जागृत करायची, तिची राखण करायची असे सारे नम्र आणि श्रद्धापूर्वक करायचे. हे करतांना मानवाच्या हाती केवळ कर्तव्यकर्म आहे. अन्य सारे काही, मानवाला निर्माण करणाऱ्या निर्मिकाच्या हाती आहे हे लक्षात येते.

जीवात्म्याठायीच्या स्वसंवेद्यतेने माती आणि मातीतून होणाऱ्या आविष्काराविषयी सहानुभूती संवेदित होते. हा मातीतील आविष्कार भूमी, वायू, आप, तेज आणि आकाश या पंचभौतिकांच्या नित्य अविनाशी चलनातून घडतो. त्याचे त्याच पंचभौतिकातून निष्पन्न असे एक अवलंबित रूप असा मानव केवळ भोक्ता आहे. हे त्याचे भोक्तेपण देहाहंकाराने, समूहमनाने कर्मधर्मातून त्याने सारणीरूपात मांडलेले असल्याने त्याच्या या भोक्तेपणालाही पंचभौतिक करुणेने प्रतिसाद देतात. याच कारणाने कृषीकर्मातील सर्व संबंधित साधनांना दिव्यत्व देऊन; भक्तिपूजनाची मांडणी करून; आनंदमग्न होण्याची आत्मसंवेद्य परंपरा मानवाने स्वीकारली. त्यामुळेच कृषीजीवनात उत्सवांच्या मालिकेत श्रद्धाभक्तिसाधनेने सच्चिदानंदाशी जोडले जाण्याचे जीवनचलन माणसाकडून निर्माण झाले. माणसाच्या स्वाभाविक मनोस्वरूपाची ही सृष्टीतील संघर्षात्मक क्रीडा होय. यातूनच शेतजमीन अर्थात क्षेत्र यासही दिव्यत्व प्राप्त होऊन; मातृदेवतेचे रूप मिळाले.

या मातृदेवतेच्या अखंड यज्ञस्वरूप उत्सवाची मांडणी ऋषीपरंपरेपासून आजतागायत माणसाने संघमनाने सांभाळली. भूमिपूजन, त्या भूमीचे अर्थात क्षेत्राचे रक्षण आणि सीमांकन करणारे वृक्ष, बांध, सीमाधारक या सर्वांना देवत्व प्राप्त झाले. त्यांच्या पूजनाची उत्सवी परंपरा सुरू झाली. भूमीला अर्थात क्षेत्रालादेखील नाव मिळाले. त्या क्षेत्राशी निगडित पारंपरिक स्वामित्व आणि

रक्षकत्व दर्शविणारे पूर्वज देव, स्थाणू, खांब, खुंट, वृक्ष, वीरगळमूर्ती या रूपाने स्थापित झाले. त्यांच्या उत्सवपरंपरा निर्माण झाल्या. शेतीच्या अवजारांचे पूजन, कर्मशुभारंभी शुभारंभाचा उत्सव, सुफलीकरणासाठी उत्सव, खळ्याची पूजा, राशींची पूजा, याचबरोबर पूर्वज देवांच्या वार्षिक जत्रायात्रा, त्यांच्याकडे नवससायास सुरू झाले. या परंपरेत भू-संरक्षक व क्षेत्रसंरक्षक, नाग, सर्प, कुत्रा, वाघ अशा प्राण्यांनाही देवत्व मिळाले. त्यांच्याही उत्सवपरंपरा सुरू झाल्या. नागपंचमी, वाघजत्रा, वाघबारस अशा परंपरा निर्माण झाल्या. आकाश, सूर्यचंद्र आणि पर्जन्य हे आभाळाचं देणं आणि भूमीचं सुफलित होणं, ही साक्षात शिवपार्वतीची सृष्टीक्रीडा वाटू लागली. त्या भावनेने गणगौर, गौराईपूजन, नवरात्र महोत्सव, शिलंगण, अक्षय्यतृतीया, दिवाळी पाडवा असे कितीतरी सणोत्सव सुरू झाले. मानवी जीवनातील अनेक संस्मरणीय कथांनी या परंपरांचा गौरव वाढविला. मकरसंक्रांत, चैत्री उत्सव परंपरा या यातूनच पुढे आल्या. अनंतकालांचे जीवनस्मरण दैवतकथांच्या सहाय्याने नृत्य, नृत्त, नाट्य, खेळ यांनी सजवून या भक्तिपरंपरांना आनंदोत्सवांचे रूप दिले.

दैवतांचे प्रकार विचारात घेतले तर; पितृदैवते आणि मातृदैवते असे दोन प्रकार मानता येतात. सच्चिदानंदस्वरूपाचा स्वसंवेद्यता हा स्वभाव असल्यामुळे; त्याच्या अस्तित्वाचे महत्‌तत्त्व आणि महत्‌तत्त्वाठायीची महाशक्ती, अशा दोनच संवेदना, अद्वैताचे द्वैत भासमान करण्यासाठी आविष्कृत झाल्या. जन्म, जीवन आणि विलय अर्थात अद्वैत-द्वैत-अद्वैत अशी ही प्रक्रिया असावी; असे तत्त्वांच्या आविष्कारप्रक्रियेचे स्वरूप अनुभूत झाले. प्रक्रियेचे त्रिविधत्त्व आणि द्विविधत्त्व या अनुभवातून माणसाला ब्रह्म-माया (ब्रह्मा), विष्णू-वैष्णवी (लक्ष्मी), शिव-शिवा (पार्वती) ही अस्तित्वे द्विविधतेची, त्रिविधरूपे अवगत झाली असावीत; हा एक कयास होय. माणसाच्या आणि मानले तर प्राण्यांच्या प्रजननप्रक्रियेच्या अनुभूतींमुळेही पितृ आणि मातृ अशा द्विविधतेचा अद्वैत आविष्कार म्हणजे अपत्य या स्वरूपात येणाऱ्या अनुभवातून आत्मरूपातील महत्‌तत्त्व व महाशक्ती या द्विविधतेचा अनुभव माणसाला आला. अद्वैताची अशी द्विविधतेची त्रिविधता, हे पंचभौतिकांच्या संघटन, विघटन प्रक्रियेचे स्वरूप माणसाच्या ध्यानी आले. जीवनप्रक्रियेला माणसाने, परब्रह्मम्याच्या, ब्रह्मा, विष्णू, महेश अशा पितृ आणि माया, लक्ष्मी आणि शक्ती किंवा पार्वती अशा मातृस्वरूपांचे आधार ठायीच्या

स्वसंवेद्यतेने दिले असावे, असे मानता येते.

मानवी जीवनाच्या भौतिक किंवा ऐहिक जीवनानुभूतीला ठायीच्या अजड अशा चैतन्यतत्त्वाचा सर्वव्यापी कारणस्वरूप आधार आहे. त्या चैतन्यतत्त्वाशिवाय पंचतत्त्वांच्या संघटन प्रक्रियेतून, त्यांच्याच गुणात्मकतेने सगुण स्वरूपात प्रकटलेल्या जीवाला अर्थात देहाला, जननप्रक्रियेत सहभागी होऊन; उत्पत्ती, स्थिती, लय यांचा अनुभव शक्य नाही. एवढेच नव्हे तर देहाहंकाराने जीवन व्यतीत करणेही शक्य नाही; हे लक्षात आल्याने, सगुण स्वरूपाने, सगुण स्वरूपाच्या जीवनातील अन्न, वस्त्र, निवारा, आहार, निद्रा, भय आणि मैथून या संबंधातील प्रक्रियेसाठी सारणी मांडली. अगणित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी, सगुणस्वरूपात आत्मस्वरूपाचे, भक्ती तथा श्रद्धाभावाने, पूजन करून; प्रसन्नतापूर्वक सहाय्य मिळविण्यासाठी, माणसाने स्वतःसारख्या सगुणस्वरूपात दैवतांची अर्थात पितृरूपांची आणि मातृरूपांची संघमनोस्वरूपाने मांडणी केली. स्वतःच्या सगुण अस्तित्वाचे, वासनात्मक वर्तनप्रणालींचे सर्व गुणविशेष त्या दैवतांना चिकटवून; लेकराने आईच्या कुशीत सुरक्षिततेचा अनुभव द्यावा; या प्राथमिक गरजेने दैवतांच्या भक्तीच्या परंपरा निर्माण केल्या. त्याचबरोबर आपल्या उत्पत्ती, स्थिती आणि विलय स्वरूपातील अविनाशित्वाच्या अनुभूती देणाऱ्या, आत्मरूपाचा अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, सच्चिदानंदस्वरूप, केवळ निजरूपाचा अनुभव घेतांना; त्या शाश्वत स्वरूपातच नित्य होण्यासाठी, जीवनप्रक्रियेच्या विकारी आणि तात्कालिक, भासमान अशा रूपातून निसटण्यासाठी; दैवतांच्या नित्य पूजेचा आणि दैवतांच्या आवाहन, स्थापना आणि विसर्जन प्रक्रियेचा खेळ मांडला. सच्चिदानंदस्वरूप साधना नरदेहाच्या ठायीच करण्याच्या पद्धती आणि शास्त्रे मांडली. अशा संपूर्ण दैवत निर्मिती आणि उपासना परंपरेतून एकविध, द्विविध, त्रिविध अशा मातृ, पितृस्वरूपांची निर्मिती व उपासना यांच्या उत्सव परंपरा मांडीत झाल्या.

कृषीजीवन आणि दर्यावर्दी परंपरा यांनी, मानवी जीवनाला सर्वांगे व्यापले आहे. ते प्रामुख्याने, मानवी मनोस्वरूपाने प्रतिष्ठित केलेल्या दैवतपरंपरेच्या आधारे दैवते ही मानवी जीवनाची धारणातत्त्वे झाली आहेत. दैवतांना मानवी जीवनाचे आदिबंध किंवा लोकबंध म्हणता येते. 'लोकबंध', 'लोककला' तसेच 'लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य' या स्वतंत्र ग्रंथात या संबंधाने विस्तृत चर्चा मी

(प्रस्तुत लेखकाने) केली आहेच. वन्यजीवन व त्यातून पुढे आलेले कृषीजीवन यांतील अनुभवांनी मानवी वंशपरंपरेला अनुबंधित केलेले दिसते.

देवक, अर्थात एकप्रकारे गोत्र, या परंपरा पाहिल्या तर गरुड या पक्ष्यापासून मोर या पक्ष्यापर्यंत पक्षीगण, गाय, वानर इ. पासून घोरपड अशा प्राण्यांपर्यंत; मासा, कासव, मगर, नाग, सर्प आदी जलचर व उभयचर प्राण्यांपर्यंत, वनस्पतीमध्ये वृक्ष, वेली, पान, फांद्या यांचा समावेश विविध मानवी वंशांच्या देवकांमध्ये आहे. संपूर्ण चैतन्यशाली अशा चरसृष्टीला देवकांच्या रूपाने आपल्या ऐहिक जीवनात स्थान देताना जीव-जगत यांचा अनुबंध आणि आत्मतत्त्वात्मक आध्यात्मिक अनुबंध, माणसाने मान्य करून; मानवी समूहसारणीत लोकनिष्ठेने आनंदमग्नतेचा ध्यास प्रदर्शित केला आहे. मानवी जीवनातील सर्व प्रकारच्या संस्कार उत्सवांप्रसंगी देवकांचे पूजन भक्तिभावाने केले जाते. एकप्रकारे ही कैवल्याच्या सृष्टीउत्सवाची संवेदना, मानवी मनात अध्यात्मनिष्ठेने प्रकट होते. ऋषीकुलांनी वंशवेली विस्तारतांना गोत्रे स्थापन केली आणि मानवी वंशांच्या इतिहासाला ईश्वरापासूनचा सनातन अनुबंध देत असतांना देवकांच्या रूपाने सृष्टीचा संबंध, परस्पर अनुबंधित कसा असतो हेही दाखविले. पंचमहाभूतात्मक सृष्टीतील एक रूप म्हणजे मानवी जीवात्मा होय. त्याचा थेट अनिवार्य आणि अद्वैत स्वरूपातील संबंध देवकांमुळे स्पष्ट झाला. मानवी सारणीत देवकांना एवढे महत्त्व आहे. देहाहंकाराच्या पलिकडे सर्वात्मक आणि सर्वात्मकतेतील एक; हे मानवी रूप, सर्व प्राणीमात्रांतील एकत्रित गुणात्मकतेने विकसित असलेल्या नरदेहाला सतत संवेदित करण्याचे महत्कार्य देवकपरंपरेने होत आहे.

पूर्वज देवतांविषयीची श्रद्धा, ऋषीमुनींची सर्वदूर पसरलेली स्थाने, समाधी पादुका यांच्या रूपाने सनातनापर्यंत घेऊन जातात. बांधाबांधांवर, शिवेवर, वेशीवर, ग्रामात स्थापित वीरगळ स्वरूपातील पूर्वज दैवते मानवी पिढ्यापिढ्यांचे संघटित, संघजीवन आणि वंश वैशिष्ट्ये प्रदर्शित करीत; कृषीजीवन, वन्यजीवन व दर्यावर्दी जीवन यांतून प्रकट होणाऱ्या सांस्कृतिक धारणा सूत्ररूपात मांडतात. प्रत्यक्ष कर्माधीन जीवनाला सनातनातून आश्वासित करतात. त्याचबरोबर ऐहिक जीवनाची क्षणभंगुरता आणि अविनाशितता ठाशीव स्वरूपात, संवेदित करीत, मानवी आत्मरूपाला परमात्मस्वरूपाशी जोडून; कर्तव्यतत्पर करतात. या पूर्वज देवतांचे सणोत्सव वीरगळाच्या जत्रायात्रा, मूळपुरुषाची जत्रायात्रा, रक्षकांची

जत्रायात्रा अशा स्वरूपात संघर्षात्मक जीवनाला संकटमुक्तीचे आश्वासन देत जीवनानंद व समाधान मानण्याकडे घेऊन जातात. मानवी अहंकार, बुभुक्षितता, असूया, द्वेष, स्पर्धा या संघर्षकारी जीवनावर मात करण्याचे बळ देतात.

मानवी वंशांच्या कुळांत कुलदेवतांचे महत्त्व कुलधारणा, कुलपोषण, कुलसंरक्षण आणि वंशवृद्धी या दृष्टीने अनन्यसाधारण असते. प्रत्येक कुळाची कुलदेवता एकविध-पितृ किंवा मातृ या स्वरूपात किंवा द्विविध-पितृ आणि मातृ अशा स्वरूपात असते. देव आणि देवी यांची वंशनिहाय रूपे कुलदेवता म्हणून दिसतात. कुलासंदर्भातील जन्म, जीवन आणि मृत्यू अशा संपूर्ण जीवन प्रक्रियेत या देवतांचा पूजनात्मक, भक्तिपूर्ण उत्सव, ही त्या कुलातील सर्व व्यक्तींची स्वात्मसाधना असते. ब्रह्म-ब्रह्मा, विष्णू-वैष्णवी, शिव-शिवा यांचेच अवतारित्व या कुलदेवतांमध्ये असते. ही कुलदैवते नित्यपूजासाधनेत अनिवार्यपणे भजली जातात. या कुलदैवतांच्या उत्सवाने प्रत्येक व्यक्ती एक प्रकारे आत्म्याचा, परमात्म्याशी संबंध जोडून कर्मतत्पर होत असतो. मानवाने आपल्या जीवनाची नाळ, लौकिकातून पारलौकिकाशी कुलदैवतांच्या संकल्पनेने जोडली आहे. व्यष्टी आणि समष्टीसह एकूण आविष्कारित सृष्टीउत्सवाचा सच्चिदानंदस्वरूप, नीजरूपाशी असलेला संबंध अशा मनोस्वरूपाने जोडून,माणसाने सत्य, चैतन्यपूर्ण, आनंदस्वरूपता आपल्या ठायी अनुभवण्याचा नित्योत्सव कुलदैवत पूजनातून सिद्ध केला आहे.

वासनादेहाच्या समूहजीवनातील, जीवनाच्या सर्व अंगोपांगातील संस्कारसंचित, कांक्षा, अपेक्षा, भौतिक, अधिभौतिक, आध्यात्मिक ताप निवारण या संदर्भातील अपेक्षापूर्तीसाठीचे उत्सव मांडतांना 'भाव तसा देव' या सूत्राप्रमाणे उपास्य दैवते स्वीकारलेली दिसतात. या दैवतांमध्ये मनोस्वरूपाला संवेदित झालेल्या शक्तिमत्ताधारक दैवते असतात. संकटमोचक आणि धनऐश्वर्यदायक शक्ती भक्तांसाठी कार्यान्वित करणाऱ्या शक्ती यात विशेषत्वाने आढळतात. यांतही मनोस्वरूपाला संवेदित झालेले सनातन लोकबंध अवतारित्वासह स्वीकारलेले असतात. भारतीय परंपरेत काही उपास्य देवता पुराणे, रामायण, महाभारत यांतून घेतलेली दिसतात. उदा. शिव, गणेश, हनुमान, भैरव, संतोषीमाता, वैष्णोदेवी, लक्ष्मी, सरस्वती इ. कृषीजीवनात शिव, गणेश, हनुमान, भैरव या पितृदैवतांचा विशेष समावेश दिसतो. उपास्यदैवतांमध्ये नवनाथ, तत्सम योगी, सिद्ध, साधू,

अवलिया यांनाही स्वीकारलेले दिसते. साईनाथ, गजानन, अक्कलकोट स्वामी इ. उदाहरणे महाराष्ट्रात विशेष लोकप्रिय आहेत. सांप्रदायिक परंपरांमध्ये राम, कृष्ण, विठ्ठल, महाकाली, शिव, दत्त, ऋषी, मुनी अशी दैवते दिसतात.

महाराष्ट्राच्या कृषीजीवनात विठ्ठल हे लोकदेवांच्या स्वरूपात उपास्य दैवत झाले आहे. याशिवाय भैरव, पूर्वज देवता, भूतदैवते यांचाही समावेश दिसतो. उपास्य दैवतांमध्ये स्थानदैवते, ग्रामदैवते, क्षेत्रीय दैवते यांनादेखील विशेष स्थान मिळालेले दिसते. उपास्यदैवतांची विविध व्रते, वाऱ्या, खेट्या, यात्रा, जत्रा यांच्या निमित्ताने विशिष्ट व्रतात्मक उपासनाही होतात. वन्यदेवतांतील गडदेवता, वनदेवता, जलदेवता यांनाही कृषीजीवनानुषंगाने मानवी समूहात विशेष स्थान दिसते. यांना माउली देवता किंवा 'मावलया' म्हणतात. काही वेळा यातील मावलयांनाच क्षेत्रीय देवतांचे स्थान प्राप्त झालेले दिसते. जननप्रक्रिये संबंधातील शितळादेवी किंवा सटवाई, हनुमान, भैरव यांच्याही उपासना दिसतात. उपास्य दैवतांविषयी मोठ्या प्रमाणावर व्यक्तिस्वातंत्र्य असते. ज्या व्यक्तीला जी देवता उपास्यदेवता म्हणून स्वीकारावी वाटेल, ती देवता स्वीकारून उपासना करता येते. एकाच कुटुंबात व्यक्तिगणिक उपास्यदैवत भिन्न आढळते. उपास्य दैवत उपासना ही एक प्रकारे स्वात्मभावात्मक अपेक्षांच्या आनंदमग्नतेसाठीची प्रतीक पूजा किंवा भक्ती असते.

दर्यावर्दी, वन्य आणि कृषीजीवनाशी निगडित स्थानदैवतांची वारंवारिता मोठ्या प्रमाणात आढळते. कुत्रा, वाघ, मगर, मासा, धोंडे, गोटे, वृक्ष, कपार, गुहा, कडा, लिंगी या स्वरूपातील प्रतिकांचा भरणा यात असतो. अष्टभैरवांनाही यात स्थान असते. अनेकदा या प्रतिकांना शेंदूरदेखील लावलेला नसतो. श्रद्धा मात्र दृढ स्वरूपात जोडलेली असते. स्थानदैवतांशी कुटुंब, जात, जमात जोडलेली असते. काही वेळा स्थानदैवतांना क्षेत्रीय दैवतांचे स्वरूप मिळते. स्थानदैवतांच्या पूजाविधींना कुलधर्माचे महत्त्वही आलेले अनेक कुटुंबात अनुभवता येते. वंशपरंपराही स्थानदेवतेंशी जोडलेल्या असतात. स्थानदैवतांचे जीवनातील स्थान सामान्यतः उपास्यदैवतांसमान असले तरी; ते व्यक्तीपुरते मर्यादित नसते. त्यांशी समूह जोडलेला असतो. नवससायास, वारी घेणे, वारी येणे, बलीप्रथा हे प्रकारही स्थानदैवतांना जोडलेले असतात. स्थानमहात्म्य कथन करणाऱ्या कथा त्या दैवतांशी जोडलेल्या समाजात प्रचलित असतात. भगतपरंपराही घराण्यात

किंवा समूहात आढळते.

मानवी स्थिर जीवनात स्वयंपूर्ण ग्रामरचना, वन्य, कृषी व दर्यावर्दी जीवनाशी जोडलेली दिसते. ग्रामजीवनात अनेक परस्परावलंबी ज्ञातीसंस्था एकत्रितपणे नांदत असतात. ग्रामव्यवस्थापनात ग्रामप्रमुख हा प्रमुख पंच अथवा वडीलमाणूस असतो. ग्रामन्यायव्यवस्था पाहणारी पंचमंडळी असते. यात पाच, सात, नऊ अशा व्यक्ती धुरिणत्वानुसार जोडलेल्या असतात. या सर्वांच्या निष्ठा ग्रामदेवतेशी जोडलेल्या असतात. अनेकदा स्थानदेवतेचे रूपांतर ग्रामदैवतात झालेले असते. हनुमान, भैरवनाथ यासारखी पितृदैवते किंवा विशिष्ट रूपातील देवी ग्रामदेवता असते. साधु, संन्यासी, ऋषी, मुनी, सिद्ध, ग्रामधुरीण अर्थात वीर यांनाही ग्रामदैवतांचे स्वरूप प्राप्त असते. कर्तृत्ववान पूर्वज महिलेलादेखील देवीच्या रूपात असे रूप प्राप्त होते. ग्रामदेवतेशी ग्रामातील सर्व लोकांच्या जीवनाच्या धारणा जोडलेल्या असतात. जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा आणि विशिष्ट प्रसंगाने ग्रामदेवतेशी उपासनात्मक संबंध जोडलेला असतो. ग्रामदैवतांशी भाकिते किंवा भविष्यविषयक कल्पना जोडलेल्या असतात. ग्रामदैवत हे ग्रामजीवनाचे परंपराप्राप्त लोकदैवत म्हणून पुढे आलेले असते.

कुलदैवते, वैदिक व पौराणिक दैवते, क्वचित ग्रामदैवते, ऋषी, सिद्ध, योगी, नाथ, स्वामी इ.चे रूपांतर क्षेत्रीय दैवते म्हणून झालेले असते. क्षेत्रीय दैवतांचे क्षेत्र पंचक्रोशीपासून, प्रदेश, देश, जागतिकतेपर्यंत विस्तारत जाते. शिव, विष्णू, शक्तिदेवता यांची क्षेत्रे अशी झालेली दिसतात. कृषीजीवनाच्या दृष्टीने शिव, विष्णू, शक्तिपीठे अतिमहत्त्वाची मानली जातात. एकाच वेळी ग्राम, कुल, आणि क्षेत्र या तीनही विषयीच्या भावना त्याशी जोडलेल्या असतात. त्यांचे महोत्सव कृषी, दर्यावर्दी आणि वन्यजीवनासाठी महत्त्वाचे असतात. महाराष्ट्रात श्रीविठ्ठल-वारी, शिवरात्र महोत्सव आणि शक्तिपीठांच्या जत्रायात्रा यांना या जीवनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसते. या दैवतांचे उत्सव हे कृषी, दर्यावर्दी आणि वन्य जीवनाच्या ऋतुचक्राशी निगडित श्रमजीवनाशी आणि सुफलीकरणाशी जोडलेले असतात. महाराष्ट्रात शिर्डी साईनाथ, श्री गजाननबाबा, श्री अक्कलकोटस्वामी, माउली ज्ञानोबा, तुकोबा, एकोबा, मढीचे कान्होबा ही क्षेत्रीय दैवतेदेखील या तीनही जीवनांशी जोडलेली आहेत.

ज्ञाती व जमाती यांची कार्ये कृषीजीवनावर अवलंबित असतात. त्यांच्या

स्वतंत्र अशा जातपंचायत किंवा जमातपंचायत व स्वतंत्र अशा वैशिष्ट्यपूर्ण मातृ-पितृ देवता पाहावयास मिळतात. या देवतांचे स्वरूप त्या-त्या जमातीच्या व्यवसायानुरुप उग्र वा सौम्य असते. जातपंचायत व जमातपंचायत यांतील न्यायनिवाड्यांचा संबंध, व्यवसायातील करारमदारांचा संबंध, वैवाहिक जीवनाचा संबंधही त्यांच्या दैवतांशी जोडलेला दिसतो. असे असले तरी विशेषतः शिव-शिवा, विष्णू-वैष्णवी, ब्रह्म-ब्रह्मा या चैतन्य व शक्ती युगुलांच्या रूपांचीच ती प्रतिके असतात. त्या-त्या जात किंवा जमातींनुसार त्या-त्या दैवतांच्या यात्रा जत्रांचे नियमन परंपरेने जोडलेले असते. या दैवतांमध्येही पूर्वज देवता, कुलदेवता, उपास्य देवता व क्षेत्रीय देवता असे स्वरूप अनुभवता येते. वन्यजमाती, भटक्या जमाती आणि व्यावसायिक ज्ञातीजमाती यांची स्वतंत्र अशी दैवतपरंपरा पाहावयास मिळते.

जगभरात सर्व दैवतांचे स्वतंत्र पौरोहित्य करणाऱ्यांचा असा उपासकांचा वर्ग पाहावयास मिळतो. या उपासकांच्या विविध जमाती, विविध वैशिष्ट्यपूर्ण दैवतांच्या उपासनांचा प्रचार, भक्तिजागरण करीत स्वतःबरोबर संपूर्ण निगडित अशा समाजाची श्रद्धाही जागवित असतात. प्रसंगी कुळधर्म कुलाचारांचे पौरोहित्यही करीत असतात. महाराष्ट्रात भारतीय परंपरेप्रमाणे भिक्षुकांचा एक वर्ग दिसतो. ऋषीपरंपरेप्रमाणे या वर्गालाही ब्राह्मण म्हणून संबोधिले जाते. श्रुती, स्मृती, पुराणोक्त परंपरांप्रमाणे मानवी जीवनातील सोळा संस्कारांचे आणि यज्ञ, याग, दैवतांच्या प्रतिष्ठापना याशिवाय अशुभनिवारणात्मक व्रते, विधी इ.चे पौरोहित्य, हा तथाकथित ब्राह्मण नामक भिक्षुक वर्ग करीत असतो. श्रुती, स्मृती व पुराणे यांचे पठण, वितरण, जतन करण्याची मोठी जबाबदारीही या वर्गाने निभावलेली दिसते. विविध प्रकारची विधिनाट्ये करून, कुलधर्म निभावण्याचे कार्य दैवतांच्या अनुषंगाने करण्याचे कार्य या जमाती करीत असतात. अशा लोकविधिनाट्यात्मक कार्य करणाऱ्या, महाराष्ट्रातील परंपरांची उदाहरणे म्हणजे खंडोबा अर्थात भैरवांचे जागरण करणारे वाघे-मुरळी आणि शक्तींचे जागरण करणारे गोंधळी अशा जमाती दिसतात. उपरोक्त भरतनाट्यम् कथाकली-कुचिपुडी, कथ्थक, मणिपुरी आदी नर्तनपरंपरा करणाऱ्या परंपरांचा उल्लेखही या प्रकारे करता येईल. या जमातींप्रमाणे काही जमाती प्राणीदैवते घेऊन पौराणिक परंपरा आणि भाकिते सांगण्याच्या परंपरा जागवितात. नंदीबैलवाले, माकडवाले, अस्वलवाले, सपेरे, वाघवाले

यांना अलिकडे खेळकरी म्हटले जात असले तरी यांचा संबंध वैदिक आणि पौराणिक देवतांशी आणि कृषीजीवनातील सुफलीकरणाशी असलेला पाहावयास मिळतो. त्यामुळे या सर्व जमातींचा मानवी जीवनातील उत्सव संपन्नतेत सहभाग असतो.

दर्यावर्दी, वन्य आणि कृषीजीवनाशी सहयोगाने मानवी मनोस्वरूपाने ऐहिक आणि पारलौकिक जीवनाची सांगड घालीत; नरदेहांचा सामूहिक जीवनातील कर्ममय प्रवास अनंतकालापासून, अनंतकालाकडे सुरू ठेवला आहे. सृष्टीनिर्मिती व सृष्टीचे चलन यांचा दिव्य आणि श्रमजीवनावर अवलंबित अनुभव घेत, व्यक्ती आणि समष्टीची परस्परावलंबी जीवनसारणी निर्माण केली. या जीवनाची धारणाशक्ती दैवतपरंपरेने व्यापलेली आहे. या धारणाशक्तींच्या आधाराने जीवनातील सर्व प्रकारच्या अनिवार्य उद्दिष्टपूर्तीसाठी विविध दिव्यअनुभवांना भौतिक जीवनात प्रतिकांच्या स्वरूपात स्थान देऊन; उद्दिष्टपूर्तीचे उत्सव मांडले आहेत. दैवतांच्या मनोस्वरूप अस्तिक्यभावाने आनंदमग्नता अनुभवण्याचा प्रयत्न केला आहे. कृषीकर्मावलंबत्वाची सुरुवात म्हणजेच ऋषीजीवन. या ऋषीजीवनातून जीवनाचे आश्रम स्वरूप, ज्ञानात्मकतेने व्यवस्थापित झाले. कुटुंब, समाज, राज्य, वैश्विक भावना या सर्व व्यवस्था माणसाने निर्माण केल्या. या सर्व व्यवस्थांच्या परिवर्तनशील तरी तत्त्वतः स्थिर जीवनाच्या धारणेला दैवतकल्पनेने मनोस्वरूपतः बळ दिले आणि पुरुषार्थाची कल्पना जोडली. त्यामुळे अवघे मानवी जीवन उत्सवपरंपरापूर्ण झाले. कृषीकर्मात्मक यज्ञ आणि कैवल्याचा पंचभौतिक आविष्कार व त्यातील तत्त्व आणि शक्ती अद्वैतातून पुन्हा सृष्टी चक्रनिर्मिती कल्पना; या अनुभूतीने लाभलेल्या जीवनात सच्चिदानंद स्वरूप होण्याची स्वाभाविक संवेदना जतन करीत, 'सोऽहं', 'अहं ब्रह्मः अस्मि' असे स्वरूप आपल्या अस्तित्वाला मानवाने व्यक्तिगत व समूहगत स्वरूपात दिले.

## (५)

# वंश आणि कुटुंब यांतील उत्सव मालिका

मानववंशशास्त्रानुसार मानवी वंशाविषयी विविध तर्क मांडले जातात. मानव प्राण्याची उत्पत्ती जर विश्वाच्या सृजन प्रक्रियेत एकदाच झाली असेल तर; ती एकच मानव की अनेक मानव स्वरूपात? तसेच स्त्री आणि पुरुष अशा द्विविध स्वरूपात झाली असेल की? याविषयी तर्कच्या पलिकडे अद्यापही गूढ उकलले नाही. उत्पत्तीसमयी एकाच वेळी किती स्त्रिया व पुरुष निर्माण झाले असतील? स्त्री-पुरुष मैथुनातून पुनरुत्पत्ती प्रक्रिया केव्हापासून सुरू झाली असेल याविषयी पुन्हा तर्क. मैथून प्रक्रिया पाहूजाता वंशवेलीविषयीचे अनेक तर्क बांधले गेले आहेत. मानवी वंश एकच की सात, नऊ, अकरा वगैरे किती? यांविषयीदेखील मानवीतर्कच आहेत! पुरातत्त्व शास्त्र, मानवांचे अवशेष इत्यादींचा विचार केला तरी; निश्चित उत्तर मिळत नाही. अब्जावधी वर्षांच्या पृथ्वीवरील सृष्टीच्या प्रवासात, जीवसृष्टीचा विचार केला तर; वर्तमानात तरी सस्तन, द्विपाद, चतुष्पाद पशू, पक्षी यांपेक्षा मानव प्राणी संख्यात्मकतेने लक्षणीय आहे हे खरे. जीवजंतू, कीटक, जीवाणू यांच्या तुलनेत मानवप्राणी संख्यात्मकतेने किती आहे? असे असले तरी माणसांचे प्रजनन आणि स्त्री-पुरुष रूपातील माता-पिता यांच्या वंशवेलीविषयी आरंभबिंदूपर्यंत जावे लागते. तरी, थांग लागत नाही!

भारतीय परंपरेत दैवतकथाशास्त्राप्रमाणे शिव-शिवा या युगुलापासून वंश विस्तार झाला असावा असा एक तर्क आहे. दुसरा तर्क ब्रह्म-ब्रह्मा किंवा माया यांच्यापासून प्रजापतींची अर्थात गोत्रनिर्मात्या प्रजापतींची आणि पत्नीरूपा स्त्रियांची उत्पत्ती झाली असावी असा मांडला जातो. त्यातील महर्षी कश्यपांना तर प्रजोत्पत्तीचे अफाट सामर्थ्य प्राप्त होते. सृष्टीच्या प्रजननाची जबाबदारीच जणू त्यांच्यावर प्रजापतींनी आपल्या तेरा कन्या देऊन केली होती. त्यातून देव, दैत्य

अथवा दानव अर्थात मानव निर्माण झाला. मनुऋषींपासूनचा मानवी वंश सांगितला जातो. आज गोत्रज म्हणून जी उत्पत्ती दिसते त्यांचे मूळ युगुल थेट शिव-शिवा, विष्णू-वैष्णवी, ब्रह्म-माया यांच्यापर्यंत मिळविता येते. या युगुलांतील पितृ आणि मातृभावांना कुलदैवतांचे स्वरूप आले आहे, एवढे नक्की दिसते. देवकांची संगती, त्या अनुषंगाने या दैवतांशी स्थलकालपरिस्थितीनुरूप जोडली जाते. श्रीमद्भागवतात कुलवंशांची यादी पाहावयास मिळते. सूर्य, चंद्र आणि शेष वंश असे तीनच वंश मानण्याची प्रथा क्षात्रपरंपरेत पाहावयास मिळते.

वर्तमानात आडनावे हीच वंशांची नावे झाली आहेत. गोत्रांनुसार व देवकांनुसार विवाहसंबंधांचा विचार भारतीय परंपरेत केला जातो. अवघा मानव एकच आहे आणि आरंभबिंदूपासून जननप्रक्रिया लक्षात घेता रक्तप्रवाह थांबलाच नाही; असे लक्षात घेतले तरी; मानवप्राणी उत्पत्तीच्या समयीची परिस्थिती भौतिकशास्त्रदृष्ट्या आकलनात येत नाही. शरीरविज्ञान व रसायनविज्ञान यांनुसार विचार करून DNA चा विचार केला तरी वंशाविषयी निश्चित असा तर्क बांधता येत नाही. त्यातच ज्ञाती व्यवस्थेने जन्मानुसार ज्ञाती मानण्याची प्रथा चातुवर्ण्य व्यवस्थेत केव्हापासून आली व त्यानुसार आडनावे वंश या परंपरा केव्हा निर्माण झाल्या; यांसाठी तर्कावरच अवलंबून राहावे लागते. भारतीय विवाह संस्थेचा इतिहास मांडण्याचा झालेला प्रयत्न, केवळ वितर्कच निर्माण करणारा आहे. स्मृतिग्रंथातून वंश, गोत्र आणि विवाहसंस्था यांचा केलेला विचार वंश व वर्ण संकरांविषयी प्रश्न निर्माण करतो. असे असंख्य प्रश्न असले तरी वंश आणि कुटुंबसंस्था यांचे प्रचलन अनादिपणे सुरू आहे. भारतीय परंपरेमध्ये राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था, कुटुंबव्यवस्था आणि त्यातील व्यक्ती आणि समाज स्तरापर्यंत, विविध मते आहेत. त्यानुसार भूमिका वठविल्या जात आहेत. या व्यवस्थेतच धर्मकर्ममीमांसा विचारात घेतली जाते. भारतीय परंपरेत वर्णाश्रमपद्धतीची बदलती रूपे घेऊन; सांस्कृतिक प्रवाह ग्राम, नगरे, राजधान्या, राष्ट्र, देश, विश्व यांतील व्यष्टी ते समष्टीसंदर्भाने आपापल्या भूमिका कर्तव्यकर्म म्हणून वठविल्या जात आहे.

वंश ह्या संकल्पनेत वंशवृक्ष मांडून थेट शेवटच्या पिढीतील पुरुषप्रधानतेने किंवा स्त्रीप्रधानतेने वंशवैशिष्ट्ये पाळत जीवन कंठण्याचा आग्रह असतो. वंशामध्ये कुल आणि कुटुंब या संस्था समाविष्ट असतात. वंशपरंपरा स्थावर जंगम मालमत्ता, दैवतउपासना धर्मपरंपरा, स्वभाववैशिष्ट्ये यांसह विचारात

घेतल्या जातात. वंशाचा अन्य वंशांशी विवाह अर्थात जननप्रक्रियेसंबंधाने पिढ्यानुपिढ्या संबंध जोडलेले दिसतात. त्यातून सामाजिक स्तरावरील परंपरा स्थावर जंगमादी मालमत्ता ह्या सामाजिक आणि राजकीय, आर्थिक व न्याय व्यवहाराशी जोडलेल्या असतात. त्याचप्रमाणे कुटुंब व सामाजिक व्यवहार हा नातेसंबंधाने अर्थात सगे व सोयरे यांसह, जात, जमात, समाज धर्मपरंपरा यांना संबंधित सुरू असतो.

कुटुंबसंस्था ही संस्था केवळ आई, वडील व त्यांची मुले यांच्यापुरती मर्यादित राहात नाही. सर्व प्रकारच्या नातेसंबंधांनी आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शासकीय, न्याय, कृषीजीवन, औद्योगिक जीवन, दळणवळण, ग्राम, पंचक्रोशी शहरे, नगरे, प्रदेश, भाषा, देश, सांस्कृतिक राष्ट्र आणि वैश्विक मानवी जीवन, याबरोबरच सृष्टीतील चराचराशी असलेला माणसाचा संबंध, रंग, शारीरिक ठेवण, रक्तपरंपरा यांशी संबंधित व्यवहाराने मानव बंदिस्त झालेला असतो. कुटुंबसंस्थेचा सामाजिक व सांस्कृतिक, भाषिक तथा व्यावहारिक संबंध प्रामुख्याने मानवी जीवनातील, जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा, अन्न, वस्त्र, निवारा यांच्या परंपरा आणि कर्मपरंपरा यांच्याशी जोडलेला असतो. कुटुंबसंस्थेतील सूक्ष्मातिसूक्ष्म उद्दिष्टे पूर्ण करण्याची विशिष्ट अशी सामाजिक व धार्मिक परंपरा विशेषतः मात–पितृ नाती आणि दैवते यांशी जोडलेली असते. त्यामुळे कौटुंबिक जीवनातील प्रत्येक उद्दिष्टपूर्तीला उत्सवसंपन्नतेचे परिमाण मिळते. प्रत्येक उत्सव आनंदलक्ष्यी असला तरी; उद्दिष्ट गाठण्यासाठी शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि व्यावहारिक तथा धार्मिक परंपरागत प्रयास कर्तव्यकर्म म्हणून करावे लागतात. कौटुंबिक जीवन हे अशा परंपरागत, भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, राष्ट्रीय संस्कार, विधिविधाने, भूमिका संपादणे यासह प्रवाहित असते. या सर्व परंपरेत भौतिक, अधिभौतिक, आध्यात्मिक संघर्ष अर्थात प्रयास करीतच, अर्थात त्रितापावर मात करीत, उत्सव संपन्न करावयाचे असतात. एकूण कौटुंबिक जीवन धर्मकर्ममीमांसेसह कर्मपर झालेले असते.

कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या आनंदमग्नतेचा विचार करून; भारतीय परंपरेत उद्दिष्टानुवर्ती उत्सवांची मालिका निर्माण केली आहे. या मालिकेला संस्कार असे नाव दिले आहे. ही परंपरा श्रुती, स्मृति, पुराणे यांच्या आधारे पारंपरिक झाली आहे. गृहसंबंधी धर्मकर्मे संस्कार म्हणून ओळखली जातात. हे १६ संस्कार

परंपरागत स्वरूपात अवलंबिले जातात. षोडश संस्कारांची नावे स्वयंपुरोहित या कृ. म. बापटशास्त्री लिखित तथा संपादित ग्रंथात एका श्लोकाधारे दिली आहेत तो श्लोक असा-

**''गर्भाधानमतश्च पुंसवनकं सीमन्तजाताभिधे ।**
**नामाख्यं सह निष्क्रमेण च तथाऽन्नप्राशनं कर्म च ।।**
**चूडाख्यं व्रतबन्ध चतुर्वेदवतांना पुरः ।।**
**केशान्तः साविसर्गकः परिणयः स्याद् षोडशी कर्मणाम ।।१।।''**

हे सोळा संस्कार असे- १) गर्भाधान २) पुंसवन ३) सीमन्तोन्नयन ४) जातकर्म ५) नामकरण ६) निष्क्रमण ७) अन्नप्राशन ८) चुडाकर्म ९) उपनयन (१०, ११, १२, १३ हे संस्कार चतुर्वेदव्रत होत-) १०) महानम्नीव्रत ११) महाव्रत १२) उपनिषदव्रत १३) गोदानव्रत १४) केशांत १५) समावर्तन (सोडमुंज) १६) विवाह हे सर्व संस्कार करतांना १) होमहवन (स्थालीपाक) २) गणपतिपूजन ३) पुण्याहवाचन ४) मातृकापूजन ५) नांदीश्राद्ध आचार्यवरण हे विधी आरंभी करण्याची प्रथा आहे. उत्सवाची मांडणी आणि विधिविधाने परंपरेने आली आहेत. षोडश संस्कारापैकी प्रचलित संस्कार सामान्यतः अवलंबिले जातात. अन्य संस्कार स्वतंत्रपणे केले जात नाहीत. प्रचलित संस्कारांचे स्वरूप थोडक्यात असे-

**१) गर्भाधान (ऋतुशांती संस्कार) :-**

प्रजननप्रथेशी निगडित असा हा संस्कार असून; या संस्कारामुळे बीज आणि गर्भ संबंधातील दोष नाहिसे होतात, अशी भावना असते.

प्रथमरजोदर्शन झाल्यापासून (अलिकडील काळात विवाहोत्तर-पूर्वी रजोदशनापूर्वीच विवाह होत असत) ज्या १६ रात्रीस ऋतुकाल म्हणतात, त्या कालावधीत हा संस्कार केला जातो. त्यात पहिल्या चार, अकरा व तेरा या रात्री निषिद्ध होत. उर्वरित १० रात्री संभोगयोग्य मानल्या जातात. मुलगा होण्यासाठी समदिवशी व कन्या होण्यासाठी पाचव्या रात्रीपासून विषम रात्री उपयुक्त मानल्या जातात. साहित्य, पूर्वतयारी, विधीप्रारंभ, संकल्प, प्रधानाज्यहोम - त्याअंतर्गत विविध विधियोग्य आहुती दिल्या जातात. त्यात सहा आहुतिमंत्र विष्णूंसाठी तर एक आहुतिमंत्र प्रजापतींसाठी असतो. त्यानंतर मुर्धाभिमर्शनसूक्त म्हणण्याची प्रथा आहे. या सुक्तात ''ॐ अपना शोशुच दधमग्रे शुशुग्ध्यारियिं ।। अपनः शोसुचदधं'' अशा मंत्राने सुरुवात करतात. याप्रकारे सूक्त गायन झाल्यावर अखेरीस प्राग अंगुली

आणि खालचे अंगास तोंड केलेल्या अशा हाताने, स्त्रीच्या मस्तकास स्पर्श केला जातो. नंतर जप करण्याची प्रथा आहे. हा जपमंत्र असा, ''याः फनिलीरित्य स्वाथर्वणो भिषगोषध योगुष्टुपु जपे विनियोगः ।। ॐ या फलिनिर्य्याऽअपुत्याश्च्य पुष्पिणीः । बृहस्पतिप्रसूता स्तानो मूञ्चनवं हसः ।।१।।'' यानंतर अग्नीची प्रार्थना केली जाते. अश्वगंधा (किंवा दुर्वा) रससेचन मंत्र म्हणून नवऱ्याकडून डाव्या बाजूला बसलेल्या स्त्रीच्या उजव्या बाजूच्या नाकपुडीत अश्वगंधेचा किंवा दुर्वेचा रस पिळतात. तो रस पोटात गेल्यावर स्त्रीने आचमन करावे. सूर्यस्तुती करतात. त्यानंतर उपस्थस्पर्श मंत्र म्हणण्याची प्रथा वेदकालापासून आहे. प्रजननासाठी हा मंत्र महत्त्वाचा मानला जातो. ऋग्वेदाच्या १० मं.सू. क्र. १८४ मध्ये हा मंत्र आहे. परमात्म्याने स्त्री योनी सामर्थ्यसंपन्न करावी व तिचे ठायी गर्भधारणा करावी यासाठी हा मंत्र आहे. अग्नी उपस्थान मंत्र–

**वधेन दस्यूमितिषण्णां वसुश्रूतोग्निस्त्रिष्टुप । अग्नपस्थाने विनि.))**
**ॐ वधेन दस्यु प्रहिचा चय स्ववयः कृण्वानस्तन्येस्वायै ।।**
**पिपर्षित्सहसस्पुत्र देणन्सो अग्ने पाहि नृतम वाजे अस्मान् ।।**

त्या गर्भाची स्थापना व निकोप वृद्धी व जन्म यांसाठीच्या प्रार्थना या सुक्तात आहेत. या विधीनंतर समागम करण्याची परंपरा आहे. यांतील भावना थेट परमात्मा आणि परमात्मस्वरूप सृष्टीलीला यांशी भावनात्मकतेने जोडलेली आहे. अग्नीने पृथ्वी गर्भवती आहे किंवा इंद्राच्या योगाने अर्थात पर्जन्ययोगाने पृथ्वी गर्भवती आहे, वायुरूपाने दिशांचा गर्भ पृथ्वी धारण करते; अशा रितीने पंचतत्त्वात्मक गर्भधारणा होवो म्हणून समागम घडविणे अशी भावना आहे. मैथून विकारातील वासनात्मकतेला सच्चिदानंदरूपाच्या आविष्काराचे रूप देऊन गर्भाधान संस्कार उत्सव संपन्न होतो.

**२) पुंसवन संस्कार :–**

हा गर्भधारणेनंतर पुत्रप्राप्तीसाठीचा संस्कार होय. गर्भधारणेनंतर अपत्यप्राप्तीसाठी (पुत्र/पुत्री) हा संस्कार आयोजित केला जातो. गर्भ व्यक्त होताच, तिसऱ्या महिन्यात शुद्ध एकादशीपासून वद्य पंचमीपर्यंत रिक्ता तिथी सोडून, हा संस्कार शुक्र, सोम, बुध आणि गुरुवारी, अष्टमस्थानी कोणताही ग्रह नसता, पुंसवन संस्कार करावा. पुष्य किंवा श्रवण नक्षत्र, कर्क, मिथुन आणि कन्या या इतर लग्नांवर हा संस्कार करावा. या संस्कारात कुमारिकेने पाट्यावर वाटून,

स्वच्छ वस्त्रात बांधलेली, दुर्वांकुरांची पुरचुंडी (पोतांडी) फार महत्त्वाची, अति महत्त्वाची असते. बैलाचे कातडे पूजेत वापरण्याची प्रथा होती. अन्य विधीविधाने गर्भधारणेप्रमाणे असतात. संकल्प पूर्वांपार श्रुतीवाङ्मयातून पुढे परंपरेने आलेला आहे. त्याचा अर्थ स्वयंपुरोहित मध्ये दिला आहे– 'या माझ्या स्त्रीचे ठायी उत्पन्न होणाऱ्या अखिल गर्भाचा बीज आणि गर्भ यासंबंधी दोषपरिहारपूर्वक पुरुषदेवता ज्ञानाचा प्रकाश होण्यासाठी प्रतिबंधकाच्या निरसनाद्वारे पुंसवन, अनवलोभन आणि या माझ्या स्त्रीच्या ठायी गर्भाची वाढ होण्यास अटकाव करणाऱ्या, मांस आणि रक्त यांची आवड असणाऱ्या, राक्षसांच्या संघाचा नाशपूर्वक क्षेम आणि अखिल सौभाग्याचे आदिकरण, महालक्ष्मीचे प्रवेशद्वारे करून; प्रत्येक गर्भीत बीज आणि गर्भ या उभयतांपासून निर्माण होणाऱ्या पातकांचा परिहार करण्र्याचा, अतिशयद्वारे करून, स्त्रीसंस्काररूप सीमंतोन्नयन नामक संस्कार, असे तीनही संस्कार तंत्राने करितो. तदंगत्वाने स्वस्ति, पुण्याहवाचन, मातृकापूजन व नांदी श्राद्ध करतो. परंतु त्यांच्या पूर्वी निर्विघ्नतासिध्यर्थ गणपतीपूजन करतो.' या संकल्पाला जोडून 'अन्वधानं' संकल्प 'क्रियेमाणे पुंसवानानवलोभन सीमंतोन्नयन होमे देवतः परिग्रहार्थ – मन्वाधानं करिष्ये ।।' असा करावा. त्याचबरोबर 'प्रजापतिंचरुणा विर्धातारं द्वीरांकात्रिर्विष्णु प्रजापतिं चाज्येन ।।' अर्थात प्रजापतीला चरूने म्हणजे भाताने दोन वेळा, धास्याला दोन वेळा, विष्णुला, प्रजापतीला तुपाने दोन वेळा वेष्टित करून; 'प्रजापते निर्वपामि' म्हणून तांदूळ टाकून उत्तरपूजा करतात. पतीच्या उजव्या बाजूस पश्चिमेस मान व उत्तरेस लोम केलेले बैलाचे कातडे किंवा तांबडी बनात अंतरावी. त्यावर पत्नीने आचमनपूर्वक बसावे. तिच्या हातास स्पर्श करून, हवन करावे. हात धुवून स्त्रीने दोन्ही गुडघ्यात हातांची ओंजळ धरावी. त्यात दही ठेवून त्यात लिंगासारखे जव ठेवावे. त्याच्या शेजारी दोन उडीद ठेवावे व पत्नीस 'किं पिबसा?' अर्थात काय पितेस असे तीनदा विचारावे. तिने 'पुंकसन पिते' असे तीन वेळा सांगावे असे दोन वेळा करावे. अशी या विधीची परंपरा आहे. नंतर दुर्वांरस नाकपुडीत सोडण्याचा विधी होतो.

याप्रकारे गर्भशुद्धी आणि निकोप वाढ, यांसाठी विविध प्रकारे, हा संस्कार करण्याची लोकपरंपरा दिसते. अलिकडे आयुर्वेद किंवा ॲलोपॅथीच्या योगाने औषधे देऊन ही परंपरा पाळली जाते. अशी जननप्रक्रियेतील जन्मोत्सवाची सुरुवात होते. याप्रसंगी श्रुतिप्रणित 'प्रजावदाख्य सूक्त' आणि 'जीवपुत्राख्य सूक्त'

गायनाची परंपरा दिसते. 'प्रधानाज्य होम' अर्थात सीमंतोन्नयनसंस्कार करण्याची प्रथाही असते. अशाप्रकारे तीन मासांनंतर जीवनिश्चिती झाल्यावर डोहाळे संस्कार सुरू होतात.

**३) जातकर्म संस्कार :-**

गर्भासंबंधी मातापित्याकडून नकळत घडणारे दोष निवारण्यासाठी जातकर्म संस्कार केला जातो. पुत्रमुख पाहिल्याने पिता ऋणत्रयापासून मुक्त होतो. या संस्कारात पुत्रजन्म होताच (अपत्यजन्म होताच) पित्याने तोंड पाहावे व नंतर उत्तरेस तोंड करून, स्वच्छ वस्त्रे परिधान करून गंध लावावे. नंतर नालछेदनापूर्वी ज्यास सुईण वगैरे काम करणाऱ्या व्यक्तीशिवाय इतर कोणी स्पर्श केला नाही व आईचे दूधही जो प्याला नाही आणि ज्यास स्नान घातले आहे अशा पुत्रास अर्थात अपत्यास आईच्या मांडीवर पूर्वेस तोंड करून ठेवावे व नंतर संस्कार संपन्न करतांना देशकालोच्चार, संकल्प-दोषनिवारणार्थ, - अर्थात सर्व दोषांपासून मुक्त करून श्रीपरमेश्वराच्या प्रीतीकरिता जातकर्म संस्कार करतो असा संकल्प करावा. गणपतिपूजन इ. करून नंतर 'मधुसर्पि प्राशन' विधी करावा. अर्थात मध, घृत यांचे विषम प्रमाण घेऊन त्यात सुवर्ण उगाळून मधुसर्पि तयार करावी आणि 'हे प्रिय अपत्या (पुत्रा/पुत्री) तुला मध आणि घृत प्रथम पाजतो. विश्वोत्पादक परमेश्वराच्या दयेने तुला ज्ञान, धनधान्यसमृद्धी होऊन परमेश्वर तुझे सर्वकाळ रक्षण करो आणि तुला शंभर वर्षे आयुष्य लाभो' असा मंत्रोच्चार करावा. असे परोपरीने किमान तीन वेळा करावे. श्रुतिपरंपरेत या करिता तीन मंत्रांची योजना केली आहे. हे मधुसर्पि प्राशन केल्यानंतरच मातेचे स्तन्य द्यावे. संस्कारानंतर संकल्पपूर्तीचा आशीर्वाद द्यावा.

**४) नामकरण संस्कार :-**

पंचपल्लव (आंबा, उंबर, वड, पिंपळ आणि जांभूळ यांचे डहाळे बांधून पाळणा सजवावा.) पंचामृत (दूध, दही, तूप, मध व साखर यांचे मिश्रण) पंचरत्न (सुवर्ण, रौप्य (चांदी), मोती, राजवर्त (हलका हिरा), पोवळे) असे साहित्य विधीमध्ये स्पर्श करण्यासाठी वापरावे. ''ममास्य शिशोः बीजगर्भ समुभ्दवै नोनि बर्हणायुराभिवृद्धिव्यवहार सिद्धिद्वारा श्रीपरमेश्वर प्रीत्यर्थ नामकरण करिष्ये।'' ''तदंग तथा गणपतिपूजनपूर्वकं स्वस्ति पुण्याहवाचन मातृकापूजन नांदी श्राद्धं च करिष्ये ।।'' या मंत्राप्रमाणे विधी करून नंतर कास्याच्या ताटात तांदूळ पसरून

कुलदेवतेचे नाव लिहावे. नंतर विष्णूची बारा नावे घ्यावीत. नंतर ज्या नावाने नामसंस्कार करायचा ते नाव कानात सांगावे. वर्णव्यवस्थेप्रमाणे शर्म, वर्म, गुप्त, दास अशी उपाधी लावण्याची प्रथा आहे. उदा. अनिल शर्मा, अनिल वर्मा, अनिल गुप्त, अनिल दास.

**५) सूर्यावलोकन व निष्क्रमण संस्कार :–**

आयुष्याची व संपत्तीची वृद्धी होण्याकरिता हा संस्कार केला जातो. सर्व प्रकारच्या पूजाविधींप्रमाणे, पुण्याहवाचन, ग्रहपूजन, अग्निपूजन, सूर्यावलोकन, निष्क्रमण, उपवेशन असे विधी केले जातात. तिसऱ्या महिन्यात – जन्मदिवशी किंवा जन्मनक्षत्रावर हा विधी करावा. शिशूस अलंकृत करून सूर्यदर्शन करावे. नंतर चवथ्या महिन्यात शुभवेळी अग्नी, गाय, चंद्र यांचे दर्शन करावे. या विधींनंतर महामृत्युंजय मंत्रजाप करण्याची प्रथा आहे.

**६) अन्नप्राशन संस्कार :–**

गर्भातील अन्नप्राशन दोष नाहिसे होऊन अन्नग्रहणास सुरुवात करावी, यासाठीचा हा संस्कार करतात. याला परंपरेने उष्टावण असेही म्हणतात. मुलास सहाव्या किंवा आठव्या महिन्यात व मुलीला पाचव्या किंवा विषम महिन्यात हा संस्कार करवितात. पत्रिकेत लग्नी योग पाहून शुक्ल पक्षात हा विधी करतात. नित्याप्रकारे पूजाविधी संपन्न करून ‘हे अन्नपते ईश्वर! आम्हाला निरोगी व आरोग्यदायक, पराक्रम व पुष्टिदायक अन्न द्या!’ असे म्हणून सुवर्णयुक्त हाताने अन्नाचा पहिला घास भरवावा. याप्रसंगीही होमादी करण्याची प्रथा आहे. अन्नोदकसमृद्धीसाठी हा होम केला जातो.

**७) चौल (चूडाकर्म) संस्कार :**

जावळ संस्कार हा संस्कार तिसऱ्या वर्षांपासून करण्याची परंपरा आहे. बालकाचे बीज आणि गर्भ ह्यांपासून उत्पन्न झालेल्या पातकांचा नाश होऊन बल, आयुष्य व ओज वृद्धीसाठी हा संस्कार करतात. याप्रसंगी श्रुतीस्मृतिप्रमाणे प्रधानाज्य होम करण्याची प्रथा आहे.

श्रुती, स्मृति, पुराणे यात सांगितलेले असे सात संस्कार जन्मप्रथा म्हणून केले जातात. यात पुरुष आणि स्त्रीचा कौटुंबिक संबंध व जननप्रक्रिया यासंबंधी सुरक्षितता वा आनंददायकता यांसाठी हे उत्सव केले जातात. विविध जातीजमातींमध्ये हेच विधी वैविध्यपूर्णतेने केले जातात. मात्र या ना त्या प्रकारे

हे विधी होतातच. महाराष्ट्रात सत्यवाहीदेवी पूजन अर्थात 'सटवाई' देवी पूजन असा एक संस्कार जन्मानंतर पाचव्या दिवशी करण्याची परंपरा आहे. हे सर्व संस्कार मिळून मानवाचा जनोत्सव साजरा केला जातो. कुटुंबाशी संबंधित सर्व नातेगोते यात सहभागी होतात.

**८) उपनयन (मौंज) संस्कार :–**

उपनयन म्हणजे शिक्षक अथवा गुरुजवळ नेणे, अर्थात शाळेत घालणे. कोणीही माणूस जन्मतः केवळ माणूस असतो. द्विजपणा प्राप्त होण्यासाठी अर्थात ज्ञानात्मक दुसरा जन्म प्राप्त होण्यासाठी अर्थात ब्राह्मण अथवा ज्ञानी होण्यासाठीची प्रक्रिया सुरू करणे म्हणजे उपनयन करणे होय.

सामान्यतः आठव्या वर्षी दोन, पाच, सात, नऊ, अकरा या स्थानी गुरू असतांना लाभदायक नक्षत्रावर हा विधी करण्याची प्रथा आहे. अपत्याचे अर्थात पुरुष/स्त्री अपत्याचे उपनयन संस्कार करण्याचा अधिकार आईवडील वा तत्सम कोणीही योग्य व्यक्तीला असतो. पुण्याहवाचन, आहेर, देवकस्थान, आचार्यवरण, खालीपाक होम, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, मुसळदर्शन आदी विवाह विधीतील तसेच परंपरेने अनेक विधी या संस्कारात उपयोजित होतात. विद्यार्थ्याला ब्रह्मचारी वेश धारण करण्यासाठी कृष्णाजीन, यज्ञोपवित, पलाश दंड इत्यादी परंपरागत परिवेष आवश्यक मानला जातो. भिक्षा अर्थात मधुकरी मागण्याची वृत्ती स्वीकारण्यासाठी भीक्षावळ संस्कार केला जातो. याप्रसंगी गुरुगृही जाण्याचा विधी केला जातो. ज्ञानसाधनेसाठी संध्याव्रत शिकविले जाते. संध्याव्रत म्हणजे प्राणायाम, योगसाधना व नामस्मरण तसेच गात्रन्यास शिकविले जातात. त्यासाठी गायत्रीमंत्राची दीक्षा दिली जाते. या संस्कारांतर्गत महालक्ष्मीपूजा, वस्त्रधारणा, घटीस्थापन असे विविध विधी केले जातात. विविध सूक्ते शिकविणे, अजिनधारण, यज्ञोपवित मंत्र, आचमनादीविधी, विभूतीग्रहण, उपस्थान मंत्र, मेखलावंदन मंत्र, आचारबोध, विविध प्रकारचे होम, ५ वर्षानंतर महानान्मीव्रत, महाव्रत, उपनिषदव्रत, गोदानव्रत, ब्रह्मचारीलोप व्रत, केशांत संस्कार आदी गोष्टी गुरुगृही करून घेण्याची प्रथा होती. अलिकडील काळात विविध ज्ञानशाखांतर्गत थोड्याफार फरकाने अवधान केंद्रित करून; त्या-त्या ज्ञानशाखेचे शिक्षण पूर्ण करून घेतले जाते. उपनयन हा विधी पूर्णतः शिक्षणप्रक्रियेशी निगडित आहे. मौखिक परंपरा आणि प्रात्यक्षिक परंपरा यांसह सर्वज्ञानशाखांचे ज्ञान शक्यतो

एकाच गुरुकुलात करून घेण्याची परंपरा होती. अलिकडे विशेष शिक्षणासाठी विशेष कुलांत शिक्षण प्रशिक्षण घेतले जाते. मात्र माध्यमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत आजही, सामान्यतः सर्व ज्ञानशाखांचा परिचय करून देण्याची प्रथा आहे.

**९) समावर्तन संस्कार – सोडमुंज अथवा गृहस्थ होण्यासाठी तयारी करण्याचा संस्कार :–**

ब्रह्मचर्य धारण केलेल्या विद्यार्थ्याने गुरुगृहातून विद्यालयातून स्वगृही परत येणे यास समावर्तन किंवा सोडमुंज म्हणतात. सर्व संस्कारांसाठी सामान्य असे सर्व विधी करण्याची प्रथा आहे. याप्रसंगीचा संकल्प असा– 'मम गृहस्थाश्रमानंतर प्राप्तिद्वारा श्रीपरमेश्वरप्रित्यर्थ समावर्तनाख्यं कर्म करिष्ये ।। तदंगभूत गणपतिपूजनं, पुण्याहवाचनं मातृकापूजनं नांदीश्राद्धं च करिष्ये ।।' या संकल्पानुसार पूजनानंतर या संस्कारासाठीच्या प्रधानदेवतेचा उच्चार करून गृहस्थाश्रमाचा संकल्प करावा– 'क्रियाप्रमाणे समावर्तन होमे देवता परीग्रहार्थमन्वाधानं करिष्ये ।। अस्मिन्न न्वाहितेग्नो जातवेद समाग्नि मिध्ये न प्रजापतिं प्रजापतिंचाधार देवते आज्येनाग्नीषी मौचक्षुषी आज्येन ।। अत्र प्रधानं त्रिरग्नि पवमानं प्रजापतिं चैताः प्रधान देवता आज्येन अग्निमूर्ध्व समिधा विश्वान्देवान दश समिद्भिः शेषेण स्विष्टकृत ।।' नंतर परंपरेनुसार पुरोहिताकडून एकवीस दर्भाग्रांनी, बटू व आईच्या उजव्या बाजूस बसून; प्रधान होम करावा. नंतर ब्रह्मचर्यव्रत त्याग करण्यासाठी केशकर्तनादी विधी करावेत. वस्त्रधारण, काजळ, कुंडल, पुष्पमाला, जोडा, छत्र, दंड इ. वस्तू धारण करून सुवर्णमणी धारण करावा. समिधाधान, दशसमिधाधान या मंत्रोचाराने ब्रह्मचर्यव्रत्याग करावा. या सर्व विधींनंतर स्नातकाने गृहस्थपदवी धारण करून गृहस्थव्रत आचरणाचे नियम पाळण्यास सिद्ध व्हावे.

**१०) विवाह (लग्न) संस्कार :–**

देव आणि पितर यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी विवाह संस्कार करण्याची परंपरा आहे. मानवी प्रजनन या नैसर्गिक संस्काराला सर्वजनसुखाय विचार करून विवाह संस्काराची परंपरा मानवाने प्रस्थापित केली आहे. मैथून या मुलभूत विकारामुळे कामप्रवृत्ती सर्वांठायी असतेच. प्राणीजीवनात कळपात सबल नरच कामशमन करतो. दुर्बल नरांना तो माद्यांजवळ फिरकू देत नाही. मानवाने या प्रवृत्तीचा सर्वकल्याणात्मक विचार करून विवाह या उत्सवाची मांडणी केली आहे. नरदेहाला कामतृप्तीचा सहज आनंद मिळवून देऊन; सामाजिक स्थैर्य

प्रस्थापित केले आहे. परंपरेने वृत्ती, प्रवृत्ती, आहार, विहार यानुसार विवाह संस्कारांचे प्रकार केले आहेत. (१) बाह्य अर्थात वरास सालंकृत कन्यादान करणे. (२) दैव अर्थात यज्ञात ऋत्विजास कन्यादान करणे. (३) प्राजापत्य अर्थात केवळ धर्मसिद्धीप्रित्यर्थ कन्यादान करणे. (४) आसूर अर्थात वधूच्या बापास द्रव्यानी देणगी देऊन कन्या करून घेणे. (५) आर्ष अर्थात वधूच्या बापास गाई इ. देऊन कन्या वरणे. (६) गांधर्व अर्थात लग्न न लावता वधूशी संभोग करणे. (७) राक्षस अर्थात वधूच्या पित्याशी भांडण करून तिला पळवून नेणे हे वधूच्या संमतीने किंवा बळबजरीने दोन्ही प्रकार घडतात. (८) पैशाच अर्थात वधू निद्रिस्त अगर बेशुद्ध असतांना पळवून नेऊन तिच्याशी लग्न लावणे. या सर्व प्रकारात बाह्य हा प्रकार श्रेष्ठ आहे, असे स्वयंपुरोहित या ग्रंथात प्रकारांची माहिती देऊन नोंदविण्यात आले आहे.

विवाहासाठी जन्मटिपण, गोत्र, नाडी इ. पाहण्याची परंपरा आहे. लग्न घटितात ३६ गुण पाहावे लागतात. त्यातून १८ पेक्षा अधिक गुण जमले की मेलन जमले असे समजतात. घटित कसे पाहावे हे ज्योतिर्विज्ञानानुसार पंचांगाधारे निश्चित केले आहे. ऋषीपरंपरेने ह्या संदर्भात विशेष चिंतन केले आहे असे दिसते.

वाग्दान, वरप्रस्थान, मधुपर्क, कन्यादान, विवाहहोम, ऐरणीपूजन इ. विधीविधाने महत्त्वाची मानली जातात.

(१) वाग्दान अर्थात वधूवरांकडील परस्परांकडील संमती अर्थात सुपारी तथा गंधाक्षत. (२) सीमांतपूजन (३) तैलहरिद्रारोपण (४) विवाहपूर्वदिन कृत्य मंडपप्रतिष्ठा तथा देवप्रतिष्ठा. (५) वराचे वधुगृही गमन. (६) मधुपर्क (७) गौरीहारपूजन (८) अंतःपटधारण (९) लग्न लावण्याचे वेळी म्हणावयाचे सत्त्येनोक्तभित सूक्त (१०) मंगलाष्टके (११) परस्पर निरीक्षण (१२) लग्न लागल्यानंतर म्हणावयाचे ऋक्चवेवाक्यानी ब्राह्मण खंड (१३) कन्यादानप्रयोग अर्थात सुवर्णाभिषेक, सूत्रवेष्ठन, कंकणबंधन, अक्षतारोपण, तिलक व पुष्पमाला अर्पण, मंगलसूत्रबंधन, वस्त्रग्रंथीबंधन. (१४) विवाहहोम अर्थात सप्तपदी, लाजाहोम (१५) गृहप्रवेशनीय होम (१६) वधूवरव्रत (१७) विवाह चतुर्थदिनकृत्य ऐरणीदान साडे अर्थात तांबूल इ. (१८) वधूसह गृहप्रवेश अर्थात लक्ष्मीपूजन (१९) देवकोत्थापन व मंडपोद्वासन अर्थात देवक उठविण्याचा विधी असे विधी केले जातात. सर्वत्र सर्वसाधारणपणे असे विधी करतांनाची विधीविधाने अर्थात

साहित्य, मांडणी आणि मंत्रोच्चार अर्थात भाषिक विधाने परंपरेने पाहावयास मिळतात. हे विधी करतांना महत्त्वाचे उपसंस्कार म्हणजे (१) साक्षगंध (२) साखरपुडा (३) कन्यापूजन (४) शालमुदी अर्थात मुलीस शाल-दुशाला आणि अंगठी देणे (५) वरपूजन व शालमुदी (६) गणयाग अर्थात कार्यमुहूर्त (७) तैलहरिद्रारोपणविधी अर्थात हळद (८) गडगनेर - अर्थात विवाहपूर्वदिन विधी गृह्यज्ञ ग्रहमक (९) मंडपदेवताप्रतिष्ठा (१०) मंडपदेवता स्थापना (११) शाखास्थापन - मेढ रोवणे (१२) कलशस्थापनप्रयोग (१३) मुहूर्तघटिका स्थापना करून; उपरोक्त विधीविधाने केली जातात व कन्यादान विधी संपन्न करतात. याप्रसंगी सुवर्णाभिषेक विधी, सूत्रवेष्ठनविधी, कंकण बंधन, अक्षतारोपण अशा परंपराही दिसतात. अखेरीस प्रतिचेति ब्राह्मणखंड वेदोक्त म्हणण्याची प्रथा आहे. 'ॐ प्रेतिचेतिचेत्ये तद्वै सर्व स्वस्त्ययनं यत्प्रेति चेति तद्योस्य प्रियः स्यात्तमे तेनानु मंत्र येतप्रति चेति चेति स्वस्त्यवेगच्छति स्वस्ति पुनरागच्छति ।।' हा मंत्र तीन वेळा म्हणतात. याचा अर्थ आमच्या गोत्रात अर्थात कुळात, प्रत्येक सहा-सहा महिन्यांनी असे शुभप्रसंग येवोत, असे यजमानाने म्हणावे. सर्व मानवमात्रांच्या समाजात विवाहविधीला सर्वाधिक महत्त्व सामाजिक व राष्ट्रीय स्तरावर दिलेले असून, कुलसुफलीकरणाचा अर्थात प्रजापतींनी कर्तव्यकर्म म्हणून हा उत्सव करावयाचा असतो.

**११) अंत्येष्टी विधी :-**

अंत्य होम असा अंत्येष्टी शब्दाचा अर्थ आहे. याला लोकभाषेत मयतविधी, मर्तिक, उत्तरविधी/क्रिया अशी नावे आहेत. मोक्ष अर्थात जीवदशा किंवा वासनाबद्धदशा यांपासून मुक्तता होऊन सच्चिदानंदस्वरूप होणे होय. अंत्य होम संस्काराने देह विसर्जित होऊन जीवात्म्याचे परमात्म्याशी तादात्म्य होते. केवळ आनंदस्थिती प्राप्त होते. जीवनाचे हेच अंतिम लक्ष्य असते. निस्सीम भक्तीने, कर्तव्यतत्पर निष्काम कर्म केल्याने, योगसाधनेने हे लक्ष्य देही असूनही गाठता येते. मानवी मनाने द्रष्टेपणाने सर्वसामान्य प्रापंचिकाला या संस्काराच्या आधारे हे लक्ष्य गाठण्याचे साफल्य प्राप्त करून दिले आहे.

अंत्येष्टीमध्ये चार संस्कार समाविष्ट असतात- १) प्रायश्चित्त २) दहन ३) श्राद्धे व ४) दाने.

जीव गेलेला अर्थात जीवात्म्यातील किंवा देहातील चैतन्य गेल्यावर पार्थिव

शरीर राहते, असे असले तरी जीवात्माही देहासोबत वासनालिप्त असतो; हे मनोस्वरूपाने संवेदित होते. देहातील चैतन्यतत्त्वाचे चैतन्य, मनोस्वरूपामुळे संवेदित होते. जीवात्म्याचे वासनामुक्त झाल्याशिवाय आत्मा म्हणून मनोस्वरूप प्रकटत नाही. वासनायुक्त जीवात्मा पार्थिवात ये-जा करीत, त्याच्याभोवती किंवा त्याशी लिप्त होऊन; पृथक अस्तित्वाने असतो. हे मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासून अनुभूत होत गेले आहे. यामुळे प्रेतावर यज्ञ किंवा होम संस्कार करून जीवात्म्याची मोक्ष वाट सुलभ करण्याचा संस्कार अंत्येष्टीने साधता येतो. अंत्येष्टी संस्कार पूर्ण होईपर्यंत प्रेतात्मा भटकत राहतो व त्याचे अधरआत्म्यातही रूपांतर होण्याची शक्यता असते. यालाच पिशाच्च असे म्हणतात. असे पिशाच्च वासनापूर्तीनंतर नष्ट होते व ते मुक्त आत्म्यात रूपांतरित होते. हे सत्वर घडविण्यासाठी जन्माला आलेल्या माणसावर हा अखेरचा संस्कार करावयाचा असतो.

जन्माला येतांना आई आणि पिता यांच्या संचितासह वासनादेहात लिप्त झालेला आत्मा, जीवात्मा म्हणून वावरू लागतो. देहविकसनाबरोबरच जीवात्म्याचे वासनालिप्तपणे विकसन घडते. त्याचे मूळ आत्मस्वरूप किंवा स्वसंवेद्य मनोस्वरूप जीव अर्थात वासनादेहाच्या ठिकाणी जीवात्मास्वरूप अर्थात वासनालिप्त स्वरूप होते. जीवाच्या वर्धनाबरोबरच समूहजीवनातील वासनांनी ते जीवनमुक्ततेला पारखे होते. त्यामुळे जीवात्मस्वरूप त्रितापाने बद्ध असे जगू लागते. या कारणानेच जीवन दुःखमय वाटू लागते. वर्धनातील लहान-लहान उद्दिष्टे पूर्ण करीत आनंदलक्ष्यी होऊन; धडपडू लागते. याच जीवनात परिपूर्ण आनंद उपभोगता यावा यासाठी द्रष्ट्या ऋषींनी भक्तियोग, कर्मयोग, ज्ञानयोग, सन्यासयोग असे मार्ग प्रचलित केले. देही असताना विदेही होण्याची शक्ती मनोस्वरूपाठायी आहे हे प्रात्यक्षिकासह सिद्ध केले. सामान्य प्रापंचिकाला हा जीवनमुक्त होण्याचा, अर्थात केवलआनंदप्राप्तीचा अर्थात परिपूर्ण उत्सवाचा अनुभव घेता येईलच असे नाही, हे लक्षात घेऊन जीवनाला उद्दिष्टानुव्रती करण्यासाठी संसारप्रपंच क्रीडा मांडून लहान-लहान उद्दिष्टांची मांडणी केली आहे. उद्दिष्टपूर्तीसाठी संघर्ष, उद्दिष्टपूर्तीचा आनंद या क्रमाने माणूस जीवनोत्सव पूर्ण करू लागतो. त्याची अखेर परिपूर्ती अंत्येष्टीने होते. सर्व प्रापंचिकांना अंतिम सत्याचे, जीवनमुक्ततेचे ज्ञान अर्थात जीवनविषयक वैराग्य ज्ञात होते. याकरिता अंत्येष्टी हा संस्कार जन्मोत्सवापेक्षाही महत्त्वाचा मानला गेला आहे.

प्रेतावर अंत्येष्टी करण्यासाठी वंशजाला, जवळच्या आप्ताला, मित्राला अथवा समाजधुरिणाला असे उपलब्धतेनुसार पुढे होऊन सिद्ध व्हावे लागते. स्वतः शुचिर्भूत होऊन प्रेताला अर्थात मृताच्या देहाला निर्जंतुक, शुद्ध, शुचिर्भूत करण्यासाठी विशिष्ट पदार्थांनी शुचिर्भूत करून स्नानादि विधी करवावे लागतात. पिंडवर्धन पिंडावरील अर्थात देहावरील केसांप्रमाणे वर्धित होत असते. त्यासाठी अन्नपिंड प्रदान करण्याची प्रथा आहे. निरनिराळ्या समाजात यासंबंधी निरनिराळ्या प्रथा आहेत.

भारतीय परंपरेत अग्नीदहन किंवा समाधिस्त अर्थात पुरणे अशा मान्य क्रिया आहेत. त्यानुसार अंत्येष्टी विधी करण्यात येतो. अग्नीदाह संस्कारात गृहअग्नीलोप प्रायश्चित्त, और्ध्वदैहिक क्रिया, आहुतिमंत्र, अग्निप्रज्ज्वलनमंत्र, घर फोडणे, तिलांजलीदान, पहिले दिवसाची प्रेतक्रिया, तिलातोयांजलीदान, विष्णूची प्रार्थना करणे. कारण विष्णू हा जीवात्मा स्थितीचा पालनकर्ता आहे. विष्णूप्रार्थना पुढीलप्रमाणे–

**‘अनाधिनिधनो देवः शंखचक्रगदाधरः ।**

**अक्षय्यः पुंडरीकाक्षः प्रेतमोक्षप्रदोस्तु वै ।।’**

ह्या मंत्रोच्चाराने प्रेतास मोक्ष मिळतो असे समजतात. नंतर विसर्जन, नवश्राद्धे, नग्नप्रच्छादन श्राद्ध, पाथेयश्राद्ध, अस्थिसंचयन श्राद्ध पहिल्या दिवशी केली जातात.

दुसऱ्या दिवसापासून पिंडदान व अवयव श्राद्धे केली जातात. दहाव्या दिवसापर्यंतचे विधी असतात. यासाठी दहा मंत्रोच्चार दिले आहेत. हे सर्व मंत्रोच्चार विविध अवयवांच्या शांतीकरिता असतात.

दहावे दिवशी– काकबळी देण्याची प्रथा असून, उपरोक्त सर्व श्राद्धे या एकाच दिवशीही करण्याची परंपरा आहे.

अकरावे दिवशी सुतकातून शुद्धीविधी केला जातो. त्यात वृषोत्सर्ग– आवडती जनावरे अर्पण करणे, एकोद्दिष्ट श्राद्ध एका पिंडाने श्राद्ध केले जाते. रुद्रगण श्राद्ध शिवलोक मिळविण्यासाठी केले जाते, वसुगण श्राद्ध वसुरूप अर्थात ग्रह, तारे, नक्षत्रे व पंचतत्त्वे स्वरूप प्राप्त होण्यासाठी करतात.

सोळा मासिक श्राद्धे करण्याची परंपरा आहे. दाने निरनिराळ्या प्रकारची असतात. लिप्तआत्म विरक्त व्हावा यासाठी ही दाने दिली जातात. दशदाने,

अष्टदाने, उपदाने, प्रायश्चित्त, पंचगोदाने, पददाने दिली जातात. थोडक्यात जीवात्म्याला आवडणाऱ्या प्रपंचातील सर्व वस्तुअन्नादी गोष्टी दान करावयाच्या.

बारावे दिवशी सपिंडीकरण श्राद्ध करतात. मृताच्या पूर्वजांना मृताचा पिंड समर्पित करून मोक्षाप्रत जाण्याची शृंखला पूर्ण करतात. त्यामुळे त्याला पितृलोक प्राप्त होतो. यात अर्घ्यसंयोजन – पूर्वजांसाठी पात्रे मांडून विसर्जन, पिंडसंयोजन – पिंडभाग विसर्जन व पाथेय श्राद्ध मृत्यूलोकातून पितृलोकात जाण्यासाठी हे श्राद्ध केले जाते.

तेरावे दिवशी निधन शांती करून या निधनामुळे निर्माण झालेल्या सर्व दोषांचे, परिवारावरील अरिष्टांचे शमन केले जाते. यात तेरा श्रवणामन्न दाने, उदककुंभ श्राद्धे, मासिक श्राद्धे, प्रतिवासंगिक श्राद्धे, आत्मशुद्धी, द्रव्यशुद्धी, देवपितृपूजन, अग्नीकरण, देवपितृभोजन, पिंडदान, विकीरविधी अर्थात विखुरलेल्या भावाचे एकत्रीकरण, पितरांची प्रार्थना.

चवदाव्या दिवशी उदकशांती करून शुभ गोष्टींना सुरुवात करतात.

भाद्रपद वद्य पक्षात मरणतिथीस महायज्ञ श्राद्ध (पक्ष) घालण्याची प्रथा आहे. तीर्थश्राद्ध – तीर्थाचे ठिकाणी श्राद्ध.

अक्षय्यतृतीयेला कुंभश्राद्ध करावे.

अशा प्रकारे अंत्येष्टीमध्ये १) प्रायश्चित्त २) दहन ३) श्राद्धे ४) दाने असे चार संस्कार केले जातात.

मानवी व्यक्ती एकटी कधीच नसते. जन्माला येते, त्या क्षणापासून व्यक्तीचा प्रवास व्यक्तिगत आणि समूहगत अशा दोन्ही स्तरावर सुरू होतो. व्यक्ती मातापित्याचे संचित घेऊन प्रकटते आणि जन्माला येताच सगेसोयऱ्यांच्या नात्यात प्रसिद्ध होते. त्यामुळे त्या व्यक्तीची जीवनउद्दिष्टे आणि जीवनकर्मे त्या समूहाशी अनुबंधित होतात. जगण्यातील आनंद अनुभवतांना, ज्या उद्दिष्टानुवर्ती आनंदानुभव घ्यावयाचा तो व्यक्तिगत पातळीवर समूहानुबंधित असाच असतो. बद्धजीवनातील वाट्यास येणारी सारणी ही बद्ध असते. मनाची आणि जनाची बद्धता घेऊनच, आनंदलक्ष्यीपणाने जगावयाचे असते. आनंद मिळविण्यासाठी अखंड धडपड अर्थात संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष व्यक्ती, कुटुंब आणि सामाजिक पातळीवर त्रिविध स्वरूपाचा असतो. मात्र त्या त्रिविध प्रकारच्या संघर्षमय जीवनावर मात करीत; मनोस्वरूप होऊन; अर्थात ज्ञानात्मकतेने जगण्याचा पुरुषार्थ करावयाचा

असतो. असे करणे वासनाबद्ध देहाला अवघड असले तरी; अशक्य नसते. अवघड मानून हतबल झाले तर संसारप्रपंच दुःखकारक आहे, निरर्थक आहे असे वाटू लागते. आपणही सोऽहम आहोत अर्थात ब्रह्म आहोत, असे मनोस्वरूपाला जाणवले की त्रिविध संघर्षात्मक जीवनही, अंतिम ध्येयाचा अर्थात सच्चिदानंदाचा ठायीच अनुभव घेऊ लागते. जीवनच उत्सव होते!

व्यक्तीच्या वाट्याला समूह आणि सृष्टी अनुबंधाने त्रिविध प्रकारे संघर्ष करीत, सच्चिदानंदस्वरूप हे अंतिम ध्येय गाठायचे असते. या त्रिविध संघर्षाचे वर्णन पूर्वसूरींनी त्रिताप स्वरूपात केले आहे. हे त्रिताप म्हणजे (१) आध्यात्मिक ताप (२) आधिभौतिक ताप (३) आधिदैविक ताप होत. त्या त्रितापांचे वर्णन तथा उकल संत समर्थ रामदासांनी 'दासबोध' ग्रंथात पुढील प्रमाणे केली आहे–

सांख्य दर्शनामध्ये मानवी जीवनातील दुःखाचे अर्थात संघर्षाचे तीन भेद केले आहेत. वेदान्ताने हे भेद मान्य करून मांडणी केली आहे. (१) बाह्य विश्वातील वस्तूंचा माणसाच्या इंद्रियांशी संयोग होऊन जी दुःखे भोगावी लागतात; ती आधिभौतिक दुःखे होत. (२) बाह्य संयोगावाचून उद्‌भवणाऱ्या दुःखांना आध्यात्मिक म्हणतात. आणि (३) देवतांच्या कोपाने भोगाव्या लागणाऱ्या दुःखांना आधिदैविक असे नाव आहे. प्रा. के. वि. बेलसरे आपल्या विवेचनात लिहितात. यांतील मर्म असे की, 'पिंड आणि परिस्थिती यांच्या परस्पर क्रियाप्रतिक्रियांनी जीवन चालते. आईच्या पोटात आल्यापासून, जीवाचा परिस्थितीशी संबंध येतो. देह सुटेपर्यंत तो राहतो. पिंड व परिस्थिती यांच्या खेंचाखेंचीत पिंडावर जे प्रतिकूल आघात होतात त्यांना संत ताप असे म्हणतात. माणसाला त्याच्या जीवनात स्वतःच्या देहापासून ताप होतो, मनापासून ताप होतो, इतर प्राण्यांपासून व माणसांपासून ताप होतो. हवा, पाणी, वीज, अग्नी या नैसर्गिक शक्तींपासून ताप होतो. त्यांना तापत्रय म्हणतात. जन्मास आलेला कोणीही माणूस या तापत्रयांच्या कटाच्यांतून सुटलेला नाही. माणसाला दुःख नको असते तरी ते भोगावे लागते. ते किती प्रकारांनी भोगावे लागते याचे वर्णन श्री समर्थांनी (दशक तिसरा–समास ६,७,८) पुढील तीन समासांत केले आहे.'

**(१) आध्यात्मिक ताप :–** ''देह इंद्रिय आणी प्राण । यांचेनि योगें आपण । सुखदुःखे सिणे जाण । या नाव आध्यात्मिक ।।१३।। देहामधून जें आलें । इंद्रिये प्राणे दुःख जालें । तें आध्यात्मिक बोलिलें । तापत्रई ।।१४।। नाना व्याधी नाना

दुःखें । नाना भोग नाना खांडकें । प्राणी तळमळी शोकें । या नाव आध्यात्मिक ।।५४।। ऐसा आध्यात्मिक ताप । पूर्व पापांचा संताप । सांगतां सरेना अमूप । दुःखसागर ।।५५।।''

**(२) आधिभौतिक ताप :–** ''सर्व भूतांचेनि संयोगे । सुख दुःख उपजों लागे । ताप होतां मन भंगे । या नाव आदिभूतिक ।।१।। नाना कुवासें निर्बुजे । नाना अपमानें लाजे । नाना शोकें प्राणी झिजे । या नाव आदिभूतिक ।।८७।।''


**(३) आधिदैवित ताप :–** ''शुभाशुभ कर्मानें जना । देहांतीं येमयातना । स्वर्ग नर्क भोग नाना । या नाव आदिदैविक ।।२।। उठवेना बैसवेना । रडवेना पडवेना । यातनेवरी यातना । या नाव आदिदैविक ।।२५।। आक्रंदे रडे आणि फुंजे । धकाधकीनें निर्बुजे । झुर्झुरों पंजर होऊन झिजे । या नाव आदिदैविक ।।२६।। कर्कश वचनें कर्कश मार । यातनेचे नाना प्रकार । त्रास पावती दोषी नर । या नाव आदिदैविक ।।२७।।''

व्यक्तीला तीन प्रकाराने झुंज द्यावी लागते. ही झुंज सहज, सुलभतेने आणि आनंदलक्ष्यी पद्धतीने देता यावी याकरिता मानवी धुरिणांनी व्यक्तीवरील संस्कारांची मांडणी केली. त्याच्या जगण्याला आकार आणि पाठबळ दिले. संस्काराबरोबरच उद्दिष्टांची मालिका निर्माण झाली. त्रितापयुक्त सुखभोगांना आनंदाचे, यशस्वितेचे ध्येय मिळाले. निरर्थक जगणे वाटू नये तर सच्चिदानंदस्वरूप असे आपले अस्तित्व प्रकट करावयाचे असेल तर त्रिताप ही सृष्टस्वरूपाची क्रीडा आहे हे ओळखून ज्ञानात्मकतेने कर्तव्यतत्परतेने त्रिताप सोसून त्यावर मात करण्याचे बळ संस्कारांनी दिले. प्रत्येक दुःखभोगाला उत्सवमांडणीचे रूप मिळाले. क्रीडापटूच्या उत्साहाने त्रितापावर मात करण्याची शक्ती संस्कारांनी दिली. जीवनाचा उत्सव अनुभूत होऊ लागला. जीवनावरील अर्थात परब्रह्मस्वरूपावरील श्रद्धेने दुःखाचेही आनंदभोगात रूपांतर झाले.

अशा ज्ञानपूर्ण संस्कारित व्यक्तींचा समाज निर्माण झालेला असतो. व्यक्ती–कुटुंब–ज्ञाती–ज्ञातींचा एकत्रित ग्राम–पंचक्रोशी–प्रदेश–राष्ट्र–विश्व अशा चढत्या क्रमाने अवघा मानव एक स्वरूपात जीवनोत्सवातील क्रीडापटू झाला की हेच सच्चिदानंदस्वरूप विराटस्वरूपात भासमान होते. हे स्वरूप प्रकटण्यासाठी मानवाने सारणीस्वरूप जीवनपद्धतीचा उत्सव मांडला. व्यक्तीच्या त्रिताप भोगावर मात करण्याच्या कर्मसिद्धांताला उत्सवाचे परिमाण मिळते. याविषयी त्रिताप

अनुभूतीविषयक एक तक्ता गुरुप्रसाद या ग्रंथात श्री साई आध्यात्मिक समिती पुणे यांनी प्रसिद्ध केला आहे. दादा भागवतांच्या या ग्रंथातील हा तक्ता असा– कर्मसिद्धान्ताला गुरुकृपेने जीवनाची आनंदलक्ष्यी जीवनावस्था अर्थात विकसित अवस्था कशी प्राप्त होते हे स्पष्ट करतो.

**गुरुकृपाशिर्वादाद्वारे प्राप्त झालेली विकरित अवस्था**



त्रितापयुक्त व्यक्तिगत तथा समाजजीवनातील जीवन आनंदलक्ष्यी होऊन आनंदमग्नता भोगण्यासाठी अशा अवस्था आध्यात्ममार्गींनी सुचविल्या आहेत.

व्यक्ती, कुटुंब माध्यमातून जीवन व्यतीत करतांना, उत्सवांच्या मालिकातून सच्चिदानंदस्वरूपाचा अंतिम उत्सव अनुभवू शकतो.

## (६)

# सामाजिक व सांस्कृतिक उत्सव

स्वसंवेद्य आत्मरूपाला, 'एकोऽहं बहुस्याम् प्रजायेय' अशी भावना झाली. महत्तत्त्व व महाशक्ती स्वरूपात ते त्रिविधतेने अर्थात जन्म, जीवन आणि मृत्यू अर्थात विलय पुनर्जन्म या चक्रनेमीक्रमाने सृष्टीरूपात प्रकटले. ॐ या शब्दस्वरूपात, स्वसंवेद्य स्वरूप वायू अर्थात स्वर आणि गति प्रकटनासह भौतिक झाले. आनंदाचा अर्थात सच्चिदानंदस्वरूप परमात्म्याचा सृष्टी हा आनंदमग्न उत्सव होय. त्यातील आनंदाचे एक रूप म्हणजे मानव. त्याच्या ठायीही तेच आनंदस्वरूप आहे. तेही स्वसंवेद्य! त्यालाही बहुस्वरूप सहानुभूती आहे. मानव हा असा व्यक्ती आणि समाजही असतो. जन्मतःच माता-पित्याच्या वंशपरंपरेचे संचित घेऊन; समाज म्हणूनच माणसाचा जन्म होतो. एकटा वाटला तरी माणूस एकटा नसतोच. त्याच्या ठायी व्यक्तिमन आणि समाजमन दोहोंचे संवेदन असते.

समाजमनाने मानवमात्राच्या आणि जीवमात्राच्या तसेच वस्तुमात्राच्या कल्याणाचा विचार करून; जीवनव्यवहाराचा उत्सव संस्कृतिसारणीच्या रूपाने त्याने मांडला आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांचे संपादन करण्यासाठी, ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या चार आश्रमात जीवनप्रवास नियमित केला आहे. त्यातील व्यवहार, ब्राह्मण (ज्ञानात्मक), क्षत्रीय (संरक्षणात्मक), वैश्य (वस्तुव्यवहार व विनिमयात्मक) आणि शूद्र (आरोग्य, सेवा, शुद्धी सारणी) या चार मानवी मनोवस्थांमधून मांडला आहे. ऋषींच्या गुरुकुलांमधून या सर्व सारणी नियमाने न्यायात्मक शिक्षण प्रत्येक साधक माणसाला देण्याची प्रथा पाहावयास मिळते. राव आणि रंक, ब्रह्मज्ञ आणि सेवक या चारही अवस्था माणसाठायी या शिक्षण व्यवस्थेतून प्रकट होतात. कृष्ण-सुदामा व राम-धोबी यांच्या उदाहरणांमधून हेच स्पष्ट होते. पुराणांच्या

रूपाने प्रकटलेले सूत वाङ्मय या संस्कृतिसारणीची उदाहरणेच, ऐतिहासिक पाहाणीसह मांडते.

दैवते, विधिनाट्यात्मक कुळधर्मकुळाचार, क्षेत्रीय यात्रा-जत्रा, स्थानिक जत्रा-यात्रा, सणोत्सव, व्रतेवैकल्ये यांची परंपरा, धारणा, श्रद्धा समान असलेला मानवी समुदाय, समाज म्हणून ओळखला जातो. जात, पंथ, धर्म यानुसारही समाज ओळखला जातो. भाषा, प्रदेश यांनुसार तसेच राहणीमान, खाद्यसंस्कृती यांच्या साम्यावरूनही समाज ओळखला जातो. विशिष्ट जात, विशिष्ट ग्राम, विशिष्ट भूप्रदेश यांच्या साम्यानुसारही समाज ओळखला जातो.

प्रत्येक समाजातील धार्मिक श्रद्धा तथा धारणा, कुळधर्म, कुळाचार, संस्कार यांना अनुसरून नृत्य, नाट्य, वादन, चित्र, गोंदण आणि विशिष्ट पारंपरिक शृंगार साधने, भाषाव्यवहार, न्यायव्यवस्था, न्यायधारणा, विवाहप्रथा, खाद्यपरंपरा, गृहरचनापरंपरा, सणोत्सवप्रसंगीच्या उत्सवांची मांडणी, या व अशा गोष्टींना संस्कृती असे म्हटले जाते.

समाज आणि संस्कृती या गोष्टी वेगळ्या करता येत नाही. समाजाचे दृष्टरूप हे वर्तनपरंपरा, साधनपरंपरा आणि शाब्दपरंपरा यांतून प्रकट होते. समाज आणि संस्कृतीमध्ये लोकव्यवहार, कृषीजीवन, व्यापारउदीम, घरेदारे, संसारप्रपंचपरंपरा, धर्म व दैवते यांच्या धारणापरंपरा, आरोग्य, न्याय, संरक्षण यांच्या परंपरा, मनोरंजन, सभ्यवर्तनपद्धती यांच्या परंपरा, ह्या सामाजिक संस्कृती म्हणून ओळखल्या जातात. विशिष्ट भूप्रदेश, विशिष्ट राष्ट्र, विशिष्ट धर्म, विशिष्ट भाषा यांच्या नावानेही संस्कृती व समाज ओळखला जातो. समाज आणि सांस्कृतिक व्यवहार हा प्रामुख्याने मौखिक परंपरेने प्रकट होतो. राजव्यवहार, राजधर्म, राज्य किंवा राष्ट्रपरंपरा या सांस्कृतिक परंपरांचा अवलंब करीतच सामाजिक व सांस्कृतिक व्यवहार सुरू असतो.

**१) घरेदारे – वास्तुविशेष :-**

समाजामध्ये ऐतिहासिक परंपरांना खूप महत्त्व असते. ग्रामरचना, नगररचना, महानगररचना यांत वैयक्तिक, सामाजिक, शासकीय आणि धार्मिक तथा सांस्कृतिक वास्तु निर्माण झालेल्या असतात. यातील प्रत्येक वास्तुचे परंपरा आणि बदलती रूपे, बदलते संदर्भ यानुसार एक रचनारूप ठरते. त्या वास्तुला वास्तुशास्त्रीय तथा रचनाशास्त्रीय परंपरा सांभाळत पूर्ण करून; प्रचलित

करावयाचे असते. यात भूमिपूजन, पायाभरणी, प्रवेशद्वार मांडणी येथपासून परिपूर्णता; याचबरोबर अंगण, ओटे, परसद्वार, जलस्थान, मलविसर्जनस्थान, कोट किंवा कंपाऊंड बांधणी, सभोवार विशिष्ट प्रकारची झाडे इ. सर्व गोष्टींचा विचार करून मांडणी केलेली असते. प्रत्येक घटक मांडणीचा एक स्वतंत्र समारंभ किंवा उत्सव असतो. त्या उत्सवाची सामाजिक व धार्मिक मांडणी असते. त्यासाठी वर्तनपरंपरा, साधनपरंपरा, शाब्दपरंपरा यांसह विधिविधाने असतात. या सर्व वेळी उत्सव संपन्न करण्यासाठीची पराकाष्ठा, समायोजन, सामाजिक व सांस्कृतिक संबंधांचे पारंपरिक पालन या गोष्टींसाठी शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शासनप्रणित आदी स्तरांवर प्रयत्नांना एक उद्दिष्टपूर्तीची दिशा असते. त्या दिशेने प्रयत्न करतांना कष्ट, त्रास, वेदना अर्थात दुःख, दैन्य, दारिद्र्य सोसतांनाही विलक्षण संतोषाची अनुभूती येत असते. ती अनुभूती हीच नरदेहाचे व्यष्टी आणि समष्टीसह सार्थकतेची संवेदना देत असते. हाच जीवनातील आनंद, शाश्वत आनंदाकडे नेणारा प्रवास असतो. एकूणच ही संपूर्ण उभारणी आणि त्या उभारणीचा विनियोग हा उत्सव असतो. सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय पातळीवर, एखादा सेतू उभारावयाचा असला तरी हा अनुभव सामूहिक आनंदलक्ष्यी पद्धतीने मिळत असतो.

**२) कपडेलत्ते :–**

शिवणकाम, वीणकाम, भरतकाम, सौंदर्याकृतीचितारणी या गोष्टी करणारांचा एक व्यावसायिक वर्ग कौशल्य परंपरेने निर्माण झालेला असतो. त्या त्या पातळीवर ते ते कुशल कारागीर उदरनिर्वाह आणि कलाकौशल्यात्मक आनंद मिळवित असतात. त्याचबरोबर समाजाच्या स्तर आणि प्रतिष्ठांची उत्सवसापेक्षता जपत, सर्व समाजाला, आपला प्रतिष्ठाप्रदर्शन उत्सव आणि आरोग्यवर्धक सुरक्षितता प्रदान करीत असतात. यांत रंगारी आणि धोबी तथा परीट यांचा अंतर्भाव खूपच महत्त्वाचा असतो.

कपड्यांचे महत्त्व आणि वापर समूहमनाने सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक सापेक्षतेने, तसेच स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने पारंपरिक केलेले असते. अर्थातच बदलत्या संदर्भांनुसार, प्रतिष्ठा आणि भावना, वासना आणि सौंदर्यदृष्टी या दृष्टीने कपड्यांना आकार देऊन; उपयोजन करण्याचे आवाहित केलेले असते. जन्मोत्सव, विवाहोत्सव आणि उत्तरक्रियात्मक परंपरा यांच्या

संपनेसाठी विशिष्ट प्रकारे कपड्यांचा वापर व्यक्तीपासून समाजापर्यंत, सर्व मानव समूहमनाने करतात. कपड्यांच्या उपयोजनानेही तो तो उत्सव अनुभूत होतो. सामाजिक, शासकीय, धार्मिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय व्यवहारवर्तन प्रसंगीच्या, वस्त्रउपयोजन परंपरा निर्माण झालेल्या दिसतात.

वस्त्रांच्या साहचर्याने रंगरेखांचा उत्सव संपन्न केला जातो. एवढेच नव्हे तर नववस्त्रे, नाविन्यपूर्णवस्त्रे आणि भाववृत्तीनुसार वस्त्रे परिधान करणे हाही एक उत्सव म्हणूनच व्यक्ती, समूह, समाज यांच्याकडून अवलंबिला जातो.

विशिष्ट घटना, प्रसंग, समारंभ यांसाठी विशिष्ट वस्त्रे परिधान करणे हा त्या घटना, प्रसंग, समारंभ संपन्न करण्यासाठीचा मांडणीतील महत्त्वाचा घटक असतो. त्या त्या घटना, प्रसंग, समारंभप्रसंगी विशिष्ट आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राष्ट्रीय, मानसिक, शारीरिक स्तरावर, वस्त्रांना विशिष्ट परिमाण प्राप्त झालेले असते. भरताच्या नाट्यशास्त्रापासून वस्त्रविषयक विशिष्ट परिमाणे समूहमनमान्यतेच्यानुसार आलेली दिसतात.

विशिष्ट घटना, प्रसंग, समारंभ संपन्न करण्यासाठी पारंपरिक कलावंतही विशिष्ट प्रकारे वस्त्रे परिधान करून; त्या त्या घटना, प्रसंग, समारंभांना कलात्मक परिमाण देऊन; उत्सवसंपन्नतेतील आनंद शतगुणित करतात.

वस्त्रे हा मानवअर्जित असा भावनात्मक, सुरक्षात्मक, कलात्मक आणि सांस्कृतिक स्वरूपाचा घटक होय.

**३) सामाजिक न्याय :–**

ग्राम, नगर, राज्य, धार्मिक जीवन यांच्या सांस्कृतिक मांडणीमध्ये; एकप्रकारे ग्रामस्थ, नागरिक, प्रजा, धर्मानुयायी यांच्यासाठी समूहमनातून आचारसंहितेची परंपरा निर्माण झालेली असते. त्यांस अनुसरून न्यायासनाची मांडणीही पारंपरिक संकेतांसह सिद्ध झालेली असते. या आचारसंहितेनुसार वर्तनविषयक, साधनापरंपराविषयक आणि विधिविधानांविषयीचे पारंपरिक संकेत अथवा स्वयंशासनात्मक विधिनिषेधात्मक नियम, पारंपरिकतेने रूढ होतात. सामाजिक जीवनात, व्यक्तीचे जीवनवर्तन मोठ्या निष्ठेने, आत्मियतेने, प्रतिष्ठेने आनंदलक्ष्यी पद्धतीने, अर्थात उत्सवनिष्ठेने सुरू असते. त्या पारंपरिक पद्धतीने आपण सामाजिक व्यवहार केला की साफल्याचे समाधान लाभते. शिलंगणासारख्या सांस्कृतिक उत्सवात याचा विशेष अनुभव येतो. स्मृतिग्रंथांची सांप्रत काळी हेटाळणी होत

असली तरी; त्याच स्वरूपात राज्यघटना व कायदे, संकेत, विधिनिषेध नागरिक शास्त्र म्हणून शासनव्यवस्थेसह स्वीकृत झालेले असतात. या सर्व विधिनिषेधात्मक वर्तनसारणीचा सांस्कृतिक उत्सवसंपन्नतेत मोठा सहभाग व महत्त्व असते.

सामाजिक जीवनात ग्रामपातळीवर, नगरपातळीवर, प्रदेशपातळीवर अनेक प्रकारे, सामूहिक जीवनात, कुळधर्माप्रमाणे प्रथा, परंपरा, रूढी निर्माण झालेल्या असतात. त्यांची मांडणी जत्रायात्रा, व्रते, याग, नवरात्री महोत्सव, सप्ताह महोत्सव, जन्मोत्सव, तिथीउत्सव, वर्षभरात येणारे विविध सर्वव्यापी असे दिवाळी, दसरा, शिमगा यांसारखे सणोत्सव (विविध धर्म म्हणविणारे समूह, पंथ, संप्रदाय यांचे त्यांच्या परंपरांप्रमाणे सणोत्सव) याप्रमाणे सबंध वर्षभरासाठी सामूहिक जीवनाला सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक ध्येयांनी नियमित करून; समूहजीवन कृतार्थ करण्यासाठी उद्दिष्टानुवर्ती उत्सवांची मालिका निर्माण केली जाते. जीवनातील कृतार्थतेचा सात्त्विक आनंद व्यक्तिगत आणि समूहगत पातळीवरही लाभतो.

सामाजिक न्याय असे म्हणतांना, समाजजीवनातील विधिनिषेधात्मक वर्तनपरंपरा, या सर्वसमावेशक आणि सर्वकल्याणात्मक असाव्यात असे समूहमनाचे गृहितक असते. अनेकदा यामध्ये संघर्षात्मक समस्या निर्माण होतात. व्यक्तिगत किंवा सामूहिक पातळीवरही शोषणात्मक किंवा वासना, प्रवृत्ती यांतून निर्माण होणाऱ्या विकृतींच्या स्वरूपात वर्तन घडते. असे वर्तन व्यक्तिगत व सामूहिक पातळीवर सामाजिक स्वास्थ्य बिघडविणारे असते. अशावेळी सामाजिक न्यायव्यवस्थांची मांडणी, सर्वकल्याणात्मक न्याय प्रसृत करण्यासाठी उपयोगी पडते. भारतीय परंपरेमध्ये सनातनापासून विधिनिषेधात्मक, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय, धार्मिक नीतिनियमांनुसार पारंपरिक निकोप वर्तन व्यक्ती आणि समूहाकडूनही अपेक्षित असते. असे नियम हे सर्वथा ग्रंथनिविष्ट असतातच असे नाही. तसेच नियमांचा विचार सर्वकल्याणात्मकतेने आणि तारतम्याने करावा लागतो. यांसाठी सामंजस्य महत्त्वाचे असते. याकरिता न्यायव्यवस्थेत अनुभवी, वयोवृद्ध, तपोवृद्ध अशा ज्ञानी, समंजस व्यक्ती धुरिणात्मकतेने कार्यरत व्हाव्यात अशा प्रकारे न्यायासन निर्माण करण्याची प्रथा आहे. तटस्थतेने, साकल्याने आणि कल्याणात्मकतेने न्याय मिळावा यांसाठी, तटस्थ, निःस्पृह अशा व्यक्ती समाजधुरिणांकडून सूचित केल्या जातात. अशा व्यक्तींची परंपराही निर्माण झालेली असते. राजव्यवस्थेतदेखील अशा व्यक्ती नेमल्या जातात. एक, तीन, पाच, सात

अशा विषम संख्येने न्यायासन निवडले जाते. त्यांना परंपरेने पंच म्हणण्याची प्रथा असते. शक्यतो सामूहिक न्यायनिवाडा व्हावा यासाठी बहुमताची मान्यता स्वीकारली जाते. तरीही न्यायासनाचा एक सरपंच नेमून; त्याला विशेष अधिकार दिलेले असतात. न्यायासनासमोर, अव्यक्त परमेश्वराजवळ गाऱ्हाणे मांडावे; तसे स्त्री, पुरुष, कोणत्याही स्तरावरील व्यक्ती, यांना मोकळेपणाने मांडण्याचे स्वातंत्र्य असते.

भारतीय परंपरेत 'जात' किंवा 'ज्ञातपंचायत', 'गावपंचायत', 'राजपंचायत' अशा स्वरूपात न्यायासनाचे स्तर पाहावयास मिळतात. उदा. मढी येथील कानिफनाथांच्या पंधरा दिवसांच्या यात्रेत भटक्या विमुक्त ज्ञातींच्या स्वतंत्र 'जातीपंचायती' भरविलेल्या दिसतात. तेथे न्यायनिवाडे होतात.

न्यायासनासमोर जावेच लागू नये याप्रकारे व्यक्ती व समूहाचे सामाजिक व सांस्कृतिक वर्तन सर्वकल्याणात्मक आनंदलक्ष्यी पद्धतीने असावे असा प्रयत्न नैतिक पातळीवर असतो. अशाप्रकारे व्रतस्थतेने जगण्याचा पुरुषार्थ करणे म्हणजे जीवनोत्सव किंवा जीवनातील विशिष्ट गोष्टींची सफलतापूर्वक परिपूर्ती करणे होय अशी जीवनातील उद्दिष्टांची मांडणी असते. समग्रव्यवहार हा असा उत्सवसाधनेचा व्यवहार असतो.

**४) सामाजिक जीवनातील सणोत्सव व सामूहिक भक्तिपरंपरा :–**

**(i) यज्ञसंस्थांची मांडणी :–** १. ब्रह्मयज्ञ : प्राणायाम, गायत्रीमंत्र, संकल्प, प्रार्थना, अर्घ्यदान दिशावंदन इ. २. देवयज्ञ : अग्निहोत्र करणे. ३. पितृयज्ञ : श्राद्ध, तर्पण इ. ४. भूतयज्ञ : वैश्वदेव, आहुतीमंत्र, अन्नाचा भाग ठेवणे, नैवेद्यमंत्र इ. ५. अतिथीयज्ञाची संकल्पना : चित्राहुती, प्राणाहुती – भोजनपात्राभोवती पाणी फिरविणे.

**(ii) व्रते व सणोत्सव :–** १. वटसावित्री पूजा कल्पना २. मंगळागौरीपूजन ३. हरतालिका पूजन ४. श्रीमहालक्ष्मी व्रत ५. श्री गणेशोत्सव ६. ऋषिपंचमी उत्सवपूजा ७. सोळा सोमवार व्रतोत्सव ८. श्री सत्यनारायण पूजा ९. महादेव पूजा – शिवरात्री महोत्सव १०. श्रीकृष्ण जन्मोत्सव ११. गौरीपूजन महोत्सव १२. श्रीराम जन्मोत्सव १३. होलिकोत्सव १४. नवरात्री महोत्सव व विजयादशमी सीमोल्लंघन तथा शमीपूजन १५. दत्तजयंती महोत्सव १६. विविध प्रकारची नवरात्रे १७. दीपकोत्सव दिवाळी १८. गंगापूजन उत्सव १९. भूमिपूजनापासून

वास्तुशांतीपर्यंत वास्तुनिर्माणोत्सव २०. हनुमान जयंती व सूर्योपासना महोत्सव २१. अक्षय्यतृतीया पूजाविधी २२. रक्षाबंधन व नारळी पौर्णिमा.

**(iii) यात्रोत्सव/जत्रोत्सव :–** ग्रामदैवत, उपास्यदैवत, क्षेत्रदैवत, वैदिक तथा पौराणिक देवता, आर्षमहाकाव्यातील महान व्यक्तिमत्त्वे इ.च्या संबंधाने ठराविक तिथी किंवा ठराविक पवित्र पर्व – श्रावण, चैत्र, वैशाख, अधिमास इ. मध्ये परंपरेने यात्रा/जत्रा उत्सव भरविण्याची सामूहिक भक्तिपरंपरा दिसते. प्रत्येक यात्रेचे वैदिक, पौराणिक, स्थानमाहात्म्यविषयक, दैवतकथात्मक महत्त्व असते. त्या संबंधाने काही विधिविधाने कर्मकांड इ. असते. संबंधित समाज त्यात सहभागी होतो व परंपरेचे पालन करतो. ही सर्व दैवते व त्यांचे यात्रोत्सव जीवनधारणा करण्याचे कार्य करतात.

**(iv) यात्रोत्सवानिमित्ताने मिरवणुका, खेळ :–** लेझीम, दांडिया, काठ्या, टिपऱ्या, स्त्रीपुरुष नृत्यगीते परंपरा, वैशिष्ट्यपूर्ण नृत्याविष्कारात्मक पूजाविधी उदा. बोहाडा, खम, दंडार, कथक, कथाकली, मणिपुरी, भरतनाट्यम, गंमत–तमाशा, यक्षगान, दशावतारी खेळे इ. बोधनृत्ये असतात.

विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन उदा. बैलगाडा स्पर्धा (शंकरपट) झुंजी इ. कुस्त्या किंवा दंगल यांचे हगामे किंवा फड, काही वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धा उदा. गोफणगुंडा इ.

मानपान, पालख्या इ.च्या प्रथा परंपरा या निमित्ताने दिसतात. महाराष्ट्रात पंढरपूर व त्याशी निगडित आळंदी, पैठण यात्रा यांची परंपरा मोठी आहे.

**(v) तीर्थयात्रा :–** भारतीय परंपरेमध्ये तीर्थयात्रांना मोठे महत्त्व आहे. काशीयात्रा, प्रयागयात्रा, चारधाम–बद्रीकेदार, द्वारका, रामेश्वर, भुवनेश्वर रथयात्रा, गिरीबालाजी, बाराज्योतिर्लिंगे, गंगायमुनासरस्वती, नर्मदा, गोदावरी, कृष्णा, सिंधू सप्तसरिता स्नान यात्रा, अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार), काशी, कांची अवंतिका, द्वारिका अशा सत्य पुरी (पवित्र शहरे) यांच्या यात्रा भारतीय समाजाची श्रद्धास्थाने झाली आहेत.

**५) सामाजिक व्यवहारपरंपरा :–**

आर्थिक आयव्यय व्यवहार, व्यापारउदीम आदी करण्यासाठी विशिष्ट सामाजिक, आर्थिक परंपरा पाहावयास मिळतात.

(i) बाजारहाट – भारतीय परंपरेत बाजारहाट परंपरा दिसते. आठवडी बाजार

असे त्यास म्हणतात.

(ii) जत्रा, यात्रा यांच्या पारंपरिक प्रतिवर्षी भरणाऱ्या उत्सवानिमित्त मोठ्या प्रमाणावर आयव्यय-व्यवहार सुरू असतो. उदा. मढी येथील पंधरा दिवस चालणारे भटक्या विमुक्त समुदायांचे व्यवहार.

(iii) जनावरांचे बाजार

(iv) कृषीमाल खरेदी-विक्रीसाठी भरणारे विशिष्ट मोठे किंवा आडतेबाजारासारखे बाजार. बाजार समित्यांचे बाजार (मार्केटयार्ड).

(v) मोठ्या नगर, शहरातील विविध बाजारपेठा.

(vi) विशिष्ट वस्तु विक्रयासाठी प्रसिद्ध वैशिष्ट्यपूर्ण बाजारपेठा उदा. वणी येथील पंधरा दिवसांच्या यात्रा प्रसंगी जादुटोणा, करणीकवटाळ, तांत्रिक विधिविधाने यांसाठी शाक्ततंत्र, नाथपरंपरा इ. पंथोपपंथांच्या तंत्रविधीसाठी उपयुक्त वस्तुंचा विक्रय होत असतो. इ.

**६) उदरनिर्वाह साधने आणि नोकरी व्यवसाय प्रतिष्ठा :-**

दैनंदिन मुलभूत गरजांमध्ये उदरनिर्वाहाचे साधन म्हणून नोकरी व्यवसाय व वृत्ती अवलंबिणे आवश्यक असते. यात प्रामुख्याने काही गट स्वतंत्रपणे विचारात घ्यावे लागतात. त्या त्या नोकरी-व्यवसाय वृत्तींतील समाजजीवनातील अनिवार्यता, सामाजिक प्रतिष्ठा व त्या क्षेत्रातील यशस्विता संपादण्यासाठीचा अभ्यास, संघर्ष, स्पर्धा यामुळे या सर्व गोष्टींना उत्सवांचे स्वरूप प्राप्त होते. नोकरी, व्यवसाय, वृत्ती अवलंबिण्याची अनिवार्यता लक्षात घेऊन; त्या त्या क्षेत्रात व्यक्ती व समाज यांच्या प्रतिष्ठा व सामाजिक संबंध सांभाळणे यासाठी, पोशाख, भाषिक व्यवहार, विधिनिषेध, अर्थव्यवहार, सांस्कृतिक व धार्मिक व्यवहार यांची नेमकी मांडणी अपेक्षित असते. ही मांडणी प्रतिष्ठेनुसार करून यशस्वी होणे यासाठी उत्सव साधावा लागतो. त्यासाठी त्या त्या क्षेत्रातील ज्ञानसाधना व त्यांचे नेमके उपयोजन साधावे लागते. उदा. विश्वकर्मा परंपरेतील, लोहार, सुतार, वास्तुबांधकाम कर्मचारी व व्यावसायिक इ. यांची वास्तुनिर्मितीतील धडपड ही उत्सव संपन्नतेतील धडपड असते, असेच उदाहरण सोनार, शिंपी, विणकर, कातारी, ओतारी, पटवारी, गोंदणकरी, नेपथ्यकार इ. लोकांची असते. नोकरी व्यवसाय वृत्तीमध्ये १) उपासक, पुरोहित यांचा वर्ग २) विविध अनुशासन संस्थांमध्ये नोकरी करणारे नोकरदार व विशिष्ट अधिकार पदांवरील लोक ३)

कारखाने, व्यापार यातील मालक, कामगार इ. ४) शिक्षण व न्याय संस्थांमधील लोक यांचा स्वतंत्रपणे विचार करावा लागतो. ५) मजूर, सेवक, इ. वर्ग, या सर्व क्षेत्रांतील लोकांचा एकूण सामाजिक व्यवहारात विशिष्ट प्रकारचा अनुबंध असतो. सामाजिक घटनेतील हे अनिवार्य घटक असतात. समाज आणि हे वर्ग परस्परावलंबित्वाने यशस्वी होण्यासाठीची मांडणी, आचारसंहिता, भाषिक व्यवहार व कर्तव्ये करून, एक प्रकारे सामाजिक उत्सव साधत असतात.

**७) जीवनानंद आणि प्रबोधन संदेश वाहक संस्थांचा सामाजिक उत्सवातील सहभाग :–**

**(i) खेळकरी** : नंदीबैलवाले, माकडवाले, सपेरे, जादुगार, डोंबारी, उंटवाले, कोल्हाटी, कठपुतली, बहुरुपी अशा संस्था आता नाहीशा होत चालल्या असल्या तरी; त्यांची जागा नव्या संस्था घेत आहेत. टीव्ही माध्यमातून काही संस्था पुढे येत आहेत. स्वतःच्या कलाकौशल्याचे प्रदर्शन करून स्वतःची क्षेत्रातील प्रतिष्ठा सांभाळण्यात आनंद मानणाऱ्या या संस्था सामाजिक जीवनात विरंगुळा देऊन, आनंद प्रस्तुती करतात. तसेच जत्रायात्रा या उत्सव प्रसंगात शोभा वाढविण्याचे काम करतात.

**(ii) संगीत–नृत्य–नाट्य–गायन मंडळ्या व शाहीर मंडळ्या** :

**(१) सुगम संगीत, शास्त्रीय संगीत यांसारख्या गायन करणाऱ्या मंडळ्या** : त्याचबरोबर शास्त्रीय नृत्याचे कार्यक्रम करणाऱ्या मंडळ्या यांत कथ्थक, कथाकली, भरतनाट्यम, कुचिपुडी इ. प्रकारातील नर्तन करणाऱ्या मंडळ्या वाद्यपारंगत अशा वाघांच्या जुगलबंदी करणाऱ्या मंडळ्या या सभा, संमेलने, उत्सव इ.चे वैभव असते. सामाजिक व सांस्कृतिक उत्सवांत या मंडळ्या भर घालतात.

**(२) विशिष्ट लोकगायन परंपरा** : यांत उदा. पांडवानी, रामलीला, कृष्णलीला, विधिनाट्यातील खेळ करणारे जागरण, गोंधळ, यक्षगान, दशावतारी इ. प्रकार येतात. मनोरंजन आध्यात्मिक प्रबोधन तसेच कुळधर्म कुळाचार संपन्नता इ. गोष्टीमध्ये या परंपरा विशेषत्वाने सहभागी होतात.

**(३) भजनमंडळ्या** : रंजन, भक्ती आणि उत्सवसंपन्नता साधणाऱ्या या मंडळ्या स्वतःबरोबर समाजजीवनात सात्त्विक समाधान साधतात.

**(४) शाहीर मंडळ्या** : कलगीतुरेवाले व विविध दैवत गान परंपरेतील पुराणगायक, ऐतिहासिक पोवाडे, भारूडे इ. सह प्रबोधक व अध्यात्मनिवेदनात्मक

कार्यक्रम करणाऱ्या मंडळ्या. लोकरंजन, प्रबोधन व प्रासंगिक उत्सव संपन्न करण्यासाठी सरसावतात. मध्ययुगात शाहिरांची परंपरा दिसते. प्रसिद्धी व प्रबोधन करण्यासाठी शासकीय व खाजगी संस्था यांचे उपयोजन करतांना दिसतात. शाहीर, स्वप्रतिष्ठा, यशस्विता आणि क्षेत्रातील अनिवार्यता मांडण्याचा उत्सव करतात. आपल्याबरोबर समाजजीवनाचे भरणपोषण करण्यात सहभागी होतात.

**(५)** कीर्तनकारांचा मोठा वर्ग सांप्रदायिक आध्यात्मिक जीवनात सर्वदूर पाहावयास मिळतो. भक्तिसूत्रांनुसार कीर्तन हा एक भक्तिसाधनेतील प्रकार आहे. सामाजिक व सामूहिक अध्यात्म जागरण करणारा हा वर्ग समाजाला सनातनाचा आणि इतिहासाचा आधार देऊन, चिरंतनाचे सात्त्विक कवच कीर्तनकार देतात. सांप्रदायिक पातळीवर विचार करता नारदीय परंपरा, यात प्रामुख्याने दिसत असली, तरी संप्रदायानुसार कीर्तनप्रयोग वेगवेगळ्या प्रायोगिक मांडणी आणि संगीतपरेपरेने सिद्ध होताना दिसतात. नारदीय कीर्तन, वारकरी कीर्तन, रामदासी कीर्तन, चटई कीर्तन यांसह राष्ट्रीय कीर्तन मांडणाऱ्या परंपरा महाराष्ट्रात दिसतात. आख्यान सादर करीत अध्यात्माचे जागरण व प्रबोधन करीत, समाजाला दिशा देण्याचे कार्य करीत, मनोरंजनात्मकतेने सामाजिक सात्त्विकतेचे जागरण करीत, भक्तिमय वातावरण निर्माण करतात.

**(६) व्याख्याते, कथाकार, प्रवचनकार, सत्संग करणारांचा वर्ग** : व्याख्यानमाला, प्रवचनमाला, सत्संगमाला हा सामाजिक आध्यात्मिक उत्सवांचा भाग झालेला असतो. यात कथाकारांचा फार मोठा वर्ग कथाज्ञानयज्ञाचे सप्ताह संपन्न करीत प्राचीन ग्रंथांतील कथा निवेदनाधारे सामाजिक व आध्यात्मिक प्रबोधनासह मानवी जीवनात श्रद्धा जोपासण्याचे कार्य करून मानवी वर्तनाला कर्तव्यतत्परतेची बैठक प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतात. स्वतःचे जीवन आध्यात्मिक स्तरावर उत्सवमय करीत, प्रबोधनाचे कार्य करणारी ही मंडळी, समाजाचे श्रद्धास्थान होतात. व्याख्यानमालांमधून समूहमनाला विशिष्ट दिशेने ज्ञानात्मकतेने वर्तनासाठी, अनुसरणासाठी प्रवृत्त करण्याचे कार्य ही मंडळी करतांना दिसतात.

**७) नाट्यपरंपरा** : कुटुंबापासून राष्ट्रापर्यंत, एवढेच नव्हे जाणिवांच्या संदर्भातही व्यक्तिमन आणि समूहमन किंवा सामाजिक मन हे परस्पर संबंध, अनुबंध यांसह बद्धतेत, सामाजिक विधिनिषेधात्मक भान ठेवून व्यवहार करत

असते. दैनंदिन बद्धवर्तनामुळे मनही बद्धतेनेच, भावनात्मक, चिंतनात्मक, संवेदनात्मक पातळीवर बाधित अवरुद्ध अशा स्वरूपात; सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि व्यक्तिगत कामजीवनसंदर्भातही, मनोगंडांनी जखडले जाते. आत्मतत्त्वाचा मुळातील मुक्त स्वभाव मनाच्या ठायी असावयास हवा. बद्धतेमुळे जीवनमुक्तता बाधित होते. यातून बाहेर काढून; अवरुद्ध भावनांचे ताटस्थ्यपूर्वक विरेचन, भावनांचे युक्त संवर्धन उदा. सामाजिक, कौटुंबिक व राष्ट्रीय कर्तव्यांच्या संबंधात, भावनांचा मुक्त आविष्कार घडविण्यासाठी स्वरसरंजनाची आवश्यकता असते. आत्माविष्कार हा मानवी मनाचा स्वभाव असतो. हा आत्माविष्कार स्वाभाविकपणे व्यक्तिगत आणि समूहगत पातळीवर घडण्यासाठी नृत्य, नाट्य, काव्य यांची जणू प्रतिसृष्टी निर्माण केली आहे. नृत्य, नाट्य, काव्य यांचे प्रयोग ही एकप्रकारे ताटस्थ्यपूर्वक घेता येईल अशी जीवनानुभूती असते. जीवनानुभूतींचे दर्शन घडले तरी; त्यापासून अलिप्तता असते. त्यामुळे स्वरसरंजन घडते. दैनंदिन जीवनाचा कलापूर्ण आविष्कार असे या प्रयोगांचे स्वरूप असते. त्याचा परिणाम म्हणून व्यक्तिगत आणि समूहगत जीवनाला सौंदर्यदृष्टीयुक्त कलात्मक आकार देता येणे शक्य होते. यामुळेच जीवन हा उत्सवस्वरूप भोगण्याचा विषय होतो! 'काव्य अगोदर झाले मग झाले जग सुंदर' ही उक्ती याच संदर्भाने सार्थ ठरते.

नाट्यपरंपरेत शाब्द सौंदर्यासह कल्पनाचमत्कृतीपूर्ण जीवनानुभूती घडते. आपसूकच भावनांचे विरेचन आणि संवर्धन प्रक्रिया घडते.

नृत्य, नाट्य, काव्य यांच्या परंपरा शाब्द आणि प्रयोगसिद्ध परंपरेने प्रकटतात. या प्रयोगांचे आयोजन हे केवळ मनोरंजनासाठी, विशिष्ट संस्कार व उत्सव प्रसंगी केले जाते. उदा. बारसे, विवाह, विशिष्ट यश संपादनाचा आनंदोत्सव साजरा करणे यासाठीही असे प्रयोग घडतात.

अतिप्राचीन काळापासून नृत्य, नाट्य, गायन, वादन, काव्यलेखन यांच्या परंपरा धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रांसाठी आणि कलासंवर्धनासाठी जोपासल्या गेल्या. गुरुशिष्य परंपरेने शिष्याने विशिष्ट नैपुण्य प्राप्त करण्यासाठी आणि नैपुण्यप्राप्तीची यशस्विता प्रदर्शित करण्यासाठीदेखील स्पर्धात्मक व स्वतंत्र उत्सवांचे आयोजन घडत आहे. या आयोजनातून लोककलांच्या परिष्करणातून अभिजात कलांच्या परंपरा निर्माण झाल्या आहेत.

नृत्य, नाट्य, गायन, वादन, काव्य या कलांनी अवघे जीवन व्याप्त केले

आहे. त्यांच्या परंपरा भाषाश्रयाने सुरू असल्यामुळे भाषिक आविष्काराचेदेखील चमत्कृतीपूर्ण, भावाविष्कारात्मक कलास्वरूप निर्माण झाले आहे. कलाविष्कारांच्या स्वरूपात संपूर्ण सामाजिक आशय कसा आनंदानुभूतीपूर्णतेने भोगता येतो याविषयीचे उदाहरण म्हणजे भरतमुनींचे नाट्यशास्त्र ब्रह्मदेवाच्या आशीर्वादाने प्रकट झाले आहे अशी भावना स्वाभाविकपणे जोपासली गेली आहे, हे होय. भरताच्या नाट्यशास्त्रातील रससिद्धांत सर्व कलांमध्ये स्वीकृत झालेला पाहावयास मिळतो. कलाविष्कार हा जीवनोत्सवाचे अविभाज्य अंग बनला आहे असे दिसते.

धार्मिक आणि आध्यात्मिक स्तरावर कुळधर्मकुळाचाराच्या स्वरूपात आणि सामाजिक स्तरावर सामूहिक भावना परिपोषित करणाऱ्या उत्सवांच्या निमित्ताने नाट्यपरंपरा विधिनाट्यांच्या स्वरूपात अवतरली आहे याचा विचार यापूर्वी केला आहेच.

नाट्यपरंपरेत खेळकऱ्यांचा समावेश करावा लागतो. जत्रायात्रा संपन्न करतांना हे खेळकरी जत्रायात्रांची रंजनात्मकतेने शोभा वाढवितात. गारुडी, वाघवाले, उंटवाले, अस्वलवाले, सपेरे, कठपुतळीवाले, बहुरुपे यांच्याबरोबरच ठिकठिकाणच्या हौशी गंमत/तमाशा मंडळ्या, दशावतारी, रामलीलावाले आपल्या नाट्याभिनयाने रंजकता वाढवतात.

**८) चित्रकला, गोंदणकला, शिल्पकला, कशिदा, लाकूड कलाकुसर – यांच्या अनुषंगिक ज्ञाती :–** चित्रकलांनी सामाजिक जीवनाला अधिक आखीवरेखीव करीत, सौंदर्य बहाल केलेले आहे. चित्रकलेचा उपयोग प्रामुख्याने कपड्यावरील सौंदर्याकृती चितारण्यासाठी केलेला पाहावयास मिळतो. याच्या जोडीला कशिदा किंवा भरतकाम यांचा समावेश करता येईल. विणकऱ्यांना या दोन्ही कला सहाय्यभूत होतात. ठशांनी सौंदर्याकृती उमटविले जात. छापखान्यांची परंपरा निर्माण झाल्यापासून; छपाईमध्ये चित्रकलेचा मोठ्या प्रमाणावर वापर होताना दिसतो. भित्तीचित्रे, प्रत्यक्षचित्रे (पोर्ट्रेटस्), निसर्गचित्रे यांचा वापर वास्तुसजावटीसाठी केला जातो. वास्तुकलेत शिल्पकला आणि काष्ठशिल्पकला या दोहींचाही मोठ्या प्रमाणावर वापर होतो. राजवाडे, महाल, माड्या अलिकडील काळातील समारंभाचे हॉल, सभागृहे, घरातील दिवाणखाने, बैठकखोली यांची सजावट करतांना चित्र, शिल्प, कलाकुसर यांचा वापर केलेला दिसतो. त्या

सहाय्याने मानवाच्या मुलभूत गरजांपैकी निवारा ही गरज उत्सवाचे स्वरूप धारण करते. मठमंदिराची भव्यता आणि श्रद्धा जागृती यासाठी पौराणिक कथाप्रसंगाची शिल्पे आवर्जून रेखलेली दिसतात. याला कोणताही धर्म, पंथ अपवाद नाही. शामियाने, सभागृहे यांतील बैठकव्यवस्थेत कशिदाकाम केलेले गालिचे विशेष शोभा वाढवितात. वास्तुकलेतील कारंज्यांची बांधणी विशेष चैतन्य निर्माण करते. वास्तुकलेअंतर्गत प्रकाशयोजनांचे विविध प्रकार प्रकाशासह सौंदर्य बहाल करीत असतात. हंड्या, झुंबरे, दीपमाळा, लामणदिवे येथेपासून अगदी पणत्या लावण्यासाठी केलेल्या योजना, राऊळे, देऊळे, घरे, शामियाने, सभागृह यांची शोभा वाढवून उपभोक्त्यांचा आनंद शतगुणित करतातच, त्याचबरोबर विशिष्ट कार्यक्रम उत्सव स्वरूपात, संपन्न करण्यासाठी सहाय्यभूत होतात. समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचे चित्र उत्सव संपन्नतेने प्रदर्शित करतात.

गोंदण कला ही अतिप्राचीन अशी कला, आधुनिक काळातही लोकप्रिय झाली आहे. भावना, श्रद्धा, नातेसंबंधस्मृती आणि शारीर सौंदर्य अधिक दिमाखदारपणे आणि आकर्षकपणे प्रदर्शित करण्याचे कार्य गोंदण कला करते. अवघ्या जीवनभर ही कला भावनांचे भरणपोषण करीत जीवनाला अर्थ भरते. अनेकदा गोंदणकला कुसरपूर्णतेने शरीरावरील कपड्यांचा आभास निर्माण करण्यातही मदत करते. गोंदण कलेबरोबर मेहंदी रेखाटनकला ही विशेषतः स्त्रीप्रधान उत्सवांना अधिक संपन्न करते. लग्नकार्ये यामध्ये भाववृत्ती तयार करणे जोपासणे यासाठी तर मेहंदी अधिक रंगत भरते.

या सर्व कलांना मानवी जीवनात मनोवृत्ती प्रफुल्लित करण्यासाठी, तसेच श्रद्धा आणि प्रसंगौचित्यानुसार भावनिक पर्यावरण तयार करण्यासाठी विशेष महत्त्व, अनादिकालांपासून दिले गेले आहे.

शिल्पकलेचा प्रयोग जसा अश्मशिल्पे, काष्ठशिल्पे यादृष्टीने होतो, तसाच तो सुवर्णशिल्पे (दागिने) तसेच धातुशिल्पे, भांडीकुंडी यातही केलेला असतो. धातुशिल्पांमध्ये लोहधातूचा वापर प्रामुख्याने हत्यारे, वाहने इ. मध्ये केला जातो. येथेही लोहशिल्पे उपयुक्त ठरतात. जहाजांसारखी जलप्रवास वाहनेही लोहधातूने अधिक सुशोभित केली जातात. सुवर्णशिल्पांमध्ये गोठवणे अर्थात पटवणे म्हणजे धागा, तार वापरून सौंदर्यपूर्ण गुंफण करीत, दागिन्यातील भाळा तयार करण्यासाठी, मोतीकाम करण्यासाठी केला जातो. त्यामुळे सोनार, लोहार ह्या

स्वतंत्र विकसित अशा कौशल्याधिष्ठित ज्ञाती तयार झालेल्या दिसतात. शिरोभूषणे अर्थात मुगुट, पगड्या तयार करणे यांचाही समावेश यात करावा सागतो.

**केशरचना :–** केशकर्तन, केशरचना, केशगुंफण ही कलादेखील चित्र, शिल्प, कुसर, गोंदण कलेशी अनुबंधित अशी कला आहे. केशरचना मानवी मनोवृत्ती प्रफुल्लित करतेच त्याचबरोबर मुळातल्या शारीर सौंदर्यात भर घालते. विशिष्ट समारंभ, विशिष्ट सामूहिक वृत्ती, व्यवसाय कार्यालये यांचा परिचय आणि त्यांच्या आविष्कार संपन्नतेसाठीही केशरचनांची वैशिष्ट्यपूर्णता उपयुक्त असते. अलिकडील काळात स्त्री–पुरुषांसाठी ब्युटीपार्लर अर्थात सौंदर्यवर्धक केंद्र तयार झालेली दिसते. केशकर्तनासाठी विशिष्ट ज्ञाती परंपरेने प्रस्थापित असली तरी अनेक कलावंतांनी ही वृत्ती स्वीकारून व्यवसाय आरंभ केलेला दिसतो. सैनिकी क्षेत्रात, कार्यालयात विशिष्ट प्रकारे केशरचना असावी, तसेच विशिष्ट समारंभ, संगीत पंडित तथा गायक, नर्तक यांची विशिष्ट केशरचना अपेक्षित असते. अशा केशरचनांनी त्या–त्या क्षेत्राचे भावनिक तथा व्यावसायिक पर्यावरण, परिपोषित होऊन; जीवनानंद उपभोगण्यास मदत होते. नेपथ्यकारांचे एक स्वतंत्र स्थान नृत्य, नाट्य क्षेत्राबरोबरच लग्नसमारंभ व तत्सम उत्सवांमध्ये अलिकडे अधोरेखित झाले आहे. क्षेत्र, उत्सव आनंदमग्न करण्यासाठी या कलेचा नक्कीच उपयोग होतो.

**चर्मकला :–** चित्र, शिल्प, कुसर या कलांशी अनुबंधित अशी आणखी एक कला म्हणजे चर्मकला होय. मोट, चर्मवस्त्रे, पट्टे, तरवारींच्या मॅना, बुधल्या, पखाली, बैठका यात विशेष कलाकुसर करणारे चर्मकार मोठ्या प्रमाणावर पदवेश अर्थात बूट, चपला तयार करण्याचे काम करतात. यांत असंख्य प्रकारे स्थलकालपरिस्थिती आणि आवड व परंपरा यांनुसार पदवेश कलात्मकतेने निर्माण केले जातात. शारीर सौंदर्यात भर आणि सामाजिक स्तरावरील प्रतिष्ठा अधोरेखित करण्यासाठी या कलेला अनिवार्य महत्त्व प्राप्त झाले. आरोग्य आणि सौंदर्य या दोन्ही करता ही कला महत्त्वाची मानली जाते. चर्मकार ही स्वतंत्र ज्ञाती तयार झालेली आहे.

**९) पाककला :–** जन्मापासून मृत्यूपर्यंत भूक ह्या विकाराची शांतता करणं हा एक उत्सवच असतो. याच मुलभूत विकारातून पाककलेचा जन्म झाला. सणवार उत्सव साजरे करतांना विशिष्ट प्रकारे पाकसिद्धी करण्याच्या परंपरा, स्थल, काल, परिस्थितीनुसार प्रचलित झालेल्या दिसतात. रसपूर्ण पाकसिद्धी

करणं ही कला म्हणूनच मान्यता पावली आहे. पाककलानिपुण कलावंतांचा एक वर्ग वृत्ती स्वीकारून कार्यरत झालेला दिसतो. पाकसिद्धीतून मन आणि आत्मियता जिंकता येते. प्रपंच सुखदायक होतो. प्रपंचात शांती समाधान लाभते. लोकसंग्रह वाढतो. हे लक्षात घेऊन; गृहिणी तर ही कला प्रयत्नपूर्वक आत्मसात करून; जीवनोत्सव संपन्न करण्यात दंग असतात. मिळणारा आनंद तात्कालिक असला तरी, कलानैपुण्यामुळे त्याची शाश्वती असते. पाककलेचा थेट संबंध कृषी उत्पादनांशी असल्याने कृषीजीवनातील कृषीकलेला वेगळे परिमाण प्राप्त झालेले असते. जीवनातील विविध उत्सवांची मालिका लक्षात घेऊन; कृषीकर्मी पाककलेस उपयुक्त पदार्थ अचूकपणे देऊन, पाकसिद्धीचा आनंद द्विगुणित करतात. पाकसिद्धीला जठराग्नी यज्ञाचे परिमाण प्राप्त आहे. भोजन करणे हे यज्ञकर्म असून शारीरिक आरोग्य मनप्रसन्नता सामूहिक मनोधारणा, विविध देवदेवतांची भक्तिसाधना यांशी; तसेच सणोत्सव वैशिष्ट्यपूर्णतेने, उत्सवपूर्ण करण्यासाठी, हा यज्ञ आवश्यक मानला जातो. आहार हा भूक या विकाराशी नित्य जोडलेला असल्याने 'उदर भरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म' या जाणिवेने ह्या यज्ञाची मांडणी आणि सिद्धता केली जाते. जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा या जीवनातील तीनही परिवर्तन अवस्था परंपरा या यज्ञाने उत्सवपूर्णतेने संपन्न होतात.

१०) **क्रीडामहोत्सव** :– क्रीडा ही जीवांची सहजप्रवृत्ती असते. जीवनोत्सव साजरा करतांना खेळांना सांस्कृतिक नियोजनात्मक महत्त्व प्राप्त करून देण्यात माणसाने योजकता दाखविली आहे. पुरुषांचे खेळ, स्त्रियांचे खेळ, बाळांचे खेळ, प्रौढांचे खेळ, वृद्धांचे खेळ, बैठे खेळ, मैदानी खेळ, उत्सवनिगडित पारंपरिक खेळ असे नियोजन परंपरेने पाहावयास मिळते. सणोत्सवांच्या निमित्ताने स्पर्धात्मक खेळांची परंपरा पाहावयास मिळते. यात बैलगाडे शर्यती, साठमारीसारखा खेळ, झुंजी, झोंबी किंवा कुस्ती किंवा दंगल यांच्या स्पर्धा पाहावयास मिळतात. सणोत्सवांच्या निमित्ताने नृत्य, नाट्य, गायन यांसह संपन्न होणारे खेळ, मानवी जीवाचा उत्सव संपन्न करतात. लेझीम, टिपऱ्या, भवाडे किंवा सोंगनृत्ये, स्त्रीपुरुषांची पदन्यास हस्तन्यासासह नृत्ये पाहावयास मिळतात. नृत किंवा नृत्ये यांच्या सीमारेषा पुसट होऊन, हे खेळ खेळले जातात. सामूहिक खेळांची अशी परंपरा सर्वदूर पाहावयास मिळते. यात रामलीला, कृष्णलीला, गरबा, सोंगीभारूड, भजनी दिंड्या, फुगड्या, फेर असे अनेक प्रकारे खेळ मांडले जातात. मैदानी खेळांमध्ये हुतुतु,

हमामा, लगोऱ्या, सूरपारंब्या, विटीदांडू, चेंडूफळी, अबाधबी, आट्यापाट्या असे कितीतरी खेळ पाहावयास मिळतात. आध्यात्मिक खेळ प्रकार यात्रांच्या स्वरूपात खेळले जातात. उदा. गोफणगुंड्यासारखे खेळ, लुटुपुटीच्या लढाया, युद्धखेळ यात शस्त्रबाजी दर्शन असे खेळ आलेले दिसतात

**११) सामाजिक व आध्यात्मिक जागरण करणाऱ्या संस्था :–** लोकसंस्कृतीचे उपासक म्हणून ज्याचा उल्लेख होतो अशा संस्था बहुरूपे, पांगुळ, जोशी, जोगतिणी, पुराणगायक उदा. भांडपुराण इ. अशा लोकांचा वेगळ्या संदर्भात विचार यापूर्वी झाला आहेच.

**१२) फिरते व्यावसायिक :–** वैदू महिला, कोमटिणी, बोहारणी, तुंबड्या लावणारे वैदू, धारलावे, गोधड्यादि शिवणकाम करणारे असे कितीतरी फिरस्ते लोकोपयोगी दैनंदिन लागणाऱ्या वस्तु घरपोच देत गृहस्थांचे उत्सव साजरे करीत असतात. अलिकडे ही जागा हॉकर्स आणि ऑनलाईन घरपोच वस्तु पोहोचवणाऱ्यांनी घेतली आहे.

**१३) जत्रायात्राप्रसंगी :–** मसाले सौदे विकणारे, लहान मुलांची खेळणी विकणारे, वर्षभरासाठी आवश्यक जिनसा विकणारे, बाजार मांडून समाजजीवनाच्या उत्सवसंपन्नतेला हातभार लावत स्वतःचा जीवनोत्सव संपन्न करीत असतात.

**१४) स्वच्छता करणारे लोक :–** रस्ते, उकीरडे, संडास, मेलेली जनावरे ओढून नेणे याशिवाय घरेदारे, राऊळे यांची स्वच्छता करणारे व टाकाऊ पदार्थांची यथोचित विल्हेवाट लावणाऱ्यांचा एक अनिवार्य वर्ग समाजजीवनात उत्सवसंपन्नतेच्या दृष्टीने अतिमहत्त्वाचा मानला जातो. सेवावृत्ती जोपासत ही कामे करून समाजाला समाधान आणि प्रसन्नता प्रदान करणारे हे लोक स्वच्छतेचाच उत्सव करतांना दिसतात.

**१५) आरोग्यसेवा :–** ग्रामीण जीवनात, नागरव्यवस्थेत व राजव्यवस्थेत वैद्य, हकीम व अलिकडील काळात डॉक्टर यांचा वर्ग आरोग्यरक्षण, वर्धापन, व्याधीनिवारण असे महत्त्वाचे कार्य करीत, मानवी जीवनाच्या आनंदमयतेत भर घालतात. या परंपरा अनादि आहेत असे लक्षात येते. व्यक्तिगत पातळीवर ही वैद्यकीय ज्ञान सेवा छंद आणि समाजसेवा म्हणून जोपासणारेही दिसतात. या सर्वांना समाजजीवनात विशेष स्थान व मान असतो.

**१६) शिक्षणपरंपरा :–** सामाजिक आणि सांस्कृतिक सारणी परंपरा ह्या

तत्त्वज्ञान व शास्त्रे यांच्या उपयोजनातून निर्माण झालेल्या असतात. सामाजिक व सांस्कृतिक सारणीत स्थल, काल, परिस्थितीनुसार बदल होत, तत्त्वज्ञान आणि शास्त्रे यांच्यातील ज्ञानपरंपरेला उपयोजित परंपरांनी पैलू पडतात किंवा अपेक्षित परिवर्तन होते. या प्रक्रियेत समाजजीवनाच्या ज्ञान, मनोरंजन, समाजव्यवस्थापन, समाजासाठी उपयुक्त उत्पादने, आरोग्य, न्यायव्यवस्था, संरक्षणव्यवस्था, राज्यव्यवस्था आदि सर्व क्षेत्रात ज्ञानात्मक सामंजस्य निर्माण करण्यासाठी, शिक्षणपरंपरा निर्माण झालेल्या दिसतात. सर्वच क्षेत्रात गुरू, मार्गदर्शक, समुपदेशक, शिक्षक, निरीक्षक स्वरूपात गुरू-शिष्य परंपरा दिसतात. गुरुकुलांपासून अत्याधुनिक महाविद्यालयांपर्यंत या शिक्षण परंपरा दिसतात. धर्म, पंथ, मार्ग यांतील तत्त्वज्ञान व त्याचा योगिक आणि कर्मनिष्ठ अनुसार यांत, तसेच वैद्यक व्यवसायात गुरुपरंपरेला विशेष महत्त्व आहे. असे एकही क्षेत्र नाही की, त्यात गुरुपरंपरेला महत्त्व नाही. अतिप्राचीन काळापासून समाजधारणा, संस्कृतिधारणा, धर्मधारणा, राजशकट, युद्धसाधना अशा आणि इतर गोष्टी नेटकेपणाने पुढे जाण्यासाठी, पारंपरिक होण्यासाठी, गुरुपरंपरा आवश्यकच असते. सर्वांगीण जीवनसारणीला अध्यात्मनिष्ठेने स्थैर्य, सात्विकता, न्यायप्रियता आणि सामाजिक व मानसिक स्वास्थ्य देण्यासाठी अध्यात्म अर्थात तत्त्वज्ञान गुरुपरंपरा अतिमहत्त्वाची ठरते. त्यामुळे गुरुपरंपरा म्हटले की आध्यात्मिक गुरुपरंपरेकडे लक्ष जाते. शास्त्रे व कला या दोन्ही क्षेत्रांतही गुरुपरंपरेला तेवढेच महत्त्व असते.

**१७) टपाल परंपरा :-** अनादि काळापासून टपाल व्यवहार परंपरा अवलंबिणारी सामाजिक व्यवस्था दिसते. या व्यवसायात स्वतंत्र ज्ञातीही तयार झालेल्या दिसतात.

**१८) समाज व संस्कृती क्षेत्रातील परिवर्तनशीलता :-** येथवरच्या चर्चेत प्रामुख्याने अतिप्राचीन काळापासून समाज व संस्कृती यांतील जीवनोत्सवाला अधिक वैशिष्ट्यपूर्ण आकार देऊन संपन्न करणाऱ्या घटकांचा आढावा घेतला. शास्त्रे व कला यांतील नवनवीन संशोधनांमुळे वर्तनपरंपरा, साधनपरंपरा आणि भाषिक तथा शाब्द परंपरांमध्ये परिवर्तन होते. दळणवळणाची साधने, संपर्क माध्यमे, संरक्षण व्यवस्था, व्यवस्थापन परंपरा, नोकरी व्यवसाय, अन्न निर्माण व उपयोजन परंपरा यांत परिवर्तन घडते. उदा. हॉटेल संस्कृती अशी एक सांस्कृतिक परंपरा आता खूपच स्थिरावली आहे. प्रसंग व्यवस्थापन ही स्वतंत्र कला म्हणून,

समाजजीवनात स्थिरावते आहे. आरोग्याच्या संदर्भात रुग्णालयांचे स्वरूप अधिक व्यापक व प्रगत झाले आहे. संगणक आणि ई माध्यमे जीवनाची अविभाज्य अंगे बनली आहेत. जीवनातील जन्मप्रथा, मर्तिकप्रथा, विवाहादि संस्कारप्रथा यांनाही इव्हेंट मॅनेजमेंटच्या स्वरूपात संपन्न करण्याच्या प्रथा निर्माण होत आहेत. यांत्रिक युगामध्ये दळणवळणाची साधने व्यक्ती व सामाजिक स्तरावर उपयोजिली जात आहेत. घरेदारे यांच्या परंपरा, गावगल्ली यांच्या परंपरांमध्ये आमूलाग्र बदल होऊन; परिवर्तनपूर्वक नव्या परंपरा प्रस्थापित होत आहेत. याचा परिणाम एकूण जीवनधारणांच्या सारणी पद्धतीवर तपशिलात्मक बदल घडविण्यात आला आहे.

प्राचीनकालीन सरिता व पर्वतकेंद्रित कृषीनिष्ठ सामाजिक व सांस्कृतिक परंपरांमध्ये आमूलाग्र बदल होऊन; व्यापक प्रदेशांना जोडणारे विस्तारित रस्ते अर्थात हायवे व त्यांस जोडणारे उपमार्ग यांशी निगडित समाज व संस्कृती आकार घेत आहेत. स्वयंपूर्ण ग्रामरचनेतील सामाजिक, सांस्कृतिक अशी ग्रामव्यवस्था व त्यातील न्यायव्यवस्था यांची जागा शासननिष्ठ व्यापक संस्थांच्या जाळ्यांनी घेतली आहे.

असे परिवर्तन घडत असले तरी; जीवन आनंदलक्ष्यी पद्धतीने जगण्याची जीवनधारणा त्यातील आध्यात्मिक संवेदना सांस्कृतिक व सामाजिक जीवनाला नवे आकार देत उत्सव संपन्न करीत आहे.

(७)

# राजकीय तथा राष्ट्रीय उत्सव परंपरा

राजकीय व्यवस्था हा सामूहिक जीवनाचा अविभाज्य भाग असतो. ही राजकीय व्यवस्था, जातपंचायतीच्या स्वरूपात जात किंवा जमात यांच्या मर्यादेपासून, एक व्यापक राज्य येथपर्यंत विस्तारत जाते. यात अनुशासनाचे चढते स्तर होतात. ग्राम, प्रदेश, राज्य यांत अनेक जाती, जमाती, एका राज्याची प्रजा म्हणून समाविष्ट असतात. ग्रामस्तरावर गावपंचायत व व्यापक राज्यव्यवस्थेचे अनुशासन असते. त्यांत शासकीय कर्मचारी, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी स्वरूपातील पदाधिकारी यांचा समावेश असतो. सत्तेचे केंद्रीकरण थेट राज्यप्रमुखापर्यंत जाते, तर विकेंद्रीकरण राज्यप्रमुखापासून ग्रामपातळीपर्यंत पोचते. यात कायदा व सुव्यवस्था आणि संरक्षण असा एक अनुशासनाचा अधिकार परंपरांचा भाग असतो. दुसरा महसुली विभाग स्वरूपात, अनुशासनाचा भाग असतो.

राजकीय व्यवस्था स्वकीय वा परकीय असू शकते. राजसत्ता विस्तारित करण्यासाठी, एक राजव्यवस्था अन्य राजव्यवस्थांवर आक्रमण करू शकते. मानवी इतिहासात राजविस्तारवाद प्रामुख्याने दिसतो. किंबहुना त्या विस्तारवादाचाच इतिहास लिहिला गेलेला दिसतो. भारतीय परंपरेमध्ये राजेशाहीचा विचार केला तर अश्वमेध यज्ञाच्या अवलंबनाने सार्वभौम चक्रवर्ती सम्राट होण्याच्या महत्त्वाकांक्षांचा इतिहास पाहावयास मिळतो.

राजव्यवस्थेनुसार राजदंड मान्य करूनच प्रजेला आपले दैनंदिन सार्वजनिक जीवन अवलंबावे लागते. खरे तर कुटुंबातही कुटुंबप्रमुखाच्या अनुशासनानुसार कौटुंबिक जीवनसारणी अवलंबावी लागते.

मानवी समूहजीवन असे कुटुंब, जात आणि राजव्यवस्था यांच्या

अनुशासनाने बद्ध असते. या बद्धतेने जगतांना अधिकार, हक्क आणि कर्तव्ये यांची सारणी अवलंबावी लागते. अशा बद्ध अवस्थेमुळे मानवाचा अंतर्बाह्य संघर्ष सुरू असतो.

असा संघर्ष करीत जीवनोत्सव म्हणून जीवन व्यतित करतांना, निर्लेप अशा तत्त्वज्ञानाची साथ स्वीकारावी लागते. तत्त्वज्ञान आणि राजसत्तेची सांगड, दैवतकथाशास्त्र आणि परिवर्तनशील सांस्कृतिक सारणीसह निर्माण झालेल्या समाजधारणा, धर्म म्हणून ओळखल्या जातात. अनेकदा धर्मधुरीण आणि राजधुरीण अर्थात धर्मसत्ता आणि राजसत्ता यांचा संघर्ष होत असतो. हा संघर्ष एकप्रकारे समूहजीवनाचा अनिवार्य भाग होऊन बसतो. 'यथा राजा तथा प्रजा', 'राजा कालस्य कारणम्' किंवा 'कालो वा राज कारणम्', असे त्यामुळेच म्हटले जाते.

भारतीय परंपरेमध्ये, वैदिक परंपरेनुसार आणि स्मृतिग्रंथात उल्लेखिल्यानुसार राजसत्ता आणि धर्मसत्ता यांची चर्चा असते.

राजव्यवस्थांच्या संघर्षात दोन सत्तांचा युद्धस्वरूपात संघर्ष होतांना दिसतो. भारतीय परंपरेत, बृहद भारतातील राज्यांमध्ये आपापसात जशा लढाया झालेल्या दिसतात, तशाच त्या परकीय आक्रमणांतूनही झालेल्या दिसतात.

राज्यानुशासन आणि सांस्कृतिक धर्मसारणी व तत्त्वज्ञान यांनी अनुशासित अशा स्वत्वात्मक अनुशासनासह, संघर्ष करताना आपल्या राजकीय व सांस्कृतिक परंपरेप्रमाणे; स्वत्वपूर्ण अनुशासनासह, प्रजेचाच भाग असलेले संरक्षण आणि अनुशासन विभागातील कर्मचारी, कर्तव्यतत्परतेने जीवनाचा पुरुषार्थ म्हणून सहभागी होऊन; आपले राज्य व धर्मानुशासन संरक्षित करण्याचा प्रयत्न करतात. राज्यांची प्रत्येकी पृथक अशी स्वत्वाविषयी मनोधारणा निर्माण झालेली असते.

या धारणेतूनच राष्ट्र ही भावना निर्माण झालेली दिसते. भारतीय परंपरेतील, दैवतांविषयीची एकात्म भावना, सांस्कृतिक व सामाजिक सारणीतील एकात्म भावना आणि तत्त्वज्ञानात्मक एकात्मभावना, ही सूक्ष्मातिसूक्ष्म लोकसमूहांपासून, व्यापक अशा स्थल काल परिस्थिती सापेक्ष लोकसमूहांमध्ये आढळते. त्यातूनच अतिप्राचीन मानवी एकात्म जीवनाचे व रक्तपरंपरेचे दर्शन घडते. व्यापक सप्तसिंधूंच्या प्रदेशातील सनातन सांस्कृतिक राष्ट्राचा अनुभव, महर्षी अगस्ती ऋषी, प्रभुरामचंद्र, भगवान, विष्णूंचे दशावतार, सम्राट अशोक, चंद्रगुप्त यांनी घेतला. श्रीमद् आद्य

शंकराचार्यांनी या प्रदेशाची एकात्मता दैवतकथाशास्त्रानुसार आणि श्रुति, स्मृति, पुराणे यांच्या सहाय्याने अधोरेखित केली. मध्ययुगात छत्रपती शिवरायांनी अशाच राष्ट्राचे पुनरुज्जीवन केले. संतांनी सनातन संस्कृतीच्या पुरश्चरणातून या सांस्कृतिक राष्ट्राची जोपासना केली. स्वामी विवेकानंदांसारख्यांनी भारत राष्ट्र म्हणून स्वत्वाचा विचार तरुणांमध्ये संक्रमित केला. तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संस्थेने प्रत्यक्ष भारतीय राष्ट्र हे शक, हुण, कुशाण, बरबर, डच, फ्रेंच, ब्रिटिश यांच्या आक्रमणातही; कसे एकात्मतेने टिकून राहिले हे मनामनांना समजावीत; सनातन सांस्कृतिक भारत तथा हिंदूराष्ट्राची बांधणी करण्याचा खटाटोप केला.

ही राष्ट्र संकल्पना वेदांमधील पुरुषसुक्तापासून अथर्ववेदातील राष्ट्रव्यवहार मार्गदर्शनापर्यंत अशी प्राचीन अनुभवातून सिद्ध करून मांडली आहे. अशीच उदाहरणे नंतरच्या काळात जगभरात इतिहासात मिळतात.

**राजकीय तथा राष्ट्रीय जीवनसारणी :–**

राज्य आणि राष्ट्र या संकल्पनांत, बद्धतेने व अनुशासितपणे, आपल्या प्राप्त जीवनाचा साक्षात उत्सव करता यावा तथा सच्चिदानंदस्वरूप अवस्था भोगता यावी; यासाठी भारतीय परंपरेने कर्तव्यपूर्ण कर्मपरंपरा निर्माण केली. त्यासाठी वर्णाश्रम व पुरुषार्थ अशा संकल्पना सनातनपणे मांडल्या आहेत.

**अ) राजकीय स्थिती :–**

राजकीय स्थितीगतीमध्ये अर्थनीती, युद्धनीती, न्यायनीती, आरोग्य, पर्यावरण, भूक्षेत्रनीती, जलप्रणाली व सामुद्रिक क्षेत्रनीती तसेच अंतरिक्ष क्षेत्रनीती, शिक्षण, सत्ता व सार्वभौमत्व संदर्भातील राजनीती, शिक्षण, संशोधन, कृषीविकास या व अशा असंख्य छोट्यामोठ्या क्षेत्रासंबंधी, मानवसंसाधन आणि साधन उपयोजन यासह, संचार तथा दळणवळणाची साधने, यासंबंधाने विचार करावा लागतो. या सर्व गोष्टी अखेर मानवी जीवनाशी निगडित असतात. त्यामुळे वंश, भाषा, राजकीय वैचारिक व्यूव्ह, अर्थविचारासंबंधी धोरण, अर्थसत्ता, धर्मसत्ता, राजसत्ता या सर्व गोष्टींमुळे राजकीय स्थितीगतीमध्ये व्यक्तिगत, समूहगत, वैचारिक व्यूव्हगत, राजसत्ता, धर्मसत्ता, अर्थसत्ता, न्यायनीती यासंबंधी उद्दिष्टे व ध्येये निश्चित करावी लागतात. ती साध्य करण्यासाठीचा शैक्षणिक, आर्थिक, व्यावहारिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, नैसर्गिक आदी अनेक क्षेत्रात, अनेक पातळ्यांवर संघर्ष, प्रयत्न, साधना, सामंजस्य अशा गोष्टींची आवश्यकता असते.

ध्येयपूर्ती किंवा त्या मार्गावरील उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी भावनिक आणि शारीरिक स्वरूपात कर्मशील व्हावे लागते. येथेच पुरुषार्थ साधनेचा आनंद प्राप्त होत असतो.

सर्व साधनांमध्ये, माणसामधील मुलभूत प्राणी प्रवृत्ती आणि मानवी प्रवृत्ती कार्यान्वित झालेल्या असतात. समूहजीवनातील धार्मिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रातील प्रतिष्ठा आणि ठायीच्या वासना, उपजत प्रवृत्ती, अनुवंशिकता यांचा परस्परसंबंध ध्येयपूर्तीसाठीची साधना तीव्र संघर्षात्मकतेने घडवितो. त्यातच मानवाच्या ठायी तत्त्वज्ञानाच्या पातळीवर प्रवृत्ती आणि निवृत्तीचा झगडा आणि व्यक्ती, समाज किंवा समूह पातळवरील ध्येयपूर्तीच्या दिशेने स्वार्थपर कल्याणप्रद किंवा परमार्थपर स्वरूपात स्पर्धा सुरू असते. मानवी देहाठायीच्या वासनांमुळे उत्पन्न झालेल्या राग, लोभ, मोह, मद, मत्सर, असूया, ईर्षा, सूड आदींसह ध्येयपूर्ती करण्यासाठी प्रवृत्त व्यक्तीठायी भावनिक विचलन घडते. मानवी सारणीतील सुष्ट दुष्ट प्रथा परंपरा, पुरुषार्थ संपादनात विशेष परिणामकारक ठरतात.

राज्याभिषेक समारंभ, राजकुमार घोषणा समारंभ, शासकीय अनुशासनातील पदोन्नतीच्या घोषणा व पदग्रहण समारंभ यात फड, कार्यालये, दरबार, सचिवालये, मंत्रिमंडळ या सर्व संबंधातील पदोन्नतीचा विचार करावा लागतो. अलिकडील काळात सहकार क्षेत्रात तसेच लोकशाहीव्यवस्थेत निवडून आलेल्यांमधून मुख्यमंत्री, प्रधानमंत्री, मंत्री, अध्यक्ष इ. पदे पदोन्नत केली जातात.

सर्व प्रकारच्या पदोन्नतीसाठी मानसिक तथा भौतिक स्वरूपाचा संघर्ष उद्दिष्टानुसार, ध्येयानुसार, वैचारिक व्युहानुसार करावा लागतो. हा संघर्षदेखील एकप्रकारे उत्सव असतो. त्या संघर्षातून समाधान, आनंद मिळविण्याचा मोठा खटाटोप सुरू असतो. प्रत्यक्ष पदोन्नतीची घोषणा हा विजयोत्सव असतो. पदग्रहण समारंभ हा प्रत्यक्ष विधिविधात्मक उत्सव असतो. सहकार, बँका, कारखाने अशा सर्व आस्थापनांमध्ये असे उत्सव साजरे झालेले अनुभवता येतात.

राजकीय स्थितीगतीचा परिणाम समग्र मानवी जीवनावर होतो. समाजधुरीण, साधु, संत, तत्त्वज्ञ मानवी जीवनावरील राजकीय स्थितीगतीच्या परिणामाला आध्यात्मिक, सकारात्मक दिशा देण्याचा प्रयत्न करीत; मानवी जीवनाला निवृत्तीपर, तटस्थ, ज्ञानवान कर्म करण्याचा प्रबोध करतात. ज्ञानसत्तेमुळे माणसाला

ध्येयपूर्तीचा सकारात्मक विचार, आनंदमग्नकर्मपरता प्राप्त होते.

राजकीय स्थितीगतीमध्ये जीवनाकडे उत्सव म्हणून पाहण्यासाठी मनःशक्ती साधना आणि तत्त्वज्ञानाची बैठक आवश्यक असते.

अलिकडील काळात जगभरात लोकशाही राजव्यवस्था स्वीकारलेली दिसते. राजसत्तेचे विकेंद्रीकरण हे धोरण स्वीकारलेले असले तरी; प्रभूसत्तेच्या संपादनासाठी सत्तेचे शृंखलाबद्ध केंद्रीकरण करण्याची पद्धती अवलंबावी लागते. त्यामुळेच संपूर्ण राजकीय क्षेत्राचे, लोककल्याणकारी दृष्टीने नियमन करण्याचा दावा करणारे अनेक वैचारिक व्यूव्ह कार्यान्वित झालेले असतात. पक्षीय राजकारण असे याचे स्वरूप असते. त्यामुळे राजकीय स्थितीगतीचे परिमाण सत्ताकारणाला प्राप्त होऊन; वैचारिक, पक्षीय अभिनिवेश निर्माण होतो. या अभिनिवेशाने राज्य आणि राष्ट्र यांना विशिष्ट स्वरूप प्राप्त करून देण्यासाठीची उद्दिष्टे आणि ध्येये निर्माण होतात. वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर सत्तास्पर्धात्मक संघर्षपूर्ण कर्मप्रयोगमूलकता प्राप्त होते. त्या-त्या ध्येय व उद्दिष्टपूर्ततेचा पुरुषार्थ संपादन करतांनाही उत्सवमग्नता बाधित होण्याची शक्यता असते.

**ब) राष्ट्रभावना :-**

'राष्ट्र' हा शब्द वैदिक वाङ्मयापासून प्रचलित आहे. पाश्चात्यांनीही 'नेशन' या शब्दातून राष्ट्रभावनेची चर्चा केली आहे. राष्ट्र ही एक मानसिक, आध्यात्मिक भावना आहे. नगरच्या आनंदोत्सव प्रकाशन मंचाने २०२२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'रामदासांचे वैश्विक रामराष्ट्र' या ग्रंथात या दोन्ही दृष्टीने, राष्ट्र या भावनेचा कसा विचार केला आहे व संस्कृतिसारणीमध्ये त्याच भावनेचे कसे प्रकटन होते; याची चर्चा केली आहे. मी लिहिलेल्या या ग्रंथात रामतत्त्व हे राष्ट्रतत्त्व म्हणून विचार मांडला आहे. राष्ट्र या भावनेमुळे लोकांत एकात्मतेची, आत्मियतेची भावना निर्माण होते व अन्य समाजाहून आपण पृथक कसे आहोत, हे दर्शविण्यासाठीही त्याचा उपयोग केला जातो. यांतूनच राष्ट्र-राज्याची कल्पना उदयास आली आहे. राष्ट्रीयत्वाची भावना अर्थात एकात्मतेची भावना निर्माण करणाऱ्या घटकांमध्ये वंश, भाषा, समान इतिहास, समान सांस्कृतिक परंपरा, समान राजकीय उद्दिष्टे यांचा अंतर्भाव होतो. उदा. भारत हे सनातन सांस्कृतिक हिंदू राष्ट्र आहे हे याच घटकांच्या आधारे म्हणता येते. 'राष्ट्र' या संकल्पनेनुसार राज्य, राजकीय घडामोडी, राजव्यवस्था आदी राजशैलीशी निगडित गोष्टी ह्या राष्ट्रभावनेअंतर्गत

समाविष्ट असतात. सर्व प्रकारचे संघर्ष हे राष्ट्रभावनेने प्रेरित असतात.

केवळ राजकीय आणि राष्ट्रीय यात महत्त्वाचा भेद हा असतो की, राजकीय व्यवस्थेत जीवनातील व्यक्तिगत आणि सामूहिक स्वरूपाचे सर्व संघर्ष केवळ जगण्यातील स्वार्थपरतेशी किंवा व्यक्तिगत वा सामूहिक मुक्तीसाठी सुरू असतात. त्यात राष्ट्रीय स्वरूपातील अध्यात्मभावना नसते. राष्ट्रीय जीवनात जीवनलक्ष्यी पद्धतीने ऐहिक जीवन जगणे राहातच नाही; ते आध्यात्मिक पातळीवर त्यागपूर्ण असे जीवन जगणे होऊन बसते. या जगण्यात दुःखभोग ही आनंद आणि समाधान देत अवघे जीवनच सर्वात्मक उत्सवाचे रूप धारण करते. भारतीय सनातन सांस्कृतिक राष्ट्राचे स्वरूप तसे झाले आहे. त्यामुळेच ते साम्राज्यवादी आक्रमक राजकीय घडामोडींमध्येही ऐतिहासिकपणे टिकून आहे. कोणतेही सांस्कृतिक राष्ट्र हे संस्कृतीप्रवाहाबरोबर आपले अस्तित्व टिकवून असते. त्यातील सर्वकल्याणाचा विचारदेखील राष्ट्रीय भावनेने प्रेरित असतो.

राष्ट्रीय भावना सर्वात्मकतेने अस्तित्वात येते तेव्हा विश्वात्मक व्यापक राष्ट्रभावना तयार होते. अशी विश्वात्मक राष्ट्रीय भावना ही सांस्कृतिक तथा अध्यात्मनिष्ठ जीवनशैलीचे द्योतक असते. या भावनेत राजकीय व्यवस्थापनाचा विचार गौण होतो. आध्यात्मिक पातळीवर एकात्म मानवाचा विचार बळावतो.

भारतीय सनातन राष्ट्रभावनेत ऋषी, मुनी, संत आदी महात्म्यांनी केलेले मार्गदर्शन तथा समूहसारणीवरील संस्कार हे विश्वात्मक भूमिकेचे मानसिक आविष्कार रूप असते. उदा. माउली ज्ञानेश्वरांचे पसायदान किंवा पुरुषसूक्त हे अशा भावनेचा आविष्कार होय.

राष्ट्रीय भावनेने प्रेरित समाज वैभवसंपन्न अर्थात सर्वकल्याणात्मक राष्ट्रव्यवस्थेचे उत्सव संपन्न करण्यासाठी संघर्षशील होतो. प्रभूरामचंद्रांचा अश्वमेध यज्ञ किंवा अलिकडील काळातील छत्रपती शिवराय यांचा हिंदवी स्वराज्यासाठीचा संघर्ष या स्वरूपाचा आहे. वर्तमान काळातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रेरित, प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे राजकीय व्यवस्थापन व त्यातील ध्येय हे या स्वरूपाचे आहे.

राजकीय तथा राष्ट्रीय भावनेने प्रेरित वर्तनाचे निरीक्षण केवळ राजकीय आणि राष्ट्रीय यातील भेद लक्षात घेऊन करावे लागते. सर्व राजकीय तथा राष्ट्रीय भावनेवर अवलंबित जीवनाचा विचार केला तरी; मानवी मनाचे मुलभूत ध्येय

उत्सव संपन्न करणे अर्थात निर्मळ आनंदप्राप्ती हेच असते. त्यामुळे व्यक्तीचे सामूहिक जीवनातील उद्दिष्टपूर्ती किंवा ध्येयपूर्तीसाठीचे वर्तन हे उत्सवसंपन्नतेसाठीच असते. तसेच मानवी समूहाचे जीवनदेखील व्यक्तिजीवनाशी अनुबंध राखीत उत्सवसंपन्नतेसाठीच सुरू असते, हे लक्षात घ्यावे लागते. त्यादृष्टीने राजकीय तथा राष्ट्रीय भावनेचा जीवनशैलीअंतर्गत विचार करावा लागतो.

**१) धर्म, नीती, तत्त्वज्ञानानुसार सारणीचे पालन :–**

आपापल्या जीवनात क्रमाने पुढे जात असतांना; मानवी जगण्यातील मांडणीचे रूप हे धर्म, नीती, तत्त्वज्ञान स्वरूपातील धुरिणांनी केलेल्या मार्गदर्शक सूत्रांना अनुसरून असते. त्यानुसार जीवन जगत असतांना उत्सवसंपन्नतेला, गृहस्थाश्रम सफलता, सामाजिक प्रतिष्ठा साफल्य, राजकीय प्रतिष्ठा साफल्य अशा प्रकारचे परिमाण प्राप्त होऊन; जीवनाविष्काराला विशिष्ट सर्वमान्य आकार येतो. उदा. गृहस्थधर्मातील वर्तनात भूमिकेनुसार कर्तव्यतत्परता, सामाजिक व्यवहारातील वर्तनसंकेत, आर्थिक तथा राजकीय तथा कार्यालयीन तसेच व्यावसायिक, वृत्तीनुसार वर्तन संकेतांसह वर्तन करीत दिलेली, घेतलेली वचने पाळीत व्यवहार घडत असतो. निदान तसा तो घडावा अशी अपेक्षा असते.

समाजजीवनात पाखंडपणाने असे धर्म, नीती, तत्त्वज्ञान मूलक आकारांचे परिमाण पाळत जगणारे ढोंगी, स्वार्थपर लोकही आढळतात. ते केवळ व्यक्तिगत, कुटुंबगत, जातगत, धार्मिक गटगत; स्वार्थापोटी दांभिकता, पाखंड यांचा आश्रय घेत असले तरी; समाज व सांस्कृतिक स्वास्थ्य सांभाळणारे धुरीण दंभस्फोट, पाखंड खंडन करून; खल जनांचे खलत्व नाहीसे करण्याचा प्रयत्न करून; व्यक्ती व समाज अशा दोन्ही स्तरांवर उत्सवात्मक जीवन अनुभवण्यासाठी यत्नशील असतात. उदा. मध्ययुगातील संतांचे कार्य हे या प्रकारचे कार्य आहे हे सर्वमान्य आहे.

**२) नैसर्गिक आपत्ती आणि निसर्गावलंबी उत्सव :–**

सृष्टीचक्र नियमित आहे. ते नियमित करण्यासाठी महर्षी अगस्तिमुनींसारख्या मुनींनी अपार संशोधन व साधना केली. सृष्टीची नियमितता गृहित धरून; कृषीसंस्कृतीची मांडणी ऋषीपरंपरेने केली. अखिल प्रजेला कृषीकला, कृषीविद्या प्रदान केली. परंपरेने कृषीसंस्कृतीसारणी म्हणून ती प्रचलित आहे. या कृषीप्रणालीशी राजकीय तथा राष्ट्रीय अर्थव्यवस्था व सामाजिक व्यवस्था

जोडलेली दिसते. एवढेच नव्हे तर मौखिक परंपरेने चालत आलेल्या 'एक होता राजा' ह्या प्रकारचा कथाप्रारंभ कृषीसाठीच आलेला दिसतो.

सृष्टीचक्राची ही नियमितता सूर्यमालेच्या गुरुत्वाकर्षण प्रणालीवर व सूर्याच्या अनंत अवकाशातील असंख्य आकाशगंगांमधील, मातृरूप आकाशगंगेच्या स्थितीगतीवर अवलंबून असते. ह्याचे ज्ञान ज्योतिर्विज्ञान आणि निसर्ग निरीक्षण तथा भौतिक विज्ञानाच्या अभ्यासाने मानवाला ज्ञात झाले आहे. शोध आणि संशोधन संपलेले नाही. त्या स्थितीगतीमुळे सृष्टीची मानवाला वाटणारी नियमितता अनुभवतांना अनियमितताच अधिक अनुभवास येते. पर्जन्यमान, हिवमान, उष्णतामान यांत केव्हा कशी अनियमितता अनुभवावी लागेल याविषयी केवळ अंदाजांवरच अवलंबून राहावे लागते.

भूकंप, वीज, वादळे, महाचक्रीवादळे, अतिवृष्टी, अवर्षण, उष्णतेचा प्रकोप, हिमवर्षाव, भूस्खलने, परिणामतः वनस्पती आणि जीवसृष्टीवरील त्याचे भीषण परिणाम, अनाकलनीय परिवर्तने यांमुळे मानवी स्थिर जीवनावर प्रलयंकारी संकटे ओढतात. या संकटांवर मात करण्याचा स्थानिक आणि वैश्विक पातळीवर मानवाचा प्रयत्न सुरू होतो.

राजकीय आणि राष्ट्रीय अहंकार, अस्मिता बाजूला सारून एकात्म मानवाचे दर्शन या प्रसंगांतून नेहमीच प्रकट होत राहिले आहे. याचे मुलभूत कारण म्हणजे सत्य, प्रेम, करुणा हे परमात्मतत्त्वाचे स्थायीभाव, सृष्टीरूपाने आविष्कृत झालेले असतात. निसर्गाच्या या प्रलयंकारी तांडवात सृष्टीसतीच्या कुशीतील जीवसृष्टी, सर्व जीवांविषयी सत्य, प्रेम, करुणा यांचे संवेदन भोगते. विश्वकुटुंबीय भावनेचा, कर्मशील, कर्तव्यतत्पर तरी स्वाभाविक असा उत्सव मांडते. अखिल जीवमात्रांविषयी अर्थात भूतमात्रांविषयीची एकात्मतेची सत्यनिष्ठा, प्रेमभाव आणि विश्वंभर करुणा, शिखराला पोहचते. विश्वातील प्रत्येक मानवाचे मन असा सच्चिदानंद स्वरूपाचा अनुभव स्वरूपसंबंधाने घेऊ लागते. हेच तर, निर्गुण निराकार, निर्विकार, केवल, महाशून्य, अविनाशी अशा महाविष्णूंचे अर्थात परमात्म तत्त्वाचे सच्चिदानंद स्वरूपाचे सृष्टिस्वरूपातील आविष्करण असते. या प्रसंगांत मानवाला परमात्म्याच्या सृष्टीस्वरूप होऊन; युगानुयुगे आविष्कृत होऊन; स्वसंवेद्यतेने स्वरूपाचा अनुभव घेणे अवगत होते. प्रत्येक मानव, परमात्मा होऊन हा सत्य, प्रेम, करुणापूर्णतेचा उत्सव अनुभवत असतो.

निसर्गचक्राच्या प्रलयंकारी नाट्याबरोबरच ऋतुचक्राचा विलोभनीय अनुभव मानव सतत घेत जीवनाचा उत्सव अनुभवतो. आकाशातील रंगोत्सव, वायुलहरींची आल्हाददायक क्रीडनात्मकता, जलप्रवाह आणि प्रपात यांतील धारानृत्ये, तरंगनृत्ये, लाटांचे खळाळ, स्फटिकविमलतेत मिसळलेले आकाश, रंगोत्सवांचे चैतन्यशाली नृत्य, सूर्योदय सूर्यास्ताची जीवनतत्त्वज्ञान सांगणारी, भान हरपून टाकणारी दृष्ये, हिरवाई, पितवर्णीय झळाळी, असंख्य रंगछटांसह उमलणारी फुले, बहरलेली लतावृक्षराजी, पर्जन्यवर्षावाने सुस्नात झालेली सृष्टी, भुईतून जीवनोत्सवासाठी तरवरून आलेले इवलेसे कोंब, सृष्टीसतीच्या मांडीवर लडिवाळपणे जीवन क्रीडा करणारी उद्‌भिज, स्वेदज, अंडज, जारज अशी चौखाणी सृष्टीची बाळे, सृष्टीचक्राची पुनरपि जन्ममृत्यूचा येत राहिलेला अनुभव, पुन्हा पुन्हा सृजनासाठी घडणारे मृततेचे नाट्य, असा सृष्टीचा नित्योत्सव मानव अनुभवत असतो. सृष्टीरंगात रंगून मानवही स्वतःभोवती नृत्य, नाट्य, गायन, वादन, यांसह वसंतोत्सव, पर्जन्योत्सव आणि हिमोत्सव अनुभवू लागतो. निसर्गाची स्वाभाविक लयलूट करण्यासाठी आपल्या संस्कृतिसारणीला उत्सवांची रूपे देतो. अन्न, वस्त्र, निवारा, भूक, तहान या सर्व गरजांना सृष्टीसृजनाच्या मांगल्याचा साज चढवून सणोत्सवांची मांडणी करतो.

मानवी जीवनाने जगभरात निसर्गचक्राशी निगडित अशा असंख्य वर्तनशैलींची मांडणी केली आहे. स्नाने, क्रीडाउत्सव, सण साजरे करणे, देवतांना नवरात्रीसारखे उत्सव मांडून अवघ्या सृष्टीविभ्रमानी निवेदित करणे. आपलेच आपल्याच सृष्टी आविष्काराला समर्पण असे स्वरूप या उत्सवाचे असते.

राजकीय तथा राष्ट्रीय स्थितीगतीवर निसर्गचक्राचा स्थानिक, प्रादेशिक, देशपातळीवर आणि वैश्विक स्तरावर मोठा परिणाम होत असतो. शासकीय भूमिकेतून आपत्तीव्यवस्थापन, पर्यटन आणि विशेष प्रकारचे कृषी उत्पादन महोत्सव असे उपक्रम हाती घेऊन राजव्यवस्थेअंतर्गत निसर्गचक्राशी असलेल्या मानवी संबंधांच्या दृष्टीने योजना कार्यान्वित करून मानवी जीवन सुलभ, समृद्ध व आनंदमग्न कसे होईल, त्याचा सत्ता, संरक्षण, आरोग्य या दृष्टीने अधिक लाभ कसा मिळेल याचा विचार केला जातो.

**३) राजकीय तथा राष्ट्रीय संघर्षावर मात करण्यासाठी उत्सवांचे आयोजन :–**

सत्तापिपासा, साम्राज्यवादी भावना, विस्तारवाद, प्रभुसत्तावाद अशा

राजकीय तथा राष्ट्रीय भावनेतून छोट्या-छोट्या संघर्षापासून महायुद्धांपर्यंत संघर्ष निर्माण होतात. यात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक पातळीवर अवघे जनजीवन ढवळून निघते. यांसाठी अशा संघर्षांवर मात करण्यासाठी गौरव घडविणारे, मानसिक अस्मिता जागृत करणारे, निष्ठा वृद्धिंगत करणारे, कार्यक्रम आखून त्यांना उत्सवाचे स्वरूप दिले जाते.

हुतात्मा दिन, हुतात्म्यांच्या जयंत्या-महंत्या, राष्ट्रीय पुरुषांच्या वा विभूतिमत्त्वांच्या जयंत्या-मयंत्या, राज्याभिषेक दिन, स्वातंत्र्य दिन, राज्यारोहण-राज्यव्यवस्थापन तथा राज्यघटना दिन, विशेष लढ्यांचे स्मृतीदिन अशा अनेक प्रकारचे उत्सव नियमित करून, राज्यभरातील समस्त प्रजेला त्यात सामावून घेतले जाते. त्यानिमित्ताने वैयक्तिक जीवनातील यातायातींवर मात करून; राष्ट्रीय भावनेला विशेष महत्त्व दिले जाते. राष्ट्रीय जीवनाचा उत्सव यानिमित्ताने घडतो. उदा. चलेजावचा लढा - भारतीय स्वातंत्र्यातील महत्त्वाचा स्मृतीदिन म्हणता येतो.

राजकीय स्थितीगती अंतर्गत सामाजिक तथा जाती-वर्णलढे, भाषावाद, प्रांतवाद अशा वादातून निर्माण झालेल्या लढ्यांच्या यशापयशाचे स्मृतीदिन, विजयदिन नियमितपणे साजरे करून अस्मिता जागरण केले जाते. त्यातून त्या-त्या क्षेत्रापुरती मर्यादित अस्मिता, निष्ठा जागृत करून; व्यापक राजकीय तथा राष्ट्रीय भावनांशी जोडले जाते. भारतात व प्रामुख्याने महाराष्ट्रात शिवछत्रपतींच्या संदर्भाने येणारे ऐतिहासिक महत्त्वाचे दिन तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निमित्ताने साजरे होणारे महत्त्वाचे दिन अशी यासंबंधी उदाहरणे देता येतील.

महाराष्ट्रात संत-महंतांच्या जयंत्या-मयंत्या यांना महाराष्ट्रव्यापी तर महत्त्व आहेच; तथापि माउली ज्ञानेश्वर, जगद्गुरु तुकाराम यांसारख्या संतांचा संदर्भ सांस्कृतिक राष्ट्रउभारणीच्या दृष्टीनेही केला जातो.

अशा उत्सवांच्या निमित्ताने राष्ट्रीय संघर्षांवर मात करण्यासाठी एकात्मता निर्माण होण्यास मदत होते.

**४) सांस्कृतिक राष्ट्रासाठीचे सनातन उत्सव :-**

भारत हे सनातन सांस्कृतिक राष्ट्र आहे. याचे प्रमाण म्हणजे बृहद् भारतामध्ये आणि जगभरात पसरलेल्या भारतीयांच्या समूहांमध्ये विशेषत्वाने संपन्न होणारे सणोत्सव होत.

**(i) शारदीय नवरात्री किंवा देवी नवरात्र महोत्सव –** बृहद् भारतामध्ये सर्व जाती, जमाती, पंथोपपंथ हा मातृत्सोव आपापल्या परीने स्थानदेवता, क्षेत्रीय देवता, शक्तिपीठे, कुलदेवता यांच्यासंदर्भाने व्रतस्थपणे साजरा करतात तेव्हा विविध जातीसमूहांमधील पृथगात्मता नाहिशी झालेली पाहावयास मिळतात. एका मातेची लेकरे एवढी सनातन, आध्यात्मिक, एकात्मता सर्वांठायी निर्माण झालेली दिसते. हे उत्सव व्रतस्थतेने साजरे करतांना राजकीय सत्ताधीश आणि राष्ट्रीय धुरीणही या उत्सवांमध्ये समाविष्ट होऊन श्रद्धापूर्वक व्यवस्थापन करतांना दिसतात. नवरात्री महोत्सवाच्या निमित्ताने सुफलीकरणाचा उत्सवही ऋतुचक्राप्रमाणे साजरा होतो. स्थळ व पर्यावरण सापेक्षतेने निर्माण झालेले अन्नपदार्थ शक्तिमातेला अर्पण करण्याचा सोहळा बृहद् भारतात पाहावयास मिळतो. नृत्य, नाट्य, गायन, वादन यांच्या परंपरा मिरवणुका, गानसभा, नाट्यसभा, कुळधर्म स्वरूपात उभ्या राहिलेल्या दिसतात. अवघी ऐहिकता मातृकृपेने सफल झाली असून तिच्या लीलेने घडलेले सारे तिच्या चरणी अर्पण करण्याची आध्यात्मिक भावना सर्वांठायी निर्माण होते. ही सांस्कृतिक राष्ट्रभावना वैश्विक राष्ट्रभावनेपर्यंत उदात्त होत जाते. यासंबंधीचे अगदी अलिकडचे उदाहरण म्हणजे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या नवरात्र महोत्सवातील व्रतस्थतेचा जगाला आलेला अनुभव होय.

**(ii) विजयादशमी तथा दशहरा (दसरा) –** नवरात्रींचे पारणे स्वरूपातील विजयादशमी अर्थात दसरा हा सण भारतवर्षात विजयोत्सवांचा सण म्हणून साजरा केला जातो. सीमोल्लंघन, शस्त्रपूजन व रावणदहन अशी या विजयोत्सवाची वैशिष्ट्ये असतात. बृहद् भारतात अनेक विजय स्मृतीदिन या उत्सवाच्या निमित्ताने उजळले जातात. ईर्षा, उल्हास, शस्त्रशक्ती आराधना, संघर्षावर मात, दुष्टप्रवृत्तीवर मात, ऋतुचक्राप्रमाणे नवधान्याची लयलूट तसेच सत्तास्पर्धेतून आणि शत्रूवर मात करून; स्वराज्यात आणलेल्या संपत्तीची लयलूट करून हा सण साजरा केला जातो. दैत्यनिर्दालन तसेच महाभारतीय युद्धाच्या स्मृती जागविल्या जातात. या उत्सवातही अवघा भारत आणि जगभरातील भारतीय भावनात्मक पातळीवर एकात्म, सनातन राष्ट्राचे जागरण करतात.

**(iii) दीपोत्सव तथा दीपावली (दिवाळी) –** भारतात आणि जगभरातील भारतीयांत दीपोत्सव, संघर्षाच्या काळरात्रीनंतर जणू ज्ञानात्मक व समृद्धीयुक्त

आनंद घेऊन येतो. कौटुंबिक जिव्हाळा, नातीगोती, सामाजिक व आर्थिक व्यवहारातील नवे पर्व घेऊन हा सण येतो. मानव, दानव, देव आदी समस्त मानवीरूपे अनादिपणे सनातनातील, असंख्य संदर्भ घेऊन हा सण साजरा करतात. दशावतारांतील बली-वामन अवतारांपासून विविध दैवतकथा या सणाशी जोडलेल्या असतात. संघर्षांतून प्राप्त झालेल्या संपत्ती आणि समृद्धीचे लक्ष्मीरूपातील पूजन करून; आर्थिक व्यवहारांना सामाजिक, कौटुंबिक, राजकीय संदर्भाने नव्याने सुरू करण्यासाठी हा सण मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. सर्व प्रकारच्या श्रमजीवनाला संपत्तीचा समृद्धीचा यथोचित वाटा प्रदान करीत; राष्ट्रीय एकात्मतेचे प्रदर्शन गांभीर्याने भावनात्मकतेने करीत; सर्वकल्याणाच्या ध्येयाने प्रेरित होत हा उत्सव मनामनात साजरा केला जातो.

**(iv) कृष्णजन्माष्टमी –** भगवान श्रीकृष्ण भारतीय दैवतकथाशास्त्रात दोन प्रकारे प्रकट झाला आहे. एक म्हणजे साक्षात निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, महाशून्य, कैवल्य, परमात्मा, संवित्ती, सच्चिदानंदस्वरूप, आत्मतत्त्व या स्वरूपात, स्वरूप भावनेने. दुसरे रूप म्हणजे भगवान विष्णूंच्या दशावतार रूपांतील पूर्णावतार स्वरूपातील वसुदेव-देवकीरूपात यादव घराण्यात जन्मास येऊन; गोकुळातील नंद-यशोदेचा पुत्र म्हणून प्रसिद्ध झालेला गोपीकृष्ण. यामुळे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव बृहद् भारतात मोठ्या आत्मियतेने साजरा होतो. अध्यात्मस्वरूप आणि प्रत्यक्ष लीला करणारा श्रीकृष्ण भारतीय कुटुंबामध्ये बालकृष्ण म्हणून विशेष प्रिय आहे. प्रजनन प्रक्रियेतील मूर्तिमंत केवलानंदाचे रूप म्हणजे लडिवाळ अपत्य. हे अपत्य म्हणजेच श्रीकृष्ण अशी भावना सनातनपणे मनामनात जागृत झालेली असते. श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या निमित्ताने भगवान व्यास लिखित श्रीमद् भागवत महापुराण कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन भारतीय उपखंडात विविध भाषांमधून केले जाते हे या उत्सवाचे वैशिष्ट्य होय. गोपालन, गोसंवर्धन आणि कृषीजीवनातील गोसंबंध यांचे महत्त्व यानिमित्ताने भारतभरात उजळले जाते. श्रीकृष्ण हे तत्त्व भारतीय सनातन सांस्कृतिक राष्ट्राचे मूलाधार तत्त्व आहे, हे लक्षात येते. श्रीकृष्णार्पणमस्तु! या घोषणेने जीवनमायालीलेच्या पलिकडे जाऊन; जीवनाचा सच्चिदानंदस्वरूप उत्सव ठायीच अनुभूत होतो, हे या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

**(v) वर्षप्रतिपदा तथा गुढीपाडवा आणि रामजन्मोत्सव –** वर्षप्रतिपदा हा

उत्सव बृहद् भारतात विजयोत्सव, आरंभोत्सव, राज्याभिषकोत्सव म्हणून साजरा होतो. या उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण भारतवर्ष रामतत्त्वाने एकात्म भासमान होते. गुढीपाडवा हा उत्सव केवळ धार्मिक राहात नाही. तो राजकीय तथा राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा होतो. आरोग्य, धनसंपदा, नवे संकल्प या दृष्टीने हा उत्सव मनामनाला जागवतो. नवजीवनासाठी प्रोत्साहित करतो.

याच दिवसापासून ऋषी वाल्मिकी लिखित रामायणाचे पठण, स्मरण, रामलीलेच्या खेळांच्या स्वरूपात जागरण घडते. रामनवरात्री म्हणूनही हा उत्सव साजरा केला जातो. बृहद् भारतात या उत्सवाच्या रूपाने नृत्य, नाट्य, गायन, वादन अशा संगीतबद्ध कलात्मकतेने रामायणाचे सनातनत्व पुनर्जागृत होते. 'राम' ह्या तत्त्वाचा आध्यात्मिक पातळीवरील अनुभव घेत, जीवनातील यशआनंद, सच्चिदानंदरूप म्हणजे रामतत्त्व म्हणून लोकजीवनात अध्यात्म ज्ञान प्रकाश उजळतो. रामतत्त्व म्हणजे जीवनसारणीत यशस्वीतेने प्रकट होण्याचे ज्ञानात्मक वर्तन अर्थात पुरुषार्थ एवढ्या व्यापकतेने हा विचार अगदी सामान्यातिसामान्य माणसाच्या मनातही जागवला जातो. जीवनात राम आणण्याचा संकल्प यानिमित्ताने होतो.

रामतत्त्वाचे जागरण करण्यासाठी, शब्दब्रह्मातून लक्ष रामायणे प्रकटली आहेत याची साक्ष मिळते. महर्षी वाल्मिकींच्या आर्षमहाकाव्यापूर्वीच रामतत्त्वाचे दाशरथी राम या नायकाच्या रूपाने त्रिकालज्ञ महामनांनी काव्यात्मक भविष्य लेखन करून; युगांचा इतिहास युगापूर्वीच लिहिल्याचे अनेक पुरावे पुढे येतात. त्यात महर्षी अगस्तिमुनींनी लिहिलेले रामायण आणि श्रीमद् हनुमानाने लिहिलेले रामायण हे मौखिक परंपरेने, शिव निरुपित रामायण म्हणून पुढे आलेले दिसते. सनातन सांस्कृतिक हिंदूराष्ट्राचे शिल्प जणू रामायणाच्या रूपाने शिल्पित करण्याचे कार्य, विष्णूतत्त्व, पुरश्चरित करणाऱ्या तपोमग्र महादेवांनी केले; असे म्हणता येण्याएवढे पुरावे अखिल पुराणांमधून सर्वांसाठी, भगवान व्यासांनी दिलेले दिसतात. या घटितामुळे रामजन्मोत्सवात अनेक परीने रामकथा उजळली जाते. लोकछंदातून ती घरादारात निनादते. अवघे मानवी जीवन रामतत्त्वाने भारून जाते. म्हणूनच रामजन्मोत्सव हा राजकीय तथा राष्ट्रीय महोत्सव म्हणून प्रत्येकजण अनुभवतो.

**(vi) रक्षाबंधन तथा नारळीपौर्णिमा –** जीवनरक्षणार्थ परस्पर बंधनांचा

स्वीकार करण्यासाठीचा हा जीवनोत्सव.

दर्यावर्दी जीवनाची परंपरा 'मनु आणि मासा' कथेपासून आहे असे वैवस्वत मन्वंतराच्या इतिहासाने सिद्ध केले आहे. भगवान विष्णूंच्या दशावतारांची सुरुवात भगवान प्रलयंकारी शिवांनी मत्स्य अवतारापासून, शिव-शक्ती युगुलाच्या माध्यमातून घडविली; त्याची आठवण हा उत्सव करून देतो. वैश्विक मानवी राष्ट्राचे रक्षाबंधन शिवांनी घडविले. अखिल मानवी एकात्मतेसाठी अन्न, वस्त्र, निवारा यांसह उत्पत्ती, स्थिती आणि लय या जीवन प्रक्रियेसाठी वरुणालयातून मत्स्यरूपी करुणा शिवांनी प्रेरित केली. 'मत्स्य' हा केवळ जलचर जीव नाही, तो अखिल जीवसृष्टीचा आरंभबिंदू आहे. तो जीवसृष्टीला अन्नब्रह्म देऊन परिपोषित करणारा आहे. स्वतःचे जीवन जीव जीवनासाठी समर्पित करणारा आहे. अवघ्या सृष्टीचा प्रजापती म्हणून आद्य प्रजापती प्रलयंकर शिव-शक्तींतून तो धारणा विष्णूतत्त्व स्वरूपात प्रकट झाला आहे. जीवनाचा पवित्र धागा अर्थात नाळ. त्याच्यातून निष्पन्न झाली आहे. त्याचे स्मरण दर्यावर्दी लोक त्यालाच जीवनाचे निवेदन करून अर्थात श्रीफळ समर्पणाच्या रूपाने नैवेद्य प्रदान करून करतात. अवघ्या मानवजातीचे जीवन एकाच होडीत बसून सागरात प्रवास करणाऱ्या जीवांसारखे आहे हे लक्षात घेऊन, परस्परांचे रक्षण करीत सृष्ट जीवनसागरातून अखिल मानवाने, असृष्ट अशा सच्चिदानंदस्वरूप अर्थात परमात्मस्वरूप होण्यासाठी म्हणजे पुनःप्रलयापर्यंत जाण्यासाठी तत्पर व्हावे याचे प्रतीक म्हणून रक्षाबंधन करावयाचे.

या नारळपौर्णिमेला दयावर्दी जीवनात पुरुषार्थाचा आयाम लाभला आहे तर रक्षाबंधनाला भगिनी-बंधू यांच्या परस्पर रक्षण बंधनापासून वैश्विक मानवाच्या रक्षणाचे आयाम लाभले आहे.

सनातनातून चालत आलेल्या रक्षाबंधन आणि नारळीपौर्णिमा या उत्सवाने मानवी मनात वैश्विक राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करून मनात वैश्विक परमात्म तत्त्वाचे जागरण घडविले. इतिहास पुराणामध्ये राजकीय आणि राष्ट्रीय आनंद साधनेसाठी या प्रागैतिहासिक उत्सवाचा उपयोग करून घेतलेला दिसतो.

**(ix) शिवरात्री महोत्सव –** बृहद् भारतात, सनातन सांस्कृतिक धारणात्मक सारणीमध्ये अध्यात्माच्या सृष्टीजीवन आविष्काराचे आदिकारण म्हणून शिव-शक्ती अर्थात शिव-शिवा या आद्यतम प्रजापतीयुगुलाचे स्मरण, पूजन केले जाते.

निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, महाशून्य, कैवल्य, सच्चिदानंदस्वरूप, आत्मरूप, संवित्ती अशा परमात्म्याच्या निजरूपाला स्वसंवेद्यतेने स्वतःचे स्वरूप अनुभवण्याची इच्छा झाली ते आदिकारण आदिमपणे महत्‌तत्त्व आणि ठायीची महाशक्ती स्वरूपात प्रकटले. महत्‌तत्त्वाची 'बहुस्याम प्रजायेय' ही भावना महाशक्तीच्या प्राकट्याने भासमान झाली. हे महत्‌तत्त्व म्हणजे महादेव आणि त्याच्या ठायीची सृष्टीशक्ती म्हणजे महत्‌तत्त्वासह अर्थात आत्मतत्त्वासह प्रकटलेली पंचमहाभूतात्मक सृष्टी होय. म्हणजेच या सृष्टीचे प्राकट्य अस्तित्व आणि प्रलय होय. हाच महादेव विष्णू-वैष्णवी अर्थात लक्ष्मी होऊन, पंचभौतिक सृष्टीचे प्रलयापर्यंत पालन करतो. त्याच पंचभौतिकातून तत्त्वासह अखिल विश्वात असंख्य रूपे निर्माण करण्यासाठी स्वतः ब्रह्म-ब्रह्मा अर्थात माया होऊन प्रकटतो. या त्रिविध तत्त्व व शक्ती रूपांचे आद्य तत्त्व म्हणजे शिव. हेच शिवतत्त्वाला शरण जाण्यासाठी, युगानुयुगांच्या प्रवासातील त्याचे अस्तित्व आत्मरूपाने अनुभवण्यासाठीचा उत्सव म्हणजे शिवरात्र. केवळ स्मरणाने शिवतत्त्व जागवते आणि जीव शिव होतो ही बृहद् भारतीय मनातील अध्यात्म भावना जागविण्याचा हा उत्सव!

परंपरेने या उत्सवाशी आणि शिवतत्त्वाशी निगडित अशा असंख्य लीलाविग्रह स्पष्ट करणाऱ्या कथा जोडलेल्या आहेत. व्याधाची वृक्षावर बसून आपसूक शिवपूजन घडलेली शिवरात्री कथा ही बीजरूपात्मक आहे. मानवी अंतरात्मा शिवस्वरूप असल्याने, प्रलयंकारी रात्रीच्या कृष्णविवरातून पुन्हा सृष्टी निर्माण करण्याचा चक्रनेमीक्रम अस्तित्वाच्या अंतापर्यंत अखिल अस्तित्वाला आनंदमग्नतेने अनुभवता यावा; याची संवेदना सहज प्रकट करणारा हा उत्सव आहे. शिवस्थाने आणि शिवोत्सव यांच्या असंख्य परी जगभरात पसरल्या आहेत. भारतीय परंपरेत राजकीय आणि राष्ट्रीय उत्सव प्रणालीत भारतीय सनातन सांस्कृतिक राष्ट्र या दृष्टीने तर शिवरात्री उत्सव परिमाण ठरतोच, त्याचबरोबर वैश्विक सनातन सांस्कृतिक राष्ट्राची संवेदनाही हा उत्सव निर्माण करतो.

**(x)** भारतीय सनातन सांस्कृतिक हिंदूराष्ट्राचे जागरण करीत जीवनोत्सव साधण्याची परंपरा दिसते, तशी अलिकडील गत दोनअडीच हजार वर्षांपूर्वी धर्मधारणात्मक विचार म्हणून तत्त्वज्ञान मांडणाऱ्या प्रणाली म्हणजे मुस्लिम आणि ख्रिश्चन प्रणाली यांनीही राष्ट्रीय उत्सवाच्या स्वरूपात जीवनोत्सव घडावा यासाठी

धार्मिक तथा ऐतिहासिक स्थळे व प्रसंगांचा उत्सव मांडून सारणीला आयाम देण्याचा प्रयत्न केला आहे.

हज यात्रा किंवा जरुसेलमची यात्रा ही या उत्सवप्रणालीने जीवनोत्सव साधना करण्याचीच उदाहरणे होत.

**(xi)** भारतीय सनातन सांस्कृतिक राष्ट्रसाधनेच्या मार्गाने जीवनोत्सव घडावा यासाठी भारतीय ऋषीपरंपरा, भगवान बुद्ध, भगवान महावीर यांच्यापासून आधुनिक संतमहात्मे यांच्यापर्यंत सर्वांनी, राष्ट्रीय उत्सवस्वरूपात जीवनाला आकार देण्याचा सनातन प्रयत्न केला आहे. हे समस्त संत सनातन सांस्कृतिक हिंदूराष्ट्राचे शिल्पकार होत असे म्हणता येते.

**(xii)** होलिकोत्सव तथा रंगोत्सव, ऋतुचक्राच्या बद्धतेशी संघर्ष मांडून सुफलीकरणात सफल झालेली कृषी तसेच वन्य समूहजीवन व त्यावर अवलंबित ग्राम तथा नागर जीवन आणि अनुषंगाने सत्ताप्रशासन होलिकोत्सवाच्या निमित्ताने दुरितांची होळी करून, रंगोत्सव मांडतात. मुक्तआनंदाची लयलूट सर्व स्तरावर करण्याइतकी मनस्विता व्यक्ती तथा समूहमनात जागृत होते. वसंत आणि ग्रीष्म ाच्या स्वागतासाठी नवा उत्सव मांडीत करीत हा सण सर्व प्रकारच्या वातावरणात आणि पर्यावरणात रंगांची उधळण करीत, मुक्त क्रीडन आणि मुक्त संगीतात मग्न करून टाकतो.

**(xiii) अक्षय्य तृतीया –** हा पुनर्जीवन साधनेचा आरंभ करणारा मोठा सण, बृहद् भारतात मोठ्या उत्साहाने सूर्यमुखी होऊन, सज्ज होतो. कृषीजीवन आरंभाचा हा सण विवाहसंस्कारासाठीही आरंभ करणारा सण असतो. संघर्षावर मात करीत नवजीवनाचे स्वागत करण्यासाठी हा सण प्रवृत्त करतो.

**(xi) संत : भारतीय सांस्कृतिक राष्ट्राचे शिल्पकार –** संत हे भारतीय सांस्कृतिक राष्ट्राचे शिल्पकार होत; या आशयनिष्ठेने संत साहित्याचा अभ्यास घडला पाहिजे. विश्वात्मक प्रेम आणि करुणा या मनोभूमिकेसह, स्वतःचे घर, समाज, राष्ट्र यांचे, समत्व दृष्टीने अर्थात न्यायबुद्धीने, संरक्षण, जतन आणि सर्वकल्याणात्मक विकासाचा विचार करणारे नागरिक निर्माण होणे आवश्यक आहे.

वैवस्वतमन्वंतरात, हिमालयाच्या कुशीत, परब्रह्म्याच्या महत्‌तत्त्व व म हाशक्ती स्वरूपातील तत्त्वाची महेश, विष्णू, ब्रह्मा या त्रिविध देवता आणि त्यांच्या

ठायीच्या महामाया, महालक्ष्मी, महासरस्वती या त्रिविध शक्तिरूपांची लीला, सृष्टीस्वरूपाने प्रकटली. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचमहातत्त्वांच्या संघटन आणि विघटन चक्राच्या स्वरूपात, ही सृष्टी लीला अविनाशी परब्रह्म स्वभावाने सुरू आहे. या सृष्टीलीलेत, चर, अचर रूपांमध्ये ते परब्रह्म स्वरूपतः नटले आहे. त्यातील जीव सृष्टीत उद्‌भिज, स्वेदज, अंडज आणि जारज अशा चौखाणीमध्ये जलचर, भूचर, खेचर स्वरूपातील सर्व खाणींच्या गुणात्मकतेने, मानवी जीव प्रकटला आहे. म्हणूनच देव, दानव, राक्षस, यक्ष, किन्नर, विद्याधर, गंधर्व, भूत, प्रेत आणि मानव या मानवी रूपांना प्राप्त झालेले सगुण साकार असे जीवरूप आणि जीवन, परब्रह्मस्वरूप अर्थात अलौकिक असे आहे.

उत्पत्तीपासून मानवाने, व्यष्टीचा समष्टीस्वरूपात विचार केला. केवळ तात्त्विक विचार करून जीवदशा भोगता येत नाही. अहं ब्रह्मः अस्मि। तत्त्वमसि। सोऽहम्। शिवोऽहं। या संवेदनेसह व्यक्ती, कुटुंब, समाज, भूप्रदेशातील मानव राष्ट्र आणि अखिल विश्वातील मानव अशा स्तरांवर, संरक्षण, सहानुभूती, समावेशन या जाणिवांसह सत्यनिष्ठेने, प्रेमाने आणि परब्रह्मस्वरूपाच्या कारुण्याने, प्रत्यक्ष कर्मपर सारणी परंपरागत करावी लागते. हीच मानवाची अध्यात्मनिष्ठेने मांडणी केलेल्या, लोकसारणीची, धर्मात्मक सांस्कृतिक मांडणी होय.

वेद, ब्राह्मणे, अरण्यके, उपवेद, वेदांगे, उपनिषदे असे श्रुतिवाङ्मय प्रसृत करणारे व त्यानुसार समाजसारणीची धारणा पारंपरिक करणारे, मन्वंतराच्या सुरुवातीपासून; व्यक्तीपासून राष्ट्रापर्यंत आणि वैश्विक कल्याणाचा विचार, सूत्ररूपाने आणि परिवर्तनशीलतेने विधिनिषेधात्मकेतेने घडवित सारणीरूपाचे दर्शन घडविणारे स्मृतिकार आणि मन्वंतराचे भारतीय राष्ट्रधारणेचे ऐतिहासिक कथात्मक दर्शन घडविणारे, पुराण वाङ्मय प्रस्तुत करणारे आणि त्रेतायुगातील आर्षमहाकाव्य श्री रामायण व द्वापारातील आर्षमहाकाव्य श्री महाभारत ऐतिहासिक स्वरूपात प्रसृत करणारे असे सर्व ऋषी, मुनी, संत, सिद्ध, साधू आदींनी या मौखिक अर्थात वाङ्मयीन परंपरेने वैश्विक चिंतनासह आणि संवेदनेसह भारतीय सांस्कृतिक राष्ट्राची उभारणी केली आहे.

ही भारतीय सांस्कृतिक राष्ट्र उभारणीची आणि जतन करण्याची परंपरा भगवान बुद्ध, भगवान महावीर, भगवान श्रीमद् शंकराचार्यांनी आणि नाथपरंपरा यांनी केली आहे. सत्य, प्रेम, करुणा या स्वसंवेद्य जाणिवांसह, वैश्विक भूमिकेसह

सांस्कृतिक राष्ट्राचे शिल्पकार म्हणून सर्व संत सरसावले आहेत याचा प्रत्यय मध्ययुगात येतो. सर्वांभूती समत्व दृष्टीने प्रेम, सत्यनिष्ठा आणि करुणा यांसह, सर्वकल्याणाचा विचार, देव, धर्म आणि राष्ट्र संरक्षणासह करावा, यांसाठी आकांत मांडत; आधुनिक भारताचे स्वरूपही सनातन सांस्कृतिक राष्ट्र म्हणून उभे करण्याचा अथक प्रयत्न सर्व संत करीत आहेत.

भारतीय सांस्कृतिक राष्ट्राचे प्रेरक आणि खरे शिल्पकार, संत हेच होत. या संतपरंपरेत, अध्यात्मनिष्ठेने, स्वतः साधना करीत; समग्र समाजाला धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरुषार्थ चतुष्टयाचे ज्ञान प्रेरीत करणाऱ्या सर्व महामानवांचा समावेश संत म्हणून करता येतो. ऋषी, मुनि, योगी, सिद्ध, साधू, भिक्कू, संत, महंत, साधक, कीर्तनकार, कथाकार, एवढेच नव्हे तर त्या मार्गावर वाटचाल करू पाहणारे अध्यात्मनिष्ठ हे सर्व संतच होत. माऊली ज्ञानेश्वरांनी समोर बसलेल्या जाणकार श्रोत्यांनाही संत म्हटले आहे.

भारतीय संतपरंपरेतील संत अध्यात्मनिष्ठेने, देव, धर्म आणि देश तथा राष्ट्र आणि वैश्विक मानवाच्या संरक्षणाचा, सर्वकल्याणाचा प्रबोध करीत; भक्तिसाधनेनुसार भक्ती, ज्ञान आणि वैराग्यपूर्ण कर्तव्यतत्परतेची शिकवण देत; भारतीय संस्कृतीचे, पर्यायाने भारतीय सांस्कृतिक राष्ट्राच्या पुनरुथ्थानाचे व्रत घेऊन अहोरात्र झटत आहेत. ते संप्रदायात्मक अध्यात्मसाधनेसह, कर्तव्यनिष्ठेने संस्कृति तथा घर, समाज, राष्ट्र यांचे संरक्षण करीत, श्रद्धावान कर्तव्यतत्पर अशा संस्कारित भक्तांची मांदियाळी घडवत आहेत.

७) भागवत तथा वारकरी संत हे भारतीय सांस्कृतिक राष्ट्रनिर्माण कार्यात अग्रणी आहेत–‘वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा’, असे निक्षून सांगत, ‘आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासी । बोलले जे ऋषी साच भावे वर्ताया ।।’ हे स्पष्ट करून; भारतीय सनातन सांस्कृतिक राष्ट्राचे जागरण करणारे, भागवत तथा वारकरी धर्माचे कळस ठरलेले संतशिरोमणी जगद्गुरु संत तुकाराम महाराज, रामतत्त्वाचे जागरण करीत; भारतीय राष्ट्राचे शिल्पकार शिवस्वरूप हनुमंतांचे सामर्थ्यसंपन्न, सेवाभावी आदर्श डोळ्यासमोर ठेवून; महाराष्ट्र धर्माचे महत्त्व स्पष्ट करीत; सांस्कृतिक राष्ट्रनिर्मितीसाठीच्या व्यवस्थापनासाठीचा बोध घडविणारे, स्वामी रामदास या आधुनिक वैष्णव संतांनी आधुनिक भारतीय सांस्कृतिक राष्ट्राची जणू पुनर्सिद्धता केली आहे.

संत माऊली निवृत्तीनाथांनी, सिद्ध, नाथ परंपरेने साधलेल्या, अखंड भारतभूच्या, सांस्कृतिक राष्ट्रभावनेचे केलेले जागरण; भागवतांना प्रेरित केले. 'भाष्याकाराते वाटपुसतु' असे म्हणत; माऊली ज्ञानेश्वरांनी भगवान श्रीकृष्णांनी निवेदित केलेला, राष्ट्रसिद्धतेसाठीचा, अध्यात्मनिष्ठ कर्मसिद्धांत श्री ज्ञानेश्वरीच्या मांडणीतून सिद्ध करून; वैश्विक कल्याणात्मक भूमिकेने, भारतीय सांस्कृतिक राष्ट्रसिद्धतेचा पुनर् पाया घातला. शांतीब्रह्म संतश्रेष्ठ एकनाथांनी श्रीमद्भागवताचा सनातन सांस्कृतिक राष्ट्रनिर्मिती भावनेचा अढळ खांब देत रामतत्त्वाचे पुनर् जागरण केले.

भागवत संतपरंपरेतील संत पांडुरंग-विठ्ठल स्वरूपातील, परब्रह्म श्रीकृष्ण भक्तीचे जागरण करीत, वैश्विक भावनेसह जगद्गुरु तुकोबारायांच्या सांगीनुसार, दिंडीपरंपरा, कीर्तनपरंपरा, ज्ञानकथापरंपरा या माध्यमातून पुरुषार्थपूर्ण भारतीय सनातन सांस्कृतिक राष्ट्रबांधणीचे कार्य अथकपणे करीत आहेत.

## (८)

# भाग्ये नरदेह लाभला – उत्सव साधा

अवघी सृष्टी हे परब्रह्मस्वरूपच आहे. मानवदेह अर्थात नरदेह हे रूपही परब्रह्मस्वरूप आहे. त्या देहाठायी, आत्मरूप नांदते आहे. या आत्मरूपाच्या स्वसंवेद्य अस्तित्वानेच, देह जीव म्हणून प्रसिद्ध आहे. परब्रह्माचे स्वरूप सच्चिदानंदरूप असे आहे. स्वसंवेद्यतेने, आत्मरूप नित्य आनंदमग्न असते. सच्चिदानंदस्वरूपता हाच निर्गुण, निराकार, निर्विकार, महाशून्य, केवल, अविनाशी, स्वसंवित्ती, स्वसंवेद्य परिपूर्णता अशा परमात्म्याचा अर्थात परब्रह्माचा स्वभाव आहे. हाच स्वभाव स्वरूपतः जीवाचा असणार हेही उघड आहे. सगुण, साकार देहबद्धतेमुळे पंचभूतात्मकतेचे स्वभाव देहाला वासना देहरूप देतात. या पृथगात्मतेमुळे देह अज्ञानवशतेने आत्मरूपाला बद्ध भ्रामक अशा, अर्थात विनाशी, विकारी आणि आवेगमर्यादित अशा, वासनादेहाच्या चलनात गुंतवतो. सगुण, साकार, सविकार, मर्त्य असे देहरूपच सत्य आहे; असा देहाहंकार निर्माण होऊन; जीवाचे जगतात वर्तन सुरू होते. या तात्कालिक अज्ञानअहंकारवशतेने, जीवाचे जगतातील जीवन, दुःखमूलक भासू लागते. तात्कालिक वासनातृप्तीलाच सुख मानण्याकडे या बद्ध जीवाची लालसा दुणावते आणि दुःखाला कारण होते. 'मेल्याशिवाय स्वर्ग लाभत नाही' ही सर्वश्रुत व बहुमान्य उक्ती, मानव देहाच्या टोकाच्या निरर्थकतेचे विनाशित्वाचे द्योतक म्हणून पुढे येते.

मुळात मानवदेहाच्या ठिकाणी 'मी' म्हणजे देहरूपता, असा निर्माण झालेला अहंकारच मायावी, भ्रामक असा असतो. ज्या आत्मरूपाच्या अस्तित्वाने देहाला जिवंत असे अस्तित्व लाभलेले असते; त्या मुलभूत अस्तित्वाचाच अर्थात स्वस्वरूपाचाच अज्ञानवशतेने, अविद्येने अथवा मायेमुळे विसर पडलेला असतो.

आत्मरूपाची स्वसंवेद्यता ज्या 'मन' या आत्मस्वरूप अस्तित्वाने प्रतीत

होते; ते 'मन'च सगुण, साकार, सविकार वासनादेहाच्या आधीन होते. आत्मरूपच बद्धपणे प्रकटते आहे; अशी अवस्था निर्माण होते. त्यातूनच देहाहंकाराला जगतातील, देहाच्या वर्तनात विशेष महत्त्व प्राप्त होते. मानवी देहाची बद्धावस्था त्याला ठायीच्या आत्मरूपापासून वंचित करते. हीच गोष्ट मानवी जीवनात, षड्रिपूमूलक, दुःख, दैन्य, दारिद्र्य, नैराश्य यांची अनुभूती घडविते. जगद्गुरु संत तुकोबाराय याच अवस्थेचे वर्णन, 'सुख पाहाता जवा पाडे । दुःख पर्वता एवढे' असे करतात. आनंद अनुभवणे हा आत्मरूपाचा स्वभाव आहे. त्याच स्वाभाविक आनंदानुभूतीला जीव पारखा होतो. हा निखळ आनंद सच्चिदानंदस्वरूप आत्मरूपाने अनुभवणे; ही आत्मरूपाच्या ठायीची स्वसंवेद्यता बाधित होते. आनंद मिळविण्याची धडपड मायावशतेने भ्रामकतेत अडकलेली असते. मानवेतर जीवांनाही कदाचित हीच अनुभूती असेल. मानवांप्रमाणे मानवेतरांनी, यांविषयी सखोल चिंतन करून जीवनासाठी सारणी, धर्मधारणा, भाषा व भाषाशास्त्र, नीतीशास्त्रे, सामाजिक, राजकीय अर्थविषय आदी मानव्यशास्त्रे आणि भौतिक, रसायन, भूशास्त्रे, खगोलशास्त्रे यांशी असलेल्या संबंधाची चर्चा केलेली दिसत नाही. मानवाचा मात्र हा सारा खटाटोप करण्याची परंपरा दिसते. एवढेच नव्हे तर बद्धतेतून, मुक्त, सच्चिदानंदस्वरूप होण्यासाठी मार्गदर्शन केलेले दिसते.

श्रीमद् भागवत पुराणामध्ये मायावशतेचे केलेले विश्लेषण यादृष्टीने अधिक मूलगामी विवेचन वाटते. मराठीमध्ये 'एकनाथी भागवत' या संत श्री एकनाथ महाराजांनी लिहिलेल्या ग्रंथावरील गद्य भावानुवाद करतांना, भागवताचार्य विद्यावाचस्पती अजित महादेव कुलकर्णी, मायेचे मुख्य लक्षण स्पष्ट करतांना म्हणतात, 'मग मूळ माया म्हणजे काय? तर जगात उत्पत्ती, स्थिती व लय करणारी ही शक्ती म्हणजे माया असून; ती माया तीन गुणांनी विभागली जाते. जसे सूर्याला अग्निविषयक संकल्प नसतो त्याप्रमाणे शुद्ध स्वरूपामध्ये कसलाच संकल्प नसतो; तरी ती दिसते ती 'मूळ माया' होय. हे स्वरूप पूर्णपणे निर्विकल्प असते. या ठिकाणी 'मीपणाचे' स्फुरण असते ती 'मूळमाया' समज. या मूळमायेमुळे, 'मी मला दृष्टीने पाहावे, माझ्याशीच मी गोष्टी सांगाव्यात, माझी मलाच भेट व्हावी' असे म्हणतो, माझी मलाच अत्यंत प्रीति आहे, माझ्यामध्येच मी रममाण व्हावे. माझ्या बोधाने मला माझी प्राप्ती व्हावी, मीच मला आलिंगन द्यावे, माझा

मीच उपभोग घ्यावा, मला मीच मिळावे, स्वामीसेवक या नात्याने माझे मीच नियमन करावे असे भगवंताला आठवावे. यातूनच पंचभूते व भौतिके निर्माण झाली. या स्फुरणानेच चार वर्ण, चारही खाणी, चारही युगे, चार वाणी, चारही पुरुषार्थ आणि चार लक्षणांनी, चारमुक्तीचे प्रकाराची मांडणी स्फुरणातून झाली. ते स्फुरणच तीन गुण उत्पन्न करून; त्रैलोक्याची रचना करिते झाले. त्याने ज्ञान, ज्ञाता व ज्ञेय हे त्रिपुटीचे कार्य असून कर्महीही तीन प्रकारचे झाले. अशा प्रकारे मूळचे स्फुरणच एकपणामध्ये अनेकपणाचे रूप उत्पन्न करते. ते पूर्णपणाने अखंडच असते. कुंभार जी जी मडकी करतो त्यात आकाश हे असतेच. त्याप्रमाणे पंचमहाभूते व भौतिक शरीरे ह्यांमध्ये श्रीहरी अंतर्बाह्य भरलेला असतो. तेव्हा ऐक्यरूपानेच सारी महाभूते जी आकारास आली तीच 'माया' होय. भूतभौतिकादि जी स्फूर्ति स्फुरते तिला मात्र माया स्वसत्तेने प्रकाशित करू शकत नाही. या मायेचा प्रकाशक तो चिन्मूर्ति परामात्माच सर्व भूतात प्रविष्ट झालेला भासतो. तो चिद्घन परमात्माच मायेचे मुख्य लक्षण प्रकाशित करतो आणि तोच भूतात्मा भूतांमध्ये वास्तविक नसलेलेच प्रवेश केलेला दाखवितो.' सद्गुरु श्रीधर दत्तात्रेय सेवा प्रतिष्ठान, पुणे यांनी प्रसिद्ध केलेल्या या भावानुवादात परब्रह्म आणि मूळमाया यांचे संबंध स्पष्ट करून; स्वरूपाचा स्वभाव वर्णन केला आहे. हे माया स्वरूप ठायीच्या स्वसंवेद्य आत्मरूपाला स्वभावतः अवगत असते; हे ओळखणेही त्यात आत्मरूपाधीन अशा मनाला ज्ञात होऊ शकते. याकरिता मानवी देहाने हा संबंध लक्षात घेऊन; मायापटल दूर करण्याचा निकराने प्रयत्न करायचा असतो. म्हणजेच जीवाठायी असलेले आत्मरूपच परमात्म स्वरूपाने मनोस्वरूपपणे अनुभूत होते. याकडे संत एकनाथांनी लक्ष वेधले आहे.

वास्तविक ऋषी, मुनी, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, चिंतक, कवि, लेखक, कलावंत आदी लोकधुरिणांनी यासाठीच ठायीचे आत्मरूप अनुभूत करून परमात्म्याशी मनोस्वरूपाने स्वरूपपणे सिद्ध होण्यासाठी, मानवी देहाचा उपयोग करावा असे प्रतिपादिले आहे. कारण मानवेतरांपेक्षा मानवाला हेच तर आगळेवेगळे संवेदन, परमात्म्याने बहाल केले आहे. हेही त्याचेच स्फुरण होय. मानवी देहालाच केवळ, परमात्म्याचे आद्य स्वसंवेद्य आत्मरूप अर्थात सच्चिदानंदस्वरूप अवगत होऊन; अद्वैत सिद्ध करून आनंदमग्न होता येते. भ्रामक सुखदुःखाच्या मायावी फेऱ्यातून स्वरूपाच्या ज्ञानाने, सच्चिदानंदस्वरूप होण्याची शक्ती मानवा ठायी

आहे. मात्र मायेतील हे अज्ञान अर्थात भ्रामकता वेळीच ओळखून आपल्या जीववृत्तीला आत्मवृत्तीचे वळण लावून मनोस्वरूप सिद्ध करण्याचा प्रयत्न करावा. याचाच अर्थ मानवी देहाने उत्सव करावा; असे संत एकनाथांच्या भागवतांच्या माध्यमातून प्रबोधित होते. वेदशास्त्रांची हीच सांगी शास्त्रकारांनी शास्त्रांतून आणि भागवत संतांनी आपल्या अभंगवाणीतून मोठ्या पोटतिडकीने, भक्तियोग मार्गांतर्गत सांगितली आहे.

मानवी देहाने स्वस्वरूप अर्थात आत्मरूप मनोस्वरूपाने ओळखून; आत्मरूपाच्या स्वसंवेद्यतेचा उपयोग, ज्ञानविज्ञानात्म प्रयोग करण्यासाठी केलेला दिसतो. ज्याला सामान्य लोक चमत्कार म्हणतात. तशा चमत्कारांची मालिका योगी, सिद्ध, ऋषी, मुनी, संत अशा मानवी देहांच्या विभूतिमत्त्वांच्या चरित्र वर्णनात आलेली दिसते. वास्तविक मानवी देहाच्या ठिकाणी असलेल्या आत्मरूपाच्या स्वसंवेद्यतेचा अर्थात मनोस्वरूपाचा विनियोग करतांना, देह हे केवळ साधन असून; त्या पंचभौतिक देहाने आत्मस्वरूपातून प्रकटलेल्या मूळमायेत घडणाऱ्या सर्व स्फुरणांप्रमाणे मानव स्फुरण घडवू शकतो. कारण तीच स्वसंवेद्य शक्ती त्याच्या ठायीच्या आत्मरूपातही असते. देहाहंकार टाकून आत्माहंकार प्रकट करण्यासाठी, देहाला नियमित केले की हे स्फुरणकार्य घडू शकते. यासाठीच तर ऋषींनी योगशास्त्रांची मांडणी करून, मार्गदर्शन केले आहे. जगतात कोणताही चमत्कार नसतो. ते केवळ निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित स्वसंवेद्य असे स्फुरण असते. 'भारतीय इतिहास व संस्कृतीचा यथार्थ अभ्यास' या खंडात्मक ग्रंथ मालिकेतील 'अद्वितीय कर्मयोगी श्री आद्य शंकराचार्य' या 'श्री वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर – भीष्म' प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात संत ज्ञानेश्वरांच्या विभूतिमत्त्व संदर्भातील पार्थिव भिंत चालविणे, चांगदेव वाघावर बसणे, रेड्याने वेदमंत्र म्हणणे इ. चमत्कार म्हणून उल्लेखिल्या जाणाऱ्या कथांची उदाहरणे देऊन ''संकल्पादेव तत श्रुतेः'' (ब्रह्मसूत्र ४.४.८) या सूत्राचा– ''ब्रह्मैक्य साधलेला मनुष्य केवळ स्वतःच्या इच्छेने असे चमत्कार घडवू शकतो याला वैदिक वचनांचा आधार आहे'' असे नोंदवून, माणूस अर्थात योगी निसर्गाविरुद्ध वागत नाहीत, असे स्पष्ट करून; 'आधुनिक विज्ञानाधारे चमत्कारांचे स्पष्टीकरण' या मथळ्याखाली, 'चमत्कार म्हणजे काय? ज्या घटना सर्वसामान्य आणि ज्ञात नियमांनी घडून आल्याचे दिसत नाही त्या घटनांना चमत्कार म्हणतात.' अशी

चमत्काराची व्याख्या करून; कोणतीही गोष्ट चमत्कार नसते; तर केवळ ब्रह्मैक्य अर्थात आत्मरूपस्वरूप स्थिती प्राप्त झाली की स्वसंवेद्यतेने मानव कोणतीही गोष्ट करू शकतो; कारण त्यात स्वाभाविक स्फुरणाने कायिक आणि रासायनिक प्रक्रियांतून रूपांतरण घडत असते; असे स्पष्ट केले आहे. आजचे वैज्ञानिक शोध हेही युगानंतर चमत्कार वाटतील. खरे तर आपल्या भोवती घडणारी प्रत्येक घटना एक चमत्कार आहे. हे स्पष्ट करून सांगितले आहे. हाच डोळस संदेश देतांना संत तुकोबारायांनी 'आम्ही वैकुंठवासी । आलो याच कारणासी । बोलले जे ऋषी । साच भावे वर्ताया ।।' असे म्हटले आहे.

मानवदेह अर्थात नरदेह हे एवढे विकसित प्राणीरूप आहे की नरदेहाला अद्वैत सिद्धीने अर्थात योगमार्गे, आत्मानुभवी अर्थात सच्चिदानंद मग्न होता येते. मात्र त्यासाठी मायापटल अर्थात अज्ञान दूर करून; ज्ञान, भक्ती, कर्म आदी योगमार्गांचा अवलंब करीत उत्सव साधला पाहिजे. म्हणून मध्ययुगीन संतांनी नरदेहाचे सार्थक करा, असे म्हटले आहे. श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी आपल्या विजय यात्रेतून हाच संदेश दिला आहे.

सांख्य दर्शनात आत्मा-जीवात्मा या संदर्भाने चर्चा करतांना जीवात्म्यांच्या अर्थात नरदेहांच्या, अर्थात मानवदेहातील आत्मरूपाने प्राप्त सामर्थ्याची चर्चा करून; मानवदेहच ईश्वरस्वरूपाने कार्य करू शकतो, असे स्पष्ट केले आहे. त्यासाठी शरीर, प्रकृती, सृष्टी यांचा संबंध, आत्मरूपाविषयीचे ज्ञान, या सर्व गोष्टींचा ठायीच्या स्वसंवेद्यतेने अनुभव घेणे आवश्यक आहे; असे सूचित केले आहे. महर्षी अगस्त्य संहितेत रामतत्त्व अर्थात सच्चिदानंदस्वरूपाची साधना स्पष्ट करून; मानवी देहाला आत्मरूपात्मकतेने थेट कार्य करता येते हे स्पष्ट केले आहे.

मध्ययुगीन संतांनी नरदेहाची अर्थात मानवी देहाची महती वर्णन करून; नारायणस्वरूपसिद्धी प्राप्त करता येते. अर्थात ठायीच सच्चिदानंदस्थिती अनुभवता येते त्यासाठी भक्तिसाधना अर्थात उत्सव साधना सुचविली आहे.

(१) संत श्री निवृत्तिनाथ महाराज म्हणतात-

**देहाच्या दीपकीं एकी वस्तु चोख । असोनियां शोक कां करितोसी ।।१।।**
**देहभरि आत्मा नांदे निरंतर । असतां हा विचार कां धांवतोसी ।।२।।**
**तुझें तू पाही आहे तें घेई । एकरूप होई गुरुखुणें ।।३।।**

**निवृत्तिचें सार हरिरुप सदा । नित्य परमानंदा रतलासे ।।४।।**

(स.सं.गाथा नि. २८७)

ठायीच नित्य परमानंद स्वभावाने असलेले आत्मरूप ओळखून तो परमानंद जतन करणारे कर्म करावे, अर्थात मायापटल अर्थात अज्ञान नाहिसे करून; सदा हरिरूप राहण्याचा उत्सव साधावा.

(२) संत श्री माउली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

**उपजोनि संसारीं आपुला आपण वैरी । मी माझे शरीरीं घेऊनिं ठेला ।**
**या देहातें म्हणें मी पुत्र दारा धन माझे ।**
**परि काळाचें हें खाजें ऐसे नेणतु गेला ।।१।।**
**कामक्रोधमदमत्सराचेनि गुणें । बांधला आपण नेणे भ्रमितु जैसा ।**
**मिथ्या मोह फांसा शुक न कळे जैसा । मुक्त परि अपैसा पळो नेणें ।।२।।**
**जळचर आमिष गिळी । जैसा का लागलासे गळीं ।**
**आपआपणापें तळमळी । सुटिका नाही ।।**
**तैसे आरंभी विषयसुख गोड वाटे ।**
**इंद्रिया फळपाकीं पापिया दुःख भोगी ।।३।।**
**राखोंडी फुंकितां दीप न लगे जयापरी ।**
**तैसा शब्द ब्रह्मकुसरी ज्ञान न पवे ।**
**व्रत तप दान वेचिलें पोटा ।**
**दंभाचा खटपटा सिणतु गेला ।।४।।**
**मृगजळाची नदी दुरूनि देखोनि । धांवे परी गंगोदक न पवे तान्हेला ।**
**जैसा तैसें विषयसुख नव्हेचि हित ।**
**दुःख भोगितो बहुत परि सावधान नव्हे ।।५।।**
**परतोनि न पाहे धांवतो सैरा । करितो येरझारा संसारींच्या ।**
**ज्ञानदेव म्हणे बहुता जन्मांचा अभ्यासु । तरीच होय सौरसु पराब्रह्मी ।।६।।**

(स.सं.गा.ज्ञा. ५०६)

वासनादेहाच्या वासनावृत्ती विळख्यात गुरफटून आत्मरूपाच्या आनंदमग्नतेला पारखा होऊन; दुःख भोगतो असा अनेक जन्मांचा अनुभव असूनही सावध होत नाही. जन्मोजन्मी आत्मरूपाशी स्वरूप होण्याच्या अभ्यासाने परब्रह्म सौरस अर्थात आनंद अनुभवता येतो म्हणूनच मानवी देहाचा उपयोग स्वरूप सिद्ध

करण्याचा उत्सव सतत साधावा.

(३) संत श्री सोपानदेव म्हणतात–

**मन आधीं मुंडी वासनेते खंडी । विठ्ठल ब्रह्मांडी एक आहे ।।१।।**
**मन हें सोंवळे सदा शौच करी । तुज निरंतरीं हरि पावे ।।२।।**
**विवेक वैराग्य ज्ञानाचें सौभाग्य । सोंवळा आरोग्य हरि देख ।।३।।**
**सोपान नेणे सलगीचा सोंवळा । त्याने वेळोवेळां स्मरे हरि ।।४।।**

(स.सं.गा.सो. ३५)

ब्रह्मांड अर्थात देहाठायीही विठ्ठलच आहे. अर्थात पूर्ण सोवळे आत्मरूप आहे. ते मनाने स्वरूप होऊन; अनुभवले तरच सलगीचा सोंवळा अर्थात सच्चिदानंद सुखसोहळा असा उत्सव साधता येईल. शाश्वत आनंदोत्सवाचे मर्म संत सोपानदेव सांगतात.

(४) संत श्री मुक्ताबाई म्हणतात–

**नामबळें देहीं असोनि मुक्त । शांति क्षमाचित्त हरिभजनें ।।१।।**
**दया धरा चित्तीं सर्वभूतीं करुणा । निरंतर वासना हरिरूपी ।।२।।**
**माधव मुकुंद हरिनाम चित्तीं । सर्व पैं मुक्ति नामपाठें ।।३।।**
**मुक्ताईचें धन हरिनामें उच्चारू । अवघाचि संसारू मुक्त केला ।।४।।**

(स.सं.गा.मु. २६)

नामभक्ति उत्सवाने मायामयी संसारातून मुक्त होऊन, मानवदेहाठायीच जीवनमुक्ततेचा आनंद अनुभवता येईल, असे संत मुक्ताई म्हणतात.

(५) संत श्री नामदेव म्हणतात–

**देह पडे तंव देहाचा अभिमान । परि न करी अज्ञान आत्महित ।।१।।**
**मी माझें म्हणतां गेले नेणों किती । रंक चक्रवर्ति असंख्यात ।।२।।**
**क्षणक्षणा देह आयुष्य पैं काटे । वासना ते वाढे नित्य नवी ।।३।।**
**मोहाची सोयरीं मिळाली चोरटी । खाऊनी शेवटीं घर घेती ।।४।।**
**जंववरी संपत्ति तंववरी हे सखे । गेलीया तें भुकेंजैसे ।।५।।**
**नामा म्हणे केशवा मी तों तुझा दास । मज आहे विश्वास तुझे नामी ।।६।।**

(स.सं.गा.ना. १९०७)

आत्मानुभूतीनेच केवळ आनंदानुभूती मिळू शकेल. अन्यथा वासनादेह वासनाधीन होऊन; मायेत अडकून भ्रामक अशा सुखदुःखाच्या जाळ्यात स्वतःचा अखेर

घात करून घेतो. मानवी देह आहे तोवरच नामभक्तीने केशवस्वरूप होणे शक्य आहे. भक्तिउत्सवाने ठायीच सच्चिदानंदस्वरूपता प्राप्त होऊन आत्महित साधेल असे नामदेव म्हणतात.

(६) संतश्री जनाबाई म्हणतात–

**जन्मा येऊनिया देख । करा देहाचें सार्थक ।।१।।**
**वाचें नामविठ्ठलाचें । तेणें सार्थक देहाचें ।।२।।**
**ऐसा नामाचा महिमा । शेषा वर्णितां झाली सीमा ।।३।।**
**नाम तारक त्रिभुवनी । म्हणे नामयाची जनी ।।४।।**

(स.सं.गा.ज.२)

भक्तीने मिळालेल्या मानवी देहाचे सार्थक होईल. मायेत अडकू नका. मायेतून अर्थात दुःखमूलकतेतून सुटून सच्चिदानंद स्वरूप होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे नामभक्तिउत्सव होय.

(७) संत कबीर म्हणतात–

**नरतनु जावे पस्तावेगा । फेरधारन बुरा है ।।**
**पलख ग्याने सबही भ्यावे । काहेकू मूरख रोता है ।।१।।**
**मत भुलोरे बाबा । ये फंद दुर करोरे बाबा ।।धृ।।**
**चंडी भैरव भूत खेचर । काहेकू फत्तर पूजता है ।**
**आलख अल्ला मौजुद मौला । विठ्ठल बिटपर खडा है ।।२।।**
**एक बार जाना पग शीस धरना । जनम मरन दूर करना अच्छा है ।**
**आपने दिलमों भाव भगवतसे । कबीरा कहना मानो है ।।३।।**

(स.सं.गा.कबीर १४)

जन्ममरणाच्या फेऱ्यातून निसटून; सच्चिदानंदस्वरूप होऊन, आनंदमग्न होण्यासाठी अर्थात शाश्वत आनंद अर्थात शाश्वत सुख मिळविण्यासाठी मर्त्य देह आहे तोवरच भगवत भक्तीचा उत्सव साधला पाहिजे.

(८) संत कमाल म्हणतात–

**आऊट हाताका वीरख लगाया । दोनो शाखा उनकू ।।१।।**
**रामनाम का फल बी आये । चाखेना कुई उनकू ।**
**वेदपुराना सूनो कुराना । भूल गये आपआपकू ।।२।।**
**अपना बरख आप लगाया । आपही फल चाखो ।**

**कहे कलाम सुनो भाई साधु । आपने दिलमें देखो ।।३।।**

(स.सं.गा.क. ३१)

साडेतीन हाती देहाला दोन्ही हातांनी कर्म करून, सुखावण्याचा प्रयत्न व्यर्थ होय. रामभक्तीने या देहाचे सार्थक करावे. स्वतःच स्वतःला ओळखून, आत्मरूप स्वरूप मनाने जीवनमुक्त व्हावे, असे वेद्पुराणे व कुराण सांगत आहेत. ते सावध होऊन ऐकावे. देह आहे त्याच्या वासनांचे लाड करून प्रवाहपतित होऊन भवसागरात अडकू नका. आहे त्या नरजन्माने रामस्वरूप होण्यासाठी भक्तिउत्सव करा.

(९) संत मीराबाई म्हणतात–

**कायकूं देह धरी भजन बिन कायकु देह । गर्भवासकी त्रास देखाई धरी वाकी पीठ बुरी ।।भ.१।।**

**कोल बचन करी बाहेर आयो अब तूम भुल परि ।।भ.२।।**

**नोबत नगारा बाजे । बघत बघाई कुटुंब सब देख । ठरी ।।भ.३।।**

**मीरा कहे प्रभु गिरिधर नागर । जननी भार मरी ।।भ.४।।**

(स.सं.गा.मी. ३६)

सच्चिदानंदस्वरूप होऊन आत्मस्वरूपाने जगतात आनंद लुटण्यासाठी गर्भवास भोगून जन्माला आलात, हे सत्यच विसरलात. संसारप्रपंचातच रमलात. सुखदुःखाच्या मायेत गुंतलात. आत्मघात झाल्याचा नगारा वाजतोय ओळखून, कृष्ण भक्ति उत्सवाने आनंद मिळवता येत नसेल, तर देह धारण करण्याचा काय उपयोग?

(१०) संत शेखमहंमद म्हणतात–

**नर देहि पावलास । सद्गुरुताता ।।१।।**

**चंहु खणीचि दुःखे सांगता अपार । येतुसे गहिवर । आठविता ।।छ।।**

**जड देह तरुवर भलताचि घालिघाये । दुःख करुणा नये । कोण्हांलागी ।।२।।**

**ज्या जैंसे आवडे । तो तैसे तोडी । बहुजीव चरफडि । बोलता नये ।।३।।**

**संचित तुझे कृपे । घाये बरे होति । मागुते तोडिति पालव खांद्या ।।४।।**

**पशुमछ आजा पुत्र । शस्त्रें विदारिति । हे दुःखे फजीति । न कळे कोण्हां ।।५।।**

**याति सयाति मध्यें वैराकार चाले । या दुःखाचे घायाळे । हरि पाहतोसि ।।६।।**

**हरि म्हणे प्रलब्धे । भोगिती सुख दुःखे । भक्तिअभक्ति देख । वंदिति निंदति ।।७।।**

**हे श्रीवचन ऐकोन । वैरागें आत्मज्ञान । पाहिले परतोन सेख महंमदिं ।।८।।**

(स.सं.गा.शे.म.३)

उद्भिज, अंडज, जारज, स्वेदज या चारही जन्मातील, अपार मायावश, अज्ञानवश अपारदुःख सोसूनही जड देहाविषयी सावध होत नाही. प्रालब्ध म्हणून मायेतच गुंतून पडता, त्यामुळे सच्चिदानंद सुखापासून वंचित राहता. सद्गुरु कृपेने देहाचे महत्त्व ओळखून त्या देहाला आत्मस्वरूप होण्याकडे वळवून; भक्ति, ज्ञान, वैराग्य साधून आत्मज्ञानाचा आनंद लुटावा, असे संत शेख महंमद म्हणतात.

(११) संत चोखामेळा म्हणतात–

**देहांत अवसान भरलेसे दिसे । म्हणोनी पंढरी निवासे मोकलिले ।।१।।**
**कर्माचें संचित प्रालब्धाचा भोग । न सुटे भोगाभोग निढळीचा ।।२।।**
**तया अक्षरासी न पडे उणे । भोगतो भोगणें सुख दुःख ।।३।।**
**चोखा म्हणे देवा तुझ्याकडे काय । आमुचे तें होय पूर्व कर्म ।।४।।**

(स.सं.गा.चो. ७२)

वासनांचे, अहंकाराचे अवसान देहात भरलेले असल्याने अर्थात मायावश देहाहंकारामुळे संसारप्रपंचातील कौटुंबिक, सामाजिक आदी सुखदुःख भोगण्यातच देहाने वेळ गमावला. देहाठायीचे आत्मरूप पंढरीत निवासाने दृष्ट झाले आणि देहाठायीचे अवसान गळून पडले. देहाहंकाराने आत्मरूपाला पारखे झालो त्यात देवाचा दोष नसून देहाठायीचे स्वरूप माणसालाच अवगत करून; सच्चिदानंदस्वरूप होता येते. ही मानवी देहाची महती पंढरीनिवासात कळली आणि भक्तीने आत्मस्वरूपाचा उत्सव घडला.

(८) संत सोयराबाई म्हणतात–

**पंच हीं भूतें अवघा त्यांचा खळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध आहे ।।१।।**
**तेथें मरतें ते कोण राहतें तें कोण । जयाचें कारण तोचि जाणे ।।२।।**
**वायांचि वोझें घेती आपुलातें शिरी । वाउगे हांवभरी होती वांया ।।३।।**
**सोयरा म्हणे यांचे वाटतें नवल । न कले कांही बोल परमार्थाची ।।४।।**

(स.सं.गा.सो. ५०)

पंचमहाभूतात्मक मानवीदेहाच्या अहंकारवशतेने जीवनात सुखदुःखाचा खल खेळ घडतो. वस्तुतः ज्या आत्म्याच्या योगाने देह जीवदशा अनुभवतो तो आत्मा शुद्ध अर्थात सच्चिदानंद घन असतो. ते अविनाशी आत्मरूप म्हणजेच खरे स्वरूप असते. येतो जातो तो पंचभौतिक, जीव ह्यालाच सत् मानून संसारप्रपंचाचे ओझे अज्ञानाने वाहात बसून हावभरीपणाने मिळालेला मानवी देह वाया घालवितो. हे जाणवत असूनही घडते याचे नवल वाटते. लाभलेल्या नरदेहाचा उपयोग आत्मरूपाचे सच्चिदानंदस्वरूप अनुभवण्याचा उत्सव करण्यासाठी घालवावा.

(९) संत एकनाथांनी 'देह' विषयक विस्तृत विवेचन क्रमबद्धपणे केले आहे. सच्चिदानंद स्वरूपावस्था प्राप्त करून घेण्यासाठी देहाठायीच वेध घेता येतो. क्षणभंगूर सुखदुःखातून निसटून अविनाशी आनंदोत्सव करता येतो हे स्पष्ट करण्यासाठी संत एकनाथ म्हणतात–

**स्थूल देह :–**

**स्थूल देहाचा विचार । हातां आलिया साचार । तेथें दहें अहंकार । विरोनी जाये ।।१।।**

**स्थूल ब्रह्मज्ञान नेत्रीं । स्थूलभोग जागृती वैखरी । हे नव्हे मी ऐसा अंतरी । बोध झाला ।।२।।**

**मग देहें मारितां तोडिता । पूजितां कां गांजिता । नसे हर्षे खेदवार्ता । तया पुरुषा ।।३।।**

**एका जनार्दनी । लीन झाला संतचरणीं । दर्पणामाजी बिंबोनी । दर्पणातीत ।।४।।**

स्थूल देहाचे मर्त्य, विनाशी, क्षणभंगूर असे स्वरूप लक्षात येऊन, आत्मस्वरूपाचा बोध झाला की; देहाहंकार, वासनाधिनता, देहव्यापार यांविषयी उदासीनता निर्माण होऊन; देहाचा उपयोग, आत्मबोध घडविण्यासाठी करता येऊन; आनंदोत्सव साधता येईल.

**सूक्ष्म देह :–**

**ऐसी वाढलिया सद्वासना । जेथे जिराली मनाची कल्पना । इंद्रिये विषय प्राणा । बोध जाला ।।।।**

**लिंग विष्णु स्वप्न कंठस्नान । काल्पनिक भोग जाण । वाचा मध्यमा ऐसी**

**खुण । मिळोनी ठेली त्या पदा ।।२।।**

**तेथे इंद्रिया उर्वसी । आलीया सेजेसा । जयाचिया मानसीं । काम नुठी ।।३।।**

**एका जनार्दनीं बोध । अवघा झाला ब्रह्मानंद । लिंगदेहाचा खेद । वस्तु झाला ।।४।।**

सद्‌वासना वाढविली, अर्थात आत्मस्वरूपाचा बोध झाला की, मर्त्य लिंगदेहाचा अहंकार नाहिसा होतो आणि लिंगदेह हा ब्रह्मानंद प्राप्तीसाठी केवळ साधन अर्थात कथारूप उत्सव होतो.

**कारणदेह :–**

**आतां कारण जें अज्ञान । तेंही गेलें वोसरोन । बोधाचें आसन । बैसले तेथें ।।१।।**

**कारण रूप सुषुप्ति । आनंद भास हृदयीं प्राप्ती । या समस्ताची वस्ती । वस्तु झाली ।।२।।**

**ऐसा असोन वोहोट झाला । ज्ञानरसे पैं भरला । मग सर्वांसाठी देखिला । आत्मबोध ।।३।।**

**एका जनार्दनी आत्म्याची भेटी । तेथें उडाली त्रिगुण त्रिपुटी । मग बोधासी राहटी । जेथे तेथे ।।४।।**

आत्मस्वरूपाचा बोध होताच मानवी देहातील वासनादेह भोगत असलेले भोग भ्रामक वाटू लागतात. मग सर्वांभूती सच्चिदानंदस्वरूपच दिसू लागते.

**महाकारण देह :–**

**महाकारण जें देहज्ञान । त्याचाही साक्षी आत्मा आपणू । जैसा तैसा ये आंबा मुरोन । तैसा तो जाण ।।१।।**

**ऐशी मुराली तुर्या अवस्था । मग साक्षी जाला परौता । तो मुरोनी वस्तुता । वस्तु जाला ।।२।।**

**ऐशी विवेकाची राबणूक । विवेक आत्मा वोळख । एका जनार्दनी परमसुख । प्राप्त झाले ।।३।।**

(स.सं.गा.ए. २५६७, ६८, ६९, ७०)

विवेकाने आत्मानंदस्वरूप झाले की हे कळण्यासाठीचे महाकारणही आत्मस्वरूप वाटते आणि देही विदेही उत्सव सुरू होतो.

(१०) संत तुकाराम महाराज म्हणतात–

**येऊनि नरदेहा विचारावें सार । धरावा पैं धीर भजनमार्गी ।।१।।**
**चंचळ चित्तासी ठेवूनियां ठायीं । संताचिये पायीं लीन व्हावे ।।२।।**
**भावाच्या पैं हातें धरावा निश्चय । तेणें भवमय देशधडी ।।३।।**
**नामापरतें जगीं साधन सोपें नाहीं । आवडीनें गाई सर्वकाळ ।।४।।**
**तुका म्हणे वंश धन्य त्या नराचा । ऐसा निश्चियाचा मेरू झाला ।।५।।**

(स.सं.गा.तु. ३३४७)

**देह तंव आहे प्रारब्धा अधीन । याचा मी कां सीण वाहूं भार ।।१।।**
**सरो माझा काळ तुझिया चिंतनें । काया वाचा मनें इच्छितसें ।।२।।**
**लाभ तो न दिसे याहूनि दुसरा । आणिक दातारा येणें जन्मे ।३।।**
**तुका म्हणे आलों सोसीत संकटें । मी मागें वोखटें आहे देवा ।।४।।**

(स.सं.गा.तु. ३००४)

**आनंदाचे डोहीं आनंदतरंग । आनंदचि अंग आनंदाचें ।।१।।**
**काया सांगों झालें कांहीचियाबाई । पुढें चाली नाहीं आवडीनें ।।२।।**
**गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथींचा जिव्हाळा तेथेंबिंबे ।।३।।**
**तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा आला ।।४।।**

(स.सं.गा.तु. २५८२)

संत तुकोबाराय प्रारब्धाधीन नरदेह आहे, असे निक्षून सांगत. देह हा आनंदाचा डोह आहे हे ओळखून त्या डोहात उठणाऱ्या आनंदतरंगाचा अनुभव घेत, देहाचा विनियोग करावा, असे सुचवितात. भाग्याने चौऱ्यांशी लक्ष योनीतील संचिताने हा नरदेह प्राप्त झाला आहे. सच्चिदानंद, आत्मरूपाने सत्‌च्चिदानंदांचा अनुभव घेण्यासाठीच देहाच्या ठायी अर्थात देहाच्या गर्भात प्रवेश केला आहे, हे जाणवले तर तो सच्चिदानंदाचा ठसा पंचभौतिक नश्वर देहाच्या ठायी प्रकटेल आणि वासनादेह आनंदरूप होईल. आनंद भोगण्यासाठीच तर नरदेह प्राप्त झाला आहे हे तत्त्वसार लक्षात घेऊन; आत्मरूप सच्चिदानंद अशा परमेश्वराचे अर्थात त्याचेच देहरूप अर्थात सगुण असे राम कृष्ण हरी रूपाचे भजन करावे. आत्मरूपाची स्वसंवेद्यता अर्थात मनःस्वरूप देहभावाने चंचल न होऊ देता आत्मस्वरूप करावे म्हणजेच चंचल चित्ताला ठायीच ठेवावे आणि संचिताने मिळालेल्या देहाठायीच्या

आत्मरूपाठायी लीन व्हावे. असा मनोभावाचा निश्चय अभ्यासपूर्वक झाला की, देहभावाने जोडली जाणारी दुःखे देशोधडी जातील. याकरिता नामस्मरणाचा उत्सव करून, आनंदडोहातील आनंदानुभूती घ्यावी. या जन्मात याशिवाय दुसरा लाभ नाही. या दुर्लभ अशा प्रारब्धाने मिळालेला नरदेह आनंदोत्सव करण्यासाठी आहे हे लक्षात घेऊन; अंतरबाह्य, माता आणि गर्भ दोहोंचे ठिकाणी सच्चिदानंद स्वरूपाच्या अनुभूतीचा ध्यास घेणे, हाच नरदेहाने मांडलेला उत्सव होय. हे कळत नाही तोवर नरदेह म्हणजे संकटांची मालिका सोसणे आहे, असे वाटते. त्यातून वाट काढणे आपल्या हाती आहे. त्यासाठी 'सरो माझा काळ तुझिया चिंतने । काया वाचा मनें इच्छितसे' असा उत्सव नरदेहाठायी करतो असे संत तुकोबाराय म्हणतात. उपरोक्त तीन अभंगात नरदेहाची केवळ साधनरूपता, प्रारब्धप्राप्त दुर्लभ नरदेह आणि नरदेहाचे निश्चयपूर्वक आनंदध्येयप्राप्तीसाठी नामस्मरणोत्सव मांडण्याचे प्रबोधन, संत तुकोबारायांनी केले आहे. नरदेहाचे हे दुर्लभत्व समजून घेऊन; कर्म हा उत्सव व्हावा असे सांगतांना नाम भक्ती यासारखे जगात दुसरे सोपे साधन हा उत्सव करण्यासाठी नाही हेही संत तुकोबाराय परोपरीने सांगतात.

(११) संत बहिणाबाई म्हणतात–

**संचितासी दग्ध करी ऐसा कोण । सद्‌गुरुवांचोन जाणमना ।।१।।**
**यालागी सद्‌गुरु असावा उत्तम । जेणें निमे श्रम संसाराचा ।।२।।**
**त्रिविध तापासी कोण करी शांत । सद्‌गुरु एकान्त न जोडतां ।।३।।**
**जन्ममरणाची कथा कैं निवारे । सद्‌गुरु निर्धारें न भेटता ।।४।**
**वासना निःशेष निवारेल तेव्हां । भेटेल तुकोबा सद्‌गुरु तो ।।५।।**
**बहिणी म्हणे माझा जाऊं पाहे जीव । का हो न ये कींव तुकोबा ।।६।**

(स.सं.गा.ब. ४)

संचितामुळे मानवदेह प्राप्ती होते. संचिताप्रमाणे या देहाच्या ठिकाणी सुख दुःख भोगावे लागते. संसार जीवाला श्रम देणारा ठरतो. या देहस्थितीला त्रिविध ताप भोगावे लागतात. या जीवापासून जीवापर्यंत जन्ममरणाचा फेरा सुरू असतो. हा देह वासनादेह असल्यानेच असे सारे काही भोगावे लागते. मात्र जीवाला अर्थात नरदेहालाच ही सगळी देहक्रीडा निरर्थक असल्याचे जाणवते. नरदेहालाच जीवनमुक्त होण्यासाठीची आस लागते. संचितामुळे जीवनमुक्त होण्यासाठी आत्मस्वरूप होण्याची क्रिया घडू शकते एवढा हा नरदेह दुर्लभ आणि प्रगल्भ

आहे. असे असूनही देह भोगमायेत अडकून दुःखी होतो. देहाचे माहात्म्य सद्‌गुरुकृपेने कळते. त्यामुळेच भक्त आत्मस्वरूप असा सच्चिदानंदस्वरूप होऊन सफल होतो. मात्र हे सद्‌गुरुकृपेनेच घडते. सद्‌गुरु तुकोबारायांचे गुरुकृपा व्हावी यासाठी संत बहिणाबाई भक्तिउत्सवाचा आकांत मांडीत आहेत.

(१२) संत निळोबाराय म्हणतात–

**येऊनियां नरदेहा । कांही स्वहित तें पहा ।।१।।**
**नाहीं तरी व्यर्थ जन्म । चिंतितसे विषय काम ।।२।।**
**पशु विषय सेविती । तयापरी तुझी स्थिति ।।३।।**
**निळा म्हणे व्यर्थ गेला । प्राणि भूमिभार झाला ।।४।।**

(स.सं.गा.नि. १३३५)

नरदेह हे अलौकिक साधन स्वरूपसिद्ध करण्यासाठी निर्माण झाले आहे. त्या साधनाचा काही स्वहित पहावे अर्थात ठायीच सच्चिदानंद अनुभव करण्याचा उत्सव करावा यासाठी उपयोग करावा अन्यथा जन्म व्यर्थ होईल. म्हणूनच कर्म पशुवत करू नये.

(१३) संत स्वामी रामदास म्हणतात–

**स्वरूप सांडोनि देह मीच भावी । तो जीव रौरवी बुडवील ।।१।।**
**पचवील नरकीं देहाचें संबंधे । सज्जनाच्या बोधें सांडवलें ।।२।।**
**सांडोनि विवेक भेद महावाक्य । जीवाशिवऐक्य जयाचेनि ।।३।।**
**जयाचेनि तुटे संसार बंधन । तयाचे वचन दृढ धरा ।।४।।**
**दृढ धरा मनी अहं ब्रह्म ऐसें । सांगतो विश्वासे रामदास ।।५।।**

(स.सं.गा. राम परिशिष्ट पंचि.५५)

**देहबुद्धि बहु काळाची जुनाट । नवी आहे वाट सार्थकाची ।।१।।**
**सार्थकाची वाट भ्रांतीनें लोपली । जवळी चुकली असोनिया ।।२।।**
**असोनिया देव जवळी चुकला । प्राणी भांबावला मायाजाळे ।।३।।**
**मायाजाळ दृश्य तुटे एकसरें । जरि मनीं धरे स्वस्वरूप ।।४।।**
**स्वस्वरूपनिश्चयें समाधान होय । रामदासी होय स्वरूपाची ।।५।।**

(स.सं.गा.राम.परि.पंचि ६४)

देह देहभावाने जगण्यासाठी लाभला नाही तर देहस्वरूप भावाने जीवन व्यतित करण्यासाठी आहे. हा स्वरूपभाव ठायीच आत्मरूपाने नांदतो आहे. देहभावाने

जगतांना आत्मस्वरूपाचा विसर पडतो. पंचभौतिक देह स्वाभाविकपणे भौतिक वासनांच्या गुणांच्या मध्ये बद्ध होतो. देहभावच खरा वाटू लागतो. देहाने घडणारे वर्तन देहभाव सापेक्ष तथा जगत सापेक्ष घडू लागते. अर्थात बद्धपणाने घडू लागते. नश्वर परिवर्तनीय देहाप्रमाणेच वर्तनही तात्कालिक सुखदुःखात्मक वाटू लागते. शाश्वत सुखाला अर्थात जीवनमुक्त अनुभूतीला पारखे होते. खरे ध्येय शाश्वत सुख, अर्थात स्वरूपस्थिती प्राप्तीचा अनुभव घेणे, हे आहे. त्यासाठीच तर ८४ लक्ष योनीतून अलौकिक सुख प्राप्त करून देण्याची क्षमता असलेला देह लाभला आहे. शाश्वतसुख अर्थात सच्चिदानंदरूप ठायीच अनुभवणे ह्यातच लाभलेल्या नरदेहाचे अर्थात मानवजीवनाचे अर्थात 'स्व'चे म्हणजेच ठायीच्या आत्मरूपाचे अर्थात आत्मारामाचे अर्थात चैतन्याचे स्वहित आहे. रामदासस्वामी याच स्वहिताविषयी प्रबोध करतात. हे स्वहित साधावयाचे तर देहाने घडणारे वर्तन तथा कर्म सच्चिदानंद लक्ष्यी झाले पाहिजे यासाठीचा मार्ग म्हणजे भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग अथवा भक्तिज्ञानवैराग्यपूर्ण कर्म हा आहे. म्हणजेच कर्म सच्चिदानंद अनुभूतीसाठीचा उत्सव आहे, असा अभिप्राय स्वामींनी व्यक्त केला आहे.

मध्ययुगीन संतांनी मानवदेहाविषयी केलेल्या चिंतनाविषयी काही वैशिष्ट्ये संतांनी मांडलेल्या अभंगरचनांमधून पुढे येतात–

१) भूतमात्रांना प्राप्त झालेल्या सगुणरूपापेक्षा मानवाला प्राप्त झालेल्या सगुणरूपाचे वैशिष्ट्य म्हणजे, त्याला मिळालेले विकसित सगुणरूप आणि त्या साहाय्याने संपूर्ण निसर्गाला मानवकेंद्री स्वरूपात, आकार देण्यासाठी मिळालेले प्रतिभा आणि कौशल्याचे वरदान होय.

२) अन्य चतुरखाणी अर्थात उद्भिज, स्वेदज, अंडज, जारज अशा खाणींप्रमाणे आहार, निद्रा, भय आणि मैथून या विकारांना स्वनिर्मित हवे तसे आकारित आणि नियमित करण्याचे, सामूहिक प्रतिभाजन्य, व्यवस्थापन, मानवाने संघमनाने भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक तत्त्वज्ञानविषयक, राजकीय, न्यायविषयक, भविष्यविषयक, अवकाश आणि भूगर्भविषयक, वैद्यक, कृषीविषयक आहारविषयक अर्थात पाकविषयक, अशा विविध शास्त्रांबरोबरच या सर्व शास्त्रांना नियमित करू शकणारे योगशास्त्राचे मंडन करून; मानवी समूहजीवनाला सारणीचे स्वरूप दिले आहे.

३) या जीवनसारणीत मानवी जीवनाला शाश्वत आनंद अर्थात सुखप्राप्तीचे

निश्चित असे ध्येय दिले.

४) मानवी जीवाला आपल्या अस्तित्वाचे स्वरूपसंबंधज्ञान घडविण्याचा सतत प्रयास करून; ठायीच्या आत्मरूपाला पूर्णब्रह्मस्वरूपाचे स्वरूप असल्याचे ज्ञान बहाल केले. सोहऽम, अहंब्रह्म अस्मि, या जाणिवेचे आत्मविश्वासात्मक सामर्थ्य बहाल केले.

५) या ज्ञान प्रक्रियेत सत्त्व, रज, तम अशा त्रिगुणात्मक वासनात्मक देहभावाचे ज्ञान घडवून; पंचभौतिक देहभाव व त्यानुसार अन्य प्राण्यांप्रमाणे जीवनार्थ कलहासह भोगकेंद्री जीवनभान घडविले त्याचबरोबर जीवाठायी असलेल्या शाश्वत निर्गुण आत्मरूपाचे ज्ञान घडवून देह आणि आत्मा यांचा संबंध स्वसंवेद्य मन या अजड अस्तित्वाचे, देहभाव आणि आत्मभाव संबंधाने स्वरूप संबंधविषयक ज्ञान घडविले.

६) देहाची नश्वरता आणि आत्मरूपाची अक्षरता अर्थात अविनाशित्वता, अर्थात शाश्वतता यांचे ज्ञान दिले.

७) जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या अवकाशात देह म्हणजेच मी, देहाच्या वासनांची पूर्ती म्हणजेच जगणे, समूहजीवनात देहभावाने कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, नैसर्गिक, धार्मिक जीवनाचा संबंध लक्षात घेऊन; उद्दिष्ट मालिकांच्या पूर्ततेसाठी संघर्षात्मक जीवन व्यतित करतांना, उद्दिष्टपूर्ती म्हणजे सुख आणि संघर्ष म्हणजे दुःख या जाणिवेने कर्म करून त्यालाच पुरुषार्थ समजणे म्हणजे क्षणभंगुरतेच्या मोहात अडकून जीवन निरर्थक करणे, दुःखकारक जाणीव भोगणे होय. अर्थात देहभावात्मक संबंधांच्या काल्पनिक, विनाशी पाशात देह झिजविणे अर्थात मायापाशात अडकणे होय ह्याची जाणीव करून दिली. ऐहिक जीवन जाणिवेने पुरुषार्थ करणे म्हणजे भ्रामक, क्षणभंगुर मिथ्या गोष्टींमध्ये लाभलेला देह झिजविणे होय. जन्म हातात नाही, मृत्यू तर येणारच हे ठावूक असूनही देहभावाच्या आधीन जाऊन, अंतरीच्या चैतन्याला, शाश्वत अशा अस्तित्वाला पारखे होणे होय. संघर्ष म्हणजे दुःख हाच जीवनाचा आत्मा आहे असे मानणे म्हणजे दोरीलाच सर्प समजून धोपटणे होय. जीव अर्थात पंचभौतिक देह त्यातील जिवंतपण अर्थात चैतन्य अर्थात आत्मरूप मिळून जे कर्म घडणार त्याला जीवन असे म्हणावे. ते चैतन्य किंवा आत्मरूप विसरले तर देह केवळ पार्थिव निर्माल्यच ठरतो. हे लक्षात न घेता; ज्या आत्मरूपामुळे देहाठायी संवेद्यता, अर्थात जाणीव

निर्माण झाली, त्या आत्मरामाचीच जाणीव न करून घेता वासनांच्या गर्तेत भोग भोगणे म्हणजे नरजन्म अर्थात मानवी देह व्यर्थ गमावणे होय याचे भान संतांनी परोपरीने आणविले.

(८) मानवी समूहाने, चराचरातील मानवी जीवनाला सुलभता, शाश्वतता, स्वत्वसिद्धतेसह समायोजकता, सर्वात्मक सानंदता प्राप्त करण्यासाठी देहकर्माला, कर्तव्यतत्परतेचे परिमाण देऊन; संसारप्रपंचाची मांडणी केली. प्रपंचाची मांडणी म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंच भौतिकाचा मानवकेंद्रित विनियोग कोणत्या स्वरूपात केल्यास, मानवी जीवन सुलभ आणि सर्वांना सुरक्षित सानंद वाटेल; यासाठी संयम, मर्यादा आणि विवेक यांसह वर्तनसारणी मांडणे होय. यांत चराचराचा मानवकेंद्री अर्थात मानवी जीवकेंद्री विचार केला आहे. या सारणीत सत्यनिष्ठा, परस्पर प्रेममयता आणि सर्वांभूती करुणा अपेक्षित आहे. या अपेक्षेचे कारण हे चराचर म्हणजे मानवी देहाठायीच्या आत्मरूपाची अर्थात चैतन्यतत्त्वाचीच रूपे आहेत, याची जाणीव मानवाला होऊन; त्याच्या वर्तनाला निरपेक्ष कर्तव्यतत्परतेचे भान यावे अशी अपेक्षा हे होय. हे तर संतांनी स्पष्ट केलेच, त्याचवेळी देहभावाने स्वार्थपर वर्तन करू लागल्याने, जीवन संघर्ष दुःखरूप झाला त्याचेही भान आणून दिले. आत्मस्वरूप हे सच्चिदानंदस्वरूप असल्याने ते निर्गुण, निराकार, निर्विकार आहे. प्रपंच ही त्या आत्मरूपाच्या स्वसंवेद्यतेची क्रीडा आहे. क्रीडेतील, कौशल्याधिष्ठित, प्रयत्नस्वरूप, संघर्ष हाही आनंददायक असतो. याचाच अर्थ माणसाला लाभलेले जीवन अर्थात जीव अर्थात पंचभौतिक देह हे त्या स्वसंवेद्य आत्मरूपाचे देवालय आहे. देह म्हणजे आत्मरूप नव्हे, परंतु आत्मरूपानेच त्या देहालाही देवालय हे आनंदरूप अर्थात उत्सवरूप प्राप्त झाले आहे. आत्मरूपाशिवाय देहाला अर्थ नाही. ह्याचे भान माणसाला येऊ शकते एवढा त्याचा देह, आत्मरूपसंयोगाने समर्थ झाला आहे, हेही संतांनी प्रदर्शित केले.

(९) या अलौकिक मानवी देहाचा उपयोग आद्य स्वसंवेद्य आत्मस्वरूप असे मनोस्वरूप होऊन शाश्वत आनंद भोगता येतो; त्यासाठी भक्तीचा मार्ग संतांनी दाखविला. सगुण देहाला स्वाभाविक अशा सगुण रूपातील देवाचे दर्शन घडवून; भक्तीने ज्ञान अवस्थेपर्यंत नेऊन, निर्गुण स्वरूपाचा शाश्वत आनंद भोगण्यासाठी सिद्ध होता येते; हे स्वानुभवातून दाखवून दिले. त्यासाठी सद्‌गुरुकृपेचे महत्त्व

सांगितले. अर्थात भक्तीने आत्मरूपाची संवेद्यता जागृत झाली की विनाशी अशा भोगलालसेविषयी वैराग्य प्राप्त होते. जीवनातील सर्व कर्मे निष्काम कर्तव्य म्हणून, सत्य प्रेम करुणेने सर्व कल्याणासाठी घडू लागतात, हे आर्तपणे कथन केले.

(१०) समूहजीवनातील सारणीचा अनुसार सर्वकल्याणासाठी करण्याचा विवेक; भक्ती, ज्ञान, वैराग्य या त्रिपदेने जागृत होतो. असे झाले की जीवनातील सारणीस अनुसरून, समूहजीवनातील संघर्षाला ज्ञानपूर्ण कर्माचे स्वरूप प्राप्त होते. म्हणजेच उद्दिष्ट गाठण्यासाठी ज्ञानवान कर्म असा उत्सव घडू लागतो! जीवनाला असे उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले की, मानवी जीवनातील स्पर्धा, असूया, द्वेष, राग, लोभ, मत्सर, संग्रहवृत्ती, शोषक वृत्तीला विवेकाने संयमित केले जाते. जीवनात सत्यनिष्ठा, सर्वाभूतीप्रेम तथा सहानुभूतीपूर्वक करुणा निर्माण होते. ठायीच प्रकटलेल्या या स्वसंवेद्य आत्मस्वरूपामुळे जीवनातील सर्व यातायातींना शाश्वत आनंदप्राप्तीचे ध्येय लाभते आणि जीवन हाच उत्सव होतो. ''आनंदाचे डोही आनंदतरंग'' अशी, कर्माचे ठिकाणी, एवढेच नव्हे तर, जीवन संघर्षाचे ठिकाणी अनुभूती येऊ लागते. म्हणजे देहभावाने 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वता एवढे' असा अनुभव येतो; तर आत्मसाक्षात्कार झाला अर्थात ठायीचा सच्चिदानंदस्वरूप भाव संवेदित झाला की ''दुःख पाहता नाहीच । अवघे जीवन सुखमय होते ।'' अशी अवस्था प्राप्त होऊ शकते. याकडे संत लक्ष वेधतात.

(११) जीवनाचे स्वाभाविक अंतिम ध्येय मोक्ष होय अर्थात सच्चिदानंदस्वरूपता हे होय. यासाठी मानवनिर्मित विवेकपूर्ण सर्वकल्याणात्मक धर्मपालन, जीवनातील कर्तव्यतत्परतेसाठी 'जोडुनिया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करी' असे अर्थसंपादन आणि निर्गुणाच्या ठायीचे अनेकरूपात स्वसंवेद्यतेने अनुभवन करण्यासाठी काम जीवनाचा अनुसार, असा ध्येयपूर्तीसाठीचा उत्सव करावा लागतो. त्यासाठी धर्मपालन, कर्मयोगअनुसार आणि जीवनव्यवहारातील कर्तव्यतत्परता या मार्गाने, देहभावाविषयी अनासक्त होऊन; कर्म करावे असा आदेशही सर्वच संत परोपरीने करतात.

(१२) जीवन शाश्वत आनंदाने भरून जाण्यासाठी भक्तीचा मार्ग संत सुचवितात. त्यातही सगुणभक्तीतील साकारतेला नाम देऊन; नाम हाच देव अनुभवण्याचे साधन म्हणून संतांनी मानवी जीवनाला वहिवाट करून दिली आहे.

(१३) निर्गुण, निराकार, निर्विकार, महाशून्य, अविनाशी, केवळ,

सच्चिदानंदरूप, आद्य, स्वसंवित्ती, निजरूपाच्या स्वसंवेद्यतेचा आविष्कार प्रकृतिस्वरूपातील, चराचर वस्तुमात्र, प्राणिमात्र या रूपाने प्रकट झाला. त्यातील अत्यंत मौल्यवान, विकसित साकाररूप म्हणजे मानवी देह! या सर्व साकाररूपांचे मूलकारण ते सच्चिदानंदरूप आणि अंतिम लक्ष्यही सच्चिदानंदरूप आहे याकडे संतांनी लक्ष्य वेधले. नश्वरदेहभावाची भ्रामकता क्षणभंगुरता लक्षात आणवूनही; नरदेहाचे महत्त्व परोपरीने सांगितले. सच्चिदानंदस्वरूप होण्यासाठी या नरदेहाने कर्ममय उत्सव मांडून, स्वस्वरूप व्हावे असे संदेशन केले.

(१४) नरदेहाकडे अर्थात मानवी देहाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही तसेच देहभावाच्या अहंकाराने भोगी होऊन; लाभलेल्या नरदेहाला स्वस्वरूप होता येण्याची मिळालेली संधी गमावता कामा नये हे सांगण्यासाठी प्रत्येक क्षणी, देहाची नश्वरता स्पष्ट केली. मर्त्यतेची अनिवार्यता सांगितली.

(१५) संतांच्या विवेचनात सर्वसामान्य जनांचा आध्यात्मिक उद्धार करण्याची तळमळ होती. म्हणूनच नित्य कर्मांकडे लक्ष्य वेधून संतांनी प्रबोधन केले. संतांची ही लोकनिष्ठ अध्यात्म दृष्टी 'बुडति हे जन न देखवे डोळा' आणि 'करी लाभावीण प्रिती' या स्वरूपाची होती. सच्चिदानंदस्वरूप अशा निजरूपाने स्वसंवेद्यपणे स्वस्वरूप समजून घेण्यासाठी अनेकरूपे नटण्याचा प्रकृतिस्वरूप उत्सव मांडला. त्यातील एकरूप म्हणून लाभलेल्या नरदेहाने सच्चिदानंदस्वरूप होण्यासाठी जीवनोत्सव करावा व अंतिम लक्ष्य गाठून जीवनमुक्त व्हावे. अर्थात स्वहित करावे म्हणजेच ठायीचे सच्चिदानंदस्वरूप असे व्यापकत्व मनोस्वरूपाने अनुभवावे असे संतांना वाटत होते. म्हणूनच संतांनी भक्तियोगमार्ग सुचवून नामभक्तीचा उत्सव मांडला.

जीवन हा उत्सव आहे असे समजून, जीवन अनुभवले तर शाश्वत सुखाचा अर्थात सोलीव सुखाचा अर्थात सच्चिदानंदाचा अनुभव घेता येईल. यासाठीच संतांनी भक्तीची वहिवाट प्रशस्त केली आहे. त्यासाठी अंतरीचा देव बाहेर राऊळात साकार स्वरूपात मांडून; सर्वसामान्यांना या उत्सवात प्रेरित करण्याचे कार्य संतांनी केले. या योगाने याची देही याची डोळा मनोस्वरूपाने सच्चिदानंदस्वरूप उत्सव भोगता येण्याचा मार्ग संतांनी स्वानुभवातून सामान्य लोकांपर्यंत पोचविला आहे, हे लक्षात घेऊन जीवनोत्सव जाणून जगावे.